CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संस्थान

(भा० २)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कृपया इस ग्रन्थको निम्नांकित तिथि पर या उसके पूर्व
लौटा दें। विलम्बसे लौटानेपर ५ पैसे
प्रतिदिन दण्ड देना होगा।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

C0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGango

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanas

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जैन वाङ्मय कुसुममाला पुष्प १० वें

बृहत्कथाकोश

भाग २ रा.

प्र० २

मूळ लेखक

श्रीमत् हरिषेणाचार्य

संपादक

अज्ञात

८२८

मिति श्रावण शु॥ ५ वी. सं. २४६६ } किंमत १ रुपाया { आवृत्ति पहिली

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रकाशक
मोतीलाल हिराचंद गांधी
उस्मानाबाद

मालेचीं पुस्तकें

१ साधुशिक्षा	शिल्लक नाहीं.
२ सज्जनचित्तवल्लभ	किं. २ आणे.
३ आत्मसिद्धि	किं. ४ आणे.
४ पुरुषार्थ सिद्ध्युपाय	किं. १० आणे.
५ तत्वपाळ	किं. ८ आणे.
६ महावीर चरित्र	किं. १॥ रु.
७ बृहत्कथाकोश भाग १ ला	किं. १ रु.
८ कमळकाव्य	किं. १२ आणे.

पुस्तकें मिळण्याचा पत्ता
प्रकाशकाकडे

मुद्रक
लक्ष्मण भाऊराव कोकाटे
हनुमान ३०० सदाशिव पेठ पुणें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

थोडक्यांत

पहिल्या भागानंतर आज जवळ जवळ दोन वर्षांनीं हा दुसरा भाग जैनवाङ्मय कुसुममालेचें पुष्प १० वें म्हणून प्रसिद्ध होत आहे. मूळ ग्रंथकारानी आपल्या कथेचा अनुक्रम १५७ दिला आहे. त्यांत सम्यक्त्वकौमुदीसारख्या मोठ्या कथा भिन्न भिन्न दाखविल्या आहेत. त्या एका कथेखालीं मोडता, येतात. म्हणून आम्ही त्या एका कथेखालीं घेऊन एकंदर कथा १४८ केल्या आहेत. म्हणून कथेची संख्या कमी दिसते. पण मुळांत जेवढा भाग तेवढाच भाग यांतहि आहे कमी नाहीं. पण क्रमांक कमी झाला एवढेच. हा कथाभाग छापून वेळेवर दिल्याबद्दल श्री. कोकाटे मालक हनुमान प्रेस यांचा मी आभारी आहे. पूर्वीप्रमाणें याही पुस्तकाचा वाचक परामर्ष घेतील अशी आशा बाळगतो. कांहीं दोष राहून गेले असतील त्याबद्दल क्षमस्व.

श्रावण शु॥ ५ वीर संवत् २४६६

आपला सर्वांचा नम्र
अज्ञात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनुक्रमाणिका

कथा		पान
६७ वी	यशोधर चरित्र	१ ते १६
६८ वी	यमपाश	१६ ते २०
६९ वी	असत्यभाषणी पर्वत व राजा वसु	२० ते ३५
७० वी		३५ ते ३६
७१ वी	श्रीभूती	३६ ते ५२
७३ वी	वारत्रय शिववर्मा	५२ ते ५६
७४ वी	द्वीपायन मुनि	५६ ते ६३
७५ वी	कंडारपिंग	६४ ते ६६
७६ वी	कौरवपाण्डवयुद्ध	६६ ते ७१
७७ वी	रामारावण कथा	७२ ते ७४
७८ वी	राजा देवराति	७४ ते ७९
७९ वी	सिंहदत्त	७९ ते ८१
८० वी	दुष्टाचरणी वीरमती	८१ ते ८४
८१ वी	रोहिणी	८५ ते ८६
८२ वी	सीताशुद्धि	८७
८३ वी	जिनदासीचें शुद्धिकरण	८७ ते ८८
८४ वी		८८ ते ९०
८५ वी	संसार वृक्ष कथा	९० ते ९१
८६ वी	श्रेष्ठी चारुदत्त	९१ ते १०८
८७ वी	मुनि शंकर	१०८ ते ११०
८८ वी	राजा कूपकार	११० ते ११२
८९ वी	भग्नपाराशर	११२ ते ११६
९० वी	रुद्र	११७ ते १२६
९१ वी	मुनि नमि	१२७ ते १३३
९२ वी	वशिष्ट उत्पत्ति	१३४ ते १३७
९३ वी		१३७ ते १३८

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा		पान
९४ वी		१३८ ते १३९
९५ वी	जिनदत्त	१३९ ते १५५
९६ वी	लोभी पिन्याक गंध	१५६ ते १५८
९७ वी	श्रेष्टी स्पट हस्तक	१५८ ते १७२
९८ वी	समक्त्वी प्रियंगू तिलका	१७३ ते १८४
९९ वी		१८४ ते १८५
१०० वी	राणी–रुक्मिणी	१८५ ते १९०
१०१ वी	संभूति–मुनि	१९० ते १९२
१०२ वी	मानी पुष्पदंता	१९२ ते १९४
१०३ वी	ऋषभपुत्र मरीची	१९४
१०४ वी	कुलाभिमानी भुजंग	१९४ ते १९७
१०५ वी		१९७ ते १९८
१०६ वी	गंधर्वदत्त व पांचाळ	१९८ ते १९९
१०७ वी	जिव्हालोलूप नरपति भीम	२००
१०८ वी	श्रेष्ठि भर्तृमित्र	२०१ ते २०४
१०९ वी	व्यभिचारी नागदत्ता	२०४ ते २०५
११० वी		२०६ ते २०८
१११ वी	राजा–सगर	२०८ ते २०९
११२ वी	सिंहबल कुंभार	२०९ ते २१०
११३ वी	श्रेष्टिपुत्र महीष	२१० ते २१३
११४ वी	यमदग्नि व कामधेनु	२१३ ते २१४
११५ वी	लढवय्या सिंहकेसरी	२१४ ते २१५
११६ वी	पौरुषवान् नीलसिंहराजा	२१५ ते २१६
११७ वी		२१६
११८ वी	सुकुमार मुनि	२१६ ते २२७
११९ वी	मुनि सुकौशल	२२७ ते २३९

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा		पान
१२० वी	मुनिगजकुमार	२३९ ते २४०
१२१ वी	मुनीसनत्कुमार	२४१ ते २४४
१२२ वी		२४४ ते २४५
१२३ वी	भद्रबाहूमुनी	२४५ ते २४९
१२४ वी		२४९
१२५ वी	मुनीधर्मघोष	२४९ ते २५०
१२६ वी	श्रीदत्तमुनी	२५० ते २५३
१२७ वी	वृषभसेनमुनी	२५३ ते २५६
१२८ वी	कार्त्तिकमुनी	२५६ ते २५८
१२९ वी	मुनि अभयघोष	२५८
१३० वी	राजा विद्युच्चर	२५९ ते २६२
१३१ वी	गजकुमारमुनी	२६३ ते २७०
१३२ वी	चिलातपुत्र	२७० ते २७१
१३३ वी		२७२ ते २७३
१३४ वी		२७४
१३५ वी	चाणाक्य-मुनी	२७४ ते २७८
१३६ वी	मुनी वृषभसेन	२७८
१३७ वी	बाल सम्यक्त्वी श्रीपाल	२७८ ते २८१
१३८ वी		२८१
१३९ वी	शालिसिक्त मत्स्य	२८१ ते २८२
१४० वी	सुभोम चक्रवर्ती	२८२ ते २८३
१४१ वी	दोन दरिद्री	२८३ ते २८४
१४२ वी	धनदेव वसंततिलका	२८४ ते २८७
१४३ वी		२८७
१४४ वी	सुदृष्टि मुनी	२८७ ते २८८
१४५ वी	धर्मसिंह	२८८ ते २८९
१४६ वी	वृषभसेन	२८९ ते २९०
१४७ वी	राजा जयसेन	२९० ते २९२
१४८ वी	शकटालमुनी	२९२ ते ३००

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बृहत् कथाकोश.

कथा ६७ वी

यशोधर मुनी

अवंतिदेशांतील उज्जयनी नगरींत राजा कीर्त्योघ आपल्या चंद्रमती राणीसह राज्य करीत होता. त्यांचा पुत्र यशोधर अति रूपवान् गुणी व विनयसंपन्न होता. त्याची अर्धांगी अमृता अत्यंत आवडती होती. त्यांना यशोमती नांवाचा एक मुलगा होता. तोहि बापाप्रमाणें विनयाचारसंपन्न गुणी होता. एकदां कीर्त्योघराजा दर्पणांत आपलें मुखावलोकन करीत असतां त्याला आपल्या डोईचे केस पांढरे झालेले दिसले. तो विरागी बनला. मुलाला आपला राज्यकारभार सोंपवून त्यानें अभिनंदनस्वामीजवळ दैगंबरी दिक्षा घेतली.

यशोधर पुढें आपल्या मंत्रिमंडळासह सुखानें राज्य करूं लागला. अमृता राणी विषयी होती. ती आपला काल सुखोपभोगांत घाल-वीत असे. तिला यशोधरामुळें संतुष्टता प्राप्त होत नसे. तिचा संबंध एका कुब्जाशीं जमला. ती त्याच्या सहवासांत आपला काळ घालवूं लागली. एकदां ही गोष्ट राजाच्या नजरेला आली. त्याला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तिचा तिटकारा वाटला. त्याचें मन उदास बनलें. त्याचें विचार त्याच दिशेनें वाहूं लागले.

दुसरे दिवशीं तो आपल्या मातेला म्हणाला 'अंबिके'! आज रात्रौं शेवटच्या प्रहरीं मला एक स्वप्न पडलें. त्यांत मी घराच्या पायऱ्या उतरीत असतां सातव्या पायरीवरून खालीं पडलों असतां मला माझ्या कर्मचाऱ्यांनीं उठविलें व माझी अवास्तव स्तुति केली. त्यामुळें मला वैराग्य उत्पन्न झालें व मी दिगंबरी दिक्षा ग्रहण केली. यावर चंद्रमति माता म्हणाली "बाळा, तुझें स्वप्न अगदी अशुभ आहे. आपल्या कुलदेवतेची आपल्या हातांनीं जीवहिंसा करून पूजा केल्याशिवाय या स्वप्नाची शांतता होणार नाहीं. तर तूं शांती कर्मकर. म्हणजे दीक्षा घेतल्याप्रमाणें होईल." मातेच्या आज्ञेप्रमाणें यशोधरानें तिला बरोबर घेऊन कुलदेवतेपुढें शांतिकर्म विधान केलें व पिठाचा कोंबडा बळी दिला. त्या पापामुळें महादेवी व यशोधर मोदकांतील विषांनीं मरण पावले. यशोधर मरून दक्षिण दिशेकडील एका हिमवान् पर्वतावर मयूर होऊन जन्मला.

कोणी एका गृहस्थानें त्याच्या आईस मारून यशोमती कुमारास नजर करण्यासाठीं तो मयूर धरून आणला. यशोमतीनें तो मयूर आपल्या राजसौधावर सोडला. चंद्रमति त्याची माता मरून करहाट प्रांतांत सुंदर कुत्री जन्मली. ती कुत्री राजदरबारांत आणून सोडण्यांत आली. ती सुंदर असल्यामुळें राजाला आवडली व त्यानें आपल्या राजवाड्यांत रक्षणासाठीं ठेवून घेतली.

एकदां प्रासादसौधावरून मयूरानें खिडकींत उज्जल दीप जळत असलेला पाहिला. तो त्यास जातिस्मरण झालें. तो अंत:पुरांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ळा. तेथें अमृता कुबड्याच्या मांडीवर बसली होती. त्यांचें द्वंद्व चाललें होतें. हें मोरानें पाहतांच त्याला त्वेष चढला. तो त्यांचें अंगांवर धावून गेला व त्यानें आपल्या चोंचीनें त्यास टोंच मारून घायाळ केलें. पण त्याचा निभाव थोडाच लागणार होता ? भयानें घाबरून गेला. परत सौधावर आला. त्याचें अंग सारखें कांपत होतें. इतक्यांत यशोमतीहि आपलें द्यूत खेळण्याचें सोडून राजानें त्याचे पाठीमागें आला. मयूर घाबरलेला पाहून कुत्राहि धांवत पळून आला व त्याच्यावर झडप घालून कुत्र्यानें त्याचा प्राण घेतला. राजाला कुत्र्याचा राग आला. त्याच्या डोक्यावर आपल्या हातांतील फांसे जोरानें मारले. मस्तकावर आघात जोराचा झाला व त्यांतच तो गतप्राण होऊन भूमीवर पडला. कुत्रा राजाचा अतिशय आवडता होता. त्याच्या मृत्युमुळें त्याला अत्यंत दुःख झालें. त्यानें चंदनाचें लांकडांत त्याला जाळलें. त्याच्या अस्थि मंदाकिनी नदींत नेऊन टाकल्या व त्याच्या स्मरणार्थ लोकांना सुवर्ण-रत्नें-वस्त्रें वगैरे दानधर्म केला.

दक्षिण दिशेला सुवेल नांवाचा पर्वत होता. पर्वतावरील झाडी दाट असून त्यांत सिंह, व्याघ्रादि क्रूर हिंसक प्राण्यांची भयंकर वस्ती होती. त्या अरण्यांत मयुराचा जीव मांजर होऊन जन्मला. जन्मतांच त्याच्या मातेच्या स्तनांतलें दूध आटलें. अभावीं तो सर्पासारख्या सरपटणाऱ्या जीवांना मारून आपली उपजीविका करूं लागला. पूर्वीचा कुत्राहि त्याच अरण्यांत एक भयंकर कृष्णसर्प होऊन जन्मला. तो एकदां उंदरामागें लागला असतां मांजरानें त्याची शेंपटी धरून ओढलें. त्यानें मागें वळून मांजरास

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चावा घेतला. दोघांची धुमश्चक्री सुरूं झाली. इतक्यांत तिकडून येणाऱ्या तरसानें मांजरास खालीं पाडलें. कृष्णसर्प त्याच्या कुरतडण्यानें मरण पावला. तरसानें मारलेला मांजर मरून सिप्रानदीच्या डोहांत तांबडा मासा झाला. सर्पहि मरून त्याच नदींत भयंकर सुसर झाला. तो मासा सिप्रा नदींत फिरत असतां सुसरीनें त्याच्या शेंपटाला धरलें.

कांहीं दिवसांनीं राजाच्या कुब्जा व ठेंगण्या स्त्रियांचा समुदाय तेथें क्रीडेसाठीं आला. त्यांपैकीं एक ठेंगण्या स्त्रीची नांव क्रीडा करीत असतां त्या सुसरीवर येऊन आदळली. रागाच्या भरांत सुसरीनें त्या माशाचें शेंपूट सोडून दिलें व वामनिकेच्या पायाला धरून ओढलें. ओढतां क्षणींच ती मोठ्यानें ओरडली. तें दृश्य पाहून इतर स्त्रिया क्रीडा करण्याचें सोडून पळून गेल्या व त्यांनीं भयानें कांपत कांपत नरेंद्रास ही गोष्ट येऊन निवेदन केली. राजाला अत्यंत क्रोध चढला. त्यानें सर्व धीवरांना बोलावणें धाडलें. राजाचें बोलावणें ऐकतांच सर्व धीवर राजापुढें गोळा झाले. तेव्हां राजा त्यांना उद्देशून म्हणाला ' धीवरांनों ! आपलीं जाळीं घेऊन सिप्रेच्या डोहांत टाका. जेवढे म्हणून तुम्हांला सुसरी व मासे सांपडतील तीं पकडून आणा.' मासा सुसरेच्या भयानें तो डोह सोडून निघून गेला. जाळ्यांत ती सुसर सांपडली. धीवरांना आनंद झाला. ते राजाकडे ती सुसर घेऊन आले. सुसर पाहतांच राजा म्हणाला ' ही पूर्वजन्मींची वैरी असली पाहिजे. तेव्हां येथून न्या व बांधून टाका. वाईट मरणानेंच मरण आलें पाहिजे. राजाज्ञेप्रमाणें सुसरीला बांधून टाकण्यात आलें. भयंकर वेदनांनीं ती बिचारी मरण पावली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पुढें कांहीं दिवसांनीं धीवराच्या जाळ्यांत तो लाल मासा अडकला. त्यांनीं तो राजास भेट केला. माशाचा रंग वगैरे पाहून अमृता देवीला बरें वाटलें व तिनें त्याच्या पक्कान्नाचें ब्राह्मणांना भोजन देण्याचें ठरविलें. माशाच्या कानांवर तिचें बोल पडतांच त्याला जातिस्मरण झालें. तो अमृत राणीकडे पाहूं लागला. तिचें सांगण्यावरून तो स्वयंपाकघरांत नेण्यांत आला. त्याचे बारीक बारीक तुकडे करून उत्तम पक्कान्न तयार करण्यांत आलें. असें माशाचें जीवित सरलें.

सुसर मरून नदीकाठीं मेंढी—बकरी होऊन जन्मली. तिच्या पोटीं या माशाचा जीव बोकड होऊन जन्मला. पुढें तो मोठा झाला. मोठा होतांच तो आपल्या मातेवर उडूं लागला. तिच्याशीं रतिक्रीडा करीत असतां दुसऱ्या एका बोकडानें त्याच्यावर आपल्या शिंगांनीं जोराचा आघांत केला. त्या आघातामुळें तो पंचत्वाप्रत गेला.

पुढें एकदां राजा यशोमती शिकारीसाठीं फिरत असतां त्याच्या दृष्टीस ही शेळी बकरी पडली. त्यानें तिच्यावर बाण सोडला. बाण तिच्या वर्मीं लागला व त्यांतच तिचा अंत झाला. राजाच्या आज्ञेवरून मातंगांनीं तिचें पोट फोडलें. तो आंतून एक उत्तम बकरें निघालें. राजाला अतिशय आनंद झाला. त्यानें तें बकरें धनगराचे स्वाधीन केलें. धनगराच्या शेळ्या—मेंढ्यांत खेळून तो राहूं लागला. लहानमोठ्या आपल्या बहिणीशीं खेळून तो आपली कालक्रमणा करीत होता.

राजानें पुढें पारध उत्तम मिळण्याच्या इच्छेनें कुलदेवीपुढें उत्तम रेड्याचा बळी दिला. त्याचें मांस प्रसाद म्हणून स्वयंपाकघरांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आणलें. त्याचें उत्तम पक्वान्न करण्याचें ठरलें. पण त्या मांसाला कावळा शिवला. आचाऱ्यानें ही गोष्ट राजास कळविली व म्हणाला राजन्! मांसाला कावळा शिवला आहे. याची शुद्धि व्हावयास पाहिजे. ही शुद्धि बोकडाच्या हुंगण्यानें होते. त्यानें हुंगलें कीं काम झालें. राजानें तशी अनुमति दर्शविली. एक बोकड आणण्यांत आलें. तें स्वयंपाकगृहांतील मांसाजवळ आलें तोंच त्याला जाति-स्मरण झालें. बोकडाला पाहून अमृता राणी म्हणाली 'मला रेड्याचें मांस आवडत नाहीं. माझ्यासाठीं इतर प्राण्यांचें मांस शिजवून अन्न केल्यास बरें.' तेव्हां राजा स्वयंपाक्याला उद्देशून म्हणाला हें पहा अनायासें हा बोकड आणला आहे; तेव्हां यालाच मारून त्याच्या मांसाचें पक्वान्न तयार करा. राजाच्या हुकुमाप्रमाणें स्वयंपाक्यानें त्याचा डावा पाय कापून त्याचें उत्तम पक्वान्न तयार केलें व तें महादेवीला वाढलें. एक पाय लंगडा झाल्यामुळें बोकडाला वेदना होऊं लागल्या. त्यांतच त्याला भूकहि लागली. पण तसाच तो निचेष्ट राहिला.

राजानें मारलेला चंद्रमतीचा जीव शेळी मरून कलिंगदेशांत एक मोठा रेडा होऊन जन्मला. एका व्यापाऱ्यानें पुष्कळशा रेड्यां-वर सामान लादून उज्जयनीस घेऊन आला. त्यांत तो रेडा होता. तो रेडा सामानाच्या ओझ्यानें अगदीं थकून गेला होता. वरील भार उतरतांच तो आपला थकवा हरण्यासाठीं सिप्रा नदीच्या पाण्यांत शिरला. नदींत राजाचा घोडा पोहत होता. या रेड्यानें त्याला आपल्या शिंगानें भोंसकून मारलें. ही गोष्ट पोतदारानें राजास कळ-विली. राजाला वाईट वाटलें. त्यानें रेड्यास धरून आणण्याचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हुकूम केला. धरून आणतांच त्याचे चारी पाय मजबूत दोरींनें बांधले. भयंकर मोठी चूल पेटविण्यांत आली. त्यावर भली मोठी कढई ठेवण्यांत आली. त्यांत तेल वगैरे पदार्थ टाकून तें गरम करण्यांत आले. त्या गरम तेलांत हा रेडा टाकून दिला. बिचारा होरपळून मरण पावला. लंगडा बोकडहि शिल्लक होताच, त्याची तीच गति झाली. अशा रीतीनें ते दोघेही तेलांत भाजून मरण पावले. जीवांना दुःख दिल्यानें मानवांना कोणती दुर्गती प्राप्त होणार नाहीं ? व कोणकोणतीं दुःखें भोगावीं लागणार नाहींत बरें ? जसें कर्म करावें तसा भोग भोगावा लागतोच, असो !

उज्जयनी नगरींतल्या मांगवाड्यांत पुष्कळशीं कोंबडीं, कुत्रीं अगदीं सलोख्यानें, प्रेमानें राहत असत. त्यांत हे माता–पुत्र, कोंबडा कोंबडी होऊन जन्मलीं. दिसायलाहि अगदी सुंदर होतीं. मांगानें तीं राजाला नजराणा म्हणून दिलीं. यशोमति तें जोडपें पाहून आनंदला. उघडच आहे. पूर्वींचा संबंध थोडाच तुटतो ! मातापित्यांना पाहतांच कोणत्या मुलाला आनंद होत नाहीं ? चंडकर्म्याला तें जोडपें सांभाळण्यासाठीं म्हणून राजानें दिलें व राजा रतिक्रीडेसाठीं आपल्या स्त्रीपरिवारांसह उद्यानांत निघून गेला. चंडकर्म्यानें तें जोडपें लोखंडी पिंजऱ्यांत बंद केलें व तोहि राजोद्यानांत आला. तेथील भव्य प्रासादाला नानाप्रकारचे पडदे लाविलेले होते. त्यामुळें तो अधिक मनोहर दिसे. त्याच्या पूर्वेच्या अंगाला ह्या जोडप्यांना क्रीडा करण्यासाठीं पिंजऱ्यांतून मुक्त केलें.

उद्यानांतील एका अशोक वृक्षाखालीं सागारधर्मी मुनी सरळ नासाग्रावर दृष्टी ठेवून एकतानतेनें ध्यान करीत बसले होते. चंड-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कर्म्याची त्यांच्याकडे नजर गेली. त्याला क्रोध चढला. ह्या उद्यानांत किडे–मुंग्यांना देखील शिरकाव मिळत नाहीं. तेथें हा नागडा ध्यान करण्यास बसला आहे. यानें आपल्या स्पर्शानें हें पवित्र स्थळ अपवित्र करून टाकलें. बोलूनचालून मांग. त्याचे विचार तसे असणारच ! यांत काय शंका ? मुनींचें ध्यान सरत आलेलें पाहून तो मुनीकडे आला आणि त्यांना वंदन करून म्हणाला ‘ तुम्हीं जगविख्यात लोकांनीं हें ध्यान कशासाठीं आरंभिलें तें सांगावें ! ’ मुनी उत्तरले ‘ बाबारे ! या संसारांत आम्हीं अतिशय भटकलों. नानाप्रकारचीं असह्य दुःखें भोगलीं. नाना प्रकारचे देह धारण केले. तरी या संसाराचा पार येईना. म्हणून त्यांतून मुक्त होण्यासाठीं हा मार्ग स्वीकारला आहे. त्यावर चंडकर्मा म्हणाला ‘ जीव व शरीर हें भिन्न भिन्न आहेत काय ? ’ मुनी अवधिज्ञानी व अकरांगांचे पाठी होते. ज्ञानी होते. ते उत्तरलें “ यांत कांहीं संशय नाहीं. देह भिन्न असून जीवहि भिन्न आहे. त्याचा आणि देहाचा कांहीं संबंध नाहीं. ” “ पण या संसारारण्यांत नाना योनींतून भटकत असणाऱ्या जीवाचे शरीर व जीव एक आहे तें कधीं भिन्न भिन्न असें दिसून येत नाहीं. कारण एका चोराला तळघरांत कोंडून ठेवलें; त्या तळघराचीं भोंकें लाखेनें अगदीं बंद केलीं. वाऱ्याला देखील आंत शिरकाव करतां येणार नाहीं. इतका बंदोबस्त केला. त्यामुळें तो मरण पावला. पण त्यांतून जीव बाहेर येतांना दिसत नाहीं. म्हणून मला वाटतें जीव व शरीर एकच आहे. ” हें चंडमारीचें प्रत्युत्तर ऐकून मुनी म्हणाले “ हे पहा ! तळघरांतल्या माणसानें शंख वाजविला तर त्याचा ध्वनि लोकांना ऐकूं येतो; पण तो ध्वनि कोणी पाहिला आहे काय ?

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

फक्त शब्दच ऐकूं येतो. तद्वतच या जीवाचें आहे. म्हणून या वचनांवर विश्वास ठेव. जीव व शरीर अगदीं भिन्न भिन्न आहेत. ” “ आपलें म्हणणें मला अजून पटत नाहीं. तें मिथ्या वाटतें. कारण ही चोराची तुलना केली त्यावरून जीवहि तोच जीव वाटतो. म्हणून जीव व शरीर हे एकच होत. ” तेव्हां मुनी म्हणाले ऐक ! “ तुला एक दृष्टांत सांगतो. त्यानें तुझी खात्री पटेल ! एका गोपालकानें बाणाचा भाता वाऱ्यासुद्धां समसमान वस्तूंशीं तोलून पाहिला. नंतर तो वातहीन भाता पुन्हां त्याच वस्तूंशीं तोलून पाहिला. तेव्हां त्यास दोन्हींही सारख्याच प्रमाणांत असल्याचें दिसून आलें. तद्वतच या देहाचें व जीवाचें आहे. म्हणून जीव व देह हे अगदीं भिन्न भिन्न होत.” जीव तो जीव व शरीर तें शरीर हें मुनीचें वचन ऐकून चंडकर्मा पुन्हां म्हणाला “ मुनीवर्य ! त्या मनुष्याच्या शरीराचे कापून अगदीं बारीक बारीक तुकडे केले. आणि तो प्रत्येक तुकडा बारकाईनें शोधून पाहिला पण कोठेंही जीवखंड दिसला नाहीं. तेव्हां शरीर व जीव हें एक, हेंच खरें ! ” तेव्हां पुनः मुनी उत्तरले, “ माझें म्हणणें शांत चित्तानें ऐक ! एकजण अरणीदंडाला (अग्नि उत्पन्न करणारें लांकूड) कापीत होता. कापतांना घर्षणानें अग्नि उत्पन्न होई. तो जसाजसा कापीत जाई तसातसा त्यांतून अधिकाधिक विस्तव निघे. तेव्हां त्यानें अरणीदंडाचे अगदीं बारीक तुकडे केले, पण त्यांत कोठेंही विस्तव दिसून आला नाहीं; कारण तो घर्षणानें उत्पन्न होत होता. घर्षणच बंद झाल्यामुळें तो त्यांत दिसणार कसा ? तद्वतच या शरीरखंडांत हा जीव राहतो. प्रत्यक्षाभावामुळें तो जीव असूनहि जगाला दिसत नाहीं, म्हणूच तो व शरीर एक मानणें योग्य नव्हे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अरणीदंडाप्रमाणें त्याचा व शरीराचा संबंध असून ते दोघें अगदीं भिन्न भिन्न आहेत. त्याचा धर्म वेगळा व याचा धर्म वेगळा आहे." मुनीराजाच्या उत्तरानें चंडकर्मा निरुत्तर झाला. त्याची खात्री पटली. त्यांनीं मुनींना धर्माचें स्वरूप विचारलें मुनी म्हणाले " ऐक. चंडकर्म्या ! या धर्मामुळें जगांत सौभाग्य, धनसंपत्ती, दीर्घायुष्य, आरोग्य प्राप्त होतें. एवढेंच नव्हे तर प्रत्येक गोष्टीची देखील सहजा सहजीं प्राप्ती होते. धर्मासारखें चिंतामणि रत्न या जगांत दुसरें कोणतेंहि नाहीं. " धर्मेन सर्वे वशा: " या साठीं तू धर्माची कांस धर! प्रथम तूं गृहस्थ धर्माचा स्वीकार कर ! ह्या गृहस्थधर्मांत प्रथम मनुष्यानें श्रावकत्वाची दीक्षा घ्यावी लागते. त्या साठीं पंचोदुंबर फळाचा, तीन प्रकाराचा त्याग करावयाचा असतो. नंतर हळूंहळूं बारा व्रतें ग्रहण करीत त्याचें पालन सम्यक्पूर्वक करावें. गृहस्थाची पूजा वगैरे षड् आवश्यक कर्में पाळावीं म्हणजे या संसारांतून मुक्त होण्याचा मार्ग सहजासहजीं हातीं लागतो. तेंच खरें सुख आहे." एवढें म्हणून मुनींनीं त्याला पंचाणु वृतांचें जिनगुणकर्माचें व चार शिक्षावृतांचें स्वरुप निवेदन केलें. पंचनमस्काराचें व अहिंसेचें महत्व समजावून सांगितलें. रात्रीं भोजनापासून घडणाऱ्या पापाचें व त्याच्या फळाचें वर्णन केलें. हें सर्व ऐकून चंडकर्मा म्हणाला "मुनीवर्या ! हीं सर्व कर्में क्रमाक्रमानें मी पाळूं शकेन. पण माझ्यानें जीवहिंसेचा त्याग करवणार नाहीं. तो माझा कुलधर्म आहे. कुलधर्माचा त्याग केल्यानें घोर पातक भोगावें लागतें. तेव्हां तें वृत माझ्यानें होणार नाहीं." त्याचा सद्भाव पाहून मुनी म्हणाले ' जीवहिंसेचें पातक अधिक आहे. तूं त्याचा त्याग करणार नाहींस तर इतर धर्माचें अंगीकरण करून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

न करून सारखेंच होय. कुलधर्माचा त्याग न केल्यामुळें किती दुःख परंपरा भोगावी लागते याची तुला कल्पना नाहीं. ही विचारी कोंबडी पहा ! आपल्या कुलधर्माला चिकटून राहिल्यामुळें त्यानीं आजपर्यंत कितीतरी दुःखें भोगलीं आहेत आणि अजूनहि भोगतात. तेव्हां तुलाहि त्यांच्यासारखें दुःख भोगावयाचें नसेल तर त्या कुलधर्माचा त्याग कर ! हिंसेसारखें दुसरें जगांत पातक नाहीं." चंडकर्मा विचारांत पडला. त्याच्या मनांत सद्भावना उत्पन्न झाली. तो कोंबडयाचा पूर्वभव जाणून घेण्याच्या उद्देशानें म्हणाला 'हे कोण होतें; यांना दुःख कां झालें ? व कसें झालें ? हें मला सांगा !' नंतर मुनीनीं त्यास यशोधर चंद्रमतीच्या जन्माची आजपर्यंतची हकीगत सांगितली. तें ऐकून चंडकर्मा संसाराच्या दुःखाला भ्याला. त्यानें कुलधर्माचा त्याग करून जैन धर्माचा स्वीकार करण्याचें कबूल केलें. नंतर अणुवृतादिक वृतांचें सम्यक्त्वपूर्वक ग्रहण केलें.

जवळच तें कोंबडयाचें जोडपें होतें. मुनींच्या तोंडून आपलें पूर्वभवांत्तर व जिनधर्माचें स्वरुप ऐकून त्यांच्याहि मनांत धर्माचें तत्व बिंबलें. नव्हें तें त्यांनीं ग्रहण केलें आणि ग्रहण केलें हें दाखविण्यासाठीं ते मोठ्यानें ओरडले.

त्यांचा तो शब्द यशोमतीच्या कानांवर आला. तो आपल्या प्रियेस म्हणाला 'कुसुमावलि, बघ ' तुला मी आपले शरसंधानकौशल्य दाखवितो ! एवढें म्हणून त्यानें धनुष्यास बाण लावून शब्दानुरोधानें तो बाण सोडला. बाण नेमका त्या कोंबडयांना जाऊन लागला. दोघेहि गतप्राण होऊन पडले.

इकडे कुसुमावतीला गर्भ राहिला. त्या गर्भांत या दोन्हीं कोंब-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ब्याचा जीव वाढूं लागला. नव मास पुरें होतांच कुसुमावतीनें दोन बालकांस जन्म दिला. कन्या व पुत्र दोघेहि गुणी निघाली. एकदां विहार करीत आपल्या संघासह सुदत्तमुनीं उज्जयनी जवळील अरण्यांत आला. मुनीना झाडांखालीं बसलेलें पाहून त्यास अपशकून वाटला. त्यानें त्यांच्या अंगावर आपलें कुत्रें सोडलें. कुत्रें प्रथम जोरानें अंगावर धांवून गेलें. पण जवळ जातांच त्यांचा उत्साह मावळला. ते शांत बनलें. मुनींना प्रदक्षिणा घालून त्यांचें भोंवतीं स्वस्थ उभे राहिले. राजाला अत्यंत त्वेष चढला. तो रागाच्या भरांत स्वतः हातांत तरवार घेऊन मुनींना मारण्यास धावला. पण कल्याणमित्रानें त्याला त्यापासून रोकून मुनीपुढें आणलें. मुनीना पाहतांच त्याचे विचार पालटलें तो स्वतःला विचारूं लागला व या दुष्कृत्याचें प्रायश्चित्त म्हणून त्यानें आपलें शीर मुनीचरणीं वाहण्याचें ठरविलें. त्यानें मुनींना वंदन केलें. मुनी अवधिज्ञानी होते. त्याच्या मनांतला भाव जाणून ते म्हणाले, ‘ राजा ! तुला असें करणें योग्य नव्हे. अविचारानें पुष्कळश्या गोष्टीं जगांत घडतात. त्यातलीच ही गोष्ट होय. कृति घडण्यापूर्वीं तुला पश्चात्ताप झाला आहे; आणि हेंच प्रायश्चित्त पुरें आहे. तूं आतां अविचार करूं नकोस ! आपल्या मनांतली गोष्ट मुनींनी जाणलेली पहातांच यशोमतीला मुनीबद्दल जास्त आदर वाटूं लागला. तो आश्चर्यानें पहात कल्याणमित्रास म्हणाला ‘ मित्रा, माझी मनोगत गोष्ट यानें जाणली ’ ! तो म्हणाला राजा ! एवढीचशी गोष्ट काय पण मुनी आपल्या ज्ञानानें भूत, भविष्यकालीनहि गोष्टी जाणतात. एखादी गोष्ट विचाराविशी वाटत असेल तर विचारून पहा ! तेव्हां राजा उत्सुकतेनें म्हणाला ‘ मुनिवर्या !

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मा‍ॽ, वडील, माता, आजोबा कोणत्या गतिला गेले हें सांगण्याची कृपा करावी.'

मुनी सांगू लागले."राजा! तुझे पितामह कीर्त्योघ दिगंबर दीक्षा घेऊन दिवंगत होऊन स्वर्गाचें सुख भोगीत आहेत. अमृतादेवी तुझी माता आपल्या जारकर्माच्या पातकामुळें स्वतःच्या पतीस मारून सहाव्या नरकास गेली असून तेथील दुःखें भोगीत आहे. तुझे वडील यशोधरराजा अर्जिका त्याची माता, तुझी आजी चंद्रमति तुझ्या पट्टबंधनानिमित्त कात्यायनी देवीपुढें स्वतःच्या हातांनीं कोंबडा मारल्यामुळें तिर्यग् योनीला गेले आहेत. तेथून अनेक जन्म घेऊन कोंबडीद्वय झाले. कोंबड्याच्या जन्मांत त्यांना जिनधर्मामृत पान करण्यास मिळालें. ते तुझ्याच बाणाला बळीं पडले. मरून तुझ्या प्रियेच्या—कुसुमावतीच्या—पोटीं मुलगा अभयरूची व अभयज्ञा मुलगी होऊन जन्मले आहेत. मुनीच्या तोंडून आपल्या पूर्व घराण्याचें भवांतर ऐकून राजानें मित्रमंडळीसुद्धां मुनीजवळ दीक्षा घेतली. अभयरूची व अभयमती जवळच होते. त्यांनाहि आपल्या जीविताचा धिःकार वाटला. त्यांनीं मुनींना वंदन करून दीक्षा मागितली. तेव्हां मुनीं म्हणाले " बाळांनों! तुम्हीं अद्यापि अज्ञ असून लहान आहांत. तुमच्या हातून परीषह सहन होणार नाहींत. तूर्त दिगंबरी दीक्षा घेऊं नका. क्षुल्लकव्रताची दीक्षा तुम्हांला योग्य आहे. तेव्हां मुनीच्या आज्ञेप्रमाणें त्या दोघांनीं क्षुल्लकव्रताची दीक्षा घेतली.

योधेय देशांत राजपूर नांवाची नगरी होती. तेथें मारीदत्त राजा राज्य करीत असे. मारीदत्त देवीभक्त होता. या नगरीच्या दक्षिण-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिशेला एक चंडमारि नांवांच्या कुळदेवतेचें एक मोठें भव्य मंदिर होतें. मारीदत्त स्वहस्तानें जीव वध करून त्या देवीची भोळ्या भक्तीनें पूजा करी. जेव्हां कोणी तिची पूजा करीत नसत तेव्हां कुळदेवता आपल्या भक्तांना मारीत असे. एकदां मारीदत्त देवीच्या देवळांत गेला होता. त्यावेळीं सुदत्तमुनी आपल्या संघासह त्या नगरीस आले. आणि उद्यानाजवळील स्मशानांत येऊन उतरले.

देवीच्या पुढें बळी देण्यासाठीं पुष्कळशीं, कोंबडीं बकरीं, वगैरे प्राणि गोळा केले होते. पण राजाला याचा बळी अति क्षुल्लक वाटला. एखादें मानवी जोडपें बळी दिल्यास देवी आणखी जास्त प्रसन्न होईल म्हणून तो कर्मचाऱ्यांना म्हणाला 'जा ! एकादें मानवी जोडपें देवीच्या प्रसादासाठीं घेऊन या.' कर्मचाऱ्यांना ती आज्ञा राजाची नसून देवीचीच वाटली. तात्काळ ते शोधासाठीं निघाले. रस्त्यांतून जात होते इतक्यांत मुनींना नमस्कार करून अभयरुचि व अभयमति क्षुल्लक नगरांत आहारासाठीं प्रवेश करीत होते. तें जोडपें कर्मचाऱ्याच्या दृष्टीस पडलें. आपल्या कामास हेंच योग्य होत असें त्यांनीं परस्परांत ठरविलें. क्षुल्लक–क्षुल्लकिनीनें तें भाषण ऐकलें. त्यांनीं मन दृढ केलें. नंतर कर्मचाऱ्यांनीं पकडून राजापुढें आणून त्यांना सोडलें. राजा देवीपुढें हातांत खड्ग घेऊन उभा होता. क्षुल्लकद्वयांनीं देवळांत प्रवेश करतांच तुझें यश चिरकाल वाढो ? तुझी कीर्ति दिगंतरी पसरो ! असा जयजयकार केला.

आपल्या पुढें तेजस्वी सुंदर जोडपें पाहून मारीदत्तास आश्चर्य वाटलें ! तो म्हणाला, 'आपण कोणत्या कारणांनीं ही दीक्षा ग्रहण केली ? आपण कोण ? हें स्पष्ट सांगण्याची कृपा करावी.' तेव्हां

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सर्व क्षुल्लकांनीं आपली हकीकत सर्व लोकांसमक्ष सांगितली. त्याचा परिणाम मारिदत्ताच्या मनांवर इष्ट असा झाला. त्यानें हातांतील खड्ग टाकून दिलें व जीववध करण्याचें रहित केलें. इतक्यांत देवीनेंही आपलें उग्र स्वरूप टाकून दिलें. तिनें तीन प्रदक्षिणा घालून त्याच्या चरणीं लोटांगण घातलें व म्हणाली ' भो मुनिवर ! मला संसारार्णव तारिणी दीक्षा द्या ! ' तेव्हां क्षुल्लक म्हणाले ' भद्रे ऊठ नरकगतीला जाणाऱ्या देवतांना, मनुष्यांना दीक्षा नसते. त्यांना दीक्षा देता येत नाहीं. तुझ्या योग्यतेचा आम्हीं धर्म सांगतो. त्याचें तूं पालन कर ! देवीनें तथास्तु म्हणताच त्यांनीं तिला सम्यक्त्वपूर्वक जिनपूजा करावयास सांगून जीववध पुढें कधींहि न करण्याचें सांगितलें. चंडमारीनें तें व्रत ग्रहण केलें. नंतर मारिदत्तादिकांकडे वळून म्हणाली ' माझ्या भक्तांनो ! आतां या पुढें माझ्यासाठीं तुम्हीं कधींहि जीव वध करूं नका. केल्यास तुम्हांला मला शासन करावें लागेल. एवढेंच म्हणून ती क्षुल्लकांना वंदन करून अदृश्य झाली. तोंच देवांनीं दुंदुभी वाजवून आकाशांतून त्याचेवर पुष्पवृष्टी केली. स्तुति गायली. मारिदत्ताला आपल्या कर्मांचा वीट आला. तो म्हणाला महाराज ! " मलाहि आपण दीक्षा द्यावी म्हणजे आत्महित करून घेईन. " क्षुल्लक उत्तरलें आम्हीं तुला दीक्षा देण्यास समर्थ नाहीं. आमचे गुरू येथील स्मशानांत आहेत तेच तुला दीक्षा देऊं शकतात. आमची ती पात्रता नाहीं. मारिदत्ताला आश्चर्य वाटलें. तो मनांत म्हणाला ' ज्याचें देवांनीं पूजन केलें अश्यांचे गुरू तरी किती श्रेष्ठ असले पाहिजेत ? त्यांचें दर्शन आतां घेणें योग्य. असें ठरवून तो आपल्या परीवारांसह त्यांचें दर्शनास गेला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सुदत्त मुनींनीं आपल्या अवधिज्ञानानें सर्व प्रकार जाणून आधींच घेतला होता. मारीदत्त जातांच त्याच्या चरणीं लागला व मुनी दिक्षेची याचना केली. त्याचा शुद्धभाव पाहून त्यास मुनींनीं दिक्षा दिली. दीक्षेपूर्वी त्यानें आपलें राज्य मुलांस सोंपविलें. क्षुल्लकिनीनें मुनी दीक्षा घेतली. चतुर्विध आहाराचा त्याग करून त्यांनीं खडतर तपश्चर्या केली व शेवटीं समाधिपूर्वक मरण साधून स्वयंप्रभ विमानांत ते दोघेहि देव झाले.

या धर्मप्रभावामुळें त्यावेळीं कित्येकांनीं जैनधर्म तर कित्येकांनीं श्रावकत्वाचें ग्रहण केलें. उत्तम आराधना करून सदत्त मुनी स्वर्गास गेले. असो !

केवळ पिष्ट जीवाचा वध केल्यामुळें अनेक भवभ्रमण करावें लागलें. तेव्हां जीवांनीं जीववध न करणेंच बरें !

———

कथा ६८ वी

यमपाश

काशी देशांतील वाराणसी नगरींत प्रतापी राजा पाकशासन राज्य करीत होता. त्याच्या राणीचें नांव पौलोमी होतें. द्वारपालाचें नांव यमदंड होतें. त्याची भार्या यमदंडा. यमपाश नांवाचा एक भयंकर दरवडेखोर तेथें राहत असे. त्याची भार्या छब्दि नांवांची होती.

एकदां तेथें महामारीचा उपद्रव सुरूं झाला. त्यामुळें लोक अतिशय जर्जर होऊन गेले. तेव्हां राजानें आठ दिवसपर्यंत कोणी कोणत्याहि जीवाची हिंसा करूं नये व जो कोणी हिंसा या आठ दिवसांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करील त्याचा शिरच्छेद केला जाईल अशी दवंडी फिरविली. गावांत धर्म नांवांचा वाणी राहात असे. तो च्युस्त मांसाहारी होता. एवढेच नव्हें तर तो रक्तपान करीत असे. त्यानें वरील दंवडीकडे लक्ष्य न देतां एका धनगराची (मेंढ्या पाळाची) मेंढी मारली व आपली रक्तपिपासा भागविली. ही गोष्ट राजाच्या कानीं आली. त्यानें त्यास पकडून आणून आजपासून आठव्या दिवशीं तुला फांसावर लटकावण्यांत येईल असें सांगून अंधारकोठडींत बंद करून ठेवलें.

अतिमुक्तक स्मशानांत अमृताश्रव मुनी राहत असत. त्यांना सर्वौषधी विद्या साध्य होती. यमपाल लोकांवरील आलेलें रोगाचें संकट दूर व्हावें म्हणून मुनीकडे आला. मुनीच्या मुखांतून जिनधर्म श्रवण करून एका दिवसासाठीं त्यांनीं अहिंसाव्रत घेतलें व घरीं आला. घरीं येतांच प्रियेस म्हणाला ‘ प्रिये ! राजाचे लोक मला बोलावण्यास येतील तेव्हां मी गावांस गेलों असें सांग.’ आपण स्वतः घराच्या आतल्या भागास जाऊन निजला. तो दिवस धर्माला वध करण्याचा होता. थोड्याच वेळांत यमदंड आला. त्यानें छर्दिकेस विचारलें. ‘ यमपाल कोठें आहे ?’ ती म्हणाली ‘ ते विवाहासाठीं पळसगांवास गेलें आहेत. ’ ‘ ते गांवांस गेलें ही गोष्ट खरी पण आज एकाचा वध व्हावयाचा. त्याच्या ऐवजीं मिळणारें धन दुसऱ्याला जाईल. तेंव्हां तो कोठें आहे तें सांग ! ’ छर्दिकेला पैसा सोडण्याचा मोह आवरेना. तिने डावा हात वर उचलून खुणेनें पतीस विचारलें. त्यानें उलट खुणेनें नकार दिला. हा प्रकार यमदंडाच्या लक्ष्यांत आला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तो छर्दिकेस म्हणाला "दुष्टे! खोटें बोलतेस! चल घराबाहेर निघ!" यमपालाचा नाइलाज झाला. आतां व्यर्थ फजिती करून घेण्यांत काय अर्थ? असा विचार करून चटकन बाहेर आला व यमदंडास नम्रपणें म्हणाला 'कसेंहि करा,' पण मला आज या कामासाठीं नेऊं नका! मी आज मुनीजवळ एक दिवस हिंसा करणार नाहीं असा नियम घेतला आहे. आणि त्या व्रताचा भंग करूं नयेसें वाटतें. तरी मला यांतून सोडवा. यमदंड त्याच्या म्हणण्यास बधेना. तो म्हणाला "राजाची आज्ञा आहे. मला कांहीं एक करतां येणार नाहीं. तूं मुकाट्या राजदरबारीं चल. तेथें तुला काय बोलावयाचें असेल तें बोल! मी काय हुकुमाचा ताबेदार."

नंतर ते दोघे राजसभेंत आले. यमपाशानें राजाला लवून मुजरा केला व म्हणाला 'राजा! आज मी मुनी जवळून हिंसा न करण्याचें व्रत घेतलें. तें व्रत आतां तडीस नेऊं देणें तुझ्या हातीं आहे. कृपा करून मला सोड.' राजाला राग आला. तो भुंवया वर चढवून म्हणाला "तूं जर वैदिक संन्याशाजवळून व्रत घेतलें असशील तर मी सोडतो. पण एकाद्या साधुजवळ घेतलें असेल तर त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं.' तुला माझी आज्ञा पाळावी लागेल. आज्ञाभंगाचें प्रायश्चित्त तुला माहितच आहे." यमपालानें खरी हकिकत सांगितली व "कोणत्याहि रीतीनें हिंसा करणार नाहीं. मी माझ्या व्रतापासून च्यूत होऊं इच्छित नाहीं. यावर राजा! तुझी इच्छाच असेल तर मी शिक्षेस तयार आहे." असें म्हणतांच राजानें यमदंडाकडे पाहून सांगितले जा! या दोघांनाहि मगर–सुसरींनीं व्याप्त अशा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नदींच्या डोहांत नेऊन टाका. राजाचे उद्गार ऐकून धर्म यमपालास म्हणाला ' बाबारे ! तूं माझ्यासाठीं कां मरतोस ? मला ठार मारण्याचें कार्य करून तूं आपलें रक्षण करून कां घेत नाहींस ? व्यर्थ मरण्यांत काय अर्थ आहे ? तेव्हां यमपाश म्हणाला ' मी व्रतासाठीं मरतो आहे. तुला मारून टाकण्यानें माझ्या वृताचा भंग होणार. आणि वृतभंग करून जगण्यापेक्षां मरण बरें ! ! !

पुढें यमदंडानें त्या दोघांना बरोबर घेतले व नगरामध्यें फिरविलें. त्याचवेळीं जो कोणी नग्न मुनी जवळून व्रत घेतो त्याला या प्रकारचें फळ भोगावें लागतें असें जाहिर केलें. शेवटीं ते डोहाजवळ आले. त्यांना उचलून डोहांत फेंकून दिलें. तों चमत्कार हा कीं त्या गंगेच्या डोहाचें रूपांतर वाळवंटांत झालें ! त्या वाळवंटांत देवांनीं एक मनोहर दिव्य सिंहासन तयार करून त्यावर यमपालास बसविलें आणि त्याची पूजा करूं लागले. त्याच्या गुणाची, व्रताची महति गाऊं लागले.

इकडे पिशाच्च्यांनीं पाकशासन भूपतीला थपडा मारून मारून बेजार केले व मोठमोठ्यानें ओरडून म्हणूं लागला " पहा ! मुनींनी दिलेल्या व्रताचा भंग करविणाऱ्यांना असें शासन मिळतें. " नंतर राजाच्या मुसक्या बांधून गंगेच्या डोहाकडे घेऊन आले. त्या डोहांत टाकणार तो राजा यमपालास म्हणाला ' मी निराधार झालों; माझी रक्षा कर !" यमपालानें पिशाच्चास सोडून देण्यास सांगितलें. पण पिशाच्चें कांहीं गेल्या सोडीनात. यमपालानें निक्षून सांगितलें तेव्हां तो राजास म्हणाला ' तूं आपली राजमुलगी यशोमती व अर्धे राज्य यमपालाला देत असशील तर आम्हीं तुझी सुटका करतो. '

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राजानें मान्य केलें. वचनाला राजाहि जागला. त्यानें अर्धे राज्य व मुलगी यमपालास दिली.

एकच दिवसाच्या व्रतामुळें यमपालाला अर्धे राज्य मिळून देवांकडून सन्मान मिळाला. या अतिशयामुळें जिनधर्माची कित्येकांनीं कांस धरली. तर कित्येकांनीं श्रावकधर्म स्वीकारला.

कथा ६९ वी

असत्यभाषणी पर्वत व पोकळ सत्याभिमानी राजा वसु

विनिता देशांत अयोध्या नांवाची नगरी होती. त्या नगरींत राजा ययाति आपल्या सुशील, प्रेमळ, सत्यवादी राणीसह राज्य करीत होता. त्याचा पुत्र वसु विनयाचार संपन्न होता. याच नगरींत एक चतुर्वेद–विद्यापारंगत क्षीरकदंब ब्राह्मण उपाध्याय राहात असे. त्याची स्वस्तिमति नामें भार्या होती. त्यांना एक पुत्र होता. त्याचें नांव पर्वत. पर्वत बुद्धीनें मठ्ठ डोक्याचा होता.

क्षीरकदंबाकडे वसु, नारद, शिकण्यास येत. पर्वतहि त्यांचें बरोबर शिकण्यास बसे. कोणताहि विषय कितीहि समजावला तरी पर्वताला आत्मसात होत नसे. ते त्याला समजावतां समजावतां कंटाळून जात. स्वस्तिमतीचें पर्वतावर फार प्रेम होतें. प्रेमामुळें तो तिला अत्यंत शाहाणा वाटे व पति आपल्या मुलांकडे मुळींच लक्ष देत नाहीं अशी तिची भावना असे. त्याच भावनेनें ती म्हणे "नाथ ! आपण इतर मुलांना मनापासून शिकवितां आणि आपल्या मुलाच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शिक्षणाकडे दुर्लक्ष करतां हें असें कां ?" क्षीरकदंब म्हणे "प्रिये ! मी ही गोष्ट कांहीं जाणुन बुजून करतो असें नाहीं. मी सर्वांना सारखेंच शिकवितो. पण त्याला डोकेंच नाहीं. कितीहि समजावलें तरी त्याच्या डोक्यांत भरत नाहीं. बुद्धीमानांची गोष्टच वेगळी. त्यांना थोडें सांगतांच ते सर्व जाणून घेतात. त्यांचें तेज फांकतें. बुद्धीवान् खुलून दिसतात. बुद्धीहीन निस्तेज दिसतो. त्याला मतीच नाहीं. हा काय माझा दोष ? आणि याची तुला परीक्षाच पहावयाची असेल तर पहा !" एकदां त्यांनीं सर्व विद्यार्थ्यांना बोलावून एकेक कवडी दिली व सांगितलें कीं ही कवडी घेऊन बाजारांत जा. या कवडीचें पोटभरेपर्यंत फुटाणे घेऊन खा व येतांना कवडी गुरुदक्षिणा देण्यासाठीं म्हणून परत घेऊन या.

तिघेहि आपापल्या कवड्या घेऊन बाजारांत निघून गेले. पर्वताला बापाचें म्हणणें मूर्खपणाचें वाटलें. म्हणें पोटभर चणें खा. आणि कवडीही परत आणा. असें जगांत होईल कसें ? आणि कवडींत कितीसे फुटाणे मिळणार ? सगळेंच अशक्य ! त्यानें आपलें सरळ बाजारांत फुटाणे घेतले. ते सर्व खाऊन तो परत घरीं आला.

इकडे नारद व वसू प्रत्येक चणेवाल्याचे दुकानीं जात. त्यास ती कवडी देत व नमुना म्हणून थोडेसें फुटाणें घेऊन खाऊन बघत. चांगले नाहींत म्हणून परत आपली कवडी मागून घेत असत. याप्रमाणें त्यांनीं सर्व बाजारभर असा उद्योग केला. त्यांत त्यांचे प्रत्येक ठिकाणीं फुटाणे खाण्यास मिळाल्यामुळें पोट भरलें व शेवटीं कवडीहि शिल्लक राहिली. नंतर ते गुरूकडे परत आले.

तेव्हां क्षीरकदंबानें विचारलें पर्वता ! 'तुझी कवडी काय झाली ?'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

'मी त्याचे फुटाणे घेऊन खाल्लें' असें त्यानें उत्तर दिलें. नंतर वसु व नारदास विचारलें. त्यांनीं सर्व हकिकत सांगून आपली कवडी पुढें ठेवली. स्वस्तिमति जवळच होती. तिजकडे पाहून क्षीरकदंब म्हणाले "पहा ! प्रिये ! पाहिलीस, याची बुद्धीमत्ता ! याला बुद्धी नाहीं त्याला मी काय करूं ?" यावर स्वस्तिमति कांहीं बोलली नाहीं. ती स्वस्थ राहिली.

कांहीं दिवस असें निघून गेले. स्वस्तिमतीचा ग्रह कांहीं बदलला नव्हता. ती म्हणाली "नाथ ! आपण मुलांकडे दुर्लक्ष करतां हें बरें नव्हे !" "मागेच तूं त्याची परीक्षा पाहिलीस. बुद्धीच नाहीं त्याला मी काय करूं ? तुझी खात्री होत नाहीं. चल आणखी एकदां परीक्षा पाहावयाची असेल तर !" एवढे बोलून त्यांनीं तिघांना बोलावून आणलें व सांगितलें "हें पहा ! हें एक भांडें व कवडी घ्या. बाजारांत जा. हें भांडें भरून तूप विकत आणा व परत कवडी घेऊन या." प्रत्येक जण आपलें भांडें व कवडी घेऊन बाजारांत गेला. पर्वतानें आपलें सरळ जाऊन एका दुकानांत कवडीचें तूप खरेदी करून तें भांडें भरून घेतलें व घराकडे परतला. त्याला आपली बुद्धी चालविण्याची संवयच नव्हती. वसु व नारद तूपबाजारांत शिरले. एका तुपाच्या दुकानीं भयंकर गर्दी पाहून त्या दुकानीं गेले. दुकानदार धांदलींत होता. त्यांत त्यांनीं गडबड केली. त्याची तारांबळ उडून गेली. त्याचें येथें यांनीं तूप विकत घेतलें. पण गडबडीचा फायदा घेऊन किमतीबद्दल वांधें या दोघांनीं घातलें. त्यांत दोघेहि विजयी झाले. अशा रीतीनें किंमत न देतां त्यांनीं आपलीं मडकीं भरून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घेतलीं व कवडीसुद्धां परत गुरूघरीं आलें. स्वस्तिमति तेथेंच बसली होती. पर्वत, नारद व वसू यांच्या बुद्धींतला हा फरक पाहून तिला अत्यंत वाईट वाटलें. पण प्रेमामुळें तिला त्यांत क्षीरकदंबाची चूक दिसे. तिनें स्वत: परीक्षा घेण्याचें ठरवून पुन: त्या तिघांना एकेक भांडे व एकेक कवडी दिली. तिघेहि बाजारांत गेले. पर्वत आपल्या बुद्धीनुसार सरळ तूप घेऊनच परत आला. कवडी तुपाच्या मोबद-ल्यांत खर्चीं पडली. वसुनारदांनीं आपली पहिल्यासारखी बुध्दी लढवून कवडी न खर्चतां तुपानीं भांडीं करून आणलीं. तेव्हां मात्र स्वस्तिमतीची खात्री झाली.

पुढें एका दिवशींची गोष्ट! क्षीरकदंब शिष्यास म्हणाले. “मुलांनो! मी तुम्हांला एक एक बोकड देतो. तो तुम्ही घेऊन जा. आणि कोणी तुम्हांला पाहत नाहीं अशा ठिकाणीं जाऊन त्याचा वध करा. गुरूच्या आज्ञेप्रमाणें ते तिघेहि आपापला बोकड घेऊन गेले. पुर, ग्राम, वन वगैरे ठिकाणें फिरून वसु–नारद बोक-डांसुद्धां परत आलेले पाहून लटकाच रागाचा अविर्भाव आणून क्षीरकदंब म्हणाले, “मी आज्ञा केली असतां तुम्हीं त्याला न मारतां कां घेऊन आला?” नारद, वसु म्हणाले ‘गुरुवर्या! आम्हीं आपल्या म्हणण्याप्रमाणें पुष्कळ देश, अरण्यें फिरलों; पण आम्हांस कोठेंहि कोणी न पाहील अशी जागा सांपडली नाहीं. कारण गांवांत लोक, अरण्यांत गेले तर तेथें वर आकाश, तारे व देवता पाहतात, बरें एकाद्या गुहेंत जाऊन वध करावा तर तेथेंहि आमचीं प्रत्यक्ष पंचेंद्रियें ही गोष्ट पाहतात. तेव्हां जगांत कोठेंहि अशी जागा नाहीं कीं कोणीहि आपल्याकडे पाहात नाहीं. म्हणून आम्हीं त्याचा वध न करतां परत आलों आहोंत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

इकडे पर्वतानें एका निर्जन अरण्यांत बोकडाचा वध केला. त्याच्या मांसावर यथेच्छ ताव मारून तो परत आला. या प्रकारानें स्वस्तिमतिची तर पूर्णच खात्री पटली. तिनें पुन्हां स्वामींना बोलण्याचें सोडून दिलें. पुढें क्षीरकदंब आपल्या शिष्यांसह एका अरण्यांत क्षेत्राची विशुद्धि करून वेदाध्ययनासाठीं गेले. शांत जागा पाहून ते पर्यंकासनानें बसून मुलांना वेद शिकवूं लागले. तिकडून वीरभद्र व शिवभद्र नांवांचे दोन चारणमुनी आकाशमार्गानें जात होते. त्यांना पाहून शिवभद्र वीरभद्रास म्हणाला, " भगवन् क्षेत्रकाळाची शुद्धी करून पहा हे कसें वेदाध्ययन करीत आहेत? वीरभद्र केवळ ज्ञानी होते. ते उत्तरले, शिवभद्रा! हे अज्ञानी दिव्य ज्ञानरहित आहेत. कशासाठीं हें अध्ययन करीत आहेत. कळत नाहीं! त्यांपैकीं एक तर सातव्या नरकाचा मालक आहे." एवढें म्हणून ते खालीं उतरले व त्यांचेजवळ आले. क्षीरकदंबांनीं त्यांचा संवाद ऐकला होता. तो संसारविरागी बनला. आपणांमुळें जर यांना नरकगति प्राप्त होणार तर आपण यांना न शिकविणेंच बरें! असा मनांत विचार करून त्यानें शिष्यांना दर्भ, फळें व फुलें देऊन आपलें घरीं पाठवून दिलें व आपण तेथेंच राहिला. तिघांना एकटेंच घरीं आलेले पाहून स्वस्तिमतीनें पतीची चौकशी केली. " ते आम्हांस घरीं जा असें सांगून कोणीकडे निघून गेले तें आम्हांस माहित नाहीं." हें उत्तर ऐकतांच स्वस्तिमतीला काळजी वाटूं लागली. बराच वेळ वाट पाहिली. येण्याची वेळ टळून गेली. तरी आले नाहींत हें पाहून तिनें पुन्हां त्यांच्या शोधार्थ एका ब्राह्मणाला बरोबर देऊन पर्वताला पाठविलें. ते दोघे वनांत शोधीत शोधीत आले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तों एका वृक्षाखालीं क्षीरकदंब दीक्षा घेऊन नग्नमुनीजवळ बसलेले त्यांना दिसले. क्षीरकदंब त्यावेळीं एका शिळेवर बसून ध्यान करीत होते. त्याचीं वस्त्रें तेथेंच पडलीं होतीं. तीं घेऊन तें दोघे परतले. वस्त्रांसह परत आले हें पाहून स्वस्तिमतीला अत्यंत दुःख झालें. कधीं त्यांची स्तुति तर कधीं निंदा करीत ती आपला काळ घालवूं लागली.

क्षीरकदंबाच्या पश्चात् पर्वतानें आपला वडिलोपार्जित उपाध्यायाचा धंदा सुरूं केला. तो विद्यार्थीजनांना वेद-विद्या शिकवूं लागला. कांहीं दिवस गेले. ययाति राजानें आपल्या वसु मुलास राज्यावर बसवून गुणसेन मुनीजवळ दीक्षा घेतली. वसु स्वभावानें गर्विष्ठ होता व गर्विष्ठपणानेंच तो आपणांस सत्यवादी म्हणवीत असे. गुरूचें ऋण फेडावयाचें होतें. तेव्हां गुरूंना म्हणाला "आपणांला जें कांहीं मागावयाचें असेल तें मागून घ्या! मी देतों. स्वस्तिमति उत्तरली, राजा! तूर्त मला तुझ्या आशिर्वादानें कशाचीच गरज नाहीं. पण वेळ आली तर मात्र मागून घेईन. तूं आपलें वचन पाळ." राजानें तथास्तु म्हणतांच ती स्वघरीं आली.

या नगराला लागून एक भयाण अरण्य होतें. एकदां त्या अरण्यांत सुलिंद्र भिल्ल शिकारीसाठीं गेला होता. एक हरीण पळत जात होतें. त्याला पाहून त्यानें बाण सोडला. पण तो बाण मध्यंतरींच एका पाषाणाला लागून परत फिरला. बाण परत आलेला पाहून त्यास आश्चर्य वाटलें. जवळ तर कांहीं दिसत नाहीं व हा बाण कसा परत आला याचा विचार करीत करीत तो अगदीं त्या पाषाणाजवळ आला. ती आकाशाच्या रंगाची एक भव्य शिळा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होती. दुरून पाहणाराला ती दिसत नसे पण तिच्या मागील कोणताही पदार्थ सहज दिसे. इतकी ती पारदर्शक शुभ्र रंगाची होती. भिल्लाला ही चमत्कारिक शिला पाहून विस्मय वाटला. ही गोष्ट त्यानें वसुराजास कळविली. राजानें ती कोणासहि न कळत राजवाड्यांत आणण्याची त्याला आज्ञा दिली. भिल्लानें ती शिला आणून राजवाड्यांत ठेवली. ती शिला पाहून राजाला अत्यानंद झाला. भिल्लाला त्यानें पुष्कळसे पारितोषक देऊन रवाना केलें. नंतर ती शिला वसूनें राजदरबारांत नेली व तिच्यावर आपलें सिंहासन ठेवलें. त्यामुळें दुरून दिसणारांस तें सिंहासन अगदीं अधर असें दिसूं लागलें. त्याचा फायदा घेऊन वसूनें आपल्या सत्य-वादीपणामुळें हें सिंहासन अंतराळीं उभें राहिलें असें जाहिर केलें व राज्य करूं लागला.

कांहीं वर्षें निघून गेलीं. सहज नारद फिरत फिरत आपल्या ५०० शिष्यांसह पर्वताचें भेटीस आला. पर्वत त्यावेळीं आपल्या शिष्यांना पाठ शिकवित बसला होता. पाठाचा विषय असा होता कीं, धर्मप्रेमी लोकांनीं स्वर्ग वगैरेंच्या प्राप्तीसाठीं यज्ञांत अजाचा बळी द्यावा. अजाचा अर्थ बोकड असा आहे. पर्वताचा हा पाठ ऐकतांच नारद म्हणाले पर्वता! आपणास गुरूंनीं अजाचा अर्थ बोकड शिकविलेला नाहीं. तीन वर्षांच्या जुन्या साळी घ्याव्यांत, त्यांचें पीठ करून त्या पीठाचा बोकड तयार करावा आणि तो यज्ञांत होमावा. असा शिकविलेला आहे. तूं म्हणतोस तसा नाहीं. तुझी चूक होत आहे. कारणः—

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कृत्वा घृत पशुसंगे कुर्यात्पिष्टमयं तथा ।
नन्वेच्छतु वृथा हंत पशुंघ्नंति द्विजोत्तमा ॥
ततः परं कृतयुगेत्रेतायां ज्ञानमुच्यते ।
द्वापरे यज्ञ मे आहुर्यानमेव कलौ युगे ॥
पश्य त्रैवार्षिकैर्युक्तं कुर्यात् भृत्य वर्गयोः ।
अधिकं वादिवेद्येन समस्तोन्यातमर्हति ॥
अतः स्वल्पीयसे द्रव्ये यः सोमं पिबति द्विजः ।
अपीत सोम पूर्वोपि नतस्प्राप्नोति तत्फलं ॥
एतेन पटुवाक्येन विद्धि मद्वचनं शुभं ।
वर्षत्रय समुद्भूता व्रीह योजा भवंत्यतः ॥
एतै स्तैः प्रयष्टव्यं पुरुषौ पुरुबुद्धिभिः ।
महानुभावतोपेतैर्नितांतं धर्ममिच्छुभिः ॥

याचप्रमाणें आपणांस गुरूंनीं सांगितलें आहे आणि मला पूर्ण आठवण आहे. पर्वताला त्यांत थोडासा अपमान वाटला. आणि तोहि आपल्या शिष्यांदेखत तो दुराग्रही बनला. मनुष्य दुराग्रहाला पेटल्यानंतर काय करीत नाहीं ? तो आपल्या अर्थाला चिटकून म्हणाला "नाहीं. मी म्हणतों तेंच खरें आहे. अज याचा अर्थ बोकडच सांगितलेला आहे. तुमच्या ऐकण्यांत कांहींतरी फरक आहे." याप्रमाणें बराच वेळ त्यांच्यांत वादविवाद झाला. कोणी कोणाच्या अर्थाला सोडण्यास तयार होईना. तेव्हां नारद म्हणाला, पर्वता ! व्यर्थ दुराग्रह कशाला ? आपण उद्यां वसुकडे जाऊं ! आपलें म्हणणें त्याचेपुढें मांडूं. तो जो निर्णय देईल तो आपण मान्य करा. आपल्या म्हणण्याप्रमाणें त्यानें निकाल न दिल्यास मी आपली जीभ कापून देईन. तुझ्याविरुद्ध दिल्यास तूं आपली शरणी दे. पर्वतानेंहि तें मान्य केलें. नारद निघून गेला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

झालेल्या प्रकारानें पर्वताचें तोंड उतरलें. त्याला उद्यां वसु नारदासारखा निकाल देणार व मग आपली प्रतिष्ठा नष्ट होईल. याची काळजी लागली. वास्तविक नारदाचें म्हणणें खरें आहे. पण आतां आपण आपली बाजू मांडली त्यांत माघार कशी घ्यावी. त्याचें चित्त कशांतच लागेना. तो तसाच घरीं आला. स्वस्तिमतिच्या लक्ष्यांत ही गोष्ट आली. तिनें विचारलें पर्वता ! काय झालें; तुझें मन उदास कां बरें? पर्वतानें झालेला प्रकार निवेदन केला. तेव्हां स्वस्तिमति म्हणाली पर्वता ! नारद म्हणतो तेंच खरें आहे. कारण त्यांनीं देखील तोच अर्थ सांगितला होता. मीहि त्यावेळीं तेथें हजर होतें. मला अगदीं पक्केपणीं स्मरतें. 'तूं व्यर्थ खोट्या तटाला पडलास हें कांहीं बरें केलें नाहींस. आहे तीहि प्रतिष्ठा आतां नष्ट होणार ! तुझ्या शहाणपणाला आतां काय म्हणावें ?' स्वस्तिमतिला अत्यंत वाईट वाटलें. तिच्या डोळ्यापुढें आपल्या पतीचें म्हणणें मूर्तिमंत उभें राहिलें. मागील स्मरणानें तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. पण मोहामुळें तिला सुचेना. तिला आपल्या वराची आवठण झाली व त्या वरानें आपलें काम भागवून घ्यावें असें ठरविलें. ती तात्काळ वसुराजाकडे आली. राजानें गुरूपत्नीचा योग्य आदर-सत्कार केला व उच्चासनावर बसविलें. नंतर कुशलोत्तर प्रश्न विचारल्यानंतर पूर्वींच्या वराची आठवण देऊन स्वस्तिमति म्हणाली. आतां राजा ! वेळ आली आहे. तूं आपलें वचन पाळ. वसु म्हणाला माते ! मी केव्हांहि माझें वचन पाळण्यास तयार आहें. तुला जें कांहीं पाहिजे असेल तें मागून घे. तेव्हां तिनें पर्वत व नारदांत झालेल्या वादाची हकिकत सांगितली. ती म्हणाली पर्वतानें दुरा-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ग्रहाला बळी पडून अज याचा खोटाच अर्थ बोकड सांगितला आहे. त्याला देखील तो असत्यच वाटतो. पण तो बोलून गेला आहे. तो आपलें वचन परत घेणार नाहीं. तेव्हां तूंहि त्याच्याचप्रमाणें अर्थ सांग. आणि हेंच मला तुझ्या वरानें मागणें आहे. तरी तूं तसें अभिवचन दे. वसु मिथ्याभाषणी होता. तो केवळ आपणाला सत्य भाषणी म्हणवी आणि त्यांतून आकाशस्तंभ मिळाल्यामुळें तर त्याला अधिकच फावलें होतें. त्यानें स्वस्तिमतिच्या म्हणण्याला पूर्ण रुकार दिला. तिला यामुळें अत्यानंद झाला. ती परत आली. दुसरे दिवशीं राजा वसु दरबारांत बसला होता. नारदपर्वत तेथें आले. दोघांनींहि आपापली बाजू राजापुढें मांडली. निकाल देण्यास सांगितलें. वसुला आधींच पटविलें होतें. तो सत्यासत्याचा विचार न करतां म्हणाला 'नारदा! यज्ञ अज म्हणजे बोकडाचा बळी देऊनच करतात. आणि हेंच आपल्या गुरूंनीं शिकविलें आहे. तूं म्हणतोस तें अगदीं खोटें. पर्वत अगदीं बरोबर आहे.' पण हे उद्गार त्याचे तोंडून पूर्णपणें बाहेर पडत आहेत तोंच आश्चर्य हें कीं, राजा वसू त्या सिंहासनावरून एकदम जमिनीवर फेंकला गेला. तेव्हां नारद म्हणाला राजा, वसु! असा अविचार करूं नकोस. सत्याच्या नांवाखालीं असत्याचें पोषण करूं नकोस. असत्यानें कधींहि तूं वर येणार नाहींस. तरी खरें असेल तेंच सांग. खऱ्यानेंच तूं वांचशील! पण वसूच्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं. 'मी म्हणतों तेंच खरें. बोकड हाच अर्थ अजाचा होय.' असें पुन्हां म्हणतांच जमीन फाटून तो सिंहासनासह आंत शिरला. थोडेसें शरीर बाहेर राहिलें होतें. तेव्हां परत नारद त्याकडे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वळून म्हणाला राजा ! पहा ! तुझ्या असत्य भाषणाचा प्रताप ! आतां मरणाची घटका जवळ आली आहे. व्यर्थ पाप करून नरकगतीचें कर्म बांधूं नकोस ! माझें म्हणणें ऐक आणि खरें तेंच सांग. पण वसूनें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. तो आपल्या गर्विष्ठपणांतच गेला. त्याचा परिणाम धरतीमातेनें त्याला सिंहासनासुद्धां आपल्या पोटांत स्थान दिलें. मरून तो सातव्या नरकास गेला.

नंतर देवांनीं आकाशांतून नारदांवर पुष्पवृष्टि केली. त्याची पूजा केली व न्यायाबद्दल प्रशंसा केली. पुढें सभेतील लोकांनीं त्याचा देवांकडून होत असलेला सन्मान पाहून पर्वताची गाढवांवर बसवून साऱ्या गांवांत धिंड काढली व त्यास राज्याबाहेर घालवून दिलें. पर्वताला आपल्या अपमानाचें अत्यंत दुःख वाटलें. तो आपली नगरी सोडून दूर परदेशीं गेला. व एका वडाच्या झाडाच्या आश्रयानें राहिला.

विनिता देशांतील साकेत नगरींत राजा सगर आपल्या पद्मश्रीं राणीसह राज्य करीत होता. राजमंत्री सुबुद्धि मोठा चतुर, नीतिशास्त्रविशारद गुणी होता. सगराचा सामंत राजा सुयोधर होता. त्याची भार्या अतिथि. त्यांना दोन अपत्यें होतीं. एक मुलगा व एक मुलगी. मुलाचें नांव अतिमुक्तक व मुलीचें सुलभा होतें. सुलभा रूपानें अत्यंत लावण्यसुंदर मदनाची पुतळी होती. तिचे डोळे कमळाप्रमाणें होते.

पोदन देशाचा राजा सुपिंगल मोठा शूर व वीर होता. त्याची प्रिया मनोहरी खरोखरी मनोहरिणी होती. त्यांना मधुपिंगल नांवाचा पुत्र होता. सुयोधनानें आपली मुलगी सुलभा मधुपिंगलास देऊं केली होती.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

एकदां साकेत नगरीच्या राजोद्यानांत दोन चारणमुनी आले. त्यांच्या दर्शनार्थ राजा सुयोधन आपल्या परीवारांसह गेला होता. मुनी मुखांतून धर्मश्रवण केल्यामुळें अतिमुक्तक विरागी बनला व त्यानें संसाराचा त्याग करून मुनीदीक्षा घेतली. राजाहि दर्शनास आला होता. परत येत असतां प्रासादशिखरावर बसलेल्या सुलभेकडे त्याचें लक्ष्य गेलें. तिचें सौंदर्य पाहून राजा वेडा झाला. त्याला चैन पडेना. सुयोधनाचें घरीं गेला व सुलभेची मागणी केली. तेव्हां सुयोधर म्हणाला राजा ! मी माझी मुलगी मधुपिंगलांस देऊं केली आहे. तिचें त्याच्यावर प्रेम आहे. तेव्हां मी तुला देऊं इच्छित नाहीं. राजाला हे शब्द बाणासारखे लागले. तो विव्हळ झाला. कोणत्याहि उपायानें सुलभा आपण हस्तगत केली पाहिजे असा विचार करीत तो घरीं आला. त्यानें पुरोहिताला बोलावून आपला हेतू सांगितला. पुरोहित राजास आश्वासन देऊन म्हणाला, राजन् ! तूं कांहीं चिंता करूं नकोस ! मधुपिंगलांशीं तिचें लग्नच होणार नाहीं असा कांहीं तरी उद्यम मी शोधून काढतो. तूं निश्चिंत एस. राजा अगदीं बेचैन झाला होता. तो दीन मुद्रेनें म्हणाला '. पुरोहितवर्मा कसेंहि कर. त्यांच्यांत वांकडें आणा. पण तिला त्याचा तिटकारा उत्पन्न होईल असें कर.' पुरोहितानें राजाला समजुतीच्या चार गोष्टी सांगून शांत केलें व तो घरीं आला.

घरीं येतांच त्यानें सामुद्रिक शास्त्र आणलें. त्यांत त्यानें सचिवाच्या मदतीनें कांहीं खोटें श्लोक तयार करून घुसडलें. ते स्वच्छ लिहून एक नवीन शास्त्र तयार केलें व तें विष्णुदत्त ब्राह्मणाजवळ देऊन सुयोधनाच्या घरीं पाठविलें. सुयोधनाच्या घरीं रोज तो जाऊन तें शास्त्र

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वाचीत असे. नित्याप्रमाणें शास्त्र वाचीत असतां प्रशस्त मनुष्य कोण यांचें आख्यान संपून अप्रशस्ताचें लागलें. त्यांतील श्लोक वाचतां वाचतां एक श्लोक लागला—

षष्टिकाणे हातंकुंटे वामने दोषसंततिः ।
मधुपिंगलके नूनं दोषाः संति सहस्रशः ॥
मधुपिंगलनेत्रेण परिणतापि कन्यका ।
तत् क्षणाद्विधवा वास्यान्त कदाचित्सुखान्विता ॥

साठ वर्षांचा, एकाक्ष, बुटका लठ्ठ वगैरे सहस्र दोष मधुपिंगल मनुष्याचें ठिकाणीं असतात. मधुपिंगल मनुष्यांशीं जिचें लग्न होतें, ती तात्काळ विधवा होते. त्यामुळें तिला सुखलाभ होत नाहीं. " हें मधुपिंगलाचें आख्यान ऐकून सुलभेस मधुपिंगलाचा तिटकारा आला. द्वेषानीं भरलेलें व्याख्यान वीष ओततेंच. अशा मनुष्यांशीं लग्न लावून आपणाला काय सुख होणार ? ही भावना मनाला शिवतांच तिचें मन पालटलें. ग्रंथानें आपलें कार्य केलें. तिची मनःस्थिति ओळखून विष्णुदत्त म्हणाला. तेव्हां मुली ! मधुपिंगलाशीं लग्न करणें योग्य नव्हें. तुझें ठरलें आहे. पण आतां सुयोधरराजाला जाऊन सांग, व स्वयंवराचा बेत ठरीव. सगरासारखा सुलक्षणी कोणी नाहीं. स्वयंवर जमल्यानंतर त्यालाच तूं माळ घाल म्हणजे तुला पूर्ण स्वातंत्र्य लाभून तुझें आयुष्य सुखी बनेल. नंतर तो घरीं निघून गेला.

सुलभेनें ही गोष्ट बापाचें कानांवर घातली. तिच्या म्हणण्याप्रमाणें स्वयंवर बोलावण्यांत आलें. देशदेशचे राजे जमले. मधुपिंगलहि आला होता.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सुलभा स्वयंवरासाठीं हातांत माळ घेऊन स्वयंवरमंडपांत आली. तिनें मधुपिंगलांना सोडून सगरच्या गळ्यांत माळ घातली. मधुपिंगलाला अत्यंत वाईट वाटलें. तो विरागी बनला. स्वयंवरमंडपांतून उठून निघून गेला व पूर्वीच्या चारण मुनीजवळ जाऊन त्यानें दीक्षा घेतली. सगरराजा सुलभेसह आपला काळ आनंदानें घालवूं लागला.

मधुपिंगल योगींद्र विहार करीत करीत विनिता नगरीला आले. आहारासाठीं गांवांत प्रवेश केला. श्रेष्ठी सागरदत्ताच्या घरीं त्याच्या भार्येनें आहारासाठीं विधिपूर्वक पडगावून घेतल्यामुळें ते गेले. त्यांच्या घरीं एक सोमशर्मा ब्राह्मण रोज जेवण्यास येई. त्यावेळीं तोहि तेथें पुस्तक वाचीत बसला होता. मधुपिंगलमुनीचा देह पाहून तो श्रेष्ठीस म्हणाला 'आपलें सामुद्रिक शास्त्र कोठें आहे? लवकर आणून द्या. मला थोडेसें काम आहे. कारण असें खोटें शास्त्र जाळून टाकलेलें बरें. त्यांत मधुपिंगलाबद्दल लिहिलेली हकिकत मुनीराजाकडे पाहिलें असतां खोटी वाटते. तें लिखाण किती विचित्र आहे? यांच्या अंगावर किती उत्तम लक्षणें आहेत! हे दिसण्याला किती सुंदर असून तेजस्वी आहेत! हे पृथ्वीचीं सुखें भोगीत आहेत; एवढेंच नव्हे तर पूर्ण विरागी बनून सर्व परिग्रहाचा त्याग करून अगदीं निस्पृह बनले व जगवंद्य बनले आहेत. वास्तविक अशी स्थिति असतांहि तें शास्त्र खराशीं बाळगणें म्हणजे असत्याचें पोषण करणें होय. तेव्हां तें लवकरच अग्नीच्या भक्ष्यस्थानींच पडणें चांगलें. तेव्हां श्रेष्ठिणी म्हणाली, सोमदत्ता! सगराला सुलभेची प्राप्ति होत नव्हती. तेव्हां तिची प्राप्ती व्हावी म्हणून पूर्वींचा कांहीं भाग वगळून हें असत्य विधान आंत घुसडून दिलें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे आणि त्यामुळेंच तर सुलभा सगराची झाली आणि बिचारा मधुपिंगल विरागी बनून मुनि बनला. मुनींनीं हा संवाद ऐकला. त्यांना सगराचा द्वेष वाटूं लागला. सूडाची भावना उत्पन्न झाली. त्या आर्तध्यानांत मरून ते असूर–देव जन्मले. सगराचा सूड उगविण्याची भावना रात्रंदिवस त्यांच्या मनांत खेळत होती. त्यांनीं एका जटाधारी ब्राह्मणाचें रूप धारण केलें व पर्वत राहात होता त्या झाडाखालीं येऊन अवतरले. नंतर पर्वताकडे पाहून म्हणाले, पर्वता ! मी तुझ्या रक्षणासाठीं आलों आहें. मी लोकपाल ब्रह्म आहें. माझी सर्व जग वंदना करते. वेद माझ्या मुखांत आहेत. तूं केलेला अर्थ बरोबर आहे. क्षीरकदंबानें पण तोच सांगितला होता. त्यामुळेंच ब्राह्मण यज्ञ करतात. चल, आपण जाऊन यज्ञयाग करूं. नंतर ते दोघे अयोध्येस आले. ब्रह्म व त्याचा पुरोहित आल्याची वार्ता सगरास समजली. ते त्याच्या दर्शनासाठीं आले. दर्शनानंतर ब्रह्मदेव राजास म्हणाला, राजा ! तूं अश्वमेधयज्ञ कर. अश्वमेधयज्ञ सुरूं झाला. त्या यज्ञाचा प्रभाव म्हणून देवानें आकाशांत विमानें उत्पन्न केलीं. राजाला आनंद झाला. त्यानें सर्वांना त्यांत बसण्यास सांगितलें. राजा आपल्या परिवारांसह त्यांत आरूढ झाला. नंतर पर्वताला त्यानें पूर्वींची सर्व हकिकत निवेदन केली व एकेकाला खालीं फेंकून देण्यास सुरुवात केली. कोणी दगडावर, कोणी ज़मिनीवर पडून मृत्युमुखीं पडले. पुष्कळांना लाथाबुक्क्यांनीं ठार केलें. सगराचे हाल हाल केले व त्यास सोडून दिलें. नंतर तो सुलभेस घेऊन मारीत मारीत अरण्यांत शिरला. तेथें अतिमुक्तकमुनि होते. त्यांनीं हा प्रकार पाहिला. पूर्वींची सर्व हकिकत सांगून असु-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राला शांत केलें व म्हणाले, बाबारे ! कितीही द्वेष असला तरी स्त्रीहत्येचें पातक कोणी करीत नाहींत. त्या अबला होत. तुझें हें कृत्य आम्हांस पसंत नाहीं. तेव्हां तिला सोडून तो परत अयोध्येला आला. त्यानें सगराला व पुरोहिताला मारून टाकलें. यज्ञांत हिंसा केल्यानें असें पाप उत्पन्न होतें. त्यामुळें मरण ओढवतें. तेव्हां कोणीहि यज्ञ करूं नये. केल्यास सगरभूपतीसारखीच त्यांची दशा होईल. असें ओरडून तो देवलोकीं निघून गेला.

मल्लीनाथ तीर्थंकराच्या वेळींच ब्राह्मणानें यज्ञयागाचें प्रस्थ केलें. त्यांत जीवहिंसा करण्यांत येऊं लागली. यापूर्वी यज्ञ होत नसत, किंवा जीवहिंसाही होत नसे.

कथा ७० वी.

पारिजात देशांत चित्रकूट नांवाचें मोठें शहर होतें. तेथें गोपदास राजा आपल्या गोपदासी राणीसह राज्य करीत होता. चित्रकुटांत समुद्रदत्त नांवाचा श्रेष्ठि राहात असे. तो अत्यंत श्रीमंत, धनाढ्य होता. त्याची भार्या समुद्रदत्ता मोठी प्रेमळ होती. श्रेष्ठीच्या हातून पुष्कळसे अपराध घडल्यामुळें राजानें त्याची सर्व संपत्ति हिरावून घेतली व त्यास निर्धन करून टाकलें. सारें धन गेल्यामुळें त्याचा परिणाम त्याच्या मनावर झाला. तो अगदीं वेडा बनला. वेडाच्या भरांत तो साऱ्या गांवांत माझें धन राजानें घेतलें. मी भिकारी बनलों असें ओरडत फिरूं लागला. त्याला ताळ्यावर आणण्यासाठीं त्याच्या आप्तांनीं वरचसे सायास केले. पण कांहीं उपयोग होईना.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिवसेंदिवस त्याचें वेड जास्तच भडकत चाललें. पुढें एका बुद्धिमान् वैद्यानें त्याला सांगितलें कीं, खरोखरीं याचें वेड घालवावयाचें असेल तर याचेपुढें कोणाचें तरी धन आणून ओता व राजानें परत तुझें तुला दिलें आहे असें सांगा! म्हणजे याचें वेड नाहींसें होईल व तो पूर्ववत् सुधारेल. त्याप्रमाणें करण्यांत आलें. धन पाहून त्याला अति आनंद झाला. तो तें धन कधीं हातांत तर कधीं खांद्यावर घेऊन हंसे. असे दिवस पुष्कळ गेले. पुढें त्याचें वेड हळूहळू कमी होत गेलें व पुढें तो पूर्ण सुधारला. त्याचा भ्रम नाहींसा झाला. पूर्वीसारखाच वागूं लागला. तेव्हां ज्याचें त्याला धन परत करण्यांत आलें. तात्पर्य, कोणतीहि प्राणप्रिय गोष्ट एकाएकीं नाहींशी झाली म्हणजे त्याचा एकदम मनावर अनिष्ट परिणाम होतो. तेव्हां कोणतीही इष्ट किंवा अनिष्ट गोष्ट दमादमानेंच करणें योग्य आहे.

कथा ७१ वी.

" श्रीभूती. "

अपरविदेशांतील गंधमालिनी देशांत वीतशोक नांवाची नगरी होती. तेथें प्रजाहितदक्ष वैजयंत राजा आपल्या सर्वांगसुंदरी सर्वश्री राणीसह राज्य करीत होता. त्यांना संजयंत व जयंत असे दोन पुत्र होते. एकदां श्रीमान् प्रभू स्वयंभू तीर्थंकर विहार करीत करीत तेथें आले. नगरवासी जनांनीं त्यांचा योग्य सत्कार करून पूजा केली. तीर्थंकर प्रभुच्या मुखांतून धर्माचें श्रवण केल्यामुळें वैजयंत राजाला संसारविरक्ति उत्पन्न झाली. त्यानें आपल्या मुलांवर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राज्यकारभार सोंपविला. मुलेंहि विरागी बनलीं होतीं. नंतर त्या सर्वांनीं पिहिताश्रवमुनीजवळ जाऊन दीक्षा ग्रहण केली.

पिहिताश्रवमुनी वैजयंत वगैरे साधूसह तपश्चरण करीत या देशांतून त्या देशांत विहार करीत होते. विहार करतां करतां वैजयंतमुनींनीं लोकालोकावलोकनीय केवळज्ञान प्राप्त झालें. तेव्हां चतुर्विध देव मोठ्या भक्तिभावानें त्यांची पूजा करण्यासाठीं आले. त्यांवेळीं धरणेंद्राचें तेजस्वी शरीर पाहून जयंतमुनींना आपल्यालाहि असें दिव्य शरीर प्राप्त व्हावें अशी इच्छा झाली. त्या निदानांत मरून ते देवलोकीं धरणेंद्र झाले.

एकदां संजयंतमुनी महोदरपुरीस आले. तेथील स्मशानांत सात दिवसपर्यंत कायोत्सर्गानें तपश्चरण करूं लागले. हे त्याच्या पूर्वजन्मींचे वैरी विद्युद्दंष्ट्र विद्याधरानें पाहिलें. रागाच्या भरांत संजयंत-मुनींना त्यानें उचलून विजयार्द्ध पर्वतांच्या दक्षिणेस हर्य्यावति, कुसुमावती, सुवर्णावर्ता, चंडवेशा व जगावती या पांच नद्यांच्या संगमा-जवळ आणून सोडलें व आपण गगनवल्लभपुरास निघून गेला.

सकाळीं उठतांच तो आपल्या बांधवांना बोलावून म्हणाला 'रात्रीं मला दुःस्वप्न पडलें असून त्यांत मी कोणातरी विद्याधरमुनींना घोर उपसर्ग देत असल्याचें मी पाहिलें.

इकडे त्या थंड प्रदेशांत घोर उपसर्ग सहन केल्यामुळें मुनींच्या कर्मांचा क्षय झाला व ते मुक्तीला गेले. त्यांच्या देहाची पूजा कर-ण्यासाठीं देव गोळा झाले. त्यावेळीं विद्युद्दंष्ट्र विद्याधरही तेथें आला. त्याला आपणांपुढें आलेला पाहतांच धरणेंद्राला एकाएकीं राग आला. त्यानें त्यास नागपाशांनीं बांधून टाकलें व म्हणाला दुष्टा ! थांब, तुला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मी आतां वडवानलांत नेऊन टाकतों त्याला उचलून धरणेंद्र घेऊन जातो असें पाहून लातवेंद्र त्याला म्हणाले धरणेंद्रा ! थांब ! असा अविचार करूं नकोस ! त्याला सोडून दे. पूर्वी या ससार अरण्यांत भटकत असतां मी, तूं हा विद्याधर व मुनिसंजय कोण होतो ? आपला एकमेकांचा संबंध कसा होता, आपण एकमेकांचे वैरी कसे बनलांत ? हें तुला सांगतों तें ऐक ! नंतर काय करावयाचें असेल तें कर ! धरणेंद्र स्वस्थ राहिला, तेव्हां लातवेंद्र सांगूं लागले. " जंबुद्वीपांतल्या भरतक्षेत्रांत शकट नांवाचा एक देश होता. त्या देशांतील सिंहपूर नगरींत राजा सिंहसेन आपल्या रामदत्ता राणीसह राज्य करीत होता. रामदत्तेची ' निपुण ' नांवाची एक दासी होती. ती सर्व शास्त्रांत पारंगत होती. तिला सर्व भाषा अवगत होत्या. ती पंडीता होती. राजपुरोहीत श्रीभूति ब्राह्मण स्वभावानें सालस सत्यवादी होता. तो कधीं परद्रव्याची अभिलाषा करीत नसे. अशीं त्याची ख्याति होती. त्याची भार्या श्रीदत्ता श्यामवर्णी होती. तिचे डोळे कमळा-प्रमाणें सुंदर असून तिचें रूप मदनासहि लाजवीत असे. श्रीभूतिनें एक मोठें संग्रहालय—भांडशाला—स्थापन केली. त्याचा उद्देश दूरदूर देशींच्या व्यापाऱ्यांची सुवर्णाचीं नाणीं व उत्तमोत्तम रत्नें रक्षण करणें हाच होता. त्यामुळें त्यांत बरेंच धन व रत्नें गोळा झालीं होतीं. त्याच्या सत्यवादीपणाबद्दल चोहींकडे विख्याति झाली. त्यामुळें उत्तमोत्तम रत्नें त्याच्या संग्रहीं जमलीं. त्यानें त्या सर्वांचें रक्षण करण्यासाठीं चांगले विश्वासू नौकर ठेवले. कांहीं दिवस असे गेले. पद्मखंड नगरीचा धनवान् श्रेष्ठी सुमित्र

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आपली भार्या सुमित्रदत्ता, पुत्र सुमित्रदत्त व सून सुप्रत्ता या सर्व मंडळींसह मिळून व्यापारासाठीं सिंहपुरास आला. श्रीभूतीनें परदेशाच्या हितासाठीं भांडशाला उघडली असून तो अत्यंत खरा सत्य भाषणी आहे; असे खात्री त्याच्या कानीं आले. तेव्हां त्यानें आपणांजवळील बहुमूल्य रत्नें आणून त्याच्या संग्रहीं ठेवलीं. वाकीचें द्रव्य तेथील इतर व्यापाऱ्यांकडे ठेवून तो आपल्या नगरीस परत आला.

कांहीं वर्षें सुखानें आपला काळ घालवून, सुमित्रश्रेष्ठी आपला पुत्र सुमित्रदत्त व इतर पुष्कळशा व्यापारी मित्रांसह व्यापारासाठीं रत्नद्वीपांकडे जाण्यास निघाला. समुद्रांतून जात असतां त्याची नाव वादळांत सांपडली. वादळ फार जोराचें होतें. वाऱ्याच्या झोंतासरशी त्याची नाव हेलकावे खाऊं लागली. शेवटीं हेलकावे खात खात तें तारूं उपडें झालें. सर्वांना जलसमाधि मिळाली. फक्त सुमित्रदत्त दैवयोगानें वांचला. एका मोठ्या नावेचा आधार घेऊन तो समुद्रकिनाऱ्याला लागला. तेथून तो नाना देश फिरत सिंहपुरास परत आला. त्यानें येऊन सर्व हकिकत मातेला निवेदन केली. तिला अति दुःख झालें. उत्तरकार्य आटोपल्यावर तो श्रीभूतीकडे आला. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यानंतर त्यानें आपलीं रत्नें मागितलीं. तेव्हां कांहींतरी वरळतां आहांत झालें! म्हणें रत्नें तुमच्याकडे ठेवलीं? तुमची माझी पूर्वीं कधीं ओळख तरी? आणि रत्नें माझ्याकडे आहेत म्हणतां? आश्चर्य आहे. आपणांला बहुतेक वेड लागलें असावें. त्याच्याच भरांत कांहींतरी वरळतां आहांत झालं. अशी श्रीभूतीनें उडवाउडवींचीं उत्तरें दिलीं. सुमित्रदत्त विचारा अगदीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वेडा होऊन गेला. तो ज्याच्या त्याच्यापुढें हीच हकिकत सांगत फिरूं लागला. तेव्हां श्रीभूतीनें हा कोणीतरी वेडा आहे. व्यर्थ कांहीं-तरी बरळतो असें राजास समजावून सांगितलें. राजानें त्यास नगरी-बाहेर हांकलून दिलें. त्याचा परिणाम सुमित्रदत्ताच्या मनावर अनिष्ट झाला. तो वेडा बनला. त्या वेडाच्या भरांत तेंच बडबडूं लागे. शेवटीं रामदत्ता राणीच्या महालाशेजारीं एका चिंचेच्या झाडावर रात्रींच्या वेळीं तेथें बसून श्रीभूतीनें माझीं पांचच रत्नें घेतलीं असून मला परत देत नाहीं आणि स्वतःला मोठा सत्यवादी म्हणवून या राजाच्या नगरींत राहतो. माझीं रत्नें अमूल्य असल्यामुळें त्याला त्यांचा मोह सोडवत नाहीं मी मागितलीं तरी मला देत नाहीं. असें म्हणें व दुःखानें हात कपाळावर मारून गांवाबाहेर निघून जात असे. हा नित्याचा त्याचा क्रम होऊन बसला. यांत सहा महिने निघून गेले. राणी रोज याचा विचार करी. एकदां राजा तिच्या महालांत आला असतां म्हणाली नाथा ! मी आज सहा महिन्यांपासून हेच शब्द ऐकतें. या शब्दांत एक दिवस देखील फरक पडत नाहीं. तो फक्त पांचच रत्नांचा उल्लेख करतो. लोक त्याला वेडा म्हणतात. पण वेडा कांहींतरी बरळतच असतो पण याचें तसें नाहीं. यांत कांहींतरी गूढ असलेंच पाहिजे. मला त्याच्या या शब्दांची कींव येते. त्याचें म्हणणें खरोखर खरें कीं, खोटें याचा आपण पूर्ण शोध करावा. तेव्हां राजा म्हणाला प्रिये। हा श्रेष्ठी वेडा आहे. वेडाच्या भरांत कांहींतरी बडबडतो आहे त्यांत कांहींच तथ्य नाहीं. ' रामदत्तेला तें पटेना. ती म्हणाली नाथा ! हा वेडा म्हणावा तर रोज रोज तेच शब्द उच्चारतो ना ? त्याचे इतर चाळे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कांहीं वेड्यासारखे नाहींत. एवढेंच म्हणतो आणि परत जातो. कधींहि त्यानें सात किंवा आठ रत्नांचा उल्लेख केला नाहीं. तो फक्त पांचच रत्नें म्हणतो. त्याचें म्हणणें मला खरें वाटतें. असत्यतेचा अंश असावा असें वाटत नाहीं आणि तीं परत न मिळाल्यामुळें तो असे वेडाचार करतो. तेव्हां एवढें तरी करा. आपण त्याची परीक्षा करावी. गरीब विचाऱ्याची आत्मशांति होईल. रामदत्तेच्या म्हणण्या-वरून श्रीभूतिला राजानें बोलावणें पाठविलें. राजाचे दूत पाहतांच श्रीभूतींचें हृदय धडधडूं लागलें. पण ती राजाज्ञा होती तो तसाच राजाकडे आला. राजानें त्यास एकांत ठिकाणीं नेऊन विचारलें. श्रेष्ठी! तूं त्या विचाऱ्याचीं रत्नें घेतलीं आहेस काय? घेतलीं असल्यास मला सांग!' 'राजा! मी रत्नें तर घेतलीं नाहींतच; पण त्याचीं रत्नें कसलीं होतीं तीं पाहिलीं देखील नाहींत. मग घेण्याची गोष्टच कसली! राजा स्वस्थ राहिला.

दुसरे दिवशीं रामदत्तेच्या सांगण्यावरून राजानें श्रेष्ठीला द्यूत खेळण्यास बोलावणें पाठविलें. द्युतांस सुरुवात झाली. राणीहि त्यांच्या-मध्यें येऊन बसली. खेळ रंगांत येत चालला होता. तेव्हां सहज राणी प्रेमानें म्हणाली, श्रेष्ठीवर्या! आपली खूण कांहींतरी सांगा! श्रेष्ठी गर्वानें फुगून गेला. तो म्हणाला आज आम्हीं साखरेची खीर खाल्ली. ती खीर मी माझ्या मुलांबाळांसह पूर्व दिशेकडे तोंड करून खाल्ली. हीच माझी खूण. रामदत्तेनें झटकन् आपल्या निपुण दासीस ती खूण सांगून रत्नें मागण्यास सांगितलें. दासी श्रेष्ठीच्या घरीं गेली. खूण सांगून रत्नें मागितलीं. तेव्हां ब्राह्मणी म्हणाली, रत्नाबद्दल मला कांहीं ठाऊक नाहीं. दासी परत आली. तोंपर्यंत राणीनें श्रेष्ठीचें जानवें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जिंकलें होतें, तें ज्ञानवें देऊन पुन्हां श्रेष्ठीणीकडे दासीस पाठविलें. पण ती पुन्हां परत आली. तिसऱ्या खेपेस श्रेष्ठीची मुद्रिका रामदत्तेनें जिंकली होती, तीच देऊन दासीस पाठविलें. मुद्रिका पाहतांच ब्राह्मणी श्रेष्ठीवर खूप रागावली. पण कांहीं उपाय नसल्यामुळें तिनें मुकाट्यानें तीं पांच रत्नें काढून दासीच्या हवालीं केलीं. दासीनें आणून रामदत्तेस दिलीं. राणीला कार्यभाग झाल्याबद्दल अत्यंत आनंद झाला. शेवटीं राजास खूण करून खेळ थांबविण्यास सांगितलें. राजानें खेळ थांबविला. सर्व द्युतकार मंडळी निघून गेलीं. राणीनें तीं पांच रत्नें राजाच्या स्वाधीन केलीं. नंतर राजानें तीं रत्नें पुष्कळशा रत्नांमध्यें मिसळून सुमित्रांस बोलावून आणलें व सांगितलें बांबारे ! हीं पहा ! रत्नें ! यांतून तुझीं रत्नें असतील तीं तूं काढून घे ! सुमित्रदत्तानें नेमकीं आपलीं पांच रत्नें काढून घेतलीं. तींच पांच रत्नें घेतलेलीं पाहून राजाला त्याच्या म्हणण्याची प्रचिति आली. सुमित्रदत्ताची त्याला खात्री पटली. श्रीभूतीचा राग आला. स्वतःला सत्यवादी म्हणविणारा श्रेष्ठी इतका वाईट असेल याची कधीं कल्पनाहि करतां आली नसती ! पण ती आतां आली. त्यानें श्रेष्ठीचें सारें धन आपल्या ताब्यांत घेतलें. त्याच्या डोक्यास लिंबाचीं पानें बांधून गाढवावर बसवून त्याची वरात काढली व नगरींतून हांकून लावलें. श्रीभूतीवर याचा आघात झाला. तो छाती फुटून मरण पावला. मरून राजाच्या जामदारखान्यांत ' गंधन ' नांवाचा भुजंग होऊन जन्मला.

श्रीभूतीच्या जागीं राजानें धम्मिल्ल नांवाच्या ब्राह्मणाची पुरोहित म्हणून योजना केली. धम्मिल्ल मोठा विद्वान् व सर्व विद्या पारंगत होता.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सुमित्रदत्त आपलीं रत्नें व संपत्ती घेऊन पद्मखंड नगरीस परत आला. त्या धनाचा त्यानें साधूंना दान देण्याकडे उपयोग केला. दान दिल्यानंतर ' मला माझ्या पुण्याईनें रामदत्तेच्या पोटीं जन्म मिळो ' अशी भावना तो भावी. कांहीं दिवस यांत गेले. पुढें तो विमलकांतारगिरीवर गेला. तेथें वरधर्ममुनी आले होते. त्यांचें तोंडून धर्मश्रवण करून त्यानें श्रावकत्वाची दीक्षा घेतली. पण तीं व्रतें पाळण्यांत त्याचें हातून अतीचार घडल्यामुळें त्याच पर्वतावर तो व्याघ्र होऊन जन्मला. हा वाघ मुनींना वंदन करण्यास गेलेला पाहून वाघिणीस राग आला. तिनें त्याच्यावर झडप घालून ठार केलें. मरून तो राणी रामदत्तेच्या पोटीं सिंहचंद्र नांवानें जन्मला. त्याचा भाऊ पूर्णचंद्र अगदीं पौर्णिमेच्या चंद्रासारखा होता.

एकदां राजा सिंहसेन द्रव्याची पाहणी करण्यासाठीं जामदारखान्यांत गेला. गंधन भुजंगानें त्याला पाहिलें. त्याला पाहतांच जातिस्मरण झालें. त्याचें वैर जागृत झालें. त्यानें सिंहसेनाला दंश केला. तेव्हां राजानें त्याचें वीष उतरविण्यासाठीं पुष्कळशा गारुडी लोकांना बोलावणें पाठविलें. त्याप्रमाणें पुष्कळसे गारुडी सिंहपुरांत गोळा झाले. राजानें आज्ञा करतांच एक गारुडी पुढें आला. त्यानें आपल्या मंत्रविद्येच्या सहाय्यानें सर्व सर्पांना बोलाविलें. त्या मंत्रप्रभावानें सर्व जातींचे सर्प गोळा झाले. नंतर तो गारुडी त्या सर्पांना उद्देशून म्हणाला ' तुम्हांपैकीं ज्यानें अपराध केला असेल त्यानेंच फक्त येथें थांबावें. बाकीच्यांना जाण्यास परवानगी आहे. ' ' गंधन ' भुजंगाशिवाय इतर सर्प निघून गेले. तेव्हां त्यास गारुडी म्हणाला दुष्टा ! तूं आपलें विष परत घे. नाहींतर ह्या प्रज्वलित

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अग्निकुंडांत उडी टाकून मरण्यास तयार हो. हे शब्द ऐकतांच सर्पाला जातिस्मरण झालें. त्याच्या वैरभावानें पुन्हां उचल खाल्ली, आणि केलें तें आपण योग्य केलें असें त्यास वाटलें. आतां मरणेंच वरें. असा विचार करून त्यानें अग्निकुंडांत प्रवेश केला. मरून तो एका भयंकर अरण्यांत वनगाय होऊन जन्मला.

सिंहसेन मरून त्याच रानांत बलाढ्य हत्ती जन्मला. धर्मिल्ल पुरोहित मरून त्याच अरण्यांत लाल तोंड्या माकड झाला.

सिंहचंद्र राज्यावर आला. मोठ्या प्रेमळपणानें तो राज्यकारभार चालवूं लागला. त्यानें आपल्या गुणानें सर्व भूमंडाळाला मोहित टाकलें.

पोदनपुरांत राजा पूर्णचंद्र आपल्या शिष्यमति राणीसह राज्य करीत होता. अवधिज्ञानी भद्रबाहू गुरुजवळ धर्मश्रवण करून पूर्णचंद्रानें दीक्षा घेतली. शिष्यमतीनें दत्त आर्यिकेजवळ आर्यिकेची दीक्षा घेतली. पूर्णचंद्रमुनींना शिष्यमति आर्यिकेनें विचारलें. महाराज ! रामदत्ता माझी मुलगी सध्यां कोठें आहे ? मुनी म्हणाले, ' सर्पदंशामुळें तुझें जामात मरण पावले. यामुळें रामदत्ता विधवा झाली आहे. नंतर ती आपल्या मुली—रामदत्ते—कडे आली. रामदत्तेनें आपल्या मातेला अर्जिका झालेली तिनेंहि तिच्या जवळ अर्जिकेचीं व्रतें घेतलीं. व ती अर्जिका बनली. सिंहचंद्राचें मातेवर अलोट प्रेम होतें, तिनें दीक्षा घेतलेली पाहतांच त्यानें आपल्या भावांस पूर्णचंद्रास राज्य सोंपवून तो विरागी बनला. नंतर भद्रबाहूमुनीकडे जाऊन त्यानें दीक्षा घेतली. व तो खडतर तप आचरूं लागला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पूर्णचंद्र राज्यावर येतांच त्यानें जैनधर्म टाकून मिथ्याधर्माचा स्वीकार केला. असो

पुढें रामदत्त आर्यिकेनें आपलें पूर्वभवांतर सिंहचंद्रमुनींना विचारलें. त्यावेळीं त्यांना अवधिज्ञान झालें होतें. ते म्हणाले. या भरत-क्षेत्रांत कौशल देश आहे. त्यांतील वर्द्धकी गांवांत मृगायन नांवाचा ब्राह्मण राहात असे त्याची प्रिया मधुरा. त्याची मुलगी वरुणा होती. पुढें मृगायन मरण पावला. तो मरून साकेत नगरीचा राजा अति-बळ त्याची राणी श्रीमती त्यांच्या पोटीं हिरण्यमति नांवाची मुलगी होऊन जन्मला. पोदनपूरच्या नरेशाला – पुर्णचंद्राला ती दिली. तिच्या पोटीं रामदत्तापूर्वीची मधुरा होऊन जन्मली. वरुणा कर्मा-नुसार मरून तुझ्या पोटीं पूर्णचंद्र नांवाचा मुलगा होऊन जन्मली. पद्मखंडपुरींचा सुमित्रदत्त त्याचीं रत्नें तुझ्यामुळें परत मिळालीं. म्हणून तो मरून तुझ्या पोटीं सिंहचंद्र नामें जन्मला. आणि तोच मी. माझे पिताश्री व तुझे नाथ मरुन या महान् अरण्यांत भयंकर हत्ती होऊन जन्मले आहेत. श्रीभूतीचा जीव सर्पहि मरून वनगाय झाला. वन-गाय मरून पुन्हां ‘ कुर्कट ’ सर्प झाला. या सर्पानें हत्तीला डंस केला. मरतांना जिननामाचा जप केल्यामुळें तो सहस्रार विमाना-मध्यें श्रीधर नांवाचा देव झाला. श्रीभूतीच्या जागीं ठेवलेला धमिल्ल पुरोहित लालतोंड्या माकड झाला. सर्प व माकड मरुन अत्यंत दुःखद वालुकाप्रभ नरकास गेले. किरातराच्या मृगालक नौकरानें त्या हत्तीचे दांत व मोती आपल्या श्रेष्ठीला दिलीं. त्यानें पूर्णचंद्र राजास तीं भेट केलीं. पूर्णचंद्रानें दांतांचें सिंहासन केलें व मौक्ति-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कांची माळा करून गळयांत घातली. आणि त्याच सिंहासनावर बसून तो राज्य करीत आहे.

रामदत्ता आर्जिकेनें पूर्णचंद्रास धर्मोपदेश केला. तो श्रावक बनला व मरून सहस्रार स्वर्गांतील वैडुर्यस्वर्गांत देव झाला. रामदत्ता आर्यिकाहि कांहीं काळानें मरून स्वयंप्रभ विमानांत देव झाली. सिंहचंद्रमुनींनीं सल्लेखना आचरून शेवटीं ग्रैवेयक विमानांत महर्द्धिक देव झाले. हे देव स्वर्गांतील नाना भोग भोगून कोठें जन्मले हें आतां सांगतों.

भरतक्षेत्रांत विजयार्द्ध पर्वताच्या दक्षिणेस धरणितिलक नांवाची नगरी आहे. तिचा राजा अतिबल आपल्या सुशिला राणीसह राज्य करीत होता. त्यांची मुलगी श्रीधरा नांवाची होती. ती सर्व कलेंत निष्णात व गुणवान् होती. सकालक पुरींत सुदर्शन विद्याधर राहात असे. त्याला ही श्रीधरा मुलगी दिली. तिच्या पोटीं वैडुर्य विमानांतील देवानें येऊन जन्म घेतला. ती यशोधरा नांवाची कन्या झाली.

विजयार्द्धाच्या उत्तर श्रेणीवरील प्रभात नगरीचा राजा सूर्यप्रभ. त्याला यशोधरा दिली. इच्या पोटीं स्वर्गांतून च्यवून वरुणेनें जन्म घेतला. त्याचें नांव रश्मिवेग ठेवण्यांत आलें, मुलाला राज्य देऊन सूर्यप्रभानें मुनीचंद्र मुनीजवळ दिगंबरदीक्षा ग्रहण केली, श्रीधरा व यशोधरा यांनीं गुणमति आर्यिकेजवळ अर्जिकेची दीक्षा घेतली.

एकदां रश्मिवेग सिद्धकूट जिनालयाची वंदना करण्यास गेला. तेथें जिनालयाचें पूजन वंदन करून साधूंना वंदना केली. धर्मश्रवण करून त्यानें हरीचंद्रमुनीजवळ दीक्षा घेतली. रश्मिवेगमुनी कांचनगुहेंत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शास्त्रपठण व तपश्चरण करूं लागले. श्रीधरा व यशोमति अर्जिकाहि तेथें येऊन राहिल्या.

तिसऱ्या नरकाचें दुःख भोगून तो श्रीभूतीचा जीव त्या गुहेंत अजगर झाला. तिघां मुनींना गुहेंत निजलेले पाहून त्यास पूर्वीचा द्वेष आठवला. त्यानें तिघांना दंश केला. रश्मिवेगमुनी मरून कापिष्ट स्वर्गांत अर्कप्रभदेव झाले. आर्जिका मरून रूचक विमानांत देव झाल्या. अजगर मरून पुढें चवथ्या नरकास गेला.

चारणमुनी सिंहचंद्र अहमिंद्र देव झाले होते. ते पुढें भोगभूमींत जाऊन जन्मले. चक्रपुरांत राजा अपराजित राज्य करीत होता. त्याची राणी सुदर्शना. त्याचा पुत्र चक्रायुध अति सुंदर असून त्याची राणी चित्रमाला कमलदललोचना होती. कापिष्ट स्वर्गांतून च्यवून अर्कप्रभदेव च्यवून यांच्या पोटीं वज्रायुध नांवानें जन्मला. हाच सिंहसेनाचा जीव होय.

पृथ्वीतिलक नगरीचा राजा अतिवेग होता. त्याची राणी प्रियंकरा व मुलगी रत्नमाला होती. हीच पूर्वजन्मींची रामदत्ता (श्रीधरा) होय. पूर्वजन्म ऋणानुबंधामुळें वज्रायुधांशीं रत्नमालेचें लग्न झालें. त्याच्या पूर्वींची यशोधरा स्वर्गांतून च्यवून रत्नायुध नांवाचा मुलगा होऊन जन्मली. पूर्वभवींचा पूर्णचंद्रमुनि चक्रायुध जन्मला. चक्रायुधानें आपल्या भावाला राज्य सोंपवून स्वतः पिहिताश्रवमुनीजवळ दीक्षा घेतली. खडतर तपश्चरण करून आपल्या कर्मांचा नाश केलाव-शेवटीं मोक्षास गेला. पुढें वज्रायुधानें दीक्षा घेतली. रत्नायुध राज्या वर बसल्यानंतर तो पुन्हां मिथ्यात्वी बनला. प्रजेला छळूं लागला. त्याच्या दरबारीं मेघनिनाद नांवाचा एक हत्ती होता. एकदां राजा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हत्तीवर बसून सहल करण्यास निघाला. हत्तीला तहान लागली म्हणून तो नदीवर गेला. नदीवर एक मुनी तपश्चरण करीत होते. त्यांना पाहतांच हत्तीला जातिस्मरण झालें व तहान लागलेली असूनही त्यास स्पर्श करीना. हें पाहून राजा विस्मयचकित झाला. त्यानें व्रजदंत-मुनींना वंदन करून विचारलें. महाराज ! याचें कारण काय असावें ? मुनी म्हणाले राजा ऐक ! !

चित्रकारपुरींत राजा प्रीतिभद्र आपल्या सुंदरी राणीसह राज्य करीत होता. त्याचा पुत्र प्रीतिंकर. राजाचा मंत्री चित्रबुद्धि. त्याच्या भार्येचें नांव कमळा होतें. त्यांना विचित्रमति नांवाचा एक मुलगा होता. प्रीतिंकाराची व विचित्रमतीची मैत्री होती. दोघेहि जिनधर्मप्रेमी होते. एकदां ते दोघे श्रुतसागर मुनीकडे आले. मुनीमुखांतून धर्म-श्रवण करून त्यांनीं तेथेंच दीक्षा घेतली. नंतर ते दोघे विहार करीत करीत अयोध्या नगरीस आले. गोचर्येसाठीं गांवांत गेले असतां विचित्रमतीच्या दृष्टीस बुद्धीमति गणिकेचें रूप पडलें. त्याचें मन चलायमान झालें. तो विषयासक्त बनला. त्यानें जिनधर्माचा त्याग केला व तेथील राजाच्या गंधमित्राच्या घरीं स्वयंपाकी म्हणून राहिला. पुढें त्याचें आणि गणिकेचें मोठ्या थाटानें लग्न झालें. तिच्याशीं नाना प्रकारचे भोग भोगीत तो आपला काळ सुखांत घालवूं लागला. नंतर मरून सातव्या नरकास गेला. पूर्वकृत पापांमुळें पुष्कळ प्रकारचे दुःखदायक जन्म यानें आजपर्यंत घेतले. शेवटीं तुझा गजेश्वर होऊन जन्मला. त्यामुळें मला पाहतांच हे राजा ! त्याला जातिस्मरण झालें. त्याला जैनधर्म सोडल्यामुळें आपणांला भोगावें लागणारें पाप त्याच्या दृष्टीपुढें आल्यामुळें आतां अत्यंत वाईट वाटलें आहे आणि आतां तो

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धर्माचा स्वीकार करून श्रावक बनला आहे, म्हणून पाणी पीत नाहीं.'

मुनीच्या तोंडून ही कथा ऐकून रत्नप्रभानें पुन्हां श्रावकाची दीक्षा घेतली.

वज्रायुधमुनी प्रियंगूवनांत तप करीत आहे हें जाणून तो पूर्वीचा श्रीभूतीचा जीव नरकांतून येऊन त्या अरण्यांत भिल्ल होऊन जन्मला. मृगयेसाठीं तो वनांत फिरत असतां काकतालीय न्यायानें त्यानें सोडलेला बाण मुनीस लागून मुनी मरण पावले व सर्वार्थसिद्धी स्वर्गांत जाऊन जन्मले.

मुनीवधानंतर भिल्लही थोड्याच दिवसांत मरून सातव्या नरकास गेला. रत्नायुध आणि माता रत्नमाला सुखासमाधानानें मरून अच्युत स्वर्गांत देव झाल्या.

पूढें हे देव स्वर्गांतून च्यवून कोठें जन्मलें तें सांगतों.

" धातकीखंडांत पूर्व मेरूपर्वताला अपरविदेहक्षेत्र आहे. त्यांत गंधिल नांवांचा एक महान् देश आहे. त्या देशांतील अयोध्या नगरींत राजा अर्हद्दास आपल्या जिनदत्ता राणीसह राज्य करीत होता. राजा अर्हद्दास अत्यंत शूर, वीर, पराक्रमी होता. तसाच अत्यंत विद्वान्‌ही होता. मोठमोठ्या पंडीतांना त्याच्या विद्वत्तेपुढें हात टेकावे लागत असत. जिनदत्ता मोठी गुणी व्रतानुसार वागणारी होती. त्यांना चार सुपुत्र होते. वीतभय, बीभिषण, बलदेव व वासुदेव हीं त्यांचीं नांवें होतीं. चौघेही मुलें तेजस्वी, तल्लख बुद्धीचीं होतीं. पुढें विभीषण मरून नरकास गेला. बलदेवानें अनिव्रत गुरुजवळ दीक्षा घेतली. बलदेवमुनी पुढें लवकरच समाधिस्त होऊन लातवेंद्र स्वर्गांत अर्ककीर्ति देव होऊन जन्मले. लातवेंद्रानें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आपल्या अवधिज्ञानानें विभिषण नरकास गेल्याचें जाणून घेतलें. त्यांना त्याचें प्रेम वाटूं लागलें. तेथें जाऊन त्यांना योग्य उपदेश केला. प्रेमामुळें जगांत काय होत नाहीं ? लातवेंद्राच्या उपदेशामुळें विभिषणाच्या मनावर परिणाम झाला. असो !!!

जम्बूद्वीपांतील भरतक्षेत्रांत गंधमालिनी नांवाचा देश आहे. त्यांत वीजयार्द्ध नांवाची एक प्रख्यात नगरी आहे. त्या नगरींत राजा श्रीधर्म आपल्या राणी श्रीदत्तेसह राज्य करीत होता. यांना श्रीदास नांवाचा मुलगा होता. एकदां तो मंदिरांत सुवर्ण—विद्या साध्य करून घेण्यासाठीं गेला होता. तेथें लातवेंद्रानें त्यास सदुपदेश दिल्यामुळें त्यानें श्रावकवृत्ताची दीक्षा घेतली. पुढें अनंतमतिमुनीकडे जाऊन त्यानें मुनीदीक्षा घेतली. तपश्चरण करून तो मरण पावला. मरून चंद्रभविमानांत तो देव झाला.

सातव्या नरकांतून विभिषणाचा जीव भयंकर सर्प होऊन जन्मला. नंतर तोहि मरून पहिल्या नरकास गेला. तेथून तो पापी जीव नाना कुयोनींतून नाना प्रकारचीं दुःखें भोगीत फिरूं लागला.

भरतक्षेत्रांतील वृज्र नामक अरण्यांत ऐरावत्ती नांवाची नदी आहे. तिच्या कांठीं खंडकेशी नांवाचें एक तपस्वी राहत असत. त्याची भार्या स्वर्णकेशी व मुलगा मृगशंग नांवाचा होता. मृगशृंग कंदमुळें भक्षण करून पंचाग्नीचें साधन करीत आपला काळ मोठ्या सुखानें घालवीत असे. हाच विभिषणाचा जीव. यानें एकदां देवाचा नायक चंद्राभखेटाला पाहिलें व तसें आपणांला रूप प्राप्त व्हावें असें निदान बांधलें. तो पुढें मरण पावला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विजयार्द्ध पर्वताच्या उत्तरश्रेणिवरील गगनवल्लभ नगरींत विद्याधर विद्युत्प्रभ आपल्या विद्युत्प्रभा राणीसह राज्य करीत होता. तो मृगशृंग मरून याच्या पोटीं विद्युद्दंष्ट्र विद्याधर नांवानें जन्मला.

विद्युद्दंष्ट्र भद्रसाल वनांत आपल्या भार्येसह गेला होता. तेथें वसलेल्या मुनींना पाहून त्याला पूर्व स्मृति झाली. त्यानें प्रियेस परत घरीं पाठवून आपण संजयंतमुनींना घेऊन विजयार्द्धाच्या दक्षिण भागांकडील नद्यांच्या पंच संगमावर आणून सोडलें. व घरीं येऊन निजला. पहांट होतांच तो आपल्या बंधुगणांना म्हणाला बंधू ! पंचनद्यांच्या संगमावर जा ! तेथें पांचशें धनुष्य उंचीचा नागडा मुनी उभा आहे. तो तीन दिवसांला एक विद्याधर धरून खातो. त्याचा आपण योग्य तो बंदोबस्त करा. नाहीं तर अशांतता माजेल. त्याच्या म्हणण्यावरून ते विद्याधर तेथें गेले. त्यांनीं तप्त लोखंडाच्या सळ्या भोंकसून मुनींना ठार केलें. मुनींनीं तो उपसर्ग मुकाटपणें सहन केला. त्यामुळें त्यांना केवलज्ञान प्राप्त झालें. पूर्वींचा श्रीभूती तोच विद्युद्दंष्ट्र होय.

पूर्वींचा सिंहसेन पुष्कळ भवाचे फेरे फेरून वीतशोक नगरींत संजय होऊन जन्मला. संजयाचा भाऊ ब्रह्मलोकांपासून च्यवून जयंत झाला. तो मरून धरणेंद्र झाला. मागील भवांत सुवर्णचंद्र होता तो लातवेंद्र झाला. त्याच्या पूर्वींच्या भवांत तुझी माता रामदत्ता होती. तेव्हां हे धरणेंद्र ! हें वैर सोडून दे ! लातवेंद्राच्या सांगण्यावरून धरणेंद्रानें दुष्ट विद्युद्दंष्ट्राला सोडून दिलें. तेव्हां सर्व विद्याधर त्यांच्या चरणीं लागले. त्याच्या सर्व विद्या हरावून घेतल्या. तेव्हां तुम्हीं ५०० धनुष्यें उंचीची मूर्ति उभी करा. म्हणजे तुमच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विद्या तुम्हांस परत मिळतील. असा उःशाप देऊन धरणेंद्र निघून गेले.

मथुरेंत राजा अनंतवीर्य राज्य करीत होता. त्याच्या प्रथम भार्येच्या मद्यमालेच्या उदरीं लातवेंद्र स्वर्गातून येऊन जन्मला. त्याचें नांव अमितप्रभ. दुसऱ्या राणीच्या पोटीं अरणेंद्राचा जीव मेरू नांवानें जन्मला. त्या दोघांही भावांनीं इहलोकींचीं भरपूर सुखें भोगून श्रेयांसतीर्थंकराजवळ जैनदीक्षा घेतली. हाच मेरूकुमार केवली झाला. नंतर श्रीश्रेयांसतीर्थंकराचा गणधर बनला.

‘ कथा ७३ वी ’

वारत्रय शिववर्मा.

कुरुजांगल देशांत धनधान्यसंपन्न कुबेरनगरीसारखी शोभिवंत अहिछत्रपूर नांवाची नगरी होती. त्या नगरींत एक वेदविद्यापारंगत शिवभूति श्रोत्रिक आपल्या लाडक्या वसुशर्मा भार्येसह राहात असे. त्यानां सोमशर्मा व शिववर्मा नांवांचीं दोन मुलें होतीं. वेदाचें उच्चारण अशुद्धपणें केल्यामुळें शिवभूतीनें शिवशर्म्याला दोनतीन वेळां शिक्षा केली. त्यामुळें त्याचें नांव वारत्रिक असें पडलें. पुढें हा वारत्रिक सर्व शास्त्रांत पारंगत बनला.

लोक त्याला वारत्रिक म्हणून संबोधित असत. त्याला त्याचें वाईट वाटे. शेवटीं इतका त्रासला कीं तो विरागी बनला. घरांदारांचा त्याग करून तो श्रावस्ती नगरीस आला. तेथें प्रवरमुनीजवळ जिनधर्माचें श्रवण करून त्यानें जिनदीक्षा घेतली. एकदां सहज तो

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विहिरीच्या कांठावर बसून आपलें मुखावलोकन करीत होता. तेव्हां मुनी त्यास म्हणाले " कां अझूनहि चेहरा पाहावासा वाटतो ? एखाद्या स्त्रीला तर भेटावयाचें नाहींना ? गुरुच्या भाषणानें तो मनांत चरकला. त्याला अत्यंत विषाद वाटला. मनांत भाव नसतांना मुनींनें असें म्हणावें तें त्यास रुचलें नाहीं. तो एकल विहारीं बनून अगदीं घोर निर्जन अरण्यांत जाऊन तपश्चरण करून राहिला.

एक महिनाभर उपवास करून तो उपवासाचें पारणें फेडण्यासाठीं त्या अरण्यांतच भटकूं लागला. तेथें आहार कोण देणार ? पण पुण्यवंतांना कोण सहाय्य करीत नाहीं ? तेव्हां अदृश्य देवांनीं त्याला भिक्षा दिली. पण ती अग्राह्य म्हणून त्यांनीं घेतली नाहीं. नंतर ते हळूहळू पुढें जाऊं लागले. शेवटीं ते एका प्रवासी लोकांच्या वस्तीला आले. तेथें त्यांनीं दिलेली भिक्षा घेऊन ते आपल्या तपश्चर्येसाठीं निघून गेले.

पुढें कांहीं दिवसांनंतरची गोष्ट ! सागरदत्त नांवाचा व्यापारी आपल्या परीवारांसह या साधूंच्या प्रदेशांत आला. त्याच्याबरोबर त्याचा गंगदेव नांवाचा मित्रहि आपल्या गंगदेवी भार्येसह आला होता. त्याला मदनवेगा नांवाची मुलगी होती. मदनवेगा संपूर्ण कलेंत व सर्व शास्त्रांत पारंगत व रूपानें मदनवेगाच होती. माध्यान्हाचें वेळीं आपल्या अंगावर पुष्कळसे अलंकार घालून घोड्यावर बसून नृत्य करीत होती. नाचतां नाचतां ती आपल्या मधुर गोड आवाजानें सर्व दिशा भारून टाकी. असें तिचें नृत्य चाललें होतें. इतक्यांत वारत्रय साधू आहारासाठीं तेथें आले. प्रथम त्याच्या दृष्टीस मदनवेगा पडली. तिचें सुंदर नृत्य, गोड गाणें ऐकून त्याचें मन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अस्थिर झालें. ते तिच्या रूपावर भाळलें. अगदीं कामातूर बनलें. जैनधर्माचा त्याग करून मदनवेगेकडे आले. मदनवेगाहि त्यांना पाहतच राहिली. तिच्या मनांतहि प्रेमांकूर उद्भवला. एकमेकांना एकमेकांचा सहवास प्रिय वाटूं लागला. पण येथें जमणार नाहीं म्हणून ते दोघे घोड्यावर बसून परत अहिछत्रपुरास आले. वारात्रिकाला परत आलेला पाहून त्याच्या ओळखीचे लोक त्याला नांवें ठेवूं लागलें. ते म्हणत ! तुला हें करणें शोभत नाहीं. ब्राह्मणांकडून प्रायश्चित्त घे. आणि खुशाल आनंदानें आपल्या घरीं राहा ! घरकृत्यें करण्यांत लोकांना लाज कसली ? तेव्हां तो म्हणे माझें वागणेंच बरोबर आहे. मी मला शोभेल असेंच वागतों. तुम्हांला त्याची खात्री हवी असेल तर कोणी चतुर्वेदज्ञ मीमांसा न्याय जाणणारा ज्ञानी मजकडे घेऊन या. मी त्याचा संशय दूर करीन.

त्यानें लोकांचा दोषापवाद मोठ्या युक्तीप्रयुक्तीनें खोडून टाकला. मदनवेगेला त्यानें सर्व विद्येंत पारंगत केलें. यांत बारा वर्षें निघून गेलीं. नंतर एकदां प्रियेसह नग्न देशांत फिरत फिरत राजगृहीं नगरीस आला. श्रेणिक आपल्या परिवारांसह बसला असतां त्याच्यापुढें खड्ग, चाप यावरील उत्तम नृत्य करून दाखवूं लागला. सहज आकाशांत त्याची नजर गेली. तेथें विद्याधर जोडपें उभे होते. त्याना पाहतांच तिला जातिस्मरण झालें. जातिस्मरण होतांच मदनवेगेला आपल्या सर्व विद्या परत मिळाल्या. त्या विद्या पाहून श्रेणिक राजा आश्चर्यचकित झाला. तो म्हणाला 'याचा अर्थ काय ? आपण कोण ? तेव्हां वारत्रय सांगूं लागला:—

या भरत क्षेत्रांत विजयार्द्ध पर्वताच्या दक्षिण भागाला प्रियंकर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नांवाची नगरी आहे. त्या नगरींत राजा प्रियंकर आपल्या महाव्रती महादेवी राणीसह राज्य करीत होता. मी पूर्वजन्मींचा त्याचा प्रीतिंकर नांवाचा मुलगा होतों व मी सर्वांचा आवडता होतों. एकदां आकाशमार्गानें जात असतां पृथ्वीवर एका विहीरीच्या पाण्यांत केशाचें प्रतिबिंब पडलेलें पाहून मी खालीं उतरलों. तो तेथें एक स्त्री विद्याधरी महाविद्येचें साधन करीत होती. तिचें विहीरीच्या पाण्यांत पडलेलें प्रतिबिंब पाहून मी अगदीं मोहित होऊन गेलों. तिच्याजवळ जाऊन मी आपलें स्वरूप प्रगट केलें. तेव्हां ती हात जोडून म्हणाली क्षमा करा! माझ्या विद्यासाधनांत तुम्हीं विघ्न आणूं नका. आपला भाव मी ओळखला आहे. मी खात्रीनें आपली होईन. पण मला विद्यासाधन करून घेऊं द्या." तिच्या म्हणण्याप्रमाणें वागण्याचें ठरवून मी परत नगरीस आलों. पुढें तिला विद्येची प्राप्ती झाल्यानंतर माझें तिच्याशीं मोठ्या थाटानें लग्न झालें. लग्नोत्तर आम्हीं नाना प्रकारच्या सुखोपभोगांत आपला काळ आनंदानें घालवूं लागलों. एकदां राजवाड्याच्या गच्चीवर बसलों होतों. आकाशांतून एक विमानासारखा उत्तुंग ढग विरून जात असतांना पाहिला. त्यामुळें माझ्या मनांत वैराग्यभावना उत्पन्न झाली. विरक्त मनानें संयमसेनमुनीजवळ जाऊन दीक्षा घेतली. भयंकर तपश्चर्या करून मी सौधर्म स्वर्गांत देव होऊन जन्मलों. विद्याधरी तप करून समाधिमरणानें मरून त्याच स्वर्गांत माझी देवी होऊन जन्मली.

स्वर्गीय सुख भोगून आयुष्य सरल्यानंतर अहिच्छत्र नगरींतील शिवभूती ब्राह्मणाच्या वसुमित्रा भार्येच्या पोटीं मी जन्म घेतला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

माझें नांव शिवशर्मा होय. अध्ययनानंतर मी संसारतारणी दीक्षा घेतली. पण पुढें माझी या माझ्या पूर्वजन्मींच्या प्रियेशीं भेट झाल्यानंतर मी पुन्हां सुखापभोगांत मग्न झालों. मी आपलें मुनीत्व सोडलें. देशपर्यटन करीत आतां येथें आलो आहे. विद्याधर अमरें-द्रांना भोगावयास मिळणाऱ्या भोगोपभोगानें देखील माझी तृप्ती झाली नाहीं, तर या माझ्या सखीच्या सहवासानें आतां थोडीच मिळणार आहे ?

एवढें म्हणून तो घोड्यावरून खालीं उतरला. विद्याधरीहि आपल्या घोड्यावरून खालीं उतरली. पूर्वभव संस्कृतीचें स्मरण झाल्यामुळें तिला सर्व विद्या प्राप्त झाल्या.

हा प्रत्यक्ष झालेला अतिशय पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. वारत्रयांनीं पुन्हां आपल्या दोषांची आलोचना करून दमवरमुनी-जवळ दीक्षा ग्रहण केली. दीक्षेनंतर श्रेणिकानें त्याचें पूजन केलें.

वरार देशाच्या पश्चिमेला विन्थानदीच्या कांठीं वैराकर नगरी होती. त्या नगरींत मोठमोठीं सुंदर जिनालयें होतीं. तेथें हे मुनी विहार करीत आले. त्यांनीं नानाप्रकारची तपश्चर्या करून मुक्ति लक्ष्मीला वरलें. जिनधर्माची दीक्षा घेऊन मदनवेगा श्राविका बनली.

कथा ७४ वी.

‘ द्वीपायन मुनी ’

कुलाल देशांतील श्रावस्ती नगरींत राजा द्वीपायन राज्य करीत होता. त्याची राणी मनोरमा एकदां वसंतऋतुमध्यें नगराबाहेरील

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नंदनवनांत आपल्या अंतःपुरपरिवारांसह सायंकाळीं क्रीडा करण्यासाठीं गेली. बागेंत एक आम्रवृक्ष मोहोरानें अगदीं बहरलेला होता. त्याचा सारखा वास सुटला होता. त्याच्या वासाला मुग्ध होऊन राजानें एक मोहर तोडून कानांवर ठेवला. त्याचें अनुकरण त्याच्या सर्व परिवारानें—सैनिकांनीं केलें. त्यामुळें त्या झाडावरील सर्व मोहोर झडून गेला. तें झाड पूर्वीं मोहर होता कीं नव्हता असें झालें. हें दृश्य एका नग्नाचार्यांनीं पाहिलें. त्यांनीं झाडाजवळ जाऊन एक खालीं पडलेली मोहराची फांदी घेऊन आपल्या शेंडीला बांधली व राजाच्या पुढें त्याचे गुण गात पळत सुटले.

नग्नाचार्यांनीं शेंडीला आम्रमोहोर बांधलेला पाहून राजाला आश्चर्य वाटलें. त्यांनीं विचारलें साधो! थोड्या वेळांपूर्वीं मी हा वृक्ष मोहोरांनीं बहरलेला पाहिला. पण आतां त्यावर कोठें मोहर दिसत नाहीं. मुनी उत्तरलें राजा खरें आहे. थोडया वेळांपूर्वीं हा वृक्ष बहरलेला होता. पण तूं सहज त्याच्या वरील मोहोर थोडासा तोडून आपल्या कानांवर ठेवलास. त्याचवेळीं तुझ्या सर्व परीवारांनीं, सैन्यांनीं तुझें अनुकरण केलें. त्यामुळें या वृक्षावरील सर्व पानें, मोहोर वगैरे झडून गेला. मीहि तिकडूनच येत होतो. मला मोठ्या कष्टानें वृक्षाखालीं ही मोहराची काडी मिळाली. मी ती आपल्या शेंडीस बांधली. तुझ्याचमुळें हा सारा वृक्ष अगदीं पत्रहीन शुष्क बनला. त्याची संपदा नष्ट झाली.

हें ऐकतांच राजाच्या दृष्टीपुढें पूर्वीचें व आतांचें दृश्य उभें राहिलें. संसारांतलीं सारीं सुखें अशींच नश्वर आहेत; आज या घटकेला दिसणारें सुख पुढील घटकेला दिसत नाहीं. धिःकार

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असो या संसाराला ! व त्याच्यावर मोह करणाऱ्याला !!! असा विचार करून त्यानें आपल्या जेष्ठ पुत्रास उदीर्णवलवाहनांस राज्यावर बसवून सूर्याचार्याजवळ दीक्षा ग्रहण केली.

द्वीपायन मुनीसंघांत राहून आगमाचे यथार्थ अध्ययन करूं लागले. एकदां संघासह उज्जयनी नगरीजवळील उद्यानांत आले. द्वीपायन तपासाठीं जवळील मुनीसागरपर्वतावर गेले होते. राजाला ही वार्ता समजली. तो आपल्या परिवारांसह मुनीराजाच्या दर्शनासाठीं आला. सर्व मुनीनां वंदन केलें. पण त्यास द्वीपायन कोठें दिसले नाहींत. म्हणून तो मुनीसागर पर्वतावर त्यांचें दर्शनास गेला व त्याचें वंदन केलें.

पौर्णिमेचा दिवस होता. वृक्षावर बसून कोकिला गुज गायन करीत होत्या. तिच्या तोंडून कांहीं शब्द निघाले. ते संघपतीच्या कानीं पडलें. तेव्हां संघपति आपल्या संघाला उद्देशून म्हणाल मुनिवर्यांनों ! उज्जयनींत जो कोणी साधू भिक्षेसाठीं जाईल त्याचा व्रतभंग होईल. तेव्हां कित्येक नग्नमुनी तेथें उपवास करून राहिलें. कित्येक जवळील दुसऱ्या गांवांत आहाराला गेले. द्वीपायनमुनींना संघनायकमुनींचें भाषण असत्य वाटलें. त्यांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. व ते उज्जयनीस आहारासाठीं गेले. त्यावेळीं उज्जयनींत राजा जितशत्रू आपल्या कनकमाला भार्येसह राज्य करीत होता.

काशी देशांतलि वाराणसी नगरींत श्रीमान श्रीधर नगराधिप आपल्या श्रीमती राणीसह राज्य करीत होता. त्यानां श्रीकांता नांवाची एक कन्या होती ती रूपानें गुणानें मोठी सुंदर होती. तिची कामसुंदरी नांवाची सखी होती. ती देवकन्येप्रमाणें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अत्यंत कोमलांगी रूपयौवनसंपन्न होती. श्रीकांतेचें लग्न जितशत्रूशीं झालें. पण दासी कामसुंदरीवर राजाचें मन बसलें. ती त्याचें प्रेमपात्र बनलें. त्यामुळें जितशत्रू ढुंकूनहि श्रीकांतेकडे पाहिनासा झाला. त्याचा सर्व काळ तिच्याच सहवासांत जाऊं लागला. श्रीकांतेला अत्यत दुःख झालें. तिला अति त्रास होऊं लागला. तेव्हां तिनें आपल्या बापाला दूत पाठवून कळविलें कीं मी त्रासांत आहे. कामसुंदरीला महाराणीपद देण्यांत आलें आहे. तेव्हां श्रीधर राजानीं श्रीकांतेसह कामसुंदरीस बोलावून घेतलें.

पुढें नखपर्वणी आली. (ही एक विशिष्ट प्रकारची प्रथा दिसते. त्या पर्वणीवर स्त्रियांचीच नखें काढीत असत.) श्रीकांताचीं नखें काढून झाल्यानंतर कामसुंदरीची काढूं लागले. नखें काढतां काढतां तिच्या डाव्या पायाचा आंगठाहि न्हाव्यानें कापला. त्या व्रणावर विषप्रयोग केल्यामुळें तो बरा होण्याऐवजीं महारोग्याच्या बोटासारखा दिसूं लागला. थोडे दिवस राहून श्रीकांता कामसुंदरीसह उज्जयनीस आली. कामसुंदरीचा आंगठा विद्रुप सुकलेला पाहून जितशत्रूच्या मनांत तिटकारा उत्पन्न झाला. त्यानें तिला टाकून दिलें.

कामसुंदरीनें आपल्या पायाच्या आंगठ्याला एक सुवर्णाचा आंगठा करून बसविला आपलें आयुष्य वेश्येप्रमाणें घालवूं लागली.

दुष्ट शत्रुबलवाहनाच्या भीतीनें राजानें आपल्या नगरीभोंवतीं एक भला मोठा खंदक खोदण्यास आज्ञा केली. खंदक खोदण्यासाठी नगरीच्या आबालवृद्धांनीं जावें असा हुकूम करण्यांत आला. त्याप्रमाणें काम चालू झालें. त्याचवेळीं द्वीपायनमुनी संघ सोडून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहारासाठीं नगरींत प्रवेश करीत होते. तेव्हां कामकरी लोक त्यांना अडवून म्हणाले, सर्वांनीं खंदक खांदण्याचें काम करावें अशी राजाज्ञा आहे. तेव्हां आपणहि कामास लागा. द्वीपायन उत्तरले ! बाबांनों ! मी भीक्षा मागून येतों. नंतर आपणांबरोबर कामास लागतो. ते नगरींत आले. आहारासाठीं फिरत असतां कामसुंदरीच्या अंगणांत शिरले. कामसुंदरीचें रूप पाहून मुनींचें मन कामातूर बनलें. आहार घेऊन ते खंदक खांदण्यासाठीं आले. ब्राह्मणाला एक कुदळ मागितली. त्यानें कुदळ मंत्रून दिली. थोडा-वेळ खोदकाम करून ते परत मुनीसागरपर्वतावर आले. त्यांचें चित्त तपाकडे लागेना. सारखें कामसुंदरीचें चित्र डोळ्यापुढें नाचूं लागलें. त्यांना चैन पडेना. त्यांना तिचा ध्यास लागला.

इकडे मुनींनीं थोडावेळ खंदक खोदलेला होता. त्यांतून सारखें पाणी निघूं लागलें. पाणी इतक्या जोरानें बाहेर पडत होतें कीं, थोडयाच वेळांत साऱ्या नगरीला त्या पाण्यानें वेढा घातला व गांवांतहि पाणीच पाणी झालें. तरी पाणी थांबेना. सारखा त्याचा वेग वाढतच होता. राजा व सारी प्रजा विवंचनेंत पडली. तेव्हां सामंत, सचीव व कांहीं स्त्रिया मिळून द्वीपायन मुनीकडे गेलें, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां कामसुंदरी स्वतः गेली. मुनी आधींच तिच्या रूपानें वेडे झाले होते. त्यांत तिनें आणखी थोडेसें कामुक हावभाव केले. द्वीपायन मुनींनें आपली नांगी तिच्यापुढें टाकली. ती त्यांना आपल्याबरोबर घरीं घेऊन आली. मुनीव्रताला धाब्यावर बसवून तिच्यासह नानाप्रकारचे भोगोपभोग भोगीत तिच्या घरीं राहिले. कोणासहि वश न होणारा गुणसागर केवली स्त्रीसंसर्गानें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जगांत निंद्य बनला. कामसुंदरीच्या सहवासांत अशा प्रकारें त्यानें बारा वर्षें घालविलीं.

पुढें उदीर्णबलवाहनानें आपल्या चतुरंग सैन्यासह येऊन उज्जयनीस वेढा दिला. तेव्हां द्वीपायनानें एका चिट्ठीवर मी तुझा बाप व्रतभंग करून या नगरींत राहात आहे. तुला तोंड दाखविण्याची मला लाज वाटतें. असें लिहून ती चिट्ठी उदीर्णबलवाहनाकडे दुतांकरवीं पाठविली. चिट्ठी वाचतांच त्याला अत्यंत वाईट वाटलें. त्याला वैराग्यभावना प्राप्त झाली. त्यानें आपला वेढा उठविला व परत नगरीस आला. आपल्या मुलाला राज्यकारभार सोंपवून त्यानें यशोधर गुरूंजवळ दीक्षा ग्रहण केली.

द्वीपायन मुनींनें आपल्या प्राणावरील संकट अशा अकल्पित रीतीनें दूर केल्यामुळें राजानें पुष्कळसें धन देऊन आपला महामंत्री बनविलें. राजा नेहमींच त्याला आनंदित ठेवण्याचा प्रयत्न करी. मोठमोठ्या मूल्यवान् वस्तूंच्या नजराणा पाठवीत असे. द्वीपायन त्यामुळें राजावर अगदीं खूष असे. जितशत्रूला त्याची भीति वाटे. त्यानें हा कांटा मार्गांतून काढण्याचे ठरविलें. तो एकदां कामसुंदरीला म्हणाला पहा! अशी एक युक्ति शोधून काढ कीं, ज्यामुळें याचा कांटा आपोआप निघेल. कामसुंदरी पूर्ण गणिकाच होती. तिला पैशाचें प्रेम. राजाकडून देणग्या मिळत. तेथें द्वीपायनाची तितकी गरज नव्हती. तिनें राजास कबूल केले.

अशारीतीनें दिवस निघून गेले. द्वीपायनाला राजानें उत्तर देशांहून आलेल्या रत्नपादुका भेट दिल्या. द्वीपायनानें त्याचा स्वीकार केला व घरीं आला. कामसुंदरीचा डावा पाय घेऊन त्यांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ती रत्नपादुका घालण्याचा प्रयत्न करूं लागला. त्या खटपटींत डाव्या पायाच्या आंगठ्यास लावलेलें सोन्याचें टोपण निघून गेलें. आंगठा उघडा पडला. तो कुष्ठरोगग्रस्त पाय पाहून द्वीपायनाच्या वैराग्यानें पुन्हां उचल खाल्ली. स्वतःचा धिःकार केला. कामसुंदरीचा त्याग करून तो परत मुनीसागरपर्वतावर आला.

तेथें विमलचंद्रमुनी आपल्या संघासह आले होते. त्यांना नमस्कार करून त्यांचेकडून पुन्हां दीक्षा घेतली. पण प्रतिक्रमणाचे वेळीं कामसुंदरीचीच आठवण होई, ते तिचेच चिंतवन करीत व तिचा त्याग केल्याबद्दल स्वतःच धिःकार करीत. हे प्रकार यतीशापासून फार दिवस लपून राहिला नाहीं. त्यांनीं त्यास धर्माचा उपदेश केला. ते म्हणाले. स्त्रीयांची मैत्री ही संध्यारागासारखी आहे. किंकाळ फळासारखें तिचें सुख क्षणभंगुर आहे. आणि त्याचा परिणामहि अनिष्ट होतोच तिच्याकडून परोपरीनें आपलीच मानहानि होते. संसार वाढला म्हणजे दुःखेंही वाढतात. तेव्हां आतां पुन्हां तिचें चिंतवन करणें योग्य नव्हे. ज्या दुःखामुळें आपणाला हें दुःखं भोगावे लागलें त्याचा विचार आपण करा. आणि सन्मार्गात प्रवृत्त व्हां. आणि ह्या मुनीधर्माचें पालन शांत चित्तानें करा. यांतच कल्याण आहे. हा उपदेश ऐकून द्वीपायनमुनी लज्जित झाले. ते खरोखरीच विरक्त बनले.

इकडे ती कामसुंदरी गणिका राजाच्या भीतीनें आत्महत्या करून मरण पावली. कोणी म्हणतात राजानें मारेकऱ्या करवीं तिचा खून करून रात्रींला स्मशानांत आणून टाकली. स्मशानांत कुत्र्यानीं तिच्या प्रेताचा निकाल केला. असो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

द्वीपायन मुनी विरक्त बनले खरे. पण मधून मधून त्या सुंदरींचे चिंतवन करीत. ते तिच्या रुपाचे चिंतवन करुन आपला धिःकार करीत. अशी योग्य सुंदर स्त्री केवळ तिच्या पायाचा आंगठा खराब झाल्यामुळें सोडली. किती मी मूर्ख ! एकदां त्याचा भाव जाणून मुनी म्हणाले द्वीपायना ! तूं द्वीपायन राजा होतास. तुझें वैभव अफाट होतें. प्रत्यक्ष तुझ्या स्त्रीया मदनालाही लाजवीत इतक्या सुंदर होत्या ' तुझ्या यशाचा डंका जगभर पसरलेला होता. इतकें तुझें वैभव असूनही तूं धर्मासाठीं पायाखालीं लाथडलें. पण पुन्हां या गणिकेच्या मोहांत वळीं पडलास. किती केलें तरी ती गणिकाच ! देहाचा विक्रय करणारी. अशा कुलक्षणी स्त्रीच्या ठिकाणीं रत झालास ! ती महारोगी ! आणि अशा महारोगांत तूं सतत पडणार काय ? तूं तिचा त्याग केलास आणि आतां तिचेंच चिंतवन करतोस ! यामुळें काय होणार याचा तूं विचार केला नाहींस. एवढा मोठा तूं ज्ञानी. तुझें ज्ञान व्यर्थ जाणार ! आणि ती तरी काय तुझ्या सोबतीला आजन्म राहणार आहे थोडीच ? असलें धर्मरत्न मिळवून पुन्हां संसारसागरांत पडूं नकोस. पुन्हां सांपडणार नाहीं. याप्रमाणें मुनींनीं पुष्कळसा उपदेश केला. परिणाम अगदीं इष्ट असाच झाला. त्यानीं पूर्ण वैराग्यभावनेनें तपश्चरण सुरू केलें. व शेवटीं स्वर्गमोक्षाचें सुख प्राप्त होईल असा कर्मबंध बांधून घेतला.

———

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा ७५ वी,

" कंडारपिंग "

कांपिल्य नगरीचा राजा श्रीमान् नरसिंह नरेश्वर होता. त्याची भार्या कमला कमलनयना होती. राजाचा मंत्री सुमति. त्याची भार्या धनश्री. या उभयतांचा मुलगा कंडारपिंग अत्यंत दुराचारी, विषयी व्यभिचारी होता. बापाच्या जोरावर तो नगरींतील उत्तमोत्तम स्त्रीयांचें शील भ्रष्ट करी. सगळे लोक हा डोळ्यांदेखत घडत असलेला अतिचार पाहून स्वस्थ राहात, मंत्र्याचा मुलगा असल्यामुळें कोणाचीहि त्याच्या विरुद्ध बोलण्याची छाती नव्हती. ते मुकाटपणें त्रास सहन करीत.

त्याच नगरींत राजाचा श्रेष्ठी कुबेरदत्त राहात असे. तो अत्यंत श्रीमंत होता. त्याची भार्या प्रियंगू मोठी लावण्यसुंदर व गुणी होती. तिच्या रुपाची गुणाची जो तो मुक्त कंठानें स्तुति गाई. एकदां कंडारपिंगाच्या नजरेस तिचें रूप पडलें. तो तिला पाहून अगदीं कामातूर झाला. कामज्वरानें पछाडल्यामुळें त्याला कांहीं सुचेना. तो अगदीं बेचैन झाला. त्याचे तोंड उतरून भान हरपलें. तो अंथुरणाशीं खिळला. मुलाची शोचनीय अवस्था पाहून सुमित्र मंत्र्यानें विचारलें. बाळा, तुला काय होते ? मुलगा आधींच सुलक्षणी ! आपली दुष्ट वासना प्रगट करतांना त्याला यत्किंचित्‌हि लाज वाटली नाहीं. अगदीं पूर्णपणें त्यांत निर्ढावलेला. त्याला लाज कसली ? तो म्हणाला तात ! माझें कुबेरदत्ताची स्त्री प्रियंगूवर प्रेम जडलें आहे. तिची प्राप्ति होईल तरच मी जिवंत राहूं शकेन. तिच्या रूपानें मी वेडा बनलो आहें. तरी कांहींहि उपायानें तिची प्राप्ति

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मला झालीच पाहिजे. " सुमतीचें मुलांवर अतिशय प्रेम होतें. प्रेम आंधळें असतें म्हणतात; तें खोटें नाहीं. प्रेमांध काय करील याचा भरंवसा नसतो. पापी, दुराचारी मुलाच्या वासनेला प्रेमामुळें सुमती बळीं पडला. तो एक युक्ति शोधून राजाकडे आला. इकडच्या तिकडच्या गोष्टी करीत करीत म्हणाला राजन्! लवणसमुद्रांतील स्वर्णद्वीपांत 'किंजल्प' नांवाचा एका जातीचा पक्षी आहे. त्या पक्ष्याच्या सामर्थ्यानें सर्व प्रकारच्या दुर्भिक्षाचा नाश होतो. राजवृद्धि होते. तो पक्षी आपण आणवावा. आणि त्या कामगिरीवर कुबेरदत्ताला पाठवावें. राजाला मंत्र्याचें म्हणणें पटलें. त्यानें कुबेरदत्ताला बोलावून तो पक्षी येऊन येण्याची आज्ञा दिली. आज्ञा शिरसावंद्य मानून कुबेर घरीं परत आला.

श्रेष्ठीचें आपल्या भार्येवर निरतिशय प्रेम होतें. तिला ही हकीकत सांगितली. ती म्हणाली स्वामिन्! माझ्या शीलाचा भंग करण्यासाठीं ही कंडारपिंडानें युक्ति रचलेली आहे. त्यानें एकदां मला पाहिलेलें आहे. तो दुष्ट केव्हां काय करील याचा भरंवसा नाहीं. तेव्हां आपण सावध राहा! मीहि सहजासहजीं त्याच्या हातीं लागणार नाहीं, म्हणून ही युक्ति योजली आहे. प्रियेचें म्हणणें श्रेष्ठीला पटलें. नंतर राजाची स्वर्णद्वीपास जाण्यासाठीं आज्ञा घेतली. नांवा वगैरे तयार केल्या. त्यावर प्रवासाची जय्यत तयारी केली. त्या नांवा रवाना करून तो गेल्याचें खोटें उठवून तो, घरीं येऊन लपून राहिला.

श्रेष्ठी स्वर्णद्वीपास गेल्याचें समजतांच कंडारपिंडाला आनंद झाला. आपली इच्छा आतां तडीस जाणार! याच आनंदांत त्याला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वर्ग हातीं लागल्याचा भास झाला. तो श्रेष्ठीच्या घरांत शिरला. प्रियंगूच्या घरीं तिचे पांच विश्वासू नौकर होते. त्यांचें आपल्या धन्यावर जीवापाड प्रेम होतें. कंडारपिंड घरांत शिरलेला पाहतांच त्यांनीं त्याच्या मुसक्या बांधून भुयारांत नेऊन टाकलें. यांत सहा महिने गेले. एके दिवशीं कुबेरदत्तानें स्वर्णद्वीपाहून आल्याचें जाहीर केलें. कंडारपिंडाच्या शरीरांवर एका विचित्र पक्ष्याच्या पंखाचा वेष घालून त्यास घेऊन तो राजदरबारांत आला. येतांच राजाला अभिवादन करून म्हणाला, राजन्! आपल्या म्हणण्याप्रमाणें मी पक्षी धरून आणला आहे. याचा स्वीकार करावा. सभेंत सामंत्र मंत्री सर्व हजर होते. 'मी पक्षी नव्हें. मी आपल्या सुमति मंत्र्याचा कंडारपिंड मुलगा आहे. मला मुक्त करावें.' पक्षाचे बोल ऐकून राजाला विस्मय वाटला. सुमतीचें धाबें दणाणलें. आपला मुलगा आणि त्याची ही स्थिति! पण करतो काय! पुढें कुबेरदत्तानें राजाला सर्व हकिकत खरी सांगितली. राजाला अत्यंत राग आला. त्यानें सुमति मंत्र्याचें घरदार जप्त केलें व त्यास हांकलून दिलें. नंतर कंडारपिंडाची साऱ्या नगरींत गाढवांवर बसवून वरात काढली व त्यालाहि राज्याबाहेर घालवून दिलें. झालेल्या अपमानानें कंडारपिंड अगदीं खचून गेला. त्यांतच मरून भयंकर नरकांस गेला.

कथा ७६ वी.

" कौरव-पांडव युद्ध. "

कुरुजांगल देशांतील नागपुरांत कुरुवंशीय राजा शंतनु राज्य करीत होता. त्याची राणी गंगा अति लावण्यसंपन्न होती. त्यांना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भीष्म नांवाचा एक पुत्र होता. भीष्म मोठा पितृभक्त होता. सुखानें संसार करण्यांत कांहीं दिवस गेले. पुढें गंगा मरण पावली. गंगेवर शंतनुचें निस्सीम प्रेम होतें. त्यामुळें तो अत्यंत दुःखी झाला. तो उदासीनपणें आपलें आयुष्य घालवूं लागला.

तेथें एक धीवर राहात असे. त्याचें नांव गंग होतें. त्याची मुलगी योजनगंधा गुणवान्, रूपवान् होती. भीष्मानें तिचें रूप पाहून आपल्या पित्यासाठीं गंगजवळ मागणी घातली. गंग म्हणाला ' आपण थोर कुलीन, मी हीन कुळाचा! मग माझा संबंध आपणांस कसा रुचावा? आणि आपली इच्छाच असेल तर एक अट आहे कीं, माझ्या मुलीच्या पोटीं होणाऱ्या मुलाला गादी मिळावी. आणि ही कबूल असेल तर मी माझी मुलगी देण्यास तयार आहें." भीष्मानें त्याचें म्हणणें मान्य केलें. आणि तेवढ्यासाठीं त्यानें सार्वकालिक ब्रह्मचर्यव्रत ग्रहण केलें. पण तें व्रत शीलेवर उभा राहून ग्रहण करीत असतांना त्याचें शुक्रबिंदू गळून पडलें. त्या बिंदूचें रूपांतर एका मोठ्या शुभ्र हत्तींत झालें. भीष्मानें त्यास आज्ञा देतांच तो हत्ती दक्षिणदिशेकडे निघून गेला. व तेथील एका मोठ्या अरण्यांत तो आपली कालक्रमणा करूं लागला.

धीवरानें आपली मुलगी शंतनुस दिली. कांहीं वर्षांनीं योजनगंधेला शंतनुपासून तीन पुत्र झाले. त्यांचीं नांवें चित्र, विचित्र व चित्राण होती. अंबा, अंबिका व विचित्रा या अनुक्रमें त्याच्या भार्या होत्या. शांतनुच्या मरणानंतर भीष्मानें आपल्या प्रतिज्ञेनुसार त्यांना राज्यावर बसविलें. व उपदेश केला कीं, बंधूंनों! एक गोष्ट ध्यानांत ठेवा! तुम्हीं कधींहि चुकून ह्या दक्षिण दिशेकडील अर-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ण्यांत जाऊं नका ! कारण तेथें एक भयंकर हत्ती आहे. तो तुम्हीं धरण्याचा प्रयत्न कराल ! पण त्याच्या हातून तुमचें मरण ओढवेल ! तरी तसा पोरकटपणा करूं नका ! ”

कांहीं दिवस सुखानें राज्य करण्यांत निघून गेले. भीष्माचे बोल ते विसरले. ते त्याच वनांत हत्ती धरण्यासाठीं गेलें असतां त्या भयंकर हत्तीनें त्या तिघांना मारून टाकलें. होणारें भविष्य थोडेंच टळणार होतें ? ते मृत्युमुखीं पडल्यामुळें गादी रिकामी झाली त्याला कोणी वारस उरला नाहीं. तेव्हां योजनगंधेनें व्यासांना बोलावून आणलें. त्यांचें आपल्या अंगवस्त्रानें डोळे बांधून अंबेकडे त्यांना पाठविलें. अंबेशीं त्यांनीं नियोजक संबंध केला. त्यामुळें अंबेला गर्भ राहिला. तो गर्भ धृतराष्ट्र नांवानें जन्मला. नंतर व्यासांनीं अंबिकेशीं संबंध केला. तिच्या पोटीं पांडू जन्मला. हा पांडू मोठा गुणी धर्मशील निपजला. त्याला योग्य संसार देऊन व्यास विचित्रेकडे गेले. व्यासाच्या संबंधामुळें विचित्रेनें विदूर नांवांच्या मुलांस जन्म दिला. व्यासांनीं संतति उत्पादण्यासाठीं केलेल्या मदतीचें आभार मानून योजनगंधेनें त्याची उत्तम तऱ्हेनें बोळवण केली-

राजा पांडू पार्थनगरींत राज्य करूं लागला. त्याच्या कुंती व माद्री नांवांच्या दोन राण्या होत्या. त्या मोठ्या पतिभक्त होत्या. एकदां पांडू मृगयेस गेला असतां जंगलांत मृगाच्या रूपांत एक मुनी हरिणेशीं संग करीत होते. पांडुचा बाण लागून तो धरणीवर पडला. मरतां मरतां त्यानीं शाप दिला कीं, “ राजा ! तूं असाच आपल्या भार्येशीं संग करतांना मरशील ! ” तेव्हांपासून पांडूनें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रति–त्याग केला व ब्रह्मचर्यानें राहूं लागला. व्यासानें शिकविलेल्या विद्येच्या जोरावर कुंतीनें धर्म, वायु व इंद्र यांना बोलाविलें व त्यांच्याशीं समागम केला. त्यामुळें तिला युधिष्ठिर, भीम व अर्जुन हे तीन पुत्र झाले. माद्रीनें अश्विनीदेवांशीं संग केल्यामुळें नकुळ व सहदेव असे दोन पुत्र तिला झाले. याला पांडुची अनुमति होती.

अशी कथा मिथ्यात्वी धर्मशास्त्रांत वर्णिलेली आहे. ती अगदींच तत्त्वाला सोडून आहे. जी स्त्री दुसऱ्यांशीं रत होते त्याचें कूळ श्रेष्ठ कसें ठरतें? ते कुळ उच्च मानतात. त्यांत सत्यतेचा लवलेश पण नाहीं. युक्तिलाहि तें पटत नाहीं. अनाचार कोण करूं इच्छील? आणि तो काल तर चतुर्थकाल होता. असल्या अधर्माला धर्म मानून त्याच्या कुलाला थोर म्हणणें किती हास्यास्पद होय. कदाचित कोणी माथेफिरू कवींनीं असें विधान केलें असावें आणि तेंच खरें मानलें जात असावें. हें जैनमताविरुद्ध आहे. वास्तविक पांडूपासून कुंती माद्रीला मुलें झालीं तीं पांच म्हणून त्यांना पांडव म्हणतात. एवढेंच! असो!

पांडव इंद्रप्रस्थाचें अर्धराज्य चालवीत होते. धृतराष्ट्राची राणी गांधारी हिच्या पोटीं १०० पुत्र जन्मले. दुर्योधनादि ते होत. ते मोठे दुष्ट होते. हस्तिनापुरांत राज्य करीत होते. युधिष्ठिरानें सर्व पृथ्वी पादाक्रांत केल्यानंतर राजसूय यज्ञ करण्यास सुरुवात केली. यज्ञसमारंभास दुर्योधनादि नरेश्वरांना पाचारण्यांत आलें होतेंच! मखशाळेंत गेल्यानंतर दुर्योधनास भीम कुत्सित भावनेनें म्हणाला बंधो! ही या ठिकाणीं पाण्यांनीं भरलेली विहीर असून त्यांत कमळें आहेत. दुसरीकडे शोभनीय आरशासारखी शुभ्र जलकांत दगडाची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भूमि केली होती. ती इतकी सुंदर होती कीं, लांबून पाहणाऱ्यांस तो तळावच भासे. दुर्योधनाला तो तळावच वाटला. तो त्यांत शिरण्याचा प्रयत्न करूं लागला. पण भिंतीशीं जोरानें टक्कर बसली. तो दगडावर जोरानें आपटला. त्याच्या मूर्खपणाला सर्व लोक हंसले. दुर्योधनाला आपली फजिति झालेली पाहून अत्यंत विषाद वाटला. तो मनांतल्या मनांत दाबून परत आपल्या राजधानीस आला.

हस्तिनापुरास येतांच शकुनीला सर्व हकिकत निवेदन केली. नंतर त्यांनीं वाटाघाट करून पांडवांना द्यूताचें आमंत्रण दिलें. युधिष्ठिरानें त्याचा स्वीकार केला व तो हस्तिनापुरास सर्व बंधू व द्रौपदीसह आला. द्युतास आरंभ झाला. कौरव कपटी होते. प्रथमपासून त्यांनीं कपटजाळ पसरलें होतें. खेळास सुरुवात झाली. मधून भीम विरुद्ध बोले. पण शकुनी त्यास थोराच्यापुढें लहानांनीं बोलूं नये म्हणून दाबून ठेवी. खेळांत युधिष्ठिरानें सर्व पणास लावलें. तें सर्व कौरवांनीं जिंकून घेतलें. राज्य, धन वगैरे सर्व संपलें. शेवटीं स्वतः भावांना व द्रौपदीला पणाला लावलें व हरून बसला. दुर्योधनानें सर्वच जिंकलें. जिंकल्यानंतर त्यानें द्रौपदीचें भरसभेंत अंगवस्त्र धरून ओढलें. जसजसें वस्त्र ओढूं लागला तसतसें तें लांबूं लागलें. धर्मानें काय होणार नाहीं ? नंतर तिचा अंबाडा धरून तिला ढकललें. अशा रीतीनें तिची अब्रू घेतली. नंतर सर्वांना उद्देशून म्हणाला ' तुम्हीं माझे दास आहांत ! तेव्हां आतां तुम्हीं १२ वर्षे दंडकारण्यांत जाऊन वनवासांत घालवावीं. नंतर एक वर्ष

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अज्ञातवासांत घालवावें. त्या एका वर्षांत तुम्हीं आम्हांस ओळखूं आला तर आणखी बारा वर्षें वनवास पत्करावा.

नंतर युधिष्ठीरानें कुंतीला विदुराघरीं ठेवलें व ते द्रौपदीसह वनवासास निघाले. बारा वर्षें वनवासाची प्रतिज्ञा घेऊन ते दंडकवनांत आले. बारा वर्षें वनवास भोगून तेराव्या वर्षीं ते आपला वेष पालटून विदुराच्या घरीं येऊन राहिले. युधिष्ठीर पुजारी, भीम आचारी, अर्जुन नर्तक, नकुळ अश्वपाळ, सहदेव गुराखी, याप्रमाणें निरनिराळ्या वेषांत राहून ते आपलीं कामें करूं लागले. थोडा काळ असा गेला. एकदां कौरवसैन्यांनीं विराटाच्या दक्षिण गोठ्यांवर हल्ला करून त्यांतील गाईगुरें पळवून नेलीं. तो कोलाहल ऐकतांच अर्जुनानें ती परत सोडवून आणलीं. तेव्हां त्यांनीं उत्तरेकडील गोठ्यांतील गुरें पळविलीं. तींहि अर्जुनानें परत आणलीं. या पराक्रमामुळें ते सर्व पांडवच असावेत अशी त्यांचीं खात्री झाली. विराटाला हें कळतांच त्याला फार आनंद झाला.

पुढें श्रीकृष्णाची भेट झाली. कुशलोत्तर प्रश्नानंतर दुर्योधनाकडे जाऊन राज्य मागविण्याचें ठरविलें. हें काम कृष्णावर सोंपविलें. कृष्णानें जाऊन दुर्योधनास मागणी केली. पण त्यानें इनकार केला. दोन्ही पक्षांत लढण्याची तयारी झाली. पांडवांचें सैन्य सात अक्षौहिणी व कौरवांचे दहा अक्षौहिणी होतें. कुरुक्षेत्रावर भयंकर मोठें तुंबुळ युद्ध झालें. त्यांत कौरव आपल्या सैन्यासह कामास आले. पांडव विजयी झाले. केवळ राज्यतृष्णा व स्त्रीसाठीं एवढा मोठा रक्तपात झाला. अनेक जीव प्राणांस मुकले. तृष्णा मोठी वाईट असते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा ७७ वी.

‘ रामरावण कथा. ’

विनिता देशांत साकेत नांवाची नगरी आहे. त्या नगरींत राजा दशरथ राज्य करीत होता. त्याला चार स्त्रिया होत्या. त्या अत्यंत सुंदर होत्या. पहिली कौशल्या, दुसरी सुमित्रा, तिसरी कैकया व चवथी सुप्रजा. कौशल्येचा पुत्र राम गुणी होता. सुमित्रेला लक्ष्मण, कैकयीला भरत व शत्रुघ्न अशीं मुलें होतीं. राजा जनक यानें रामाला आपली मुलगी सीता दिली. सीता गुणी व पतिव्रता होती. दशरथानें रामास राज्यावर बसवून संन्यास घेण्याचें ठरविलें. ही गोष्ट कैकयीस समजली. कैकयी स्वभावानें मोठी दुष्ट व मत्सरी होती. प्रथम-पासूनच भरताला राज्य मिळावें अशी तिची भावना होती. त्यांत राजा पण तिच्या कह्यांत होता. पूर्वीं एकदां तिला राजानें प्रसन्न होऊन दोन वर दिले होते. ते वर तसेच होते. त्या वराची आठवण झाली. तिनें राजाला बोलावून आणलें. म्हणाली राजन्! आपण मला दोन वर दिलेले आहेत. त्याची आपणांस आठवण आहेना? आतां वर मागण्याची वेळ आली आहे. तरी आतां आपण आपल्या वचनास जागावें. मी मागतें तें मला द्या! दशरथानें कबूल केलें. तेव्हां ती म्हणाली राजा! एका वरानें तुम्हीं माझ्या भरतास राज्यावर बसवावें व दुसऱ्या वरानें रामलक्ष्मणाला वनाला पाठवावें. राजाला वाईट वाटलें पण करतो काय? त्यानें भरताला राज्यावर बसवून रामलक्ष्मणाला सीतेसह वनवासास दंडकारण्यांत पाठवून दिलें.

त्यावेळीं लंकेंत रावण राज्य करीत होता. त्याची राणी मंदोदरी मानसहरिणी होती. त्यांना इंद्रजित व शूरजित हे दोन पुत्र होते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रावणाला सूपर्णखा नांवाची एक वहिण होती. ती खरदूषणास दिलेली होती. एकदां ती दंडकारण्यांत फिरत असतां रामाची व तिची भेट झाली. रामाचें रूप पाहून ती भाळली व म्हणाली स्वाभिन्! 'मी कुमारिका असून स्वयंवराला आल्यें आहे. तरी आपण पदरांत घ्या.' राम म्हणाले भगिनी! माझें लग्न झालें आहे. तरी तूं लक्ष्मणास विचार! तिनें लक्ष्मणांस विचारलें. लक्ष्मणाला तिच्या बोलण्याचा मनस्वी राग आला. रागाच्या भरांत त्यानें तिचें नाक, कान कापून टाकलें व तिला घालवून दिलें.

तिची ही दुर्दशा पाहून खरदूषणाला अत्यंत राग आला. तो आपल्या तिघां भावांसह त्याचेवर चालून गेला व त्यांच्यांत मोठें युद्ध झालें. त्यांत रामाच्या हातून तो मारला गेला. ही गोष्ट सुपर्णखेनें रावणास निवेदन केली. रावणालाहि त्वेष चढला. तो रामाकडे आला. तेथें सीतेचें रूप त्याच्या दृष्टीस पडलें. सीता अत्यंत सुंदर होती. रावणाच्या मनांत वाईट वासना उत्पन्न झाली व त्यानें तिला पळवून नेण्याचा बेत केला. व तो परत नगरीस आला. मारीची रावणाचा मामा होता. त्याला एका सुवर्णमय हरिणाचें उत्तम रूप देऊन सीतेच्या आश्रमाला पाठविलें. सीतेला त्या मृगाचा लोभ सुटला. तिनें रामाला धरण्यास सांगितलें. राम धरण्यासाठीं त्याचें पाठीमागें लागला. तो मायावी मृग चालवीत चालवीत त्यास दूर घेऊन गेला. आतां हातीं लागत नाहीं असें पाहून रामानें त्याच्यावर बाण सोडला. बाण लागतांच तो मायावी मृग मोठ्यानें ओरडला. हे बंधो! लक्ष्मणा! मी मेलों धांव! तो नाद सीतेच्या कानीं पडला. ती घाबरून गेली. तिनें रामाच्या मदतीला लक्ष्मणास जाण्यास सांगि-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तलें. लक्ष्मणास रामानें जातांना आश्रम न सोडण्याबद्दल सांगितलें होतें. तो जाईना. तेव्हां सीता रागावली. तेव्हां निरुपायानें तो गेला. इकडे आश्रमांत कोणी नाहीं असें पाहून रावण भिकाऱ्याच्या वेषांत पुढें आला व तिला भिक्षा वाढ असें म्हणूं लागला. ती भिक्षा वाढण्यासाठीं बाहेर आली असतां उचलून तिला खांद्यावर घेतली व तडक तो लंकेस आला.

इकडे रामानें लक्ष्मणास आलेला पाहून विचारलें, तूं कां आलास? लक्ष्मणानें सर्व वृत्तांत सांगितला. राम म्हणाला लक्ष्मणा! तुझ्या येण्यानें सर्व कार्य बिघडलें. तो परत पर्णकुटीस आला. पर्णकुटिका रिकामी होती. त्यांत सीता दिसली नाहीं. रामानें पुष्कळ विलाप केला. लक्ष्मणानें त्याची समजूत घातली. तेव्हां रामाला थोडासा विसांवा वाटला. नंतर त्यांनीं सुग्रीव, अंगद, हनुमान वगैरे सेना गोळा केली. समुद्रावर सेतू बांधला व ते सर्व लंकेला गेले. राम-रावणाचें भयंकर युद्ध झालें. युद्धांत रावण धारातीर्थीं पडला. हजारों प्राण कामांस आले व सीतेची सुटका केली केवळ भार्येखातर एवढी हिंसा घडली. जगांत जीं लहानमोठीं युद्धें होतात त्याचें बहुतेक स्त्रिया हेंच कारण असल्याचें आढळून येतें आणि त्यामुळेंच संसार वाढतो.

कथा ७८ वी.

‘ राजा देवरति. ’

विनिता देशांतील साकेतानगरींत अति पराक्रमी राजा देवरति राज्य करीत होता. त्यानें आपल्या पराक्रमानें साऱ्या शत्रूंचा पाडाव करून आपल्या राज्याचा विस्तार वाढविला होता. त्याला दोन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राण्या होत्या. एक रक्ता व दुसरी मित्रवती. मित्रवति अति सुंदर होती. पण राजाचें प्रेम रक्तेवर फार होतें. तिला त्यांनीं आपली पट्टराणी बनविलें व आपला काल तिच्या सहवासांत भोगोपभोग करण्यांत घालवूं लागला. त्यामुळें त्याचें राज्यकारभाराकडे दुर्लक्ष होऊं लागलें. परचक्र आलें तरी तो तिकडे लक्ष देईना. रक्तेशिवाय त्याला कांहीं सुचत नसे. तो पूर्ण विषयी बनला. तेव्हां सामंतमंत्री वगैरे राजपुढाऱ्यांनीं एकत्र जमून या गोष्टींचा विचार केला व राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं. राजपुत्र जयसेन कुमारास गादी-वर बसविलें, व राजाला रक्तेसह राज्याबाहेर घालवून दिलें.

देवरति राजा रानांवनांतून भटकत असतां रक्ता श्रमानें अगदीं थकून गेली. भुकेनें व्याकूळ बनली. तिचा चेहरा उतरून गेला. आपल्या प्रियेची ही स्थिति पाहून राजाला अत्यंत खेद झाला. त्यानें आपल्या मांडीचें मांस कापून तें शिजवून तिला खाऊं घातलें. वर पाणी म्हणून आपलें दंडातलें रक्त पाजलें. त्यामुळें रक्तेला हुषारी आली. ती त्याच्यावर अत्यंत प्रसन्न झाली. नंतर ते श्रमजीवि जोडपें यमुनानदीकांठीं असलेल्या श्रीपूर गांवीं आलें.

गांवच्या प्रतिष्ठित लोकांनीं त्याची परदेशीय म्हणून एका जागेंत राहण्याची सोय करून दिली. ती जागा एक शय्यागृह होती. त्या शय्यागृहांत एका बाजूला एक लंगडा राहत असे. तो नृत्यकलेंत, गायनकलेंत निपुण होता. पुढें सहवासानें त्याचा व रक्तेचा संबंध जडला. रक्ता त्याच्या सेवेंत आपला काळ घालवूं लागली. यांत कांहीं दिवस निघून गेले. पुढें तो लंगडा रक्तेस म्हणाला प्रिये ! ही व्याद आतां आपल्यामध्यें कशाला ? कोणत्यातरी युक्तीनें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

याचा वाटेंतून कांटा काढा म्हणजे आपण निर्भयपणें आपला काळ सुखानें घालवूं. रक्ता विषयी होती. त्यांतून वाममार्गाला लागलेली. तिनें या गोष्टीला पूर्ण संमति दिली. आणखी थोडें दिवस जाऊं द्या म्हणजे मी कांहीं तरी उपाय योजून हा कांटा दूर करतें. आपण निर्धास्त असा. असें तिनें उत्तर दिलें.

एके दिवशींची गोष्ट! रक्ता मोठमोठ्यानें विलाप करीत होती. राजा म्हणाला प्रिये! आज तूं कां दुःखी होतेस? ती म्हणाली नाथ! आज आपला वाढदिवस! मी दुष्ट पापिष्ट चांडाळीण, माझ्यामुळें आपणांस आपलें राज्य सोडून असें भिकारी बनावें लागलें. आज आपण आपल्या राज्यांत असतां तर किती मोठ्या थाटानें आपला वाढदिवस साजरा करण्यांत आला असता! पण आतां काय? माझ्यामुळें आपण आपलें वैभव टाकलेंत. मी खरोखरीं दुष्ट आहें. तेव्हां आपण माझा नाद सोडा आणि आपल्या राज्याला परत जा! व सुखानें कालक्रमणा करा! प्रिये! मला तुझ्याशिवाय कशाची परवा नाहीं. मला राज्य नको! तूं पाहिजेस! तूं म्हणजेच राज्य होय. तेव्हां दुःख करूं नकोस! आपण आतां गरीब आहोंत. गरीबांना वाढदिवस नसतो. तूं धीर धर. रडूं नकोस. शांत हो!" "पण नाथा! मी आपणाला राज्यवैभव परत मिळावें म्हणून जलस्नान घालूं इच्छितें." तेव्हां राजा म्हणाला प्रिये! तुझ्या इच्छेबाहेर मी नाहीं. तुला जें आवडेल तें कर! नंतर ते दोघे यमुनानदीच्या तीरावर आले. रक्तेनें राजाच्या गळ्यांत पुष्प-माळा घातल्या. डोक्यावर पुष्पें वाहिलीं व सुस्वर गाणें गाऊन त्याची पूजा करूं लागली. त्याला नदींतल्या पाण्यानें स्नान घालूं लागली. पाण्याच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घागरीच्या घागरी त्याच्या डोक्यावर पडूं लागल्या. त्या भरांत तिनें राजाचा एक पाय धरून त्याला यमुनेच्या एका भयंकर डोहांत फेंकून दिलें.

राजा नदीच्या प्रवाहाबरोबर वाहत वाहत मंगलपुराजवळ येऊन नदीतीराला लागला व गांवाजवळील एका वृक्षाखालीं त्यानें आपलें वास्तव्य ठेवलें.

त्या नगरीचा राजा श्रीमान् श्रीवर्द्धन त्याच्या दुसरे दिवशीं परलोकवासी झाला. राजाला पुत्रसंतति नव्हती. तेव्हां मंगलापुरच्या लोकांनीं विचार करून राजहत्तीला स्नान घातलें. त्याची पूजा केली. त्याला पुष्पमाळा घातल्या. त्याचें अंगांस सुगंधित पदार्थ लावले. त्याच्या मस्तकावर पाण्यानीं भरलेलें कुंभ ठेवलें व त्यास सोडून दिलें (ही पद्धत राजा शोधण्याची होय. पुत्रहीन राजाच्या मागें त्याचे भाऊबंद वारस होत नसत असें दिसतें. कारण हत्तीला सजवून सोडीत. तो फिरे व आपल्या मनाला वाटेल तो मनुष्य धरून आणी. त्यास सिंहासनावर बसवी. अशा रीतीनें हत्तीकडून राजाची निवड केली जाई. त्यानें आणलेल्या मनुष्याचें मागील चरित्र न पाहतां त्यास श्रेष्ठ समजून राज्यावर बसविलें जात असे. हे हत्ती उत्तम प्रकारचें शिक्षण देऊन ठेवलेले असावेत. हत्तीची निवड योग्यच होई.) हत्ती हळूहळू डुलत डुलत नगराबाहेर आला. देवरति राजा झाडाखालीं निजला होता. त्याचें रूप पाहून हत्तीनें त्यास मस्तकावरील जलकुंभानें स्नान घातलें व सोंडेनें उचलून आपल्या पाठीवर घेतलें व तडक राजवाड्याकडे आला. राजवाड्यांत येतांच त्यास सिंहासनावर बसविलें. नंतर सामंतमंत्री वगैरे प्रजा-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जनांनीं त्यास राज्याभिषेक केला. राजाला रक्तेच्या स्वभावानें शहाणपण आलें होतें. त्याला लंगड्याचा व रक्तेचा सूड घ्यावयाचा होता. त्यानें लंगड्याला दान देण्याचा उपक्रम सुरू केला. पतिव्रता स्त्रियांना तो मदत देई. त्यामुळें त्याची कीर्ति जगभर पसरली. त्याचा राज्यकारभार व्यवस्थितपणें चालला होता.

इकडे रक्ता त्या लंगड्यासह आपला काळ सुखानें घालवूं लागली. तेव्हां एका प्रवासी मित्रानें तिला सांगितलें. मंगलपुरचा स्वामी जयसेन मोठा दानधर्मी असून विशेषत: तो पांगळ्या लोकांना अधिक दान देतो आणि त्यांतून पतिव्रतांना तर अधिकच मदत देतो. तेव्हां तूंहि तिकडे जा. म्हणजे तुला पुष्कळसें धन मिळेल. तुझा सत्कार होईल. तेव्हां रक्ता त्या नर्तकी लंगड्याला आपल्या खांद्यावर घेऊन मंगलपुरास येण्यास निघाली. रस्त्यांत लागणाऱ्या गांवांचे लोक तूं कोण? कोठें चाललीस? हा कोण आहे? असे प्रश्न विचारीत. "ती म्हणे देवांब्राह्मणांनीं दिलेला हा माझा पति आहे. पति हेंच माझें दैवत होय. त्यांत हे लंगडे आहेत. त्यामुळें मी यानां अशी घेऊन गांवोगांव पोटासाठीं भटकत असतें." आणि अशा रीतीनें रस्त्यांत आपलें पोट भरीत भरीत शेवटीं मंगलपुरास आली. राजवाड्याजवळ जातांच द्वारपाळानें आंत राजाला वर्दी दिली. राजानें त्यांना घेऊन येण्याची आज्ञा दिली. त्यांना पाहतांच राजानें पडदा ओढला. तेव्हां राजाला आशिर्वाद देऊन रक्ता म्हणाली. "मी पतिव्रता आहे. माझें नांव मित्रवति आहे. हे माझे पति लंगडे आहेत. तूंच आमचा पालनकर्ता होय. तूं दानी आहेस. तुझा महिमा ऐकून आम्हीं तुझ्या दरबारीं आलों आहोंत. तरी आम्हांला अन्नवस्त्रांचें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दान घाल. तुझें इहपरलोकीं कल्याण होईल " " खरें आहे. मांडीचें मांस खाण्यास दिलें. दंडांतलें रक्त पिण्यास दिलें आणि त्याचा उपकार तूं त्याला नदींत फेंकून फेडलास ! आणि आतां स्वतःला मोठी पतिव्रता म्हणून मिरवत्येस ! तेव्हां तुझें सतीत्व कोठें उरलें ? एवढें बोलून राजानें आपल्यासमोरचा पडदा दूर करविला व त्यांना पुष्कळसें धन देऊन वाटेला लावलें." या प्रकारामुळें तो विरागी बनला. आपल्या जयसेन मुलास राज्यावर बसवून दमवरमुनीजवळ त्यानें दीक्षा घेतली. नानाप्रकारचें दुःखविनाशक भयंकर तप करीत तो साधू-राजा आपला काळ सुखानें घालवूं लागला.

कथा ७९ वी.

'सिंहदत्त'

पृथिवीपुरांत श्रीमान् भूपति गोविंद आपल्या रूपवान् जयमति राणीसह राज्य करीत होता. त्याचा पुत्र श्रीदेव. मोठा विद्वान्, गुणी होता. श्रीदेवाच्या भार्येचें नांव श्रीकांता होतें. त्यांना गोमती नांवाची मुलगी होती. गोमती रंगानें श्यामवर्णी कमलनयना होती.

पलास गांवाचा राजा सिंहदत्त याच्याशीं गौतमीचा विवाह झाला. गौतमीला आपल्या रूपाचा, कुळाचा मोठा गर्व. त्यामुळें सिंहदत्ताकडे ती अगदीं तुच्छ दृष्टीनें पाही. त्याच्याशीं प्रेम करीत नसे. त्यामुळें त्यांच्यांत नेहमीं भांडणें होत. या भांडणाला कंटाळून राजा पद्मिनीखेट गांवीं आला. तेथें सिंहसेन नांवाचा एक प्रतिष्ठित श्रीमान् गृहस्थ राहात असे. तो सिंहदत्ताचा मामा होता.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सिंहसेनाची स्त्री सिंहसेना होती. त्यांना एक सुभद्रा नांवाची मुलगी होती. सिंहसेनानें सुभद्रेशीं त्याचें लग्न लावून दिलें. तेव्हां सिंहदत्त तेथेंच आपला काळ घालवूं लागला.

ही वार्ता गौतमीस कळली. तिला अत्यंत राग आला. रात्रीच्या वेळीं ती पद्मिनीखेटास आली. सिंहसेनाच्या घरीं युक्तीनें प्रवेश करून तिनें सुशीलेचें डोकें उडविलें. तें डोकें बरोबर घेऊन ती एका भयंकर अरण्यांत शिरली. ती गर्भवती होती. त्यांतच दिवस भरले होते. वनांतच तिनें एका मुलास जन्म दिला. व्याघ्राच्या भयानें ती मुलाला घेऊन एका झाडावर चढली. त्या वृक्षाखालीं चोरून आणलेलें धन कांहीं चोर आपसांत वांटून घेत होते. तेव्हां गौतमीनें वरतून तें सुभद्रेचें डोकें त्यांचेवर टाकून दिलें. आपल्यापुढें एका स्त्रीचें मुंडकें पाहतांच ते सर्व भ्याले व भयानें सर्व धन सोडून पळून गेले. पहांट झाली. गौतमी झाडावरून खालीं उतरली. तिनें तें धन, तें डोकें व मुलास बरोबर घेऊन परत घरीं आली. तें डोकें खराब होऊं नये म्हणून त्यांत उत्तम मसाले घालून ठेवलें व आपल्या पतीची वाट पाहात दिवस घालवूं लागली.

सिंहदत्त कांहीं दिवस राहून पुन्हां नगरीस परत आला. घरीं येतांच गौतमीला जेवण्यास मागितलें. तिनें त्याला हातपाय धुण्यास पाणी दिलें. आदरसत्कार करून उच्च स्थानावर बसविलें. नंतर पूर्वी राखून ठेवलेल्या सुभद्रेच्या डोक्यांतील मांसाचें उत्तम प्रकारचें पक्वान्न करून त्यास वाढलें. सिंहदत्तानें अन्नाची वाखाणणी करीत तें मोठ्या आवडीनें खाल्लें. तेव्हां गौतमीनें मुद्दामच विचारलें, 'कां कसें लागलें हें पक्वान्न? ओळखलें कां कशाचें होतें तें?' सिंहदत्तानें सरळ उत्तर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिलें. मला गोड लागलें एवढें खरें? “पण कशाचें होतें तें कळत नाहीं; तूंच सांग ना! कशाचें होतें तें?” तेव्हां ती दुष्टा मत्सरी म्हणाली आपणाला कां गोड लागणार नाहीं? आपल्या प्रियेच्या डोक्याचें तें मांस. आवडत्या वस्तूचें तें पक्वान्न कोणास गोड लागत नाहीं? आणि म्हणूनच आपण प्रेमभरानें खाल्लेंत. गौतमीनें असें म्हणतांच सिंहवलानें भाला खुपसून तिला ठार केलें. स्त्रीहत्त्येच्या पातकामुळें सिंहवलाचा जीव मरून चतुर्थ नरकांस गेला. तेथें नाना प्रकारचे दुःख भोगूं लागला.

कथा ८० वी.

“दुष्टाचरणी वीरमती”

मगधदेशांत राजगृही नांवाची धनधान्यसंपन्न गुणवान जनांनीं गजबजलेली नगरी होती. तेथें एक धनाढ्य श्रेष्ठी राहात असे. त्याचें नांव धनमित्र होतें. त्याच्याजवळ एक दंड व एक छत्री होती. त्या दंडावर इंद्रनील, वैडुर्यपद्मराग वगैरे अमूल्य रत्नें कोरून बसविलीं होतीं. तसेंच छत्रीला पण अमूल्य रत्नें लटकत होतीं. एवढ्या मोठ्या अफाट संपत्तीच्या ज्याच्या या दोन वस्तु आहेत तेव्हां तो कितीतरी श्रीमंत असावा बरें? यामुळें त्याच्या श्रीमंतीचा बोलबाला सर्व नगरभर पसरला. त्याचें नांव सर्वांच्या मुखीं झालें. मोठमोठे आगमज्ञ विद्वान् त्याच्याकडे येत. लक्ष्मीकडे कोण ओढलें जात नाहीं? सर्व जग त्याच्याच पाठीमागें लागलेलें आहे! नव्हें त्यानेंच चालतें. म्हणूनच श्रीमंतांना कशाचीच उणीव भासत नाहीं. त्यांना सर्व अनुकूल असतें. श्रेष्ठीची संपत्ती कुबेराला देखील लाजवीत होती.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्रेष्ठीची धरणी नांवाची भार्या मोठी गुणी होती. त्यांना दत्त नांवाचा एक मुलगा होता. दत्त सर्व कलेंत निपुण होता.

राजगृहीजवळ भूमिगृह या नांवांचें एक खेडें होतें. तेथें एक आनंदी सुखी कुटुंब राहत असे. त्या कुटुंबाचा मुख्य 'मित्र' होता. मित्राची भार्या मित्रवती होती. यांना वीरमती नांवाची अत्यंत लावण्यसुंदर मुलगी होती. याच खेड्यांत एक अत्यंत दुष्ट चोर राहत असे. तो आपली उपजीविका चोऱ्या करून चालवी. ह्या चोराचा व वीरमतीचा चोरटा संबंध होता. पुढें बाणानें वीरमतीचें दत्ताशीं लग्न लावून दिलें.

वीरमती सासरीं राहण्यास आली. तिचें मुळींच दत्तावर प्रेम नव्हतें. चोराची भेट वरचेवर होई. त्याच्या दर्शनानें ती आनंदित दिसे. बायकोचें प्रेम आपणांवर नाहीं हें पाहून दत्तानेंही तिचा नाद सोडून दिला व जीवन गाळूं लागला.

कांहीं दिवस असेच गेले. पुढें तो चोर चोरी करीत असतांना पकडला गेला. राजानें त्याला सुळावर चढविण्याची आज्ञा दिली. त्यावेळीं वीरमति पण माहेरींच होती. सहज तिची आठवण झाल्या-मुळें दत्त आपल्या सूरसेन मित्रासह भूमिगृहास आला. जांवई आल्याचें पाहून सासऱ्याला मोठा आनंद झाला. त्याच्या निजण्याची पृथक् व्यवस्था केली. वीरमति पतिसान्निध निजली खरी, पण घडो-घडी तिच्या मनांत चोराचीच भावना येई. त्याला सुळावर चढवि-ण्याचा तो दिवस होता. तिला चैन पडेना. दोन घटका रात्र सरून गेल्यानंतर ती हळूंच उठली. चोराची पूजा करण्यासाठीं तांदूळ वगैरे पदार्थ बरोबर घेतले. सूरसेनानें तिला जातांना पाहिलें. तोहि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उठून हळूहळू तिच्या पाठीमागें जाऊं लागला. अंधारांत कोणी कोणास दिसत नव्हतें. पुढें वीरमती वाळलेल्या पानांवरून चालली त्यामुळें पानांचा आवाज होऊं लागला. सूरसेनानें याचा फायदा घेऊन तिची करांगुली कापून घेतली. त्या बोटांत मुद्रिका होती. अंगुलि मुद्रिकेसुद्धां हातीं आली. पण वीरमतीला तिकडे लक्ष्य देण्याला फुरसत कोठें होती ? ती आपल्या जिवलगाच्या अखेरच्या भेटीस चालली होती. वेळ गमावण्याची इच्छा नव्हती. ती तशीच पुढें निघाली व चोराच्या वधस्थळीं येऊन दाखल झाली. सूरसेनही पाठोपाठ येऊन तेथें लपून बसला. चोराजवळ येतांच वीरमतीनें त्याची पूजा केली. त्याच्या गळ्यांत पुष्पमाळा घातल्या. सूळ फार उंच होता. म्हणून खालीं विटा ठेवल्या. त्यावर चढून तिनें मोठ्या प्रेमानें चोराला आलिंगन दिलें. चोरानें मोठ्या प्रेमानें चुंबन घेतलें. चुंबन घेतांना तिचा ओंठ इतक्या जोरानें चावला कीं, तो अगदीं रक्तबंबाळ झाला. त्याला सूज आली. तेथून ती घरीं परत येऊन पुन्हां नवऱ्याजवळ जाऊन निजली. सूरसेनही परत आला.

थोडा वेळ निजण्याचें सोंग केलें. नंतर एकदम अंथरुणांतून उठून मोठमोठ्यानें रडूं लागली. पहांटेस तिचें रडणें ऐकून सर्व लोक गोळा झाले. लोकांनीं तिला काय झालें म्हणून विचारलें ! तेव्हां ती म्हणाली पहा ! "माझा ओंठ यांनीं किती जोरानें चावला आहे. त्यांतून हें रक्त निघत असून त्याच्या भयंकर वेदना होत आहेत. लोक दत्तावर चिडून गेले. त्यांना तो मोठा दुष्ट वाटला. बायकांच्या रडण्याला कोण फसत नाहीं ? त्यांनीं त्याला बांधून राजाकडे नेलें. व घडलेली सर्व हकिकत राजाला निवेदन केली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राजानें अशा दुष्टाला जगांतून नाहींसा करणेंच योग्य असा निकाल दिला. सूरसेन जवळच होता. राजाज्ञा ऐकतांच तो पुढें आला व म्हणाला राजन्! ही गोष्ट अगदीं खोटी आहे. ही दुराचरणी आहे. रात्रौ ती आपल्या जारास भेटण्यास गेली होती. त्यावेळीं मीहि तिच्या पाठोपाठ गेलों होतों. हिचा जिवलग म्हणजे राजानें सुळावर लटकावलेला प्रसिद्ध चोर होय. चोरानें चुंबन घेत असतांना हिचा ओंठ जोरानें चावला. रस्त्यांतून जात असतां हिची मुद्रिका असलेली करंगळी मुद्रिकेसुद्धां मी तोडून घेतली आहे. 'ही दुष्टा आपल्या सोंगाची वतावणी करण्यासाठीं विनाकारण या माझ्या मित्रावर आळ घेत आहे. तिचें म्हणणें असत्य आहे.' पहा प्रत्यक्ष पुरावा! म्हणून त्यानें ती मुद्रिका व अंगुली राजाचे पुढें ठेवली "आणि यावरही माझा विश्वासच बसत नसेल तर चोराला जाऊन विचारा!" ही हकिकत ऐकतांच पौरवासी लोक विस्मयांत पडले. नंतर राजा प्रजाजनांसह तेथें गेला. चोराच्या ओंठावर ठसा उमटलेला होता. त्याची पक्की खातरी झाली. दत्ताचा यथोचित योग्य सत्कार करून त्यास पुष्कळसें धन देऊन मुक्त केलें. सूर-सेनाचा सत्कार करण्यांत आला. त्यालाहि योग्य पुरस्कार मिळाला आणि हें त्याच्या सत्य वचनामुळें घडलें.

दत्त या प्रकारामुळें विरागी बनला. त्यानें अभिनंदनमुनीजवळ जाऊन दीक्षा ग्रहण केली. वीरमतीच्या विचित्र वागणुकीमुळें कित्येक मनुष्यांनीं दीक्षा तर कित्येकांनीं जैनधर्म स्वीकारला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा ८१ वी.

" रोहिणी. "

सूरसेन देशांतील सौरी नगरींत एकेकाळीं राजा वसुदेव आपल्या रोहिणी राणीसह राज्य करीत होता. त्यांना बलदेव नांवांचा एक मुलगा होता. बलदेव मोठा रणशूर विद्वान् गुणी होता. त्याचें रोहिणीवर अत्यंत प्रेम होतें. त्या दोघांना एकमेकावांचून अगदीं करमत नसे. हे एकत्रच राहत. याचा परिणाम विचित्र झाला. लोकांत त्याच्याविषयीं नाहीं नाहीं त्या गोष्टी चर्चिल्या जाऊं लागल्या. राजवाड्यांत राहत असल्यामुळें रोहिणीला या गोष्टी कळत नसत. पण षट्कर्णीं झालेली गोष्ट कळल्या शिवाय थोडीच राहते? कांहीं दिवसांनीं ही गोष्ट तिच्या कांनीं उडत उडत आली. त्याचा परिणाम तिच्या मनावर वज्राप्रमाणें झाला. सरळहृदयीं निष्पाप जीवाच्या असल्या असत्य गोष्टी जिव्हारीं जाऊन वसतात. तिच्या मनानें उचल खाल्ली.

राणीवंशांत गोकुळाहून दूध घेऊन गोपिका येत असे. ती एकदां सहज विहिरीवर पाण्यासाठीं गेली होती. गांवाची विहिर म्हणजे एक बातमीदारांचा अड्डाच होय. विहिरीवर गांवांतल्या बायका जमून त्यांच्यामध्यें रोहिणीविषयीं गोष्टी चर्चिल्या जात होत्या. गोपिकेनें त्या ऐकल्या. तिला अत्यंत वाईट वाटलें. ती दुःखी झाली. तिचा चेहरा उतरून गेला. नसत्या गोष्टींचा कसा बाऊ होतो याबद्दल खेद झाला. ती राजवाड्यांत आली. तिचें तोंड उतरलेलें पाहून राणीनें विचारलें गोपिके! तुला आज काय झालें? गोपिकेनें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सारा विहिरीवर ऐकलेला वृत्तांत निवेदन केला. अगोदर राणीच्या मनावर परिणाम झाला होताच त्यांतच ही भर पडली. तिच्या शोकाला पारावार राहिला नाहीं. शेवटीं ही गोष्ट राजाच्या कानावर गेली. त्यांनीं तिला बोलावून सांगितलें रोहिणी ! तूं शुद्ध असशील तर यमुनेच्या पाण्यांत कायोत्सर्गानें उभी रहा ! रोहिणीनें ती गोष्ट मान्य केली.

आपल्या पातिव्रत्याची शुद्धतेची खात्री पटविण्यासाठीं कोणती स्त्री कोणतें दिव्य करायला तयार होत नाहीं ? त्यांतून रोहिणी पवित्राचरणी होती. तिला आत्मविश्वास होता. तात्काळ ती यमुनेंत जाऊन कायोत्सर्गानें उभी राहिली. ती उभी पाहतांच यमुनेचें पाणी वाहण्याचें मंदावलें. ती स्थिर झाली. सर्व पौरवासीजन हा प्रकार पहाण्यास जमले होते. ते आश्चर्यानें दिङ्मुख होऊन गेले. त्यांना तिच्या शुद्धतेविषयीं खात्री पटूं लागली. तेव्हां जनता तिला म्हणाली ' रोहिणी तूं खरोखरीच शुद्ध असशील तर ज्या दिशेनें सध्यां ही यमुना वाहते ती दिशा सोडून उत्तरेकडे वाहण्याची तिला आज्ञा कर. रोहिणीनें नमस्कारमंत्राचा जप करून यमुनेला आज्ञा केली. तात्काळ यमुनेनें आपली गती फिरविली. व ती नगरीस वेढा घालून उत्तरेकडे वाहूं लागली अद्यापि ती त्याच दिशेनें वाहते आहे. रोहिणीच्या या प्रभावामुळें लोक तिच्या शुद्धतेची मुक्त कंठानें स्तुति गाऊं लागले. त्यांना तिच्या धार्मिकवृत्तीची खात्री पटली. धर्माचें महत्त्व पटलें. तेव्हां सरळहृदयी लोकांनीं त्यावेळीं जैनधर्माचा स्वीकार केला.

———

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा ८२ वी.

" सीता-शुद्धि. "

विनिता विषयांत साकेता नांवाची एक सुंदर नगरी होती. त्या नगरींत राजा राम आपल्या राणी सीतेसह राज्य करीत होता. रावणाच्या घरीं राहिल्यामुळें सीतेच्या पातिव्रत्याबद्दल सर्व लोक शंका घेऊं लागले. एकदां तर कांहीं प्रतिष्ठितांनीं रामाला निक्षून सांगितलें राजन्! सीता शुद्ध असेल तरच घरीं ठेवावी आणि तिच्या शुद्धतेची परीक्षा अग्निकुंडांत तिला प्रवेश करवून करावी, रामानें सीतेला तसें कळविलें. सीतेला वाईट वाटलें. पण तिची मनोदेवता तिच्या शुद्धतेची खात्री देत होती. तिनें त्या गोष्टीस मान्यता दिली. झालें. अग्निकुंड तयार करण्यांत आला. त्या प्रचंड अग्निकुंडांत सीतेनें नमस्कारमंत्राचा जप म्हणत उडी घेतली. चमत्कार हा कीं, त्या अग्निकुंडाचें एक महान् सुंदर पद्मसरोवरांत रूपांतर झालें. हा दैवी चमत्कार पाहून सीतेला संसाराचा वीट आला. ज्या धर्मामुळें आपणांला हें प्रातिहार्य प्राप्त झालें त्या धर्मालाच सर्वस्वीं वाहून घेतल्यास आपणांला आणखी काय नाहीं मिळणार? तात्काळ तिनें संयमसेनमुनीजवळ जाऊन जैनदीक्षा घेतली. हें आश्चर्य पाहून पुष्कळशा भव्यांना वैराग्य प्राप्त झालें व त्यांनींही दीक्षा घेतल्या. कित्येकांनीं श्रावकधर्म तर कित्येकांनीं जैनधर्म स्वीकारला.

कथा ८३ वी.

" जिनदासीचें शुद्धीकरण "

चंपापुरीचा राजा श्रीमान् जिनदत्त श्रावकधर्मी होता. त्याची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भार्या जिनदासी श्राविका होती. एकदां जिनदत्त प्रियेसह मिथिलानगरीस आपल्या श्वशुरगृहीं जाण्यास निघाला. मार्गांत एक घनदाट अरण्य लागलें. अरण्यांतून जिनदासीनें जिनदत्ताला बराच धर्माचा उपदेश दिला. तेव्हां राजानें आपल्या चारित्र्याची शुद्धी व्हावी म्हणून सिंहगुरूजवळ प्रतिमा घेतली. पण त्या सिंहगुरूंनीं कायोत्सर्गानें उभ्या असलेल्या जिनदासीलाच नमस्कार केला व आपल्या मार्गाला लागले. या विचित्र विधिलिखितामुळें आपणांला योग्य असा गुरू पाहून तिनें सुमतिगुरूंना नमस्कार करून तपग्रहण केलें. हें आश्चर्य पाहून राजपरिवारानेंहि जिनधर्माचें अंगिकरण केलें.

कथा ८४ वी.

विनितादेशांत अत्यंत सुंदर धनधान्यांनीं विपुल शोभिवंत अयोध्या नांवाची नगरी आहे. त्या नगरींत राजा सूरदत्त राज्य करीत होता. त्याला एकशेंपांच स्त्रिया होत्या. पण त्यांपैकीं सति नामें स्त्री त्याची अत्यंत आवडती होती. सतीची कांति चंद्रासारखी शुभ्र तेजस्वी होती. यामुळें तिला आपल्या रूपाचा मोठा गर्व वाटे. राजा विषयी होता. त्यांतून तिच्या रूपावर मोहित झालेला. त्यामुळें तो आपला सर्व काळ तिच्याच सेवेंत घालवी. राजकारणाकडे तो बिलकुल लक्ष देत नसे. एकदां मुनीच्या तोंडून धर्माचें प्रवचन ऐकण्याचा राजाला प्रसंग आला. त्यावेळेपासून तूं केव्हांहि मला साधु आल्याची वर्दी देत जाऊं नकोस, किंवा राजकारणाचें काम असल्यास सांगत जाऊं नकोस असें त्यानें द्वारपाळाला सांगून ठेवलें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व आपला सर्व काळ तो सतीच्या सहवासांत भोग भोगण्यांत घालवूं लागला.

कांहीं दिवसांनंतर यमदत्त व धर्मरुची नांवाच्या साधूंनीं भिक्षेसाठीं राजमंदिरांत प्रवेश केला. साधूंना राजमंदिरांत शिरलेले पाहतांच द्वारपाळानें जाऊन राजाला वर्दी दिली. राजा त्यावेळीं महादेवीला अलंकार घालून कुंकूमतिलक लावीत होता. राजाचें आपणांकडे लक्ष्य नाहीं असें पाहून पुन्हां द्वारपाळानें सांगितलें. राजा द्वारपाळावर रागावला व म्हणाला मूर्खा! तुला दिसत नाहीं? मी यावेळीं महाराणीच्या सेवेंत आहें, आणि तूं अशा वेळीं मुनी आल्याचें सांगतोस! कांहीं शरम वाटत नाहीं? महादेवी शांतपणें हा प्रकार पहात होती. तिनें आपल्या गांवीं हें कांहींच नाहीं; असें दाखविलें. तेव्हां द्वारपाळ पुन्हां म्हणाला 'राजा! तुझ्या द्वारीं दोन साधू भिक्षेसाठीं आले आहेत. तूं धर्मज्ञ व सर्वज्ञ आहेस. तुला आहाराची एपत आहे. म्हणून तुझ्या द्वारीं त्यांनीं प्रवेश केला. अभ्यागतांचा अव्हेर करणें बरें नव्हें. त्यांतून तें नग्न साधू होत. धर्माचें काम आहे. धर्म करण्यांत विलंब नसावा. तेव्हां राजा जाण्यास निघाला. जातां जातां सतीस म्हणाला, प्रिये! थोडा वेळ थांब. मी जाऊन येतों. आल्यानंतर तुझा शृंगार करतों. मुनींना आहार देऊन लवकर येतों व तुझ्या सेवेंत लवकर हजर होतों. राजा योग्य भक्तिभावानें मुनीसमोर गेला. त्यांचें यथायोग्य सत्कार करून पूजन केलें व मोठ्या आनंदानें, धर्मभावनेनें त्यांना आहार दिला. आहारानंतर मुनी निघून गेले.

इकडे आपल्या शृंगारांत व्यत्यय झाल्यामुळें सती साधूंची सारखी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निंदा करीत होती. त्यामुळें तिचें सारें शरीर कुष्टमय बनलें. तिची शरीरकांती नष्ट झाली. आहार देऊन राजा परत महालांत आला. राणीचें शरीर पाहातांच त्याला संसाराच्या अनित्यतेबद्दल, सुखा-बद्दल तिटकारा उत्पन्न झाला. तो विरागी बनला. सामंतमंत्री वगैरे परिवारांसह तो वीरसेनमुनीकडे गेला. मुनीमुखांतून त्यानें धर्माचें श्रवण करून संसारार्णवतारिणी मुनीदीक्षा ग्रहण केली. मुनीच्या निंदेमुळें सतीला आपल्या दिव्य व सुंदर शरीराला मुकावें लागलें. ती रोगी बनली. रोगानें ती जर्जर झाली. तेव्हां मानवानें धर्माची निंदा करूं नये, केल्यास त्यांना अशा प्रकारचें दुःख भोगावें लागतें.

कथा ८३ वी.

" संसार वृक्ष कथा "

एका नगरींत त्रिविक्रम ब्राह्मण राहात असे. एकदां तो महा-अरण्यांतून जात असतां त्यानें एक मोठा भयंकर वाघ समोरून जातांना पाहिला. वाघाच्या भयानें तो पळत सुटला. पळतां पळतां एका पडक्या विहिरींत जाऊन पडला. विहिरीच्या कांठीं एक झाड होतें. त्याच्या मुळ्या विहिरींत गेल्या होत्या. त्याच्या आधारानें तो विहिरींत लोंबकळत उभा राहिला. वाघहि त्याचा पाठलाग करीत त्या विहिरीजवळ आला. ब्राह्मणाला विहिरींत पडलेला पाहून तो मोठमोठ्या गर्जना करून पायानें जमीन उकरूं लागला. एवढा मोठा समर्थ पण तो निःसत्त्व बनला. रागारागानें तो त्या झाडाला हलवूं लागला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

झाडावर मधमाशांचें मोठें पोळें होतें. झाड जोरानें हलूं लागल्यामुळें मधमाशा पोळ्यावर उडूं लागल्या. पोळ्यांतून मध गळून ब्राह्मणाच्या तोंडांत पडूं लागला. मध गोड लागे, पण आंगास मधमाशा डंसत होत्या. इकडे वृक्षाचीं मुळें उंदीर कुरतडत होता. वर चढावें तर वाघ खाणार; झाडाच्याच आश्रयानें राहवें तर झाड लवकरच आंगावर पडेल याची भीति! यांत भर घालून अजगरानें त्याचे पाय धरले. अशी भयानक स्थिति प्राप्त झाली तरी मधुबिंदू त्याला गोडच लागत होता. तो पडतांच मोठ्या आनंदानें चाटून खाई. अहाहा! खरोखरीं जगांत अशीच प्रत्येक मनुष्याची स्थिति आहे. तें आपलें आयुष्य मृत्युरूपीं व्याघ्राला भिऊन सुखदु:खांच्या भयंकर विहिरींत पडून घालवितात. त्यांचें जीवित असें लोंबकळत असतें. दु:खरूपी मक्षिका त्यांना नेहमीं डसतात. त्याचें शरीर क्रोधादि कषायांनीं नेहमीं कांपत राहातें. नरकरूपी अजगर त्याचे पाय धरून नेहमीं ओढीत असतो. तरीपण त्यांत मुधुबिंदूप्रमाणें हा संसाराला गोड मानून त्यालाच चिकटून राहातो. परलोकींच्या दिव्य सुखाची इच्छा करीत नाहीं. किती हें मानवांचें दुर्दैव!!!

कथा ८६ वी

" श्रेष्ठी चारुदत्त "

अंग देशांतील चंपानगरींत राजा सूरसेन आपल्या सुरसेना राणीसह राज्य करीत होता. नगरश्रेष्ठी भानू मोठा श्रीमंत होता. भानूची भार्या सुभद्रा नांवाची होती. तिला संतति नव्हती. त्यामुळें ती नेहमीं दु:खी असे. मुलासाठीं नेहमीं प्रयत्न करी पण सर्व व्यर्थ जात. एकदां जिन-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मंदिरांत दर्शनासाठीं गेली होती. मंदिरांत एक चारण मुनी आले होते. त्यांना भक्तिभावानें वंदन करून म्हणाली, महाराज ! मला मुलाचें सुख लाभेल काय ? मुनी उत्तरलें, " तुला मुलगा होईल. " मुनींना नमस्कार करून सुभद्रा घरीं आली. श्रेष्ठीसह आपला काल सुखानें घालवूं लागली. मुनीच्या भाकितप्रमाणें तिनें कांहीं दिवसांनंतर एका दिव्य मुलांस जन्म दिला. त्याचें नांव चारुदत्त ठेवण्यांत आलें.

चारुदत्त एकदां आपल्या हरिसिंह, मरुभूति, वराहक व गोमुख या चार मित्रांसह खेळत होता. खेळतां खेळतां तो एका वाळवंटांत आला. वाळवंटांत त्यानें रत्नमालेचा एक पाय पाहिला. तो पाहून आपल्या मित्रांस म्हणाला, मित्रहो ! हा कांहीं साधूचा पाय नव्हे, मला तर वाटतें कोणातरी विद्याधराचा असला पाहिजे. आणि ते लोक जवळच कोठेंतरी असलें पाहिजेत. मी शोधून पाहतो. नंतर तो त्याच्या अनुरोधानें जाऊं लागला. जातां जातां एका ठिकाणीं आला. तेथें एक विद्याधरी बसलेली असून जवळच एका वृक्षाला एका विद्याधराला खिळ्यांनीं जखडून टाकलेलें त्यांनीं पाहिलें. ते भयंकर दृश्य पाहून चारुदत्त विद्याधरांस म्हणाला, " भो विद्याधरा ! आपणांस हा त्रास कोणीं दिला ? तें मला सांगा ! " विद्याधर म्हणाला, " मित्रा ! प्रथम तूं हे खिळे काढ ! या जखमेवर औषधी लाव ! म्हणजे तुला सर्व सांगतों. " चारुदत्तानें खिळे काढून त्यास औषधी लावली. औषधामुळें विद्याधर पूर्ववत् उठून उभा राहिला. नंतर एक तरवार हातीं घेऊन आपल्या प्रियेजवळ गेला. तिला व तिच्या जाराला पकडून आणून चारुदत्तापुढें उभें केलें व म्हणाला ऐक !

" विजयार्द्ध पर्वताच्या दक्षिण श्रेणीवर शिवमंदिर आहे. तेथील

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भूपाल कौशिकाचा मी मुलगा अमितगति होय. माझा मित्र धूमसिंह पूर्वीचा गोरमुंड होता. आमचे दोघांचें एकमेकांवर अत्यंत प्रेम. आम्हीं दोघें मिळून खेळत असूं. आम्हांला एकमेकांवांचून करमत नसे. आम्हीं एकदां ह्रींमंत पर्वतावर आलों. तेथें हिरण्यसेन नांवाचे तपस्वी राहात असत. त्यांची मुलगी हिरण्यतापसी अत्यंत सुकुमार होती. तिला पाहतांच मी तिच्या रूपानें वेडा बनलों. आम्हीं घरीं परतल्यानंतर ही गोष्ट माझ्या मित्रानें राजाच्या कानावर घातली. राजानें माझ्यासाठीं त्या मुलीची मागणी घातली. हिरण्यसेनानें आनंदानें संमति दिली. नंतर आमचें लग्न झालें. माझा मित्र धूमसिंह पण तिच्या रूपानें वेडा झाला होता. तो माझा द्वेष करूं लागला. आज मी हिच्याशीं क्रीडा करण्यासाठीं येथें आलो. त्यानें आमच्यावर पाळत ठेवलेली होती. तोहि मागोमाग आला. तो रागानें लाल झाला. त्यानें मला झाडाला लोखंडी खिळ्यांनीं जखडून टाकलें व माझ्या प्रियेला घेऊन निघून गेला. मित्रा! तूं मला या संकटांतून मुक्त केलें. मी त्यांना तुझ्यासमोर आणलें आहे. मी तुझा खरा मित्र बनलों आहे. तुझ्यासाठीं मी काय बरें करूं?"

ही कथा ऐकून चारूदत्त म्हणाला, ' विद्याधरा! तुझें दर्शन झालें हेंच महोभाग्य होय. त्यांतून मैत्री जमली. आतां मला याशिवाय दुसरें कांहीं नको. मित्रांसाठीं जिवास जीव देणें, मित्राचें परम कर्तव्य होय." विद्याधर चारुदत्ताच्या भाषणानें आनंदित झाला. त्याचा यथायोग्य सत्कार करून तो आपल्या नगरीस निघून गेला. चारूदत्तहि घरीं आला. नाना प्रकारच्या शास्त्रांचें अध्ययन करून त्यांत प्रावीण्य मिळविलें. तो पूर्ण वयांत आला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पुढें चारुदत्ताचें लग्न चंपा नगरीचा सुप्रसिद्ध श्रेष्ठी सुभद्राच्या मित्रवती नांवांच्या मुलीशीं झालें. मित्रवतीच्या आईचें नांव सुमित्रा होतें. मित्रवती अतिसुंदर कमळनयना होती. चारुदत्त संसाराविषयीं विरक्त बनला होता. मित्रवतीशीं तो मुळींच प्रेमानें वागत नसे. तिच्याशीं बोलत नसे. मग इतर गोष्टी तर दूरच राहिल्या. तो सदा सर्वदा आपलें डोकें धर्मांत घाली. अशा एककली धार्मिकाचें वेड पुढें वेश्येच्या सहवासानें शिथिल झालें.

याच नगरींत कलिंगसेना नांवाची एक प्रख्यात गणिका होती. ती मोठी स्वार्थी धूर्त होती. वसंतसेना ही तिची मुलगी. ती अत्यंत सुंदर रूपयौवनसंपन्न होती. पुढें चारुदत्त हिच्या प्रेमांत सांपडला. तिच्या नादानें तो द्यूत वगैरे खेळूं लागला. पूर्वीच्या धर्माचरणावर पाणी पडलें. तो पूर्ण व्यसनी बनला. वसंतसेनेशीं नाना प्रकारचें भोग भोगण्यांत तो आपले दिवस घालवूं लागला. त्याच व्यसनापायीं त्यानें आपली १६ कोटी सुवर्णाची संपत्ति केवळ वर्षाचे आंत धुळीला मिळविली. तो निर्धन बनला. शेवटीं मित्रवतीजवळ थोडेसें धन होतें. तेहि तिच्या सांगण्यावरून त्यानें वसंतसेनेच्या पायीं वाहिलें. तो अगदीं कफल्लक बनला. तेव्हां कलिंगसेना आपल्या मुलीस म्हणाली बाळे! आतां चारूदत्ताजवळ कांहीं धन उरलें नाहीं. त्या निर्धन भिकाऱ्याशीं आपला संबंध उचित नाहीं. तरी त्याला घालवून दे. दुसरा एकादा श्रीमंत गांठ. पण ही गोष्ट वसंतसेनेला रुचली नाहीं. चारूदत्तावर तिचें निःसिम प्रेम बसलें होतें. त्याच्यावांचून तिला करमत नसे. ती स्वस्थ राहिली. तेव्हां पुन्हां कलिंगसेना म्हणाली-मुली! तुला आपलें धंद्याचें ज्ञान अजून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पूर्ण अवगत झालेलें नाहीं. अद्याप जगाची माहिती नाहीं. आपली वृत्ति कशी अगदीं मधावरील माशासारखी असावयाला पाहिजे. ज्याचें धन संपलें त्यास सोडून द्यावें. आपलें काम संपत्ति मिळविण्याचें. प्रेम संपादन करण्याचें नसतें. तूं सरळ हृदयी आहेस. तुला प्रेम बरें वाटतें. पण आपणांसारख्या धंदेवाईकांना प्रेमाचा काय उपयोग ? अशानें कुलाला बट्टा लागतो. पुष्कळसें धन देईल तोच आपला वल्लभ समजावा. कारणः—

> स नरो वल्लभोऽस्माकं दाता बहुधनस्तरां ।
> निर्धनस्तु परित्याज्यः कुलजोऽपि सुरूपवान् ॥

निर्धनाचें प्रेम काय कामाचें ! मधुर दारूनें भरलेलें भांडे दारू संपतांच निरुपयोगीं ठरतें. तूं त्याला हांकलून दे. या उपदेशाचा वसंतसेनेच्या मनावर कांहींच परिणाम झाला नाहीं. आपली सारी मेहनत " पालथ्या घागरीवर पाणी " याप्रमाणें व्यर्थ गेलेली पाहतांच कलिंगसेनेस मुलीचा राग आला. पण तो बाह्यतः न दाखवितां स्वस्थ राहिली. नंतर वसंतसेना झोंपीं गेली—तिला गाढ झोंप लागली आहे असें पाहून तिनें चारुदत्तास घरांबाहेर ओट्यावर आणवून निजविलें. पहाट झाली. चारुदत्त उठून पाहूं लागला. तों पुष्कळसे लोक आपली गम्मत पाहात उभे असलेले दिसले. त्याला आपल्या पूर्वस्थितीची जाणीव झाली. मी जैनाचारी, विद्वान् आणि ही माझी काय दशा ? मला ही कुबुद्धि कशी सुचली ? आतां जगांत तोंड तरी दाखवायला कोठें जागा आहे ? धिःकार असो या माझ्या जिण्याला ! तोंडाला पदर लावून तो घरीं आला. मातृप्रेम आंधळें असतें. तिनें मुलगा आलेला पाहतांच मोठ्या प्रेमानें छातीशीं धरलें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चारुदत्ताला अधिकच दु:ख झालें. वडील वारलेले, घरचें वैभव नष्ट झालेलें दृश्य दृष्टीपुढें उभें राहतांच तो ढळढळां अश्रू ढाळूं लागला. पण गेल्या गोष्टी थोड्याच परत येणार ? तेव्हां होतें नव्हतें ते घरांतलें डागडागिनें मोडून तो आपल्या आईबायकोला बरोबर घेऊन व्यापारासाठीं त्यानें आपली जन्मभूमि सोडली.

तेथून निघाला तो उत्कल देशांत जिरावर्त नगरीस आला. तेथें पुष्कळसा कापूस खरेदी केला. तो कापूस विक्रीसाठीं कांहीं व्यापारी मित्रांबरोबर तो ताम्रलिप्त गांवास जाण्यास निघाला. रस्त्यांतून एका अरण्यांतील दावानलांत सांपडला. त्यांत कापसाला आग लागून कापूस अग्निमुखीं पडला. आईला तेथेंच सोडून तो घोड्यावर बसून एकटाच पौरंदरीकडे जाण्यास निघाला. दैवयोगानें रस्त्यांत तो घोडा मरण पावला. घोडयाचें प्रेत तेथेंच सोडून तो पायींच जाण्यास निघाला. रात्रभर चालण्यामुळें तो अगदीं थकून गेला होता. सूर्योदयाच्यावेळीं तो प्रियंगु नगरीस आला. तेथें त्याचा पूर्वींचा मित्र सुरेंद्रदत्त राहात असे. चारुदत्तांस पाहतांच त्यानें त्याला आपल्या घरीं नेलें. कांहीं दिवस मित्राच्या घरीं राहिला. नंतर सुरेंद्रदत्ताच्या सांगण्यावरून त्यानें धनासाठीं यवन नांवाच्या महाद्वीपांस जाण्याचें ठरविलें. एक सुंदर मजबूत जहाज ठरविलें. त्यांत बसून तो महाद्वीपांकडे निघाला. एकामागून एक द्वीप ओलांडीत तो सहा समुद्रांच्या पलीकडे आला. प्रत्येकवेळीं त्याला जहाज बदलावें लागे. सातवा समुद्र लागला तो ओलांडून जाण्यासाठीं त्यानें दुसरी नांव ठरविली. त्यांत बसून तो निघाला. कांहीं दिवस प्रवास केल्यानंतर कर्मधर्मसंयोगानें ती

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाव फुटली. तो समुद्रांत एका फळीच्या आधारानें तरंगूं लागला. त्याच्याच आधारें तो सिंधू सागरांत आला. तो समुद्र ओलांडून सिंधूदेशास आला. सिंधूदेशाहून तो देशाटन करीत राजगृहीस आला. श्रमांमुळें तो थकून भागून गेला होता. राजगृहींत एक संन्यासी राहत असे. त्यानें चारुदत्ताला आपल्या घरीं आश्रय दिला. यांत पांच दिवस निघून गेले. सहाव्या दिवशीं तो साधू त्यास एकांतांत नेऊन म्हणाला, मित्रा! येथून एका नगरीच्या बाहेर एक चमत्कारिक रसांनीं भरलेली विहीर आहे. त्यांतील रस मला आणून देशील तर तुझें दारिद्र्य दूर होईल. तूं सुखानें आपला काळ घालवूं शकशील! त्यांत माझा कांहींच स्वार्थ नाहीं. तुझ्याच हितासाठीं मी निरपेक्षबुद्धीनें सांगत आहे. साधूंच्या भाषणानें चारुदत्ताला आनंद झाला. त्याला कोणीकडूनहि धन मिळवायचें होतें. तो साधूला म्हणाला, पवित्र पुरुषा! माझ्या सुखासाठीं आपण सांगत आहांत. मी आनंदानें करावयास तयार आहें. नंतर एके दिवशीं तो साधु चारुदत्तास बरोबर घेऊन एका भयाण अरण्यांत आला. कांहीं वेळ चालून गेल्यानंतर ते इच्छित स्थळीं आले. विहिरीजवळ येतांच साधु त्यास म्हणाला, पहा, चारुदत्ता! ही विहीर अगदीं भयंकर व फार खोल आहे. हिचें तोंड अगदीं अरुंद चार हाताचें आहे. त्यांतच चमत्कारिक रस भरलेला आहे. तरी आंत उतर आणि त्यांतून रस भरून आण. रसानें तुझें दारिद्र्य पूर्ण दूर होणारें आहे. अगदीं निर्भयपणें तूं आंत शीर.

चारुदत्त अगदीं निर्धास्तपणें आंत उतरला. रसाचें भांडें भरून घेणार तोंच विहीरींतून मनुष्याच्या शब्दनादानें तो थबकला व म्हणाला, आपण कोण आहांत? आणि मला रस नेण्याला कां बरं हरकत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करतां ? त्यावर विहीरींतील व्यक्ति उत्तरली–' बाबारे, मीहि तुझ्यासारखाच मनुष्य आहें. पण विहीरींत पडलों आहें. पण तूं कोण ? कोणाच्यासाठीं येथें आलास ? कोणीं तुला येथें आणलें ? हें कळेल काय ? ' तेव्हां चारुदत्त म्हणाला, माझें नांव चारुदत्त. मी चंपापुरीचा राहणारा एक श्रेष्ठी ! परिव्राजकाच्या आज्ञेवरून रस घेण्यासाठीं आलों आहें. कारण, या रसानें बरीच धनप्राप्ति होणारी आहे. हें चारुदत्ताचें भाषण ऐकून कूपस्थ मनुष्य सांगूं लागला. भद्रा ! तुझें यांत कल्याण होणार नाहीं. हा तपस्वी, मोठा दुष्ट, घातकी, खल, नीच आहे. मीहि तुझ्यासारखाच धनलाभाच्या आशेनें आलो. उज्जयनी नगरीहून सिंहलद्वीपास जाण्यास निघालों. रस्त्यांत माझी नाव फुटली. मोठ्या प्रयत्नानें समुद्रांतून तरून मी राजगृहीस आलों. राजगृहींतच या विष्णुदत्त तपस्व्यांची व माझी भेट झाली. त्यानें मोठ्या सत्कारानें मला आपल्या घरीं ठेवून घेतलें. पुढें कांहीं दिवस गेल्यानंतर मलाहि तुझ्याचप्रमाणें धनाची आशा दाखवून रस आणण्यास सांगितलें. भावी धनप्राप्तीच्या आशेनें मी कबूल केलें, आणि विहीरीजवळ आलों. तेव्हां एका शिक्यांत बसवून त्यानें मला खालीं सोडलें. मी कूपस्थ रसाचा तुंबा भरून त्यास दिला. तुंबा हातीं पडतांच त्यानें मला विहीरींत ढकलून दिलें व तो घरीं निघून गेला. माझ्याप्रमाणें यानें बऱ्याच लोकांना केलें आहे. ते विचारे आशेनें यांत खिचपत पडून मरण पावले. त्यांनींच हें रसकूप भरून गेलें आहे. मी मरणाच्या दारीं पडलों आहें. तूं माझ्यावर विश्वास ठेव. या लफंग्याच्या नादीं लागूं नकोस. तो तुला माझ्याप्रमाणेंच फसविल्याशिवाय राहणार नाहीं. तो अगदीं निर्दयी, दुष्टांतःकरणी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे. त्याला दयामाया कांहीं नाहीं. तेव्हां तूं आपली सुटका करून घे. नाहींतर तुझी गत माझ्याप्रमाणेंच होईल." चारुदत्ताला त्या व्यक्तीचें म्हणणें पटलें. पण तो म्हणाला बाबारे! तुझें म्हणणें खरें आहे. पण आतां त्याला तुंबा भरून दिल्याशिवाय सुटका नाहीं. तूं तुंबा भरून दे. मी त्यास देतों. म्हणजे तो निघून जाईल. कूपस्थ मनुष्यानें तुंबा भरून चारुदत्ताच्या हातीं दिला. चारुदत्तानें तो साधूस दिला. साधु घोड्यावर बसून घराकडे निघून गेला.

चारुदत्त अर्धवट विहिरींत लटकत होता. पंचनमस्कारांचें चिंतवन करूं लागला. संकटसमयीं सर्वांनाच धर्म आठवतो. आतां आपल्याला मरण येणारच या भावनेनें त्यानें समाधिमरणाची तयारी केली. नंतर कूपस्थ मनुष्याकडे वळून म्हणाला, मित्रा! तूं मला जीवदान दिलेंस पण तुला या संसाराटवींतून तारून नेणाऱ्या धर्माचें स्वरूप निवेदितों. तें ऐक!

"मित्रा या संसारसागरांत आत्म्यास एका धर्माशिवाय दुसरा कोणताच सखा नाहीं. जीव कर्मांच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें नरकादि अगणित दुःखाचा भागीदार बनला आहे. त्याला आपल्या मूळस्वभावाची विस्मृति झाली आहे. संसारांत त्याला सुख वाटतें पण शेवटीं त्याला नानाप्रकारचीं दुःखें भोगावीं लागतात. पापामुळें तो तिर्यंक् नरकगतीस जातो. तेथील छेदन, भेदन, ताडन, मारण, वधबंधन वगैरे भिन्न भिन्न प्रकारचीं दुखें भोगून नंतर पुन्हां पुण्य आचरल्यास मानवजन्माला येतो; पण तोही दुःखीच असतो. त्याला कोणत्याहि प्रकारचें सुख नसतें. धर्माची विस्मृति होते. धर्माचें अंगिकरण केल्यास शुभकर्माचा बंध होतो. शुभकर्मानें देव-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गति लाभते. देवाचें सुख पाहून त्याला आपल्या हीनस्थितीचें दुःख होतें. पण पुन्हां संसारवर्धक कर्मांचाच कर्ता बनतो. त्याचा संसार वाढतच जातो. याला बंधन घालण्यासाठीं धर्मच स्वीकारणें योग्य ! जिनधर्मासारखा दुसरा सद्धर्म नाहीं. तरी तूं धर्माची कांस धर व त्याच्याच चिंतवनांत आपला काळ घालीव. म्हणजे मरून उत्तम गतीस जाशील. नाहीं तर भवसागराचे फेरे फिरण्याचे तुझ्या नशिबांत कायमचेंच लिहून ठेवलें जाईल." यावर कूपस्थ मनुष्य म्हणाला "मित्रा ! तुझा उपदेश मला पटतो. मी कोणत्या धर्माचें पालन आणि तें कसें करावें हें सांग ! म्हणजे मी तोच मार्ग अनुसरतों." तेव्हां चारुदत्तानें त्याला जिनधर्मातील, पंचाणुव्रताचें, शिक्षाव्रताचें, गुणव्रताचें साविस्तर कथन करून सांगितलें. मधु, मांस, मद्य, याच्या त्यागाचें, परिग्रह आहारत्यागांचें महत्त्व पटवून दिलें. पंचनमस्कार-मंत्राचें महात्म्य वर्णन करून सांगितलें. तो मंत्र त्यास दिला. तो त्या मनुष्यानें सद्भक्तीनें ग्रहण केला व त्याचें चिंतवन करूं लागला.

नंतर चारुदत्तानें विचारलें "मित्रा ! आतां मला येथून निसटण्यास कांहीं मार्ग आहे किंवा नाहीं ? कां असेंच लटकत राहावें लागणार ? कूपस्थ उत्तरला, आहे. एक सुंदर सुसर येथेंच एका गुहेंत राहते. ती रोज या विहीरींतील रस पिण्यास येते. तिचें शेंपूट धरून तूं जाशील तर यांतून सुटशील ! नंतर ते इतर गप्पा मारीत आपला वेळ घालवूं लागले.

दुसरे दिवशीं सुसर विहीरींत आली. ती पाणी पिऊन चालली असतां चारुदत्त तिच्या शेंपटीला धरून विहीरींतून बाहेर आला. बाहेर येतांच तो मूर्च्छित होऊन पडला. कांहीं वेळानें त्याला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शुद्धि आली. तो डोळे उघडून पाहतो तों एक जंगली रेडा आपली शिंगें उगारून आपणांवर धांवून येत असलेला दिसला. त्याची पांचावर धारण बसली. एका संकटांतून निभावलों, तर दुसरें संकट दत्त म्हणून उभें! आपल्या पापाचें हें फळ. तो भयानें कांपूं लागला. कोणाची मदत मिळण्याची तर आशाच नव्हती. शेवटीं धर्म आठवला. त्याचें उच्चारण करीत करीत पळत सुटला. पळतां पळतां एक उंच शिला समोर दिसली. तिच्यावर तो चढून उभा राहिला. तो रेडा मस्त होता. तो शिलेच्या पायथ्याखालींच उभा राहून त्या शिलेला टक्कर देऊं लागला. तितक्यांत अजगरानें त्यास पकडलें. त्या दोघांत चकमक सुरूं झाली. ही संधी साधून चारुदत्त तेथून निसटला.

तो भेदरून गेला होता. त्याला त्याच्या मातुलमित्रानें, समुद्रदत्तानें पाहिलें. चारुदत्तास बरोबर घेतलें. नंतर ते एका होडक्यांत बसून कांडवेगानदी तरून टंकणपर्वताच्या वनाजवळील टंकण देशांत आले. तेथें त्या दोघांनीं दोन बोकडे खरेदी केली. त्यांवर धन लादून ते पर्वताच्या बाजूनें चालले. पर्वतावर येतांच रुद्रदत्त चारुदत्तास म्हणाला, “ मित्रा ! यांपैकीं एका बोकडास मारून टाक ! ” चारुदत्त उत्तरला, “ मी याला मारणार नाहीं. कारण, हा आपला उपकारी आहे. आणि त्यांतून मी गुरुजवळून अहिंसाव्रताचें ग्रहण केलें आहे. माझ्या हातून केव्हांहि हिंसा घडणार नाहीं. ” तेव्हां रुद्रदत्त स्वतःच एक तरवार घेऊन त्या बोकडास मारण्यास तयार झाला. त्यामुळें चारुदत्तानें त्याला श्रावकधर्म सांगितला व पंचनमस्कार मंत्राचें उच्चारण त्याच्या कानांत केलें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यामुळें तो मरून सौधर्मस्वर्गांत महर्द्धिक देव झाला. याप्रमाणें दुसराहि बोकड मरून, स्वर्गांत देव झाला. रुद्रदत्तानें त्याची चामडी काढली. तें कातडें, त्यांचें मांस, इतर कांहीं पक्षी व भेरूड पक्षी बरोबर घेऊन तो रत्नद्वीपाकडे निघून गेला.

तो निघून गेल्यानंतर भेरूड पक्ष्यांशीं चारुदत्ताला झगडावें लागलें. त्यांत त्याचा बाणाचा भाता खालीं पडला. तो घेण्याच्या निमित्तानें तेथून निसटला व पळत पळत पर्वताच्या दुसऱ्या टोंकावर गेला. तेथें एक मुनी आराधना करीत असलेले त्याच्या दृष्टीस पडले. चारुदत्ताला पाहतांच साधूंनीं विचारले, चारुदत्ता ! इकडे या भयाण अरण्यांत तूं कसा आलास ? सर्व कुशल तर आहे ना ? चारुदत्ताला आश्चर्य वाटलें. तो साधूला म्हणाला, ' महाराज आपण कोण ? आणि आपली माझी ओळख कोठली ? तुम्हीं मला कोठें पाहिलें हें सांगावें. ' साधु उत्तरले, ' चारुदत्ता ! तुझी माझी भेट प्रथम चंपारण्यांत पडली. माझ्या वैऱ्यांनीं मला खिळ्यांनीं झाडास जखडून टाकलें होतें. त्यांतून तूं माझी मुक्तता केलीस. नंतर मी माझे नगरीस निघून आलों. पुढें माझे पित्यांनीं मला राज्यावर बसवून सुवर्णकुंभमुनीजवळ दीक्षा घेतली. मला दोन स्त्रिया होत्या. पहिली विजयसेना व दुसरी मनोरमा धाकटी ! मला विजयसेनेपासून गंधर्वसेना नांवाची मुलगी व मनोरमेपासून दोन मुलें झालीं. थोरल्या मुलाचें नांव सिंहयज्ञ व धाकट्याचें नांव वराहग्रीव ठेवलें. गंधर्वसेनेनें सर्व जग जिंकलें व ती गांधर्वपद्धतीनें राहूं लागली. पुढें संसाराला कंटाळून मी सिंहयज्ञाला राज्यावर बसवून वराहग्रीवाला युवराजपद दिलें. नंतर सुवर्णकुंभमुनीजवळ मी जैनदीक्षा घेतली. सर्व जगांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्रेष्ठ लवणसमुद्रांतील हें कुंडलग द्वीप एखाद्या पर्वतासारखें उत्तुंग आहे. या द्वीपाचा राजा कर्कोट आहे. हा पर्वत त्या प्रदेशांत मोडतो. हा पर्वत भयाण अरण्यांत असून यांत मोठें व्याघ्रादी क्रूर श्वापदें राहतात. देव, चारणखेट, आपल्या प्रियजनांना सोडून चुकून देखील या वनांत येण्याचें कधीं धाडस करीत नाहींत. तपस्वीच येतात. तूं तर गृहस्थी ! ! मग येण्याचें धाडस कां केलेंस ?" तेव्हां चारुदत्तानें आपली आजपर्यंतची सर्व हकिकत संथपणें निवेदन केली.

थोडया वेळानीं विद्याधर कुमार सिंहयश आपल्या सैन्यासह मुनीवंदनेसाठीं आला. मुनीजवळ कर्मभूमिचा मानव पाहून आश्चर्य वाटलें. मुनींना वंदन करून चारुदत्ताला म्हणाला, बंधो ! 'माझ्या वडलांना जीवदान देणारे आपण चारुदत्तच ना ?' चारुदत्तानें आपली ओळख दिली. तेव्हां सिंहयश त्याला कडकडून भेटला. तेथेंच मुनी सानिध्यांत अवांतर गोष्टी करीत बसले. इतक्यांत वराक्ष नांवाचा देव विमानांत बसून मुनींना वंदन करण्यासाठीं तेथें आला. देवानें प्रथम चारुदत्ताला नमस्कार करून मुनीवंदना केली व चारुदत्ताजवळ जाऊन बसला. सिंहयशाला वाईट वाटलें. तो देवाला उद्देशून म्हणाला, 'देवा ! आपल्या देवलोकीं प्रथम मुनींना नमस्कार न करतां श्रावकाला करावा असा प्रघात आहे काय ?' देव उत्तरले विद्याधरा ! तसा प्रघात कोठेंच नाहीं. पण याचें कारण निराळें आहे. तें तुला सांगतों ऐक ! आपल्या सर्वज्ञ वीतराग देवांशिवाय दुसरा देव नाहीं. त्या देवांशिवाय इतरांना आम्हीं वंदनाहि करीत नाहीं; परंतु मी पूर्वजन्मीं श्रोत्रिक ब्राह्मण यज्ञमख

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करणारा होतों पण मरणसमयीं मला चारुदत्तानें कानांत जिन-धर्मामृत पाजल्यानें मी मरून देव झालों म्हणून ते मला सद्गति देणारे प्रथम गुरू होत.

देवाची कथा ऐकून सिंहयशानें पुन्हां विचारलें, 'देवा! आपण म्हणतां कीं, वेदाच्या अकृत्रिम विधींना वंचित झालों. चारुदत्तानीं धर्म शिकविला तो कसा? ही हकिकत सांगण्याची कृपा करावी.'

देव आपली पूर्वजन्मींची कथा सांगूं लागले.

"काशी देशांतील वाराणसी नगरींत सोमशर्मा ब्राह्मण आपल्या सोमिल्ला भार्येसह राहत असे. त्याला दोन अति सुंदर कन्या होत्या. त्यांचीं नांवें भद्रा व सुलसा होतीं. भद्रा थोरली. त्या दोघीहि मुलींनीं वेदशास्त्राचें अध्ययन करून त्यांत प्राविण्य मिळविलें. त्यांनीं आपल्या पांडित्यामुळें पुष्कळशा विद्वान् पंडीतांना वादांत जिकलें. एकदां सुलसेनें असें जाहीर केलें कीं, जो कोणी मला वादांत परास्त करील, त्याला मी आनंदानें माळ घालीन. तेव्हां एक याज्ञ-वल्क्य वादासाठीं तिच्याकडे आला. त्यांचा वाद झाला. शेवटीं सुलसा वादांत हरली. प्रतिज्ञेप्रमाणें सुलसेनें त्याच्या गळ्यांत माळ घातली.

लग्नानंतर तें दांपत्य वाराणसीजवळच्या अरण्यांत एका आश्र-मांत राहूं लागलें. कांहीं वर्षें फारच सुखानें लोटलीं. सुलसेला गर्भ राहिला. नऊ मास पूर्ण होतांच तिनें एका मुलास जन्म दिला. जन्म-तांच तें मूल तिनें पिंपळाच्या झाडाखालीं आणून ठेवलें. ही गोष्ट भद्रेला कळली. तिनें त्या मुलाला घरीं आणलें. पिंपळाच्या झाडा-खालीं तो राहिला म्हणून त्याचें नांव पिपलाद ठेवण्यांत आलें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पिपलाद दिवसेंदिवस वाढूं लागला. त्याला भद्रेनें उत्तम शिक्षण देऊन वेदशास्त्रांत प्रविण बनविलें. तो आपल्या विद्वत्तेमुळें, गुणांमुळे, सर्व विद्वज्जनांचा आवडता बनला. एकदां त्यानें भद्रेस विचारलें ' अंब ! माझे मातापिता कोण ! आणि कोठें आहेत ?' भद्रेनें सांगितलेली सर्व हाकिकत ऐकून पिप्पलादाला आईबापांचा राग आला. त्यानें त्यानां वादांत जिंकण्याचें ठरविलें व तो वादविवादासाठीं त्यांचेकडे गेला. पितापुत्राचा वाद सुरूं झाला. मुलगा बापाच्या सवाई ठरला. त्यानें याज्ञवल्क्याला अगदीं सहजासहजीं वादांत जिंकलें. तेव्हां याज्ञवल्क्यानें मुलाबद्दल प्रेम व्यक्त केलें. पण पिप्पलादाच्या मनांतला द्वेष कमी होईना. त्यानें आईबापांचा वध करण्यासाठीं पितृमातृमख केला. त्या यज्ञांत त्यानां होमून टाकलें. त्या पिप्पलादाचा शिष्य वाग्वली नांवाचा होता. वेदविद्याविशारद, कलासंपन्न होता. ' तोच मी ! मला लोक मान देत. पण माझ्या पूर्वीच्या दुष्कर्मांनीं उचल खाल्ली. मी सर्व जाणत असूनहि मला मंद भाग्याला विपरीत आठवलें. मी महानुभावी वेदाच्या खऱ्या शिकवण्या बाजूला ठेवून गुरू तसा शिष्य बनलों. यज्ञांतच खरा धर्म आहे. असें प्रतिपादूं लागलों. एवढेंच नव्हें तर मोठमोठे हिंसक यज्ञ करण्यास आरंभ केला. तशी संमति देऊं लागलों. त्यामुळें हे खेटा ! मला नरकाचें दुःख प्राप्त झालें. नरकांतील नानाप्रकारचें दुःख भोगून मी अशुभकर्मामुळें बोकड बनलों. मी मोठा धष्टपुष्ट होतों. तेव्हां सोमशर्मा ब्राह्मणानें मला उत्तम प्रकारें समजवून पुष्पांच्या माळा घातल्या. व यज्ञांत बळी देण्यासाठीं चालविलें. यज्ञाला पाहतांच मला जातिस्मरण झालें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

माझें अंग मरणाच्या भीतीनें सारखें कांपूं लागलें. तेव्हां मी ओरडून ब्राह्मणांस म्हणालों ब्राह्मणा ! मला स्वर्ग सुखाची इच्छा नाहीं. तें मिळावें म्हणून मी तुला प्रार्थनाहि केलेली नाहीं. मी माझ्या तृण-भक्षणावरच संतुष्ट आहें. तुला स्वर्गाला जावें असें वाटत असेल तर तुझ्या आईबाप, मुलांना यज्ञांत कां होमीत नाहींस ? गरीब मुक्याप्राण्यांचा बळी घेतल्यानें कां स्वर्गप्राप्ति होणार आहे ?" तेव्हां सोमशर्मा मला—बोकडाला—उद्देशून पुढील ऋचा म्हणूं लागला. माता, पिता, भ्राता, मुलगा ह्या सर्व बंधुवर्गांना तूं स्वर्गाला घेऊन जाशील तरीः—

" आप्यायतां मनस्तैलं वक्रमाण्यायतां तव ।
स्पर्शमाप्याय तां तेत्र जिव्हामाप्यायतां तव ॥
चक्षुराप्यायतां नेत्र श्रोत्रमाप्यायतां तव ।
येत क्रोडं स्थितं साधु ब्रूते चाप्यायतां पशोः ॥

ही ऋचा म्हणून माझा बळी घेतला. पुढें मी प्रत्येक वेळीं मरून बोकड होऊं लागलों व यज्ञाला बळीं पडूं लागलों. याप्रमाणें मी सहा जन्म घेतले. सातव्या वेळीं टंकण देशांत बोकड होऊन जन्मलों. नंतर चारुदत्तानें समुद्रदत्ताच्या हातून मला मरण येत असतांना कानांत पंचनमस्कारमंत्राचा उच्चार केला. धर्माचें स्वरूप सांगितलें. त्या मंत्राच्या स्मरणानें मी मरून स्वर्गाचा देव झालों. तेव्हां अवधि-ज्ञानानें मी आपल्या गुरूला जाणून त्याच्या वंदनेसाठीं येथें आलों आणि म्हणूनच मी या माझ्या गुरूला प्रथम वंदन केलें. "

एवढें बोलून देव चारुदत्ताकडे वळला व म्हणाला, गुरुवर्या ! मी आपणांवर प्रसन्न झालों आहें. आपणांला पाहिजे तो वर मागून घ्या !

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मी देण्यास तयार आहे. चारुदत्त उत्तरला, देवा! तुझा वर तूर्त तुज-जवळच राहूं दे. मला लागेल त्यावेळीं मागून घेईन. तेव्हां देव पुन्हां सर्वांना वंदन करून स्वर्गलोकीं निघून गेला.

विद्याधर व चारुदत्त मुनींना वंदन करून विद्याधर नगरीस आले. चारुदत्त सिंहदत्ताच्या येथें आपला काळ सुखानें व्यतीत करूं लागला. एके दिवशीं विजयसेनेनें आपल्या दोन मुलांना व गंधर्वसेनेला बोलावून महालांत आणलें. चारुदत्तहि जवळ होता. त्यांना पाहून विजयसेना म्हणाली, " पूर्वीं पतिरायांनीं अवधिज्ञानी चारणमुनींना विचारलें होतें कीं, 'माझी मुलगी गंधर्वसेना हिला कोण वरील ?' त्यावेळीं साधूनीं सांगितलें कीं, "चारुदत्ताचें घरीं राहत असतां हिला एक चक्रवर्ती माळ घालील." आतां वेळ आली आहे. चारुदत्तहि समक्ष आहेत. तेव्हां त्यांनीं या गोष्टीला रुकार द्यावा. चारुदत्तानें संमति दिली. सर्वांना आनंद झाला. नंतर सिंहयशानें एक सुंदर, ताऱ्याप्रमाणें तेजस्वी, चंद्रकांतमण्यासारखें शुभ्र, रत्नमणिमयजडित विमान तयार करविलें. त्यांत पुष्कळशीं मौल्यवान रत्नें, सुवर्ण, मोतीं, प्रवाळ, वगैरे संपत्ति लादली व आपल्या चतुरंग सैन्यासह तो चारुदत्त व गंधर्वसेना यांना घेऊन चंपापुरीस आला.

चंपापुरीस आल्यानंतर भूपाल वगैरे जनांच्या समक्ष एका दिव्य सिंहासनावर बसवून, चारुदत्ताची विद्याधरानें पूजा केली. नंतर त्याला आणलेलें सर्व धन दिलें. विद्याधरांकडून त्याचा झालेला सन्मान पाहून लोकांनाहि त्याच्याबद्दल आदर वाटूं लागला. विद्याधर निघून गेला. नंतर चारुदत्त आपल्या मित्रवति भार्येसह सुखानें नांदूं लागला.

एकदां देवांशीं युद्ध करून वसुदेव पृथ्वीवर येऊन सुग्रीव प्रधा-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाच्या घरीं त्याचें शिष्यत्व पत्करून राहिला. एकदां तो फिरत फिरत चारूदत्ताच्या घरीं आला. तेथें गंधर्वसेनेला त्यानें वीणावादनांत जिंकलें. तेव्हां चारुदत्तानें वसुदेवाला गंधर्वसेना अर्पण केली. विवाहाच्या वेळीं गोत्राची अडचण उपस्थित झाली. वसुदेवाला उपाध्यायानें विचारलें, राजन् ! आपलें गोत्र काय? याचें गोत्र काय ? आणि हें कळल्याशिवाय मी लग्नविधि करूं तर लोक मला काय म्हणतील ! ही कोण कोठची कन्या ? गंधर्वसेना कुणाची ? तेव्हां आपण गोत्र सांगा म्हणजे जमेल. वसुदेवाला कांहीं माहित नव्हतेंच. त्यानें पुरोहिताला सांगितलें, तुला जें योग्य वाटेल त्या विधीनें होम कर ! तेव्हां उपाध्यायानें जलविधानानें होम केला. ही गोष्ट चारुदत्तास समजली. त्यानें वसुदेवांस सर्व समजावून सांगितलें. ही खेचरकन्या आहे असें समजतांच सर्वांना आनंद झाला. वसुदेव तिच्याशीं आपला काळ सुखानें घालवूं लागला.

कांहीं दिवस सुखानें संसार करून, चारुदत्तानें संसाराचा त्याग करून दिगंबरदीक्षा ग्रहण केली व तपश्चरण करून तो स्वर्गाला गेला.

कथा ८७ वी.

मुनी शंकर.

अत्यंत प्राचीन काळची गोष्ट ! वत्सकावती देशांतील कौशांबी नगरींत एक मुनी फिरत फिरत आले. त्यांचें नांव शंकर होतें. मुनीचे सर्व दांत पडल्यामुळें, त्याचा चेहरा भेसूर दिसे. त्यांतून प्रवासाच्या श्रमानें ते अगदीं थकून गेले होते. राजरस्त्यांनीं भिक्षेसाठीं फिरत असतांना एका पडक्या घरांत शिरले.

मुनींना आपल्या घरांत शिरलेलें पाहतांच घरधनीण शेजारच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घरांतून लगबगीनें आली. ती वृद्ध असून तिचें नांव जयंती होतें. मुनींनां तिनें शिळें अन्न वाढलें. आहारोत्तर मुनी पडवींत येऊन बसले. जयंतीहि शेजारींच थोडी अंतरावर बसली व महाराजांना नम्रपणें म्हणाली, 'आपली शरीरप्रकृति इतकी दुबळी कशानें झाली आहे ?' मुनी म्हणाले, 'ऐक माझी कहाणी. याच गांवचा मी राहणारा. माझे वडील सोमशर्मा. ते अति विद्वान्, वेदविद्यापारंगत होते. माझी माता काश्यपी. तिच्या पोटीं मी जन्म घेतला. माझें नांव सागर होतें. मीहि पुष्कळसें अध्ययन करून सर्व शास्त्रांचें ज्ञान प्राप्त करून घेतलें. पुढें माझा एका स्त्रीशीं विवाह झाला. पण त्या स्त्रीवर माझें मुळींच प्रेम नव्हतें. म्हणून पुन्हां रोहिणी नांवाच्या ब्राह्मण स्त्रीशीं लग्न केलें. कांहीं काळ सुखांत गेला. पुढें ती प्रिया मरण पावली. तिच्या विरहानें मी संसाराला वैतागलों. पुढें अगदीं कंटाळून दीक्षा घेतली. दीक्षेनंतर मी गांव (ज्याला मोठ्या चार भिंती असतात तें.) नगर, (तट, गोपूर असतें तें.) खेट, (नदी, पर्वतांनीं वेष्टित गांव.) कर्कट, (पर्वतानें वेष्टिलेलें) मंटव, (५०० गांवांचें) पत्तन, (रत्नमय सिंधु—समावृत.) द्रोण, (पर्वतावरील गांव.) वगैरे ठिकाणीं फिरत फिरत आतां कौशंबीला परत आलों आहें.'

आपला वृत्तांत सांगून मुनींनीं विचारलें, 'बये ! तुझी अशी स्थिति कशानें बरें झाली ?' ती सांगू लागली. 'मी येथलीच राहणारी ! माझे पिता सोमशर्मा. माता सोमिल्ला. मी त्यांची मुलगी जयंती होय. मला माझ्या रूपाचा मोठा गर्व होता. पुढें माझें शंकर नांवाच्या ब्राह्मणांशीं लग्न झालें. पण तो लवकर मृत्युमुखीं पडला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्याच्या मागें मी आपली कामधंदा करून आपलें आयुष्य कंठीत आहें. ही माझी हकिकत.'

तिची हकिकत ऐकून मुनी दुःखित अंतःकरणानें म्हणाले, 'जयंति ! तूं व मी लहानपणीं एकाच ठिकाणीं अध्ययन करीत होतों हें तूं विसरलीस वाटतें. आपलें एकमेकांवर अत्यंत प्रेम होतें.' यावर जयंति उत्तरली, 'मला सर्व आठवतें.' मुनी व्रतापासून चलायमान झाले. जयंतीहि प्रेमांत सांपडली. त्यांनीं तें गांव सोडून पाटलिपुत्राचा मार्ग स्वीकारला. तेथें गंगेच्या कांठीं एक झोंपडी बांधून राहिले. लांकडाचे भारे आणून गांवांत विकून ते आपली उपजीविका करीत व आपला काळ क्रीडा करण्यांत घालवूं लागले. स्त्रीसंसर्गानें मुनी देखील आपल्या चारित्र्यापासून भ्रष्ट होतात. तेव्हां सहसा स्त्रीचा संसर्ग घडूं देऊं नये. घडल्यास संसारचक्रांत सांपडावें लागतें.

कथा ८८ वी.

" राजा कूपकार "

मेदिका देशांतील पाटलिपुत्रांत राजा अशोक आपल्या अशोका राणीसह राज्य करीत होता. त्यावेळची ही गोष्ट ! राजपुत्राचें नांव कूपकार होतें. कूपकार अत्यंत बलाढ्य, रणशूर होता. त्यानें आपली तरवार रणांत गाजवून आसमंतांतील राज्यांवर आपलें प्रभुत्व जमविलें होतें.

एकदां विहार करीत करीत वरधर्म गणधर त्या पाटलिपुत्रास आले व राजोद्यानांत उतरले. ही वार्ता वनपाळानें राजास कळविली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कूपकार आपल्या प्रजाजनांसह त्यांचे दर्शनार्थ आला. कूपकार स्वभावानें दुष्ट, क्रूर होता. पण मुनीमुखांतून निघणारे धर्मामृताचें पान करून त्याला वैराग्य उत्पन्न झालें. त्यानें मुनीजवळ दिगंबरी-दीक्षा घेतली. तप करूं लागला.

सहज तो एके दिवशीं आपलें प्रतिबिंब पाण्यांत न्याहाळून पाहात होता. गणाधिपाचें लक्ष्य तिकडे गेलें. ते विनोदानें म्हणाले, ' अजूनहि आपणांला स्त्रियांना लोभवावयाचें आहे वाटतें ? कूपकार मुनी मनांत वरमले. त्यांना राग आला व रागाच्या भरांत म्हणाले, आपणांला मी स्त्रियांमुळें पदभ्रष्ट होऊन गेलों असें वाटतें तर मी आतां अशी प्रतिज्ञा करतों कीं, ज्या ठिकाणीं स्त्रियांचा संपर्क कधीं-हि होणार नाहीं असल्या एकांत निर्जन वनांत मी जाऊन आपलें तपश्चरण करतों.' प्रतिज्ञेनंतर मुनीची ते आज्ञा घेऊन अभ्रमंदीर पर्वतावर आले. तेथें आपल्या कर्मविनाशासाठीं नानाप्रकारचें तप-श्चरण करून भयंकर कायक्लेश सहन करूं लागले. कूपकाराच्या या वैराग्याची वार्ता आसपासच्या राजे लोकांना समजली. त्यानीं पुन्हां डोकें वर केलें व पाटलिपुत्रास येऊन वेढा दिला. अशोक राजा जोरदार नव्हता. सारी प्रजा मोठ्या काळजींत पडली. राजा किंक-र्तव्यमूढ बनला. तो सर्व सभासदांना म्हणाला, ' कूपकाराशिवाय कांहीं जमणार नाहीं. त्याच्या अभावीं हीं संकटें उभी झालीं आहेत.' राजाचे बोल ऐकून वीरमति गणिका म्हणाली, ' राजा ! आपण असे हातपाय कां गाळतां ? धीर धरा. मी कूपकाराला आपणांकडे घेऊन येतें. आपली आज्ञा असावी.' राजाला आनंद झाला. त्यानें तिला परवानगी दिली. नंतर गणिकेनें आपल्या इतर मैत्रिणी बरोबर घेतल्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व ती अग्रपर्वताच्या पायथ्याशीं येऊन राहिली. सर्वांनीं अर्जिकेचीं रूपें घेतलीं. वीरमतीशिवाय बाकीच्या सर्वजणीं पर्वतावर मुनीदर्शनास गेल्या. मुनींचें दर्शन घेऊन निघतांना त्या म्हणाल्या, मुनिराज ! एक वृद्ध अर्जिका आपल्या दर्शनासाठीं आली आहे. पर्वतावर चढणें तिच्या शक्तीच्या बाहेर झालें आहे. म्हणून ती पायथ्याशीं आपलें ध्यान करीत बसली आहे. तरी आपण तिला आपलें दर्शन द्यावें.

मुनी त्या भाषणावरून खालीं आले. वीरमती रूपवान होती. त्यांत बोलूनचालून गणिका. तिचें हावभावात्मक रूप पाहतांच मुनींचें मन चलायमान झालें. ते चारित्र्यापासून भ्रष्ट बनले. वीरमतीच्या जाळ्यांत सांपडले. मदनानें त्यांची अवस्था माशासारखी केली. वीरमती त्यांना घेऊन आपल्या सर्व स्त्रियांसह पाटलिपुत्रास आली. कूपकार आल्याची वार्ता ऐकून राजाला आनंद झाला. अशोकानें प्रत्यंतवासी शत्रूंनीं दिलेल्या वेढ्याची हकिकत निवेदन केली. कूपकाराला त्वेष चढला. त्यानें त्यांच्यावर चढाई करून कित्येकांना आपल्या तरवारीनें तर कित्येकांना आपल्या मुद्गलानें यमसदनास पाठविलें व राज्यावरील संकट दूर केलें. पण कूपकार रत्नत्रयरूपी रत्नाला एका स्त्रीच्या नेत्रकटाक्षानें कायमचें गमावून बसला. तेव्हां मुनींनीं सहसा स्त्रीसाम्राज्यांत सांपडूं नये.

कथा ८९ वी.

‘ भग्नपाराशर ’

कुरुजांगल देशांतील हस्तिनागपुरांत शस्त्रशास्त्रविशारद राजा सगर राज्य करीत होता. त्याचवेळीं जयंती नगरींत राजा विश्वसेन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आपल्या प्रेमळ, सुंदर विश्वसेना राणीसह राज्य करीत असे. त्यांना तपोधि नांवाची एक अत्यंत सुंदर कन्यका होती. तिचा वाङ्गनिश्चय सगर राजाशीं झाला. त्यावेळीं सगरास सांगण्यांत आलें होतें कीं, मुलगी ऋतुस्नात असतांना आपण कोठेंहि जाऊं नये, आणि कोठें दूर देशीं असल्यास परत यावें; आणि हें आपणांला मान्य असेल तरच मी आपली मुलगी आपणांला देतों. सगरानें ही अट मान्य केली. तेव्हां त्याचें मोठ्या थाटामाटानें लग्न झालें.

लग्नोत्तर तो तिच्या ऋतुप्राप्तीची आनंदानें वाट पाहूं लागला. कांहीं दिवस असेच निघून गेले. इंद्राच्या सभेंत ब्रह्मा, विष्णु, वगैरे देव, रुद्र, ब्राह्मण कांहीं कामासाठीं जमले होते. त्यावेळीं संवरास देखील आमंत्रण होतें. तो आपल्या प्रियेस सांगून गेला व ऋतु प्राप्त झाल्यास तात्काळ परत येईन, असें जातांना तिला वचन दिलें.

इकडे सगर स्वर्गास गेल्यानंतर ती ऋतुस्नात झाली. स्नान करून ती आपल्या पतीची वाट पाहत बसली. ते लवकर परत येत नाहींत असें पाहून तिनें इंद्राच्या सभेंत निरोप पाठविला. पण सगराला वेळ होता. तो कामांत गुंतला होता. त्यानें परत निरोप पाठविला कीं, प्रिये, रागाऊं नकोस ! मी महत्त्वाच्या कामांत गुंतलों आहें; कारण आदित्याच्या रूपानें वेडा होऊन सौधर्मेंद्रानें गौतमाच्या वेषांत तिच्याशीं समागम केला. गौतमानें रागावून तुझ्या शरीराला हजारों भोकें पडतील असा शाप दिला. त्यामुळें त्याच्या शरीरावर मोठमोठीं हजारों छिद्रें पडलीं. त्या भयानें तो स्वर्गांतून पळून गेला. त्याला शोधण्यासाठीं सर्व लोक येथें जमले आहेत. तरीपण वेळ

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मिळतांच मी तुझ्या सेवेंत हजर होतों, असा परत निरोप धाडला.

दूतानें येऊन सगराचा निरोप सांगितला. तो ऐकून ती स्वस्थ बसली. नंतर एका चिठ्ठीवर—मला ऋतु प्राप्त झाला आहे. मी आपली चातकासारखी वाट पाहात आहें. तरी नाथ ! येण्याचें करावें. कामामुळें वेळ नसल्यास आपलें शुक्र या द्रोणांत भरून पाठवावें, हा मजकूर लिहून ती चिठ्ठी पोपटाच्या गळ्यांत बांधली व त्याला सोडून दिलें. तो पोपट उडत उडत येऊन स्वर्गांत दाखल झाला. संवरानें ती चिठ्ठी वाचून पाहिली व त्या द्रोणांत आपलें शुक्र भरून तो द्रोण पोपटाच्या गळ्यांत बांधला. तो तेथून उडाला. रस्त्यांत गंगेवर स्येनपक्षानें त्याचेवर झडप घातली. त्या झटापटींत तो द्रोण उपडा झाला. त्यांतील सगळें शुक्र मंदाकिनीच्या अथांग जळांत पडलें. काकतालिय न्यायानें तें एका सुसरीच्या मुखांत पडलें. शुक्र पोटांत जातांच एक दिव्य रूपधारी कन्येनें तिच्या गर्भांत येऊन वास केला.

पुढें एका धीवरानें नदींत जाळें टाकलें. त्याचें नांव गंग. त्याची भार्या गंगदत्ता अत्यंत प्रेमळ व आवडती होती. त्या धीवराच्या जाळ्यांत ती सुसर अडकली. सुसर घेऊन तो घरीं आला. तिचें पोट कापीत असतां आंतून एक दिव्य नागकन्या बाहेर आली. त्यानें तिचें नांव सत्यवति ठेवलें. ती गुणानें, रूपानें अति सुंदर होती. एकदां तिला बरोबर गंगानें घेतलें व तो गंगेवर बांध बांधण्यासाठीं गेला व तेथेंच तिला सोडून तो परत घरीं गेला. तिकडून पराशर-योगी येत होते. त्यांच्या डोईवर जटाभार होता. हातांत कमंडलु, पायांत खडावा, काखेला दर्भासन होतें. त्यांच्या एकंदर चर्येवरून ते

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बऱ्याच लांबच्या प्रवासाहून आल्याचें दिसत होतें. सत्यवतीजवळ येऊन पाराशर मुनी म्हणाले, ‘भार्ये ! मला पैलतीराला जावयाचें आहे. तरी एक नाव घेऊन ये आणि शक्य तितक्या लवकर पोंहोंचीव.’ नंतर ती नाव घेऊन आली. नावेंत प्रथम तपस्वी बसले. नंतर सत्यवति त्यावर चढली. नाव चालूं लागली. मधून मधून ते चोरट्या नजरेनें एकमेकांकडे पाहात. तिचें रूप व शरीरसौष्ठव पाहून पराशराचें मन कामविव्हल झालें. तो सत्यवतीस म्हणाला, ‘भद्रे ! तुला पाहून माझ्या ब्रह्मचर्याचा भंग झाला. आतां तुझ्यावांचून जगणें मला शक्य नाहीं. तुझ्यावर माझें प्रेम जडलें आहे. आतां मी तुझ्या चरणाची सेवा करीत राहीन. तरी तूं माझा स्वीकार कर’ सत्यवति उत्तरली, ‘मुनि-वर्या ! आपण उच्चकुलीन आहांत, विद्वान् आहांत. मी जातीनें धीवर नीच कुलोत्पन्न असून माझ्या शरीराची दुर्गंधी येते. त्यांतून मला लोकांनीं टाकलेली. मला कोणत्याच प्रकारचे संस्कार अवगत नाहींत. मला घर ना दार ! सध्यां ह्या नदीतटावर मी एकटी राहतें आहें. तेव्हां तुमचा माझा संबंध कसा जडावा ? ’ यावर पाराशर म्हणाले, ‘सत्यवति ! तूं तसें बोलूं नकोस ! तुझ्या या बोलण्यानें माझ्या हृदयाला घरें पडतात. तुझ्या शरीराचा वास येतो–हरकत नाहीं. माझ्या विद्येच्या सामर्थ्यानें एका क्षणांत तुझें शरीर सुगंधित बनवितों. त्यामुळें या तुझ्या शरीराचा सुवास एक मैलभर पसरेल. लोक तुला योजनगंधा म्हणून संबोधतील ! हा पहा चमत्कार ! ’ असें म्हणतांच तिचें शरीर स्वर्गीय देवांगनेसारखें तेजस्वी, सुगंधित झालें. योजनगंधा मुनीच्या प्रेमाला बळी पडली. ती म्हणाली, ‘नाथा! आपणांस येथें कोणीतरी पाहील. तेव्हां दूर चलावें. तेव्हां पाराशरानें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आपल्या विद्येनें सर्वत्र धुकें उत्पन्न केलें. जिकडे तिकडे दाट धुकें पसरलें. पण तिचें हृदय धडधडतच होतें. ती म्हणाली, ' पण या नदींत नको. पाण्यांत नाव हालते. कोठें तरी गांवांत जाऊन राहूं. ' पाराशरानें एक नगरी उत्पन्न केली व त्यांत ते रममाण झाले. काम-लोलुप जीव काय करणार नाहीं? तो सर्व कांहीं करील. गांधर्व विवाहानें तिच्याशीं लग्न लावलें. आपला काळ तिच्या सहवासांत नानाप्रकारचे सुखोपभोग भोगण्यांत घालवूं लागला. पुढें सत्यवतीला गर्भ राहिला. पूर्ण दिवस भरतांच तिनें एका दिव्य मुलाला जन्म दिला. त्याचें नांव व्यास ठेवण्यांत आलें व पुढें मुलगा बापासह तिला सोडून जाऊं लागला. तिनें मुलाला आपणांजवळ राहण्यास पुष्कळ विनविलें. पण तो हस्तिनापुरास निघून गेला. पाराशरानें तिला तूं अक्षतयोनिका राहशील असा वर दिला. तेव्हांपासून योजनगंधा आपल्या कुलधर्माचें पालन करीत धीवराचें घरीं राहूं लागली.

धीवराकडे राहत असतां भीष्मानें शांतनुसाठीं तिची मागणी घातली. शांतनुपासून तिला चित्र, विचित्राचित्र व चित्रांगद हे तीन मुलगे झाले. त्यांच्या स्त्रिया अंबा, अंबिका, अंबालिका या क्रमान होत. ते तिघे राजपुत्र दक्षिणेकडील अरण्यांत हत्तीस पकडण्यास गेले असतां हत्तीनें त्यांना मारून टाकलें. तेव्हां त्यांच्या स्त्रियांच्या पोटीं संतति होण्यासाठीं व्यासांना विनंति करण्यांत आली. व्यासांच्या सह-वासानें अंबेच्या पोटीं पांडु, अंबिकेच्या पोटीं धृतराष्ट्र व अंबा-लिकेच्या पोटीं विदूर जन्माला आले. ह्या व्यासपुत्रांच्या पोटीं पांडव-कौरवांची उत्पत्ति झाली व ते जगप्रसिद्ध बनले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा ९० वी.

रुद्र.

विख्यात जंबुद्वीपांतील धनधान्यसंपन्न, भरतक्षेत्राच्या दक्षिणेला विजयार्द्ध नांवाचा पर्वत होता. त्याचेवर किन्नरगीत नांवाची नगरी होती. त्या नगरींत राजा विद्याधर मूणिचूल आपल्या मनोहरी विद्याधरीसह राज्य करीत होता. त्यांचा मुलगा रुद्रदत्त. अत्यंत सुंदर, नानाविद्याकोविद होता.

एकदां रुद्रमाला सहज विहार करीत असतां एक विद्याधरकन्या त्याचे दृष्टीस पडली. तिचें नांव अर्चिमालिनी होतें. ती एका विद्येचें साधन करीत होती. तिच्या रूपानें रुद्रदत्ताला वेड लावलें. तो भ्रमराप्रमाणें तिच्याभोंवतीं सहा महिने घिरट्या घालीत राहिला. यामुळें तिच्या विद्यासाधनांत विघ्न येऊं लागलें. तेव्हां ती खेचरास म्हणाली, ‘ आपण माझ्या विद्याराधनेंत कां बरें विघ्नें आणतां ? ’ रुद्रमालीला कांहीं उत्तरें देतां येईनात. त्याची मनःस्थिति जाणूनच विद्याधरी उत्तरली, “ आपला मनोभाव मी ओळखला. पण मला ही एवढी विद्या साध्य करून घेऊं द्या. नंतर मी आपलीच आहें. ” रुद्रमालीला अत्यानंद झाला. त्यानें आनंदाच्या भरांत विचारलें, “ प्रिये तूं कोण आहेस ? हें मला कळेल कां ? ” “ विजयार्द्ध पर्वताच्या उत्तरश्रेणीवरील गलंधपचन नगरीचे राजे महेश्वर माझे पिताश्री आहेत. माझ्या मातेचें नांव प्रभाकरी. ती मोठी गुणी, प्रेमळ आहे. त्यांची मी मुलगी अर्चिमालिनी. ” ही आपली हाकिकत सांगून विद्याधरीनेंहि रुद्रमालीचा वृत्तांत जाणून घेतला. नंतर ते आपापल्या नगरीस निघून गेले. आपल्या मातापित्यांना त्यानीं घडलेली

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सर्व हकिकत सांगितली. त्यांनाहि आनंद वाटला. पुढें कांहीं दिव-सांनीं त्या दोघांचें मोठ्या महोत्सवांत लग्न लागलें. लग्नोत्तर आपला काळ नानाप्रकारच्या सुखोपभोगांत घालवूं लागले. पुढें त्या दोघांनीं प्रज्ञाप्तिविद्या साध्य करून घेतली. ती साध्य झाल्यामुळें त्यांनीं मोठ्या भक्तिभावानें अष्ट द्रव्यानें चैत्यालयांत जाऊन पूजा केली. पूजनोत्तर मंदिरांत प्रदाक्षिणा घालीत होते. तोंच तिकडून एक कामुक विद्याधर जोडपें क्रीडा करण्यासाठीं येत होतें. आपल्या क्रीडेंत हें विघ्न येत असून त्या विद्याधर जोडप्यांना आपल्या महा-ज़ालविद्येच्या सामर्थ्यानें त्यांनीं जखडून टाकलें व ते आपल्या नगरीस निघून गेले.

कांहीं वेळानें रुद्रमाली व अर्चिमालिनी शुद्धीवर आले. त्यांनीं तो बंध आपल्या प्रज्ञप्तिविद्येनें तोडला व ते स्वगृहीं परतले. या अपमानाचा परिणाम रुद्रमालीचे मनावर अतिशय झाला. तो संसार-विरक्त बनला. त्यानें आपल्या मुलास राज्यकारभार सोंपवून समाधि-गुप्तमुनीजवळ सर्व परिग्रहाचा त्याग करून संसारार्णवतारिणी दिगंबर जैनदीक्षा घेतली. अर्चिमालिनीनें पतीचेंच अनुकरण केलें. तिनेंहि सुव्रतमुनीजवळून दीक्षा घेतली. दोघेहि सम्यक् तपश्चरण करून मरण पावले. मरून सौधर्मस्वर्गांत देव देवी होऊन जन्मले.

उत्तर प्रांतांतील गंधक देशांत माहिष्मति नांवाची नगरी होती. त्या नगरीचा राजा सत्यतनय मोठा विद्वान्, संपन्न होता. त्याची भार्या महादेवी स्वभावानें मोठी गोड व रूपानें सुंदर होती. या दांपत्याच्या पोटीं रुद्रमालीचा जीव सौधर्मस्वर्गांतून च्यवून सत्यकी नांवानें जन्मला. वैताली नगरीचा राजा चेटक. त्याची भार्या सुभद्रा. भद्रपरिणामी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गुणी, लोकाभिरामी होती. हिला प्रियकारिनी, सुप्रभा, प्रभावती, सिप्रा, सुजेष्टा, चेलना व चंदना या सात मुली होत्या. सर्वच मुली सुंदर व गुणी होत्या. ह्यांपैकीं पांचवी कन्या सुजेष्टा. ही पूर्वीची अर्चिमालिनी देवी होय. चटकानें सत्यकाशीं सुजेष्टेचा विवाह (वाङ्‌-निश्चय) केला.

अभयकुमारानें श्रेणिकाच्या केलेल्या गुणवर्णनानें चेलनेसह सु-जेष्टाहि राजगृही नगरीस जाण्यास निघाली. पण चेलनेला हें विघ्न आपल्या मार्गांत नको होतें. निघेपर्यंत तिला स्पष्ट सांगण्याचें धैर्य होईना. निघतांना एक युक्ति लढविली. ऐन निघण्याच्या वेळीं ती सुजेष्टेला म्हणाली, “ जा ! झटकन् माझ्या महालांत जा ! व माझा रत्नहार तेथेंच विसरला आहे; तो घेऊन ये. तोंपर्यंत आम्हीं तुझी वाट पाहत बसतों.” ती बिचारी सरळपणें गेली. चेलनेच्या महालांत रत्नहार सांपडण्यास बराच वेळ लागला. शेवटीं तो घेऊन ती संकेत-स्थळीं गेली. तेथें पाहतें तों चेलना व अभयकुमार भूयारमार्गानें केव्हांच निघून गेलेले दिसले. त्यांचा तिनें बराच शोध केला. पण ते केव्हांच पसार झाले असल्यामुळें सांपडले नाहींत. तिला बहिणी-च्या वागणुकीचें अत्यंत वाईट वाटलें. ती अपमानानें अर्धमेली बनली. तिला संसाराचा वीट आला. त्या भरांत ती घरीं परत न जातां परस्पर यशोमति अर्जिकेकडे गेली. ही आर्जिका चेटकाची बहिण होय. सुजेष्टेनें यशोमतीजवळून आर्यिकेची दीक्षा घेतली. ही गोष्ट सत्यकीला समजली. त्यानेंहि समाधिगुप्तमुनीजवळ जाऊन दीक्षा घेतली.

राजगृहीच्या उत्तरेला गोकर्ण पर्वत होता. त्याचेवर सत्यकी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आपलें घोर तपश्चरण करीत होते. एकदां आर्जिकांचा समूह त्यांच्या दर्शनार्थ आला. त्यांना भक्तिपुरःस्सर वंदना करून तो संघ पर्वताच्या खालीं उतरला. तोंच एकाएकीं जोराचा वर्षाव सुरूं झाला. पावसाच्या माऱ्याला भिऊन सुजेष्टा एका गुहेंत शिरली. सत्यकीही तेथेंच पावसामुळें आला. सुजेष्टेला एकटीच पाहून त्याच्या मनोविकारानें पुन्हां उचल खाल्ली. तो आपल्या व्रतापासून चलायमान झाला. सुजेष्टेचीही जवळ जवळ तीच अवस्था बनली. मदनातुर बनल्यामुळें त्यांनीं एकमेकांशीं संग केला. पण सत्यकीला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप वाटला. त्यानें गुरूला आपली हकिकत सांगितली व प्रायश्चित्त मागितलें. गुरूनें त्यास प्रायश्चित्त सांगून पुन्हां मुनीदीक्षा घेतली.

इकडे सुजेष्टेनें यशोमतीकडे येऊन आपली. हकिकत सांगितली. तिनें तिला बराच उपदेश करून शांत केलें. चेलनेला ही सारी हकिकत सांगून, सुजेष्टेला चेलनेच्या घरीं ठेवलें. नऊमास पुरे झाल्यानंतर सुजेष्टेनें एका दिव्य सुलक्षणी मुलास जन्म दिला. मूल जन्मतांच अभयकुमारानें तें कालपूर्व नांवाच्या गुहेंत नेऊन ठेवलें. ती गुहा अत्यंत भयंकर श्वापदांचें निवासस्थान होतें. त्यामुळें तिचें स्वरूप अत्यंत रौद्र दिसत असे. ही गोष्ट चेलनेला पडलेल्या स्वप्नावरून, राजा श्रेणिकाला कळली. तो चेलनेसह कालगुहेकडे आला व मुलास पाहून त्याला मोठें आश्चर्य वाटलें. त्यानें त्याचें नांव रुद्र ठेवलें व चेलनेच्या स्वाधीन केलें. चेलनेनें वारीषेणाबरोबर त्याचेंहि पालनपोषण केलें. सुजेष्टेला अभयकुमारानें पुन्हां धर्माचा उपदेश केला. त्या उपदेशाचा परिणाम पुन्हां

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ती गुरूकडे आली. आपला सर्व वृत्तांत गुरूंना निवेदन करून तिनें त्याच्याकडून पुन्हां दीक्षा घेतली.

रुद्र रौद्रस्वभावी होता. त्यामुळें तो चेटकास गुद्दे, बुक्क्या व चापट्या मारी. हें पाहून चेलनेला राग आला. एकदां तो चेटकांस मारींत असतां ती रागारागानें त्यास म्हणाली, "बटकीच्या पोऱ्या ! चल निघ माझ्या घरांतून !" चेलनेनें आपणांस टाकून बोललेलें पाहून रुद्रास वाईट वाटलें. तो म्हणाला, "माते ! आपण असें कां बरें बोललां ? मी दासीचा पुत्र कसा ? आपण सांगावें." तेव्हां चेलनेनें पूर्वीचा सारा वृत्तांत त्यास निवेदन केला. तो ऐकतांच रुद्र घरांतून बाहेर पडला व मुनीजवळ येऊन त्यानें दीक्षा ग्रहण केली. नंतर क्रमानें अकरांगाचें अध्ययन करून दशपूर्वांचेंहि ज्ञान त्यानें प्राप्त करून घेतलें. रोहिणी वगैरे १०५ विद्या व सप्तमंत्राची सिद्धि, वगैरे गोष्टी त्यानें साध्य करून घेतल्या. निश्चयानें काय साध्य होत नाहीं ? त्यांतच पूर्वपुण्याईचा जोर ! असो !

एकदां सत्यकीमुनीची वंदना करण्यासाठीं श्रावकश्राविकागण व अर्जिकेचा संघ मोठ्या भक्तिभावानें गोकर्ण पर्वत चढून येत होता; त्यावेळीं रुद्रानें सिंहाचें भीषण स्वरूप धारण करून त्यानां पळवून लावलें. तेव्हां सत्यकीमुनी त्यास म्हणाले, "आपलें हें कृत्य तपोभंगाला कारण होय. यामुळें स्त्रीवर्गाकडे आपल्या मनाचा कल फार दिसतो. मग आपण तपश्चर्या ती कशी करणार ?" गुरूच्या भाषणानें रुद्राला विषाद वाटला. स्त्रीविरहित देशांत मी तप करीन. अशी प्रतिज्ञा करून तो एकलविहारी बनला; नानाप्रकारच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वृक्षांनीं, पक्ष्यांनीं, भयंकर क्रूर श्वापदांनीं, गजबजलेल्या कैलास पर्वतावर जाऊन तो तपश्चरण करूं लागला.

विजयार्द्ध पर्वताच्या दक्षिण श्रेणीवर, मेघनिनाद, मेघनिचय व मेघनिबंधन अशा तीन नगरी आहेत. या नगरींचा राजा कनकप्रभ आपल्या मनोवेगा राणीसह राज्य करीत होता. त्याला देवदारू व विद्युजिव्ह असे दोन पुत्र होते. देवदारू हा ज्येष्ठ होता. राजानें देवदारूला राज्य देऊन आपल्या कनिष्ट पुत्रास—विद्युजिव्हास—युवराजपद व प्रज्ञप्तिविद्या दिली व आपण सर्वसंगपरित्याग करून गुणधर मुनीजवळ दीक्षा घेतली.

विद्युजिव्हानें प्रज्ञपिविद्येच्या सहाय्यानें देवदारूला राज्यांतून हांकून दिलें व आपण तिन्हीं नगरींचा राजा बनला. देवदारू पळून कैलास पर्वतावर येऊन राहिला. देवदारूला चार राण्या होत्या. चारहि स्त्रिया अत्यंत रूपयौवनसंपन्न होत्या. योजनगंधा, कनकप्रभा, तरंगवेगा व तरंगभंगिनी हीं त्यांचीं नांवें होत. योजनगंधेला गंधिला व गंधमालिनी, कनकप्रभेला कनकचित्रा व स्वर्णमालिनी, तरंगवेगेला तरंगमति व रंगसेना आणि तरंगभंगिनीला प्रभावती व सुप्रभावती अशा अनुक्रमें दोन दोन कन्या होत्या. या आठहि विद्याधरकन्या आपल्या दासींसह विहिरींत पोहण्यासाठीं आल्या. आपले कपडे विहिरीवर ठेवून त्या आंत उतरल्या. रुद्रमुनी जवळच तप करीत होते. त्यांचें सौंदर्य त्यांच्या दृष्टीस पडलें. त्यांनीं विद्येच्या सामर्थ्यानें त्यांचे सर्व कपडे आपणांजवळ आणवून घेतले. स्नानोत्तर त्या कन्या विहिरींबाहेर आल्या. ठेवलेल्या जागीं आपले कपडे नाहींत म्हणून त्यांनीं रुद्रमुनीस विचारलें, " भगवन् ! आपण आमचे कपडे पाहिलेत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

काय ?" तेव्हां रुद्र उत्तरले, 'आपण माझा स्वीकार करीत असाल, नव्हें माझ्या स्त्रिया बनत असाल तर मी आपणांस आपले कपडे परत देतों. यावर विद्याधरकन्या म्हणाल्या, "महाराज ! आम्हीं स्वतंत्र नाहीं. आम्हीं स्वतंत्र राहूं तर आमच्या सर्व विद्या नष्ट होतात. अशी परंपरा आहे. आमचे वडील या गोष्टीस अनुमति देतील तर आम्हीं खुषीनें आपणांस माळ घालूं." नंतर रुद्रानें त्यांचीं वस्त्रें, आभूषणें, त्यांना दिलीं व म्हणाला, विद्याधरींनों ! जा ! तुम्हीं आपल्या आईबापांना, बंधुवर्गांना हीं गोष्ट कळवा आणि मजकडे लवकर या !' विद्याधरींनीं घरीं येऊन सगळी हकिकत निवेदन केली. देवदारूनें "आपण माझें राज्य मला परत मिळवून देत असाल तर आपणांस मोठ्या आनंदानें माझा जामात बनवीन." असा दासीबरोबर मुनीस निरोप पाठविला. निरोप ऐकून रुद्र राज्यपद प्राप्त करून देण्यास तयार झाले व तसा निरोप त्या वृद्ध कंचुकीबरोबर धाडला. भूपतीनें रुद्रास मोठ्या सन्मानानें घरीं आणून घेतलें. त्यास आपली पूर्वींची सारी हकिकत निवेदन केली. नंतर रुद्र व देवदारू आपल्या सैन्यासह विजयार्द्ध पर्वतावर गेले. विद्युजिव्हाला त्यांनीं युद्धाचें आव्हान दिलें. दोघांत घनघोर युद्ध सुरूं झालें. त्या युद्धांत रुद्राचे हातून विद्युजिव्ह ठार झाला. देवदारू पुन्हां राज्यावर आला. नंतर रुद्राशीं त्यानें आठ कन्यांचें लग्न लावून दिलें. रुद्राला लग्नामुळें आपण कृतकृत्य झाल्यासारखें वाटलें. रात्रौं रुद्र त्यांच्यांशीं रतिकर्म करीत असतां त्याच्या शुक्राच्या जोरानें त्या कन्या गतप्राण झाल्या. त्यामुळें रुद्राला अत्यंत दुःख झालें. पुन्हां तो कैलास पर्वतावर येऊन राहिला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पर्वतावरील चैत्त्यालयांचें रक्षण चंद्र, यम, वरुण, सोम, चक्रधर, महेश्वर, धरसेन व हरीषेण, हे आठ दिक्पाल करीत होते. हे देवदारूचे मित्र होते. नागपूर, इंद्रपूर, शैलपूर, जयंतीपूर, नागयक्षपूर, दलकपूर व विजयपूर हीं गांवें क्रमानें या आठ दिक्पालांच्या राजधान्या होत्या. या आठहि विद्याधरांनीं आपल्या शंभर कन्या देवदारूच्या सांगण्यावरून, रुद्राला दिल्या. त्यांच्यांशीं मैथुन करीत असतां पूर्वीप्रमाणें त्याहि मृत्युमुखीं पडल्या. शेवटीं हताश चित्तानें तो एकटाच आपली कालक्रमणा करूं लागला.

कांहीं दिवसांनीं कोणा एका देशाहून एक आर्जिका विहार करीत तेथें आली. एका धीवरानें ती पडत असतां तिला सांवरून धरलें. त्याच्या शरीराच्या स्पर्शानें तिच्या ठिकाणीं त्याच्याबद्दल प्रेम उत्पन्न झालें. पण तिनें ती इच्छा आवरून धरली व पुढें भावी भवांत मी माझ्या या वल्लभाची भार्या होईन, असें तिनें निदान बांधलें व मरण पावली. व मरून सौधर्म स्वर्गांत इंद्राणी झाली. हाच धीवर आपल्या कर्मानुसार या संसारांत भटकत भटकत सुजेष्टेच्या पोटीं रुद्र होऊन जन्मला.

श्रावस्ति नगरीचा राजा वासव आपल्या मित्रवती राणीसह राज्य करीत होता. त्याची मुलगी विद्युन्मति शिवशंकर पति विद्युद्दंष्ट्राला दिली. या विद्युन्मतीच्या पोटीं सौधर्मस्वर्गांतून च्यवून त्या देवीनें जन्म घेतला. जन्मतांच तिला एका गुहेंत नेऊन टाकलें.

याच नगरींत सोमशर्मा नांवाचा एक ब्राह्मण राहत असे. सोमिल्ला—त्याची भार्या—त्याला प्राणांहूनहि अधिक प्रिय होती. यानां भद्रा, खंदा, सौम्या, व वैरिणी या चार मुली होत्या. एकदां या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चारहि मुली रानामध्यें पूजेसाठीं पुष्पें आणावयाला गेल्या असतां दुरून मुलाच्या रडण्याचा आवाज त्यांच्या कानीं आला. त्या नादानुरोधानें त्या मुली गुहेंत आल्या. गुहेंत मुलीला एकटीच पाहून, त्यानां आश्चर्य वाटलें. त्यांनीं तिला बरोबर घेतलें व जिनमंदिरांत आल्या. राजा वासव मित्रवती प्रियेसह दर्शनास आला होता. त्या मुलींनीं तें मूल राणीस नजर केलें. मित्रवती मुलीच्या रूपानें व सौंदर्यानें मोहित झाली व तिला आपल्या दासीला सांभाळण्यास दिली.

पुढें कांहीं दिवसांनीं इंद्र नगरीचा राजा चंद्रसेन आपल्या गिरिकर्णिका राणीसह पृथ्वीपर्यटन करीत करीत श्रावस्ति नगरीस आला. मित्रवतीनें त्या मुलीला—उमेला गिरीकर्णिकेस अर्पण केली. तिनें आपल्या निःसंतान मुलीस दिली. तिनें मोठ्या प्रेमानें आपल्या घरीं नेऊन तिचा सांभाळ केला. उमा पुढें सर्व विद्येंत पारंगत झाली. पुढें उमेचें लग्न देवकूट पुरेष वज्रवेगाशीं झालें. लग्न होतांच खेचर दिवंगत झाला. नंतर उमा देवदारू विद्याधराकडे गेली. विद्याधरानें तिला रुद्रमुनीस दिलें. रुद्र उमेसह आपला काळ सुखानें घालवूं लागला. विजयार्द्धाच्या दक्षिण श्रेणीवर तो आपली सुखानें कालक्रमणा करीत असतां त्यानें असें जाहिर केलें कीं, मी स्वयंभू सर्व लोकांचा कर्ता असून देवाचा मी अवतार आहें. नंतर त्यानें शैवधर्माच्या प्रचारास सुरुवात केली. पुष्कळसे शैवाचार्य त्याच्याबरोबर राहूं लागले. अशा रीतीनें वीस वर्षांचा काळ लोटला. त्यामुळें विद्याधरांना त्याचें भय वाटूं लागलें. तो आपल्या सामर्थ्यानें आपणांला या विजयार्द्ध पर्वतावरून, हांकलून लावील म्हणून विद्याधर त्याच्या मरणाचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उपाय शोधूं लागले. योजनगंधेनें उमेला येऊन विचारलें ' भद्रे ? तुझ्या वल्लभाच्या विद्या केव्हां लयाला जातात ? ' उमा उत्तरली, ' माझ्याशीं ते मैथुन करीत असतात त्यांच्या सर्व विद्या शांत असतात. ' योजनगंधेनें विद्याधरांना येऊन ही गोष्ट सांगितली. विद्याधरांना अत्यानंद झाला. एकदां गंधार देशांतील दुरंड नगरींत रुद्र उमेसह निजला असतां त्या विद्याधरानें येऊन त्याचा शिरच्छेद केला. त्याच्या मरणामुळें सर्व गंधार देशाला उपसर्ग झाला व विद्याधरांच्या सर्व विद्या नष्ट झाल्या.

थोडा काल निघून गेल्यावर नंदिषेणमुनीश्वर त्या उजाड दुरंड नगरीस आले. यतीश्वर आल्याची वार्ता समजतांच दुरंड नगराधिपति राजा विश्वसेन मोठ्या भक्तिभावानें मुनिवंदना करण्यास वनांत आले. मुनींना वंदन करून त्यांनीं विचारलें, ' भगवान् ! हा गंधार देशाला झालेला उपसर्ग कोणापासून झाला आणि तो कसा दूर होईल ? ' मुनी रुद्राच्या मरणाची हकिकत सांगून म्हणाले. ' ' राजा ! आपण विटांची विस्तृत पीठिका तयार करा. त्याच्या मध्यभागीं शंकराचें इंद्रिय स्थापून त्या लिंगाची पूजा नग्न होऊन होमहवनादि विधिसुद्धां करा ! म्हणजे तुमच्या सर्व विद्या तुम्हांस प्राप्त होतील ! ' मुनीच्या आज्ञेप्रमाणें विश्वसेन राजानें तसें केलें. मेंढू पूजनामुळें गंधार पूर्ववत् झाला. विद्याधरांना आपल्या सर्व विद्या प्राप्त झाल्या. तेव्हांपासून लोकांनीं दक्षिणेकडील भरतक्षेत्रांत सर्व लिंगांची स्थापना केली.

———

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा ९१ वी.

' मुनि नमि "

विदेह देशांतील मिथिला नगरींत राजा मरक आपल्या धनसेना राणीसह राज्य करीत होता. त्यांना सूर, पद्मरथ व नमि असे तीन पुत्र नीतिशास्त्रविशारद, विनयाचारसंपन्न होते. त्यांत नमि भद्रपरिणामी व धर्मप्रेमी होता. एकदां राजा आपल्या पुत्र-परिवारांसह दमधरमुनीच्या दर्शनास गेले. मुनीच्या उपदेशानें नमि संसारविरक्त बनला. त्यानें त्याचवेळीं दीक्षा ग्रहण केली.

एकदां नमि सहज विहिरीच्या कांठावर बसून आपलें प्रतिबिंब पाण्यांत न्याहाळीत होते. मुनींचें लक्ष्य त्याच्याकडे गेलें. ते म्हणाले, " मुने ! अद्यापि तुझ्या मनांतून स्त्रीभावना नष्ट झालेली दिसत नाहीं. यांत तुझ्या तपाचा भंग होईल. तुला हें करणें योग्य नाहीं." मुनिच्या भाषणानें त्याला स्त्रीविषयीं तिटकारा उत्पन्न झाला. तो मुनी आज्ञेनें एकलविहारी बनून, भयाण अरण्यांत तपश्चरणासाठीं निघून गेला. कांहीं दिवसांनीं सागरदत्त श्रेष्ठी आपल्या व्यापारी मित्रांबरोबर तेथें आला. त्यांचेबरोबर नाटकी, नर्तकी लोकांचा ताफा होता. त्याचा अधिकारी गोविंद नांवाचा नट होता. गोविंदाची भार्या भद्रा नांवाची होती. ती अत्यंत भद्रपरिणामी प्रियंवदा होती. कांचनमाला ही त्यांची मुलगी रूपानें, गुणानें अत्यंत सुंदर व सर्वकलासंपन्न होती. तिचें सौंदर्य पाहून नमि कामातुर झाला. मदनानें त्यास वेडे केलें. तो आपला वेष विसरून नटसंघाचा नाच चालला होता तेथें आला. नमीला त्या शास्त्रांत उत्तम गति होती. त्यानें दोष त्यांना दाखवून दिलें. गोविंद त्याचें प्रभुत्व पाहून त्याचेवर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रसन्न झाला. कांचनमालेशीं त्याचें लग्न लावून दिलें. प्रभुचरण सोडून हा नमि कांचनमालेच्या भजनीं लागला. नानाप्रकारचे भोगोपभोग भोगीत आपली कालक्रमणा करूं लागला. यांत कांहीं दिवस निघून गेले. कांचनमालेला गर्भ राहिला. तिची माता तिला सहज म्हणाली, " तुझा नवरा केवळ ऐदी आहे. उद्योगधंदा, पैसा मिळविण्याची त्याला अक्कल नाहीं. लोकांच्या जीवांवर सुख भोगतो." पण हे बोल कांचनमालेच्या हृदयाला बाणासारखें बोंचले. ती आपल्या भ्रतारास म्हणाली, " आपणांला येथें राहण्यास शरम नाहीं वाटत ? लोकांच्या तोंडाकडे पाहून फुकट खाण्याची लाज नाहीं ? मला हें जिणें लाजिरवाणें वाटतें. लोक आपणाला नाहीं नाहीं तें बोलतात ! अशा स्थितींत आपण आपलें जीवित असें घालविणें मला पटत नाहीं. आपण याचा विचार करा. नमीला ही विचारसरणि पटली. नंतर त्यानें विचार करून तें गांव सोडलें व पूर्ववार्धि तीरावर वसलेल्या चित्रसाणूर नगरीस आले. ती मुंडीर रायाची नगरी होती. नमीला नृत्यकला अवगत होती. त्यानें तोच धंदा आरंभला. रात्रींच्या वेळीं नृत्यास प्रारंभ केला. हजारों लोक खेळ पाहण्यास जमले होते. नृत्य करीत करीत खणखणीत सुरांत एक श्लोक म्हटला—

" चिंतनीयं सतोदीर्घं कर्तव्यं नाल्पकं सुखं ।
उत्पथ्थेन न यातव्यं न श्रोतव्यं खलोदितम् ॥ "

अर्थ— पुष्कळसा खोल विचार करावा; थोडेसें सुख मिळेल असें कार्य करूं नये. आडमार्गानें जाऊं नये. दुष्टानें सांगितलेलें कधींच ऐकूं नये. त्यावेळीं राजसुता पुष्कळसें द्रव्य, हिरे, माणके,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सोनें एका वस्त्रांत बांधून सायंकाळीं आपल्या प्रेमपात्राकडे जात होती. रस्त्यांतच हें नृत्य चाललें होतें. तिच्या कानांवर श्लोकाचें पहिलें पद "चिंतनीयं सतोदीर्घं" हें आलें. तें ऐकतांच तिनें तें सर्व धन त्या नटास देऊन टाकलें. एक कामातुर तपस्विनी परपुरुषाला घेऊन तें नृत्य पाहण्यास आली होती. तिच्याजवळहि पुष्कळसें द्रव्य होतें. तिचा विचार तें द्रव्य आपल्या प्रियकराला देण्याचा होता. पण "कर्तव्यं नाल्पकं सुखं" हें द्वितीय पद ऐकतांच तो विचार पालटला. तिनें तें द्रव्य नटास दिलें व परत ती घरीं आली. एक व्यापारी धनोपार्जनासाठीं रत्नमाणिक्यें घेऊन जात होता. तोहि तें नृत्य पाहण्यास आला. "उत्पथेन न यातव्यं" हें श्लोकाचें चरण ऐकलें. नटानें आपला भाव जाणला असें त्यास वाटलें व त्यानें बरोबर आणलेलें सर्व द्रव्य नटास दिलें व घरीं निघून गेला. एक राजपुत्र आपल्या पित्यास मारून राज्य घेण्याच्या इच्छेनें तिकडून चालला होता. शेवटीं तोहि नृत्य पाहण्यास थांबला. "न श्रोतव्यं खलोदितं" हें श्लोकाचें चतुर्थ चरण ऐकतांच त्याचे भाव पालटले. त्यानें पुष्कळसें धन त्यास दिलें. याप्रमाणें एकाच नृत्यप्रसंगीं पुष्कळसें द्रव्य मिळाल्यामुळें नमीला आनंद झाला. त्यानें तें धन आणून आपल्या भार्येच्या स्वाधीन केलें.

एके दिवशीं तो प्रियेस म्हणाला, 'तुझ्या पोटीं जो मुलगा जन्मेल, त्याला तूं जन्मतांच स्मशानांत नेऊन सोडून दे. पतिआज्ञेप्रमाणें कांचनमालेनें मुलास स्मशानांत नेऊन ठेवलें. त्याचवेळीं त्या नगरीचा राजा विश्वसेन मरण पावला. राजाला वारस कोणीं नव्हतें. तेव्हां सामंतमंत्र्यानीं करकुंभ राजहस्तीला उत्तम प्रकारें स्नान घातलें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्याची पूजा केली. त्याच्या गळ्यांत, सोंडेवर पुष्पांच्या माळा घातल्या. त्याच्या गंडस्थलावर जलकुंभ भरून ठेवलें व वाद्यांच्या गजरांत त्यास नगरींत सोडून दिलें. हत्ती मोठ्या थाटानें डुलत डुलत बाजारांतून, पेठेंतून, मंदीरांवरून जात जात स्मशानांत आला. तेथें तें मूल पडलेलें होतें. त्यास आपल्या शिरांवर वाहून आणलेल्या जलकुंभानीं हत्तीनें स्नान घातलें व सोंडेनें उचलून आपल्या पाठीवर ठेवलें व नगराकडे वळला. राजवाड्यांत येतांच त्या बालकांस सिंहासनांवर ठेवलें व पुन्हां स्नान घातलें. राजमंत्र्यांनीं त्यास विधिपूर्वक राजपट बांधला व त्याचें नांव दुर्मुख असें ठेवलें. दुर्मुख पुढें वयांत आला. वयांत आल्यानंतर त्यानें राज्याचीं सूत्रें आपल्या हातीं घेतलीं व उत्तम प्रकारें राज्यकारभार चालवूं लागला. पूर्वजन्मीं केलेल्या पुण्याईमुळें दुर्मुखाला राज्यपद मिळालें. म्हणून सज्जनहो ! नेहमीं धर्माचरण करीत जा.

नमिला आपल्या दुष्कृत्याबद्दल पश्चात्ताप वाटला. त्यानें पुन्हां वृषभसेन मुनीकडे जाऊन दीक्षा घेतली. निरनिराळे देशांतून विहार करीत करीत कालप्रिय नगरीस आला. नगरीचा राजा महासेन पुत्रहीन होता. त्याची भार्या विश्वसेना. या नगरींत गंगभद्र नांवाचा एक कुंभार राहत असे. त्याच्या बायकोचें नांव विमला. यांना विश्वदेवी नांवाची एक मुलगी होती. ती अत्यंत सुंदर, गुणी, कलाविज्ञानकोविद होती. एकदां ती आपल्या आंगणांत आंब्याचीं पानें वाळत टाकून घरांत बसली होती. इतक्यांत पाऊस सुरूं झाला. मोठमोठ्यानें मेघगर्जना होऊं लागल्या. वीजा चमकूं लागल्या. विश्वदेवी घाबरून गेली. मोठमोठ्यानें आक्रोश करूं लागली. तिला रडतांना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पाहून नमी आंगणांत शिरला व म्हणाला, 'बालिके! तुला कोणाची गरज भासत असेल तर मी तयार आहे. तेव्हां विश्वदेवी त्यास म्हणाली, 'मी अजूनहि कुमारिकाच आहें. अजून पवित्र आहें. माझे आईबाप ठरवितील तर माझी संम्मति दर्शवीन.' त्यावर नमि म्हणाला, 'हे सुंदरी, हा मंतरलेला दंड घे. तुझ्या घरांतील सर्व मातीच्या भांड्यांवरून फिरीव म्हणजे तीं सर्व धातूची बनतील." तिनें तो दंड घेऊन सर्व भांड्यांस लावला. तोंच ती सर्व धातूंचीं झालीं. ही गोष्ट आईबापांना कळतांच त्यांना मोठा आनंद वाटून त्यांनीं मोठ्या आनंदानें आपली मुलगी नमीस दिली. नमी विश्वदेवीशीं सुखानें कालक्रमणा करूं लागला. यांत एक वर्ष निघून गेलें. विश्वदेवीला गर्भ राहिला. एके दिवशीं ती नमीस म्हणाली, "नाथा! आपण आपले दिवस कांहीं उद्योगधंदा न करतां असें फुकट कां घालवितां?" तेव्हां नमीनें मातीची एक सुंदर तलवार तयार केली. इतक्यांत गोविंद नांवाचा एक ब्रह्मचारी ब्राह्मण नमीकडे आला. तो अगदीं थकून भागून गेला होता. त्यानें ती तरवार नमीस मागितली. नमीनें ती विद्येनें मंतून दिली व म्हणाला, 'हे ब्राह्मणा! तुला या तरवारीच्या सहाय्यानें आज या एका दिवसांत जें कांहीं मिळेल तें तूं मला आणून दे.' गोविंदानें तें कबूल केले व नमीस नमस्कार करून तो नगरांत भिक्षेसाठीं आला. विश्वसेना महादेवीनें अष्टह्नी, नांवाचें उपवासव्रत ग्रहण केलें होतें. त्याच्या समाप्तीप्रीत्यर्थ एका ब्रह्मचारी ब्राह्मणांस भोजन घालावयाचें होतें. तिनें त्यासाठीं आपला मनुष्य नगरींत पाठविला. तो या गोविंद विप्रास घेऊन महादेवीकडे आला. महादेवीनें त्यास उत्तमप्रकारचें भोजन विधिपूर्वक दिलें. व भोजना-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्तर ब्राह्मणदक्षिणा म्हणून पुष्कळशीं रत्नें, हिरे, माणकें व वस्त्रें दिलीं. ब्राह्मण तें घेऊन त्वरेनें राजवाड्यांतून बाहेर निघाला. तो तडक नमिकडे आला. नमीला त्यानें तीं सर्व रत्नें व तलवार देऊन टाकली. नमीनें तीं सारीं रत्नें आपल्या प्रियेच्या स्वाधीन केलीं. व तिला म्हणाला, 'प्रिये! तुला होणारा पुत्र अत्यंत सुलक्षणी आहे. पण तूं जन्मताच त्याला स्मशानांत नेऊन सोड. कारण या नगरीचा राजा पुत्रहीन आहे. तुला पुत्र जन्मेल त्याचवेळीं तो मरेल. मरणानंतर तुझ्या मुलास राजहस्ती घेऊन जाईल! व तो राजा होईल.' पुढें नवमास पूर्ण होतांच विश्वदेवीनें मुलास जन्म दिला. जन्मतांच तिनें तें मूल स्मशानांत नेऊन सोडलें. नमीच्या भाकिताप्रमाणें राजा स्वर्गवासी झाला. राजमंत्र्यांनीं रीतिप्रमाणें राजहस्ती राजाच्या संशो-धनार्थ सोडला. हत्तीनें त्या मुलास आणून सिंहासनावर बसविलें. मंत्र्यांनीं यथाविधि त्या मुलाचें पूजन करून त्यास राजपट्ट बांधला व त्याचें नांव कर्कट ठेवलें. कर्कट क्रमानें वाढूं लागला. पुढें त्यानें धर्मानें राज्य केलें. नमीनें विश्वदेवीस सोडून दिलें व गुरुजवळ पुन्हां दीक्षा घेतली. दीक्षेनंतर तो विहार करीत पूरी नगरीस आला.

मरुदेशांत मुख्यस्थान नांवाची एक मोठी नगरी होती. तेथील राजा सिंहसेन. त्याची राणी सिंहसेना होती. यांना एक अत्यंत सुंदर वसंतसेना नांवाची मुलगी होती. त्या नगरींत नमि भिक्षेसाठीं राजमंदिरांत आले. राजवाड्यांत शिरतांना त्यांची नजर वसंतसेनेवर पडली. दोघांची दृष्टादृष्ट होतांच एकमेकांच्या मनांत प्रेमभाव उत्पन्न झाला. तेव्हांपासून रोज नमि गुप्तमार्गानें राजवाड्यांत येऊन तिच्याशीं भोगोपभोग भोगूं लागला. त्याचें फळ शेवटीं तिला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गर्भ राहिला. हें दासीनें ओळखलें. तिनें राजकन्येस विचारलें. राजकन्येनें खरा प्रकार निवेदन केला. तदनंतर दासीनें पुन्हां विचारलें, "राजकन्ये! ते मुनी तुझ्याकडे आले तो दिवस तुला आठवतो कां? त्यांच्याबद्दल तुला कांहीं माहिती आहे काय?" वसंतसेनेनें नाहीं असें उत्तर दिलें. तेव्हां दासी तिला म्हणाली, "वसंतसेने! तुला त्याबद्दल कांहीं माहिती नसावी हें आश्चर्य होय. आतां असें कर! आज तो येऊन परत पहांटे जाऊं लागला म्हणजे त्याच्या पाठीवर कुंकवाचे हात मार." वसंतसेनेनें त्याप्रमाणें केलें. दुसरे दिवशीं दासीनें त्यास पकडून आणून तिच्यापुढें उभें केलें. तेव्हां वसंतसेना नमीस म्हणाली, 'भगवन्! आतां आपण माझें रक्षण करा! आपणांशिवाय मला कोणी वाली नाहीं.' तेव्हां तो वसंतसेनेसह आदित्यभवनांत आला. वसंतसेनेच्या पोटीं नम्नकी नांवाच्या मुलानें जन्म घेतला. तो अत्यंत तेजस्वी, गुणी होता. नमीनें कांहीं दिवस वसंतसेनेशीं संसार केला. पुढें त्यानें आपल्या दुर्मुख, कर्कट, व नम्नकी मुलांसह दिगंबरदीक्षा ग्रहण केली. नंतर ते चौघे विहार करीत सायंकाळच्या वेळीं कुंभकार नगरीस आले. एका कुंभाराच्या भट्टीवर ते येऊन बसले. रात्रीं कुलालानें ती भट्टी भांडीं भाजण्यासाठीं पेटविली. त्यामुळें त्यांना भयंकर उपसर्ग झाला. पण त्यांनीं मोठ्या आनंदानें तो सहन केला. याप्रमाणें भयंकर तपश्चरण करून ते योगीश्वर मोक्षास गेले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा ९२ वी.

" वशिष्ठ–उत्पत्ति "

एकदां ब्रम्ह्याला विचार आला, विष्णुलोकांत, इंद्राच्या स्वर्गांत, विष्णुमहेश्वराच्या सभेंत सर्व ब्राह्मण, देव वगैरे मोठ्या आदरानें येतात पण मजकडे कोणीच येत नाहींत. मला एकट्या-लाच येथें ब्रह्मलोकांत राहावें लागतें. त्यांची सर्व पूजा करतात, तेव्हां याचें कारण काय असावें हें आपण शोधून काढलें पाहिजे. नंतर ते मृत्युलोकांत आले. तेथें शोधांतीं विष्णु, महादेव, दुर्गा. यक्षादि देवतांना लोक आनंदानें, भक्तिभावानें भजत असून त्यांच्याच कृपेसाठीं लोक मोठमोठे यज्ञ करतात; पण आपली कोठेंहि पूजा होत असल्याचें दिसत नाहीं असें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस येऊन त्यांना लोकांचा भयंकर राग आला. माझ्या मुखांतून ब्राह्मणांची, बाहूंतून क्षत्रियांची, छातींतून वैश्यशूद्रांची उत्पत्ति झाली असून मी सगळ्यांचा कर्ता हर्ता आहें. पण सध्यां सर्वच माझा अपमान तिरस्कार करतात. कोणीहि माझें नांव घेत नाहींत. माझे ब्राह्मण-शिष्य देखील मला भजत नाहींत. तेव्हां याला कांहींतरी उपाय केलाच पाहिजे. असा विचार करून त्यानें भयंकर अरण्यांत जाऊन तपश्चरणाला सुरवात केली. त्यांनीं दिव्यप्रमाण चार हजार वर्षे तप केलें. वैदिकांनीं पांच प्रमाणें मानलेलीं आहेत. मनुष्यप्रमाण, ऋषि-प्रमाण, दिव्यप्रमाण, कालप्रमाण व ब्रह्मप्रमाण. हीं तीं पांच होत. मनुष्यप्रमाणाची व्याख्या— तीस मुहूर्तांची एक अहोरात्र म्हणजे १ दिवस. ३० दिवसांचा एक महिना. १२ महिन्यांचें १ वर्ष. हें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मनुष्यप्रमाण होय. मनुष्यप्रमाणांतील शुक्लपक्षाचे पंधरा दिवस तो ऋषिप्रमाणाचा १ दिवस. आणि कृष्णपक्षाचे १५ दिवस, ती ऋषिप्रमाणाची एक रात्र. असा दिवस व रात्र मिळून एक अहोरात्र. या तीस अहोरात्रांचा एक दिव्य मास व १२ दिव्य मासांचें १ दिव्य वर्ष—अशीं चार हजार वर्षें त्यांनीं तप केलें.

पुढें ३३ कोटि देव, चार कोटि प्राणी, १२ आदित्यमार्तंड, ११ रुद्र, विष्णु व इतर देव एकत्र गोळा झाले. त्यांना ब्रम्हदेवाचा कोठेंहि पत्ता लागेना. तेव्हां विष्णुंनीं सारें त्रिभुवन धुंडाळून पाहिलें. पण त्यांनाहि कोठें ब्रम्हदेवाचा पत्ता लागला नाहीं. तेव्हां हरीनें विष्णूस ब्रम्हदेवाच्या शोधार्थ वायुदेवांस पाठविण्यास सांगितलें. वायुदेव वायुवेगानें निघाला. ब्रम्हदेवाच्या शरीराचा खडतर तपश्चर्येमुळें केवळ अस्थिपंजरच उरला होता. त्याचें जीवन केवळ वाऱ्यावरच होतें. पूर्वेकडे तोंड करून ते एका पायावरच उभे होते. दुसरा पाय एका पायाच्या गुडघ्यावर टेंकविला होता. दोन्हीं बाहू उंच वर उभे होते. इडा, पिंगळा व सुषमा या तीन नाड्या त्यांनीं पूर्णपणें आपल्या ताब्यांत घेतल्या होत्या. वायूनें हें दृश्य दुरूनच पाहिलें व त्यानें देवांना येऊन सारी हकिकत निवेदन केली. देवांना मोठी काळजी पडली. त्यांनीं ब्रम्हदेवाला आपल्या तपापासून परावृत्त करण्यासाठीं कोणते उपाय योजावेत, याचा आपसांत खल केला. तेव्हां नंदीश्वर म्हणाले, 'या कामीं एका स्त्रीची योजना करावी. म्हणजे सर्व कार्यभाग जुळेल.' शंकराच्या आज्ञेप्रमाणें इंद्रानें तिलोत्तमा नर्तकीला ब्रम्हदेवांकडे पाठवून दिलें. ब्रम्हदेवाच्या सभोंवतालची सारी पृथ्वी पुन्हां तारुण्यांत आली. वसंताचें आगमन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

झालें. तिलोत्तमेनें स्वर्गीय नृत्य करण्यास सुरुवात केली. नूपुरांच्या मंजुळ आवाजांनीं ब्रम्हदेवाचे कान तिकडे लागले. त्यांचें मन तपापासून डळमळलें. ते मधून मधून चोरून तिच्याकडे दृष्टिक्षेप करूं लागले. तिच्या हावभावांनीं तर त्यांना वेड लागलें. ध्यानाची व आपल्या प्रतिज्ञेची विस्मृति पडली.

दुसरे दिवशीं तिलोत्तमा ब्रम्हदेवाच्या दक्षिणेला नृत्य करूं लागली. त्याचें तोंड पूर्वेकडे होतें. म्हणून त्यांना तें नृत्य पाहतां येईना. आपण तोंड फिरवून पाहूं तर सर्व देव आपलें हंसें करतील. मग आपलें तपोमहात्म्य तें कुठें राहिलें? त्यांनीं दक्षिणेकडे आपल्या विद्येच्या जोरावर एक तोंड तयार केलें. व डोळे फाडफाडून तिचें नृत्य पाहूं लागलें. आपणांकडे ब्रम्हदेव पाहात आहेत, असें पाहतांच तिलोत्तमेनें ती दिशा सोडून देऊन पश्चिम दिशेकडे आपलें नृत्य करण्यास सुरुवात केली. तिकडेहि ब्रम्हदेवानें आपलें तिसरें मुख उत्पन्न केलें. तेव्हां ती उत्तरेकडे आली. उत्तरेकडे त्यांचें तोंड झालेलें पाहतांच तिलोत्तमेनें त्यांच्या डोक्यावर अंतराळांत नाचण्यास सुरूवात केली. ब्रम्हदेवाला पुरें वेड लागलेलें होतें. त्यानें त्याहि दिशेला तोंड उत्पन्न केलें. पण तें गर्दभाचें झालें. त्यामुळें त्यांची सर्व शक्ति लयाला गेली. तिलोत्तमा आपल्या हातची जाणार म्हणून त्यांना अत्यंत वाईट वाटलें. तिला धरून ठेवण्यासाठीं त्यांनीं वर देह उचलण्याचा प्रयत्न केला, पण तपोप्राबल्य नष्ट झाल्यामुळें त्यांना कांहींच करतां येईना. तिलोत्तमेनें आपला कार्यभाग झाला असें पाहून स्वर्गाचा रस्ता सुधारला. ब्रम्हदेव तिच्या नांवानें मोठ्यानें ओरडूं लागले. तिलोत्तमेनें स्वर्गांत येऊन देवांना सर्व हकिकत सांगि-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तली. तेव्हां इंद्र म्हणाले, ' तिलोत्तमे ! ब्रम्हदेवासारख्या महान् पुरुषाबरोबर तूं संसार करण्यास जा. पण तिलोत्तमेनें तो वर आपणांस पसंत नसल्याचें सांगितलें. तेव्हां उर्वशीस पाठविण्यांत आलें. उर्वशीनें ब्रम्हदेवाबरोबर संसार केला. त्या संसाराचें फळ तिच्या पोटीं वशिष्टांचा जन्म झाला. गणिकेच्या पोटीं ब्रम्हदेवांपासून वशिष्ट जन्मले ही कथा वेदानुयायी मान्य करतात व पूज्य मानतात; कारण एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं:—

उर्वशी ब्रह्मणो भार्या वेश्या विख्यात सुंदरी।
तस्याः पुत्रो वशिष्ठाख्यो देव विप्र गणे हितः ॥

कथा ९३ वी.

दशान्य देशांत एकरथ्य नांवाची सुंदर, स्वर्गतुल्य नगरी होती. तेथें एक धनाढ्य धनदत्त नामें श्रेष्ठी राहत असे. त्याची भार्या धनदत्ता. धनदत्तेच्या पोटीं दोन अपत्यें त्यास झालीं. मुलाचें नांव धनमित्र व मुलीचें नांव धनमित्रा होतें. धनमित्रा अत्यंत सुंदर, गुणी होती. कांहीं दिवस सुखानें गेले. व्यापारांत त्यांना नुकसान आल्यामुळें ते निर्धन बनले. शेवटीं ते आपल्या मामाकडे कौशांबीस आले. मामानें मोठ्या आदरसत्कारानें त्यांना ठेवून घेतलें. त्यांना पुष्कळ समजावून पाहिलें पण ते तेथें राहण्यास कांहीं तयार होईनात. निघतांना मामानें त्यांना आठ बहुमूल्य रत्नें दिलीं. तीं रत्नें घेऊन जात असतां ज्याच्या हातांत तीं पडत त्यांना एकमेकांना ठार मारावें अशी भावना होई. त्यामुळें वेत्रवती नदीच्या पाण्यांत त्यांनीं तीं रत्नें टाकून दिलीं, व ते घरीं आले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रोहित नांवाच्या मोठ्या माशानें ते मणि गिळले. धीवरानें टाकलेल्या जाळ्यांत तो मासा सांपडला. तो बाजारांत विक्रीस आला. धनमित्राच्या आईनें तो धीवरापासून विकत घेतला. घरीं आणून तो कापला. त्यांतून ते मणी बाहेर पडले. धनदत्तेला तीं रत्नें पाहून आनंद वाटला. पण हातांत घेतांच धनलोभामुळें आपल्या संततीला मारावें अशी भावना तिला उत्पन्न झाली; परंतु तिला तो विचार असह्य झाला. तिनें तीं रत्नें धनमतीला दिलीं. धनमतीचीहि तीच स्थिति झाली. तिनें आपल्या भावांस दिलीं. ते मणी पाहतांच त्यालाहि तोच विचार आला आणि आपण पूर्वीं नदींत टाकले तेच हे मणि होत अशी त्याची खात्री झाली. त्यानें आपली मनोभावना आईला–बहिणीला, पित्याला निवेदन केली. त्यांनींहि आपली भावना व्यक्त केली. ते सर्वच विरक्त बनले. तीं रत्नें घेऊन जिनमंदिरांत गेले व जिनचरणीं तीं अर्पण केलीं व दमवर मुनीकडे जाऊन त्यांनीं संसारार्णवतारक दीक्षा ग्रहण केली.

कथा ९४ वी.

जंबुद्वीपांतील या भरतक्षेत्रांत वत्सकावती नांवाचा एक देश आहे. त्या देशांत कौशांबी नांवाची एक नगरी होती. त्या नगरींत धनमित्र, धनदत्त, यशोधर वगैरे नगरवासी लोक राहात होते. ते मोठे धनलोभी होते. एकदां ते धनमित्रादि बत्तीस श्रेष्ठी व्यापारासाठीं परदेशास जाण्यास निघाले. रस्त्यांत चोरांनीं त्यांना गांठलें. तेव्हां एकमेकांनीं एकमेकांच्या अन्नांत न कळत विष मिश्रण केलें. त्यामुळें ते सर्व मरण पावले. फक्त सागरदत्त श्रेष्ठी आपल्या रात्रीभोजनत्यागामुळें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वचावला. आपले बंधु व चोर मेलेलें पाहून त्याला अत्यंत वाईट वाटून तो विरागी बनला. सर्व धन त्याच ठिकाणीं सोडून त्यानें सागरसेन मुनीकडे जाऊन जिनधर्मी दिक्षा ग्रहण केली.

कथा ९५ वी.

जिनदत्त.

मणिचंद्र देशांतील मणिमति नगरींत राजा मणिमति आपल्या पृथ्वी राणीसह राज्य करीत होता. त्याचा पुत्र मणिचंद्र मोठा गुणी, विद्वान्, शूर व बलाढ्य होता. आपल्या गुणांमुळें तो सर्वांचा आवडता बनला. मणिमतीला आपले केस पांढरे झालेले पांहून वैराग्य उत्पन्न झालें. मुलास राज्यकारभार सोंपाविला व आपल्या सर्व सामंत, मंत्री, परिवारांसह प्रासुक वनांत दमवरमुनीकडे आला. मुनिमुखांतून जिनधर्म श्रवण करून त्यानें दीक्षा ग्रहण केली. जिन-शास्त्रांचें अध्ययन करीत ते तप करूं लागले.

पुढें कांहीं दिवसांनीं ते विहार करीत करीत उज्जयनी नगरीस आले. त्या नगरींजवळील महाकाल उद्यानांत उतरले. तो दिवस शुद्ध चतुर्दशीचा होता. मुनी ध्यानस्थ होते. एक वेताळ विद्येची आराधना करण्यासाठीं त्या वनांत आला. विद्येच्या सिद्धिसाठीं मृतकाची कवटी शोधतां शोधतां तो मुनी निजले होते त्या ठिकाणीं आला. मुनीला निश्चेष्ट पाहून त्याला तें प्रेत असावें असें वाटलें. तेव्हां विद्येच्या सिद्धीसाठीं त्यानें चूल पेटविली. अग्नीची आंच मुनीच्या मस्तकाला लागली. मस्तक भाजून निघूं लागलें. ती वेदना असह्य झाल्यामुळें मुनींनीं मस्तक हलविलें. मस्तक हालतांच कापा-लिकाचा भयानें थरकांप उडाला. भीतीनें आपलें साहित्य टाकून तो

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्मशानांतून आपला जीव घेऊन पळाला; मुनी शांतवृत्तीनें तो उपसर्ग सहन करीत तेथेंच पडले.

पहांटे एका माणसानें त्यांची ही स्थिति पाहिली. त्याला त्या मुनीची दया आली. तो पळत नगरींत आला. तेथें जिनदत्त नांवाचा एक धनवान जिनधर्मपरायण श्रेष्ठी राहात होता. त्याच्या भार्येचें धनदत्ता व मुलाचें धनदत्त नांव होतें. धनदत्त पूर्ण सप्तव्यसनी होता. सदा सर्वदा तो आपला काळ द्युत खेळण्यांत, मदिरापान करण्यांत, हिंसा, चोरी करण्यांत घालवीत असे. त्या मनुष्यानें येऊन जिनदत्तला मुनींची हकिकत निवेदन केली. जिनदत्त त्वरेनें स्मशानांत गेला. व मुनींना आपल्या घरीं घेऊन आला. घरीं येतांच श्रीदत्त वैद्यांस बोलावणें पाठविलें. वैद्यराजानें मुनीची स्थिति पाहून जिनदत्तास सांगितलें. श्रेष्ठीवर्या ! लाक्ष्यादि तेलाच्या मर्दनानें त्यांचें शरीर पूर्ववत् होईल. आणि हें तेल सोमशर्म्याच्या येथें आहे. तें मागून आण.

जिनदत्त सोमशर्म्याच्या घरीं गेला. सोमशर्म्याचें घराची जमिन स्फटिकाची होती. चुंकारिका सोमशर्म्याची स्त्री समोरच बसली होती. जिनदत्त तिला पाहून म्हणाला, "आपल्या येथें लाक्ष्यादितेल आहे. मला त्याची फार गरज आहे. दिल्यास फार उपकार होतील. व पुण्यहि लागेल." चुंकारिका उत्तरली, "या घरांतील या खोलींत शिरा. त्यांतलें एक भांडें घ्या." जिनदत्त भांडें घेऊन लगबगीनें त्या फरसबंदी जमिनीवरून जात असतां पाय घसरून पडला. पडल्या-मुळें हातांतलें भांडें खालीं पडून त्याचें शतशः तुकडे झाले व चोहीं-कडे तेल सांडलें. जिनदत्ताला वाईट वाटलें. पण तेल नेल्याशिवाय

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गत्यंतर नव्हतें. त्यानें चुंकारिकेस पुन्हां दुसरें भांडें मागितलें. तिनें घ्या जा म्हणून सांगितलें. दुसरें भांडें घेऊन खोलीच्या बाहेर निघाला तोंच पाय घसरून पडला. व भांडें फुटून तेल चोहींकडे पसरलें. यावर तिसरें भांडें घेण्याची चुंकारिकेनें परवानगी दिली. तिसऱ्याहि भांड्याची तीच स्थिति झाली. श्रेष्ठीला लाजल्यासारखें झालें. पण धर्मप्रेमामुळें त्यांनीं पुन्हां भांड्याची मागणी केली. चुंकारिकेनें मोठ्या आनंदानें अनुमती दिली. श्रेष्ठीला तिच्या वर्तनाचें आश्चर्य वाटलें. आपण तीन वेळेला भांडें मागितलें व तें फुटलें हें प्रत्यक्ष होणारें नुकसान पाहूनहि ती अगदीं शांतपणें कोणत्याहि प्रकारचा तिरस्कार न दाखवितां पुन्हां घ्याच असें म्हणतें याचें कारण कांहीं तरी असलें पाहिजे. असा विचार करून तो तिला म्हणाला, "माझ्याकडून आपली इतकी नुकसानी झाली तरी आपण न रागावतां शांतपणें पुन्हां भांडें घ्या ! असें म्हणतां हें कसें !" श्रेष्ठीचे बोल ऐकून चुंकारिका हंसत म्हणाली:— श्रावकवर्या ! मी या जीवनांत अगणित दुःखें भोगलीं, आणि त्याला कारण माझा कोपी स्वभाव ! पण मी त्याच्या त्यागाचें व्रत घेतल्यापासून अशी अगदीं आनंदांत माझे दिवस घालवीत आहे. तेव्हांपासून मला कोणत्याहि दुःखाची जाणीव झाली नाहीं. माझी कहाणी आपण शांतचित्तानें ऐका. म्हणजे आपणांस याचें कारण कळून येईल.

"या भरत क्षेत्रांत मेंढ्या प्रांतांत आनंद गांव आहे. त्या गांवीं सोमशर्मा ब्राह्मण राहतात. त्यांची भार्या मोठी गुणी वेदविद्यासंपन्न आहे. त्यांना शिवभूति वगैरे आठ मुलें होतीं. त्यांत भर मी त्यांच्या पोटीं जन्मून घातली. माझें नांव भटा. मी सर्वांची आवडती होतें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मीं पुढें सर्व शास्त्रांत प्राविण्य मिळवून कलाकोविद बनलें. पण गांवांतले लोक मला चुंकारिका म्हणत. त्यांचा मला चीड येई. मी चिडून रागाच्या भरांत त्यांना नाहीं नाहीं तें बोलत असे. याचा फायदा घेऊन ते मला चुंकारिका म्हणूनच चिडवीत. माझे पिताश्री राजश्रेष्ठी होते. राजाच्या कानांवर त्यांनीं ही गोष्ट घातली. तेव्हां राजानें या मुलीला आतां इथून जो कोणी चुंकारिका म्हणून संबोधील त्याची सर्व संपत्ति हरण केली जाईल व त्यास हद्दपार केलें जाईल अशी नगरांत ग्वाही फिरविली. राजाच्या भीतीमुळें मला कोणी चुंकारिका म्हणेना. पण लोक मोठे विचित्र—त्यांनीं माझें नांव अचुंकारिका पाडलें. त्याचवेळीं माझें लग्न झालें. लग्नापूर्वीं मी कधींहि या मुलीला चुंकारिका म्हणणार नाहीं असें त्यांनीं कबूल केलें होतें? लग्नोत्तर आम्हीं उज्जयनीस आलों. माझा काळ त्यांच्या सहवासांत सुखानें जाऊं लागला. तिकडून मला कधींहि थट्टेनें किंवा रागानें चुंकारिका म्हणणें होत नसे. पण एके दिवशींची गोष्ट! विप्रशाळेंत गांवच्या ब्राह्मणांनीं एक उत्तम गीत—नृत्यपटु नटाचा खेळ करविला. त्या खेळाला तिकडून जाणें झालें. बरीच रात्र झाली तरी ते घरीं येण्याचें चिन्ह दिसेना. मी एकटीच घरांत असल्यामुळें मला त्यांचा अत्यंत राग आला. रागाच्या भरांत सर्व दरवाजे बंद करून शयनमंदिरांत जाऊन पहुडलें. थोड्या वेळानें ते घरीं आले. दरवाजा बंदच होता. माझें नांव घेऊन मोठमोठ्यानें हांका मारूं लागले. मी जागी होतें. तरीपण त्यांना ओ दिली नाहीं. शेवटीं ते कंटाळून त्रासानें म्हणाले, 'मानी स्त्रिये! तुला तुझ्या गुणाची आठवण नाहीं काय? ऊठ, दरवाजा उघड!' यानें तर माझ्या रागांत भर पडली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यांना त्यांच्या कृत्याबद्दल चांगलाच धडा देण्याचा विचार केला. मी तशीच स्वस्थ पडून राहिलें. त्यांचें हांका मारणें चालूच होते. शेवटीं, " चुंकारिके ! मदोन्मत्ते ! दार उघडतेस कीं नाहीं ? " असें म्हणाले. चुंकारिका या शब्दानें त्यांची मला अधिक चीड आली. मला अपमान वाटला. तत्काळ मी आपल्या शयनमंदिरांतून फणकाऱ्यानें उठून बाहेर आलें व दाराची कडी काढली व त्याच-वेळीं त्यांचें समोर घरांतून बाहेर पडलें. त्यांनाहि राग आलाच होता. मी बाहेर पडतांच त्यांनींहि दरवाजा लावून घेतला व जाऊन निजले.

मी निघालें तें सरळ अशोकवनांत आलें. तेथें मला चोरांनीं गांठलें व पकडून माझ्या मुसक्या बांधून ते आपल्या ठिकाणांस घेऊन चालले. कांहीं वेळ चालून गेल्यानंतर एका झोंपडीपुढें आम्हीं आलों. झोंपडींत त्यांचा नायक विनयसेन बसला होता. त्याचेपुढें मला आणून उभें केलें. माझें रूप पाहतांच त्याला अत्यंत आनंद झाला व त्यानें आपली मला पट्टराणी बनविण्याचा प्रयत्न चालविला. पुढें पुढें तर माझ्या शीलावर घाला घालण्याचा प्रयत्न करण्यांत येऊं लागला. मला माझ्या कृत्याचा पश्चात्ताप वाटूं लागला. मी नमस्कार मंत्राचें स्मरण करूं लागलें. त्यामुळें थोडेसें माझ्या अंगीं धैर्य आलें. परंतु विनयसिंह आपल्या प्रयत्नांपासून परावृत्त होईना. तो एकदां माझ्याशीं लगट करण्याचा प्रयत्न करीत असतां चमत्कार हा कीं, देवतांनीं त्यांतून मला सोडविलें; त्यास स्तंभित केलें. विनय-सेनास आपल्या कृत्याचा पश्चात्ताप वाटला. त्यांनीं माझी क्षमा मागून पूजा केली.

कांहीं दिवसांनंतर एक व्यापारी त्याचेकडे आला होता. त्याच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वाधीन चोरांनीं मला केलें. चोरांप्रमाणें तोहि दुष्ट होता. तोहि माझ्या शीलावर उठला. पण प्रारब्ध चांगलें. देवतांनीं याहि वेळीं मला मदत केली व त्यास जखडून टाकलें. देवतेच्या या भयानें पुष्कळसें धन देऊन त्यानें मला एका पारसिकाच्या (पारशी गृहस्थाच्या) स्वाधीन केलें. तो कुटुंबवत्सल होता. कुटुंबांतील सारीच मंडळी सदाचारी होती. त्यांनीं उत्तम प्रकारें माझा सांभाळ केला. मला उत्तम उत्तम गोड पक्वान्नें खाण्यास देत असत. पण एक दोष त्यांच्यांत होता. तो माझें रक्त जळवा लावून काढून घेत असे. याप्रमाणें सहा महिने निघून गेले. माझा भाऊ द्रोणदेव तिकडचा निरोप घेऊन या पारसिकाकडे आला होता. त्याची माझी निघतांना भेट झाली. माझ्या भावानें सर्व हकिकत पारसिकांस सांगितली. तेव्हां पारसिकाला वाईट वाटलें व त्यानें द्रोणदेवांबरोबर माझी रवानगी केली.

आम्ही दोघें तेथून उज्जयनीस आलों. त्यांची माझ्या भावानें बरीच समजूत घातली. त्यांचा राग मावळला होता. त्यांनीं आनंदानें मला ठेवून घेतलें. जळवा लावून माझें रक्त काढलें त्यावेळेपासून माझें अंग वातानें फुगूं लागलें. त्यांनीं सोमशर्मा वैद्यांस दाखविलें. वैद्यानें रोगाचें निदान करून लाक्ष्यादि तेल चोळण्यास सांगितलें. त्यामुळें माझा वात कमी होत गेला व माझी शरीरप्रकृति पूर्ववत् सुदृढ बनली. तेव्हांपासून मी माझा कोणीहि अपमान केला तरी त्याचेवर न रागावतां तो सहन करीन असें व्रत घेतलें. व आपला काल धर्माचरणांत घालवूं लागलें. म्हणूनच आपल्या हातून जरी तेलाचीं भांडीं फुटलीं तरी मी आनंदानेंच तेल घेऊन जाण्यास

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सांगितलें. आणि अजूनहि सांगतें कीं, आणखी भांडें घ्या. आणि मुनीचें वैयावृत्त करा ! जिनदत्ताला आनंद वाटला. तेलाचें भांडें घेऊन तो घरीं आला. तेल चोळल्यानें मुनीचें शरीर पूर्ववत् झालें. जिनदत्तानें आपल्या घरांशेजारीं एक जिनमंदीर बांधलें होतें. त्यांतच मुनी चातुर्मासासाठीं राहिलें. मुनीच्या निजण्याच्या जागीं मुलाच्या भीतीनें जिनदत्तानें आपल्या घरांतील सारीं रत्नें, सुवर्णाचीं आभूषणें, एका तांब्याच्या भांड्यांत भरून तें भांडें पुरून ठेवलें. पण हें कृत्य त्या मुलाच्या नजरेंतून सुटलें नाहीं. तो अत्यंत सप्तव्यसनी होता. त्यानें तें भांडें बाहेर काढलें व दुसरीकडे नेऊन पुरलें. त्यावेळीं मुनीचें लक्ष्य तिकडेच होतें. पण बापानें ठेवलेलें धन मुलगाच नेत आहे असें पाहून मुनी स्वस्थ राहिले.

मुनीचा चातुर्मास मोठ्या आनंदानें धर्मध्यानांत पार पडला. ते चातुर्मास समाप्तीनंतर त्या नगरांतून बाहेर पडले. नगरीपासून थोडें दूर चालून गेले. स्वाध्यायाची वेळ झाली होती. स्वाध्यायासाठीं तेथेंच आपलें आसन जमविलें. इकडे जिनदत्तानें आपली जागा खोदली. पण त्यांत धनाचें भांडें नव्हतें. तो विस्मयांत पडला व म्हणूं लागला, मला आणखी मुनींनाच ही गोष्ट माहीत होती. तिसरे कोणीहि तेथें हजर नव्हते. तेव्हां मी किंवा मुनी या दोघांपैकीं एकानें चोरी केली असावी; पण मी माझी चोरी करून पुन्हां भांडें मागेन असा माझा स्वभावच नाहीं. तेव्हां मुनीशिवाय ही गोष्ट कोणीहि केलेली नाहीं. व मुनींनीं केली म्हणावें तर असे महान् मुनी अशा पापाचरणांत कसे पडतील ? त्याला धनाची चुटपुट लागली. तो मुनी-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कडे आला व त्यांना नमस्कार करून म्हणाला, महाराज ! आपण जाऊं नये. आपली पूजा देवांकडून जोपर्यंत केली जाणार नाहीं. तोंपर्यंत मी अन्न ग्रहण करणार नाहीं अशी प्रतिज्ञा मी माझ्या भार्येजवळ, मुलांजवळ घेतली आहे. तरी 'आपण परत येऊन मंदिरांत राहावें. मुनींनीं आपल्या ज्ञानानीं त्याच्या मनांतील दुष्टभाव ओळखला व पांच दिवसांसाठीं ते पुन्हां मंदिरांत येऊन राहिले.

दुसरें दिवशीं संध्याकाळीं तो कुबेरदत्तासह मुनीकडे आला. मुनींना वंदन करून म्हणाला, महाराज ! एखादी धर्मकथा सांगावी. साधु म्हणाले, जिनदत्ता ! तूंच प्रथम एखादी गोष्ट सांग.नंतर मी सांगेन. तेव्हां मुनीची परवानगी घेऊन जिनदत्तानें कथा सांगण्यास सुरुवात केली.

" वऱ्हाड देशांतील पद्मनगरींत राजा वसुपाल राज्य करीत होता तो मोठा पराक्रमी, धीर, गुणी होता. एकदां कौशलाधिपति जितशत्रुनें वसुपालांकडे कांहीं कामासाठीं दूत पाठविला. रस्त्यांत पद्मावती नांवाचें अरण्य लागलें. अरण्यांत जवळ कांहीं नसल्यामुळें दूत भुकेनें व्याकूळ होऊन मूर्च्छित झाला व एका झाडाखालीं निश्चेष्ट पडला. एका वानरानें त्यास पाहिलें. त्यानें थोडेसें पाणी आणून त्याच्या तोंडावर शिंपडलें व वारा घालूं लागला. थोड्या वेळानें दूताला शुद्धी आली. शुद्धीवर आल्यानंतर वानरानें त्यास एका सरोवराकांठीं नेलें. दूत पोटभर पाणी प्याला. त्यामुळें त्याला हुषारी वाटली. पुढें आपणांस रस्त्यांत पाणी मिळणार नाहीं तेव्हां या वानरास मारून, त्याच्या चामड्यांत पाणी भरून घेऊन जावें म्हणजे रस्त्यांत असा त्रास होणार

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाहीं. हें पाणी मोठें थंड व गोड आहे. असा विचार करून बाणानें त्या वानरास ठार केलें. त्याच्या कातड्याची एक गोणी बनविली व त्यांत पाणी भरून तो आपल्या मार्गास लागला. हे भगवन् तृष्णेमुळें व्याकूळ होऊन तो उन्हांत बेशुद्ध पडला होता. मर्कटानें त्यास पाणी पाजून जीवदान दिलें. पण दूतानें आपल्या उपकारकर्त्याचा उपकार त्याचा प्राण घेऊन फेडला. ही दूताची कृति पुण्यकारक ठरेल काय ? मुनी उत्तरलें श्रेष्ठीवर्या ! दूताची कृति कधींहि योग्य ठरणार नाहीं. तुझी कथा मोठी गोड आहे. पण मी एक सांगतों ती ऐक !

" वत्सकावती देशांत कौशांबी नगरी आहे. तेथें एक शिवशर्मा नांवाचा ब्राह्मण राहात असे. त्याची भार्या कपिला. तो ब्राह्मण एकदां वहिर्वृत्तीसाठीं नगराबाहेर गेला होता. तेथें त्यानें एक मुंगसाचे पिलूं पाहिलें. येतांना ते बरोबर आणलें. व आपल्या प्रियेस म्हणाला, प्रिये ! आपणांला कांहीं मूलबाळ नाहीं. तेव्हां आपण याचेंच पालन पोषण करूं. कपिला पतीआज्ञेप्रमाणें त्याचें पालन-पोषण करूं लागली. दैवयोगानें त्यांना एक सुंदर पुत्ररत्न झालें. मुलास खाटेवर निजवून मुंगसास त्याचें रक्षण करण्यास सांगितलें. व कपिला नदीवर पाण्यास गेली. कांहीं वेळांनीं एक भयंकर सर्प त्या घरांत शिरला. मुलावर सर्प झडप घालतो असें पाहातांच मुंगसानें त्यावर झडप घालून ठार केलें. सर्प मरून तेथेंच मुलाजवळ खाटेवर पडला. ब्राह्मणी घरीं येऊन पाहते तो मुलगा मरून पडलेला दिसला; मागचा पुढचा विचार न करतां तिनें मुसळानें मुंगसास ठार केलें. व मुलांजवळ आली. पाहते तों एक भयंकर सर्प मरून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पडलेला तिला दिसला. सर्पाला पाहतांच तिला सारें कळून चुकलें पण अविचारानें घडलेली गोष्ट थोडीच परत येणार होती? मुलापरी मूल व मुंगसापरी मुंगूस दोन्हींही गेल्यामुळें ती शेवटीं वंध्याच राहिली. तेव्हां श्रावका! ब्राह्मणीचें हें कृत्य योग्य होतें काय? जे जगांत कार्य करतांना मागचा पुढचा विचार करीत नाहींत त्यांना असाच पश्चात्ताप होतो. व म्हणूनच "अपरीक्षितं न कर्तव्यं कर्तव्यं सुपरीक्षितं ॥ पश्चात् भवति संतापो ब्राह्मणी नकुलं यथा ॥" ही म्हण रूढ झाली.

मुनीची कथा ऐकून जिनदत्त म्हणाला, ब्राह्मणीचें करणें वास्तविक अयोग्य, अविचाराचें होतें; पण मुनीराज! मीहि एक गोष्ट सांगतो. ती आपण ऐकावी.

"काशी देशांतील वाराणसी नगरींत प्रभू जितशत्रु आपल्या रुपिणी राणीसह राज्य करीत होता. राजाच्या पदरीं एक महान् विद्वान् नामांकित वैद्य होता. त्याचें नांव धनदत्त होतें. धनदत्ता त्याची भार्या. यांना धनमित्र व धनचंद्र अशीं दोन मुलें होतीं. मुलांना वैद्यकीचा गंधहि नव्हता. धनदत्ताच्या मृत्युनंतर राजानें त्याच्या जागीं दुसरा एक वैद्य ठेवला. ही गोष्ट त्या दोघां मुलांना रुचली नाहीं. ते वैद्यकीय शिक्षणासाठीं चंपा नगरीस आले. तेथें शिवभूति वैद्यांकडे राहून त्यांनीं उत्तमप्रकारें वैद्यकीचें ज्ञान संपादन केलें. नंतर ते घरीं परत येण्यास निघाले. रस्त्यांतून जात असतांना अरण्यांत त्यांच्या वाटेवर एक सिंह निचेष्ट पडलेला त्यांनीं दुरून पाहिला. तेव्हां धनचंद्र धनमित्रांस म्हणाला बंधो! आपण यास औषध देऊं. आणि यास पुनर्जीवन देऊं. त्यामुळें आपली कीर्ति

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जगभर पसरेल. व जीवदान दिल्याचें पुण्यहि लागेल. तेव्हां धनमित्र आपल्या भावांस म्हणाला— व्याघ्रसर्पादि क्रूर प्राण्यांवर कधींहि उपकार करूं नये. तूं औषध देऊन त्यास जीवदान देशील तर खात्रीनें तो तुलाच मारून टाकील. धनमित्राला ही गोष्ट रुचली नाहीं. तो परत भावास म्हणाला, 'तिर्यंच देखील पूर्वी केलेला उपकार स्मरतात. मग मी आतां केलेला उपकार हा व्याघ्र स्मरणार नाहीं हें कशावरून ? यावर धर्ममित्र उत्तरला. यांचे वैय्यावृत्त करणें निषिद्ध आहे. आणि तुला माझें म्हणणेंच पटत नसेल तर मी या झाडांवर चढून बसतो; नंतर तुला वाटेल तसें तूं कर. असें म्हणून तो झाडांवर चढला. इकडे धनचंद्र त्या सिंहाजवळ आला. त्यानें त्याचा रोग ओळखला. रानांतील उत्तम वनस्पतींचा रस काढून त्याच्या डोळ्यांत ओतला. रसाच्या प्रभावानें त्याच्या डोळ्यांवरील काचकमल दोष नष्ट झाला. सिंह तात्काळ उठून उभा राहिला. पुष्कळ दिवसाचा तो भुकेला त्यानें वैद्यांस तात्काळ मारून खाल्लें.' तेव्हां मुनीराज ! सिंहाचें हें करणें योग्य काय ? उपकाराची फेड अपकारानें करणें हा धर्म काय ? मुनी म्हणाले, 'केव्हांही नाहीं; पण माझी एक गोष्ट तूं ऐक.'

"अंग देशांतील चंपापुरी नगरींत सोमशर्मा ब्राह्मण राहात असे. तो वेदविद्या विशारद होता. त्याला सोमिल्ला व सोमशर्मा नांवांच्या दोन भार्या होत्या. सोमिल्लेला एक मुलगा होता. सोमशर्मा वांझट होती. ती नेहमीं सोमिल्लेचा द्वेष करी. तिच्या मुलाला पाण्यांत पाही. एकदां एक बैल त्यांच्या घरांत शिरला. ही संधि तिनें पाहून त्या मुलाला मारून, त्या बैलाच्या शिंगांवर ठेवलें. तो बैल मुलास घेऊन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सगळ्या गांवांत फिरूं लागला. हा प्रकार पाहून लोक भीतीनें त्यास घरांत शिरूं देईनात. एकदां जिनदत्त नांवाचा श्रावक वद्यचतुर्थीच्या दिवशीं ध्यानस्थ बसला होता. त्यावेळीं पौरवासी जनांनीं असें जाहीर केलें कीं, या तप्त लोखंडी फाळांस बैलानें शिवावें. शिवल्यास तो निर्दोषी समजावा. तेव्हां सर्व लोक सभोंवतालीं जमले. त्या भद्र परिणामी बैलानें येऊन तो फाळ तोंडानें उचलून त्यांच्या पुढें टाकला. तेव्हांपासून लोक त्याला पवित्र म्हणूं लागले. व पूर्वीप्रमाणें त्यास घरांत येऊं देऊं लागले. परंतु दोष नसतांनाहि त्यास दोषी म्हणणें लोकांना शोभलें असतें काय ? त्यावर जिनदत्त म्हणाला ' खरोखरी त्यांचें हें करणें योग्य नव्हतें. तरीपण महाराज ! आपण माझी एक गोष्ट ऐकावी.

"या गंगा नदीच्या कांठीं एक सुंदर हत्तींचा कळप राहात असे. आपापसांत ते मोठ्या प्रेमानें खेळत. त्या कळपाचा पुढारी गंधहस्ती पांढऱ्या कानांचा म्हणून प्रसिद्ध होता. त्याची प्रिया भद्रा नांवाची होती. त्याच्या मुलाचें नांव श्वेतकर्णी होतें. तो शरीरानें अत्यंत दुबळा; पण कलहप्रिय होता. म्हणून त्या कळपांतून त्याला एकट्याला अलग केलें. तो स्वच्छंदानें फिरत असतां एका शिवभूति तपस्व्यानें त्यास पाहिलें. मोठ्या युक्तीनें त्यास पकडुन त्यानें आपल्या झोंपडींत नेले. त्याचा उत्तमप्रकारें सांभाळ केला. त्यामुळें तो संपूर्ण लक्षणी गंधहस्ति झाला. पुढें श्रेणीकानें त्याची मागणी केली. पण त्याच्यावरील प्रेमामुळें तपस्व्यानें देण्यास इनकार केला. राजानें मागितलें तरी तपस्वी देत नाहीं हें पाहून हत्ती त्याचेवर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रागावला व रागाच्या भरांत त्यानें तपस्व्यांस ठार केलें. आपल्या पालनपोषणकर्त्यास मारणें योग्य होईल कां ?"

मुनी उत्तरले. 'केव्हांही तें योग्य होणार नाहीं. परंतु माझी एक गोष्ट तूं ऐक !" "कुरूजांगल देशांतील हस्तिनागपुरांत राजा विश्वसेन आपल्या प्रियधर्मा राणीसह राज्य करीत असे. नगराच्या पूर्व दिशेला राजानें एक उत्तम आंबराई लावली. कांहीं दिवसांनीं तीं झाडें फळाला आलीं. त्यानां मोहोर लागला. मोहोराच्या सुवासानें सारें रान दरवळून गेलें. त्या आंबराईतील एका झाडावर सौलिका पक्षी तोंडांत सर्पाला धरून खात बसला होता. त्यामुळें सर्पाचें वीष त्यांतील एका आंब्यावर पडलें. विषामुळें तो आंबा पिकल्यासारखा झाला. रखवालदारानें तो राजास नेऊन दिला. राजानें आपल्या राणीस दिला. राणी आंबा खातांच मरण पावली. तेव्हां राजानें सारी आंबराई तोडून टाकली. श्रावका ! केवळ एका आंब्याच्या दोषांमुळें आणि तोहि विषाच्या संसर्गामुळें सारीं आंब्याचीं झाडें तोडून टाकणें राजास शोभलें काय ?"

ही कथा ऐकून जिनदास आपली आणखी गोष्ट सांगूं लागला महाराज ! "माहिकमतीपुरांत वसुशर्मा राहात असे. तो एकदां विंध्य पर्वतावर गेला. तेथें एका आक्राळविक्राळ सिंहाची गर्जना ऐकून, त्याची भीतीनें गाळण उडाली. तो घाबरून जवळ असलेल्या एका महान् उतुंग शिवनीच्या झाडावर चढला. सिंह त्याकडे पाहून निरुपायानें आल्यामार्गानें निघून गेला. कांहीं वेळानें राजाचें लोक आपणांकडे येत असलेले वसुशर्म्यानें पाहिलें. त्यांना जवळ आलेलें पाहून तो झाडावरून खालीं उतरला व म्हणाला आपण कोणीकडे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आलांत ? ते उत्तरले. आम्हीं राजवाड्यांत नगाऱ्यासाठीं लांकूड पाहिजे आहे त्यासाठीं आलों आहोंत. वसुशर्मा म्हणाला, 'नगाऱ्यासाठीं शिवनीचें लांकूड उत्तम असतें. तेव्हां तें झाड लोकांनीं कापून नेलें. सिंहाच्या भयापासून ज्या झाडानें वसुपालाचें रक्षण केलें; त्याला तोडून टाकण्यास लावणें हें वसुपालाचें कृत्य सत्कृत्य ठरेल काय ?

यानंतर मुनीनीं आपली कथा सांगण्यास सुरुवात केली. विनिता देशांत साकेत नगरीचा राजा चंद्रप्रभ होता. त्याला राणी चंद्रमती शिवाय ५०० बायका होत्या. राजानें आपल्या नंदन उद्यानांत एक मोठी विहीर खणली. तिच्या पायऱ्या सुवर्णाच्या होत्या. विहीरींत चक्रवाक हंस, करडुवा वगैरे पक्षी आनंदानें खेळत असत. या शिवाय विहीरींत पुष्कळसें चित्रविचित्र रंगांचें बेडूकहि राहात असत. एकदां एक सर्प त्या विहिरींत शिरला. त्याला आंत शिरतांना एका वृद्ध बेडकानें पाहिलें. तो आपल्या सर्व बंधूंना म्हणाला आपल्या हातून या क्रूर सर्पाचा नाश होणार नाहीं. तेव्हां त्याला येथून कोणत्यातरी युक्तीनें घालविणें योग्य. आणि आपण तिकडे लक्ष्य न द्याल; तर आपणां सर्वांना प्राणांस मुकावें लागेल. पण तिकडे कोणीहि लक्ष्य दिलें नाहीं. पुढें राजा आपल्या अंतःपुरांसह क्रीडा करण्यास आला. क्रीडा करीत असतां सर्पानें बेडूक समजून महाराणीच्या पायांस चावा घेतला. विषाच्या प्रभावानें महादेवी मरण पावली. नंतर तो सर्प पाण्यांतून झटकन निघून गेला. महादेवीच्या मरणामुळें राजास वाईट वाटलें. त्यानें सर्व बेडकांस पकडून ठार

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मारण्याची आज्ञा केली. धीवरांनीं आपली जाळीं टाकून ती बेडकी पकडली व मारून टाकली." तेव्हां जिनदत्ता! सर्पानें दंश केला म्हणून बेडकांस मारणें उचित काय? चोराला सोडून संन्याशाला बळीं देणें इष्ट काय?"

जिनदत्त उत्तरला. तो तर अन्यायच होय. पण माझी एक कथा आपण ऐकावी. "या भरतक्षेत्रांत उज्जयनी नांवाची नगरी आहे. फार पूर्वी श्रीपती राजा आपल्या श्रीमती भार्येसह राज्य करीत होता. समुद्रदत्त नांवाचा श्रेष्ठी राजाचा श्रेष्ठी होता. तो अत्यंत धनाढ्य होता. त्याची भार्या समुद्रदत्ता मधुर स्वभावाची गुणी व सुंदरी होती. एकदां भांडारखान्यांत कषाय नांवाच्या चोरानें प्रवेश केला. तेथील उत्तमोत्तम रत्नें त्यानें हस्तगत केली. पण रखवालदारांनीं त्याला पाहिलें. तेव्हां चोर त्यांच्या भीतीनें पळत सुटला. तो या श्रेष्ठीच्या घरांत त्याच्या पलंगाखालीं लपून राहिला. त्याचे पाठोपाठ द्वारपालही श्रेष्ठीच्या घरांत शिरले व श्रेष्ठीस म्हणाले, 'आपल्या घरांत चोर शिरला आहे, तो कोठें आहे?' श्रेष्ठीला ही गोष्ट माहित नव्हती; त्यानें 'येथें घरांत कोणीं शिरलेंच नाहीं' असें सांगितलें. रखवालदार बिचारे हात हालवीत खिन्न मनानें राजाकडे आले. सूर्योदयापूर्वी श्रेष्ठीनें चोरांस उत्तम वस्त्रें नेसवून आपल्या बागेंतून त्यास जाण्यास सांगितलें. चोरानें श्रेष्ठीच्या घरीं पुष्कळशीं रत्नें पाहिलीं होतीं. तीं देखील त्यानें जातांना बरोबर चोरून नेलीं." तेव्हां हे साधो! ज्यानें आपला जीव वांचविला त्या श्रेष्ठीवर उलटणें हा चोराचा धर्म होता काय? उपकाराची फेड अपकारानें फेडणें हाच धर्म काय?"

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुनि म्हणाले, या सर्व गोष्टी खऱ्या असल्या तरी पण श्रावका ! तूं पुढील गोष्ट लक्षांत घे ! " या भरतक्षेत्रांत कौशांबी नगरीचा राजा भूपाल मोठा प्रजाहितदक्ष व राज्यकारभारांत निष्णात होता. त्याची राणी सुंदरी खरोखरीच गुणारूपांनीं सुंदरीच होती. तिचा मुखचंद्रमा चंद्रासही लाजवी. एकदां माध्यान्हाचें वेळीं मेदत्त नांवाचे मुनीश्वर आहारासाठीं राजवाड्याजवळील एका घराजवळ आले. त्या घरपतीनें मोठ्या आदरानें साधूंना यथाविधि आहारदान दिले. जवळच एक मयूर उभा होता. त्यानें तेथें ठवलेला पद्मराग मणि गिळला. ही गोष्ट मुनींनीं पाहिली, पण ते आपल्या वृत्तीस अनुसरून मौन राहिले. मुनी जिनाची स्तुति गाऊं लागले. मणि कोठें दिसत नाहीं असें पाहून त्या घरपतीनें त्यांना विचारलें, 'आपण येथें ठेवलेला मणि पाहिला काय?' मुनि उत्तरले ' नरवरा ! मी तुझें रत्नही पाहिलें नाहीं आणि कोणी घेतलें हेंहि मला माहित नाहीं. पण तो पुन्हां पुन्हां साधूंना विचारी व त्यांच्यावर रागावें; पण मुनि स्वस्थच ! पुढें प्रकरण हातघाईस आलें. तो आपणांस उपसर्ग देणार असें जाणून त्यांनीं शरीराचा आहाराचा त्याग केला व ध्यानस्थ झाले. त्या मनुष्यानें त्यांच्या अंगावर तप्त तेल ओतलें पण मुनि शांतच ! इतक्यांत मयूर तडफडत मुनींजवळ आला. मनुष्य लांकडानें मुनीस मारण्यास धावला; पण दैवयोगानें तो लांकडाचा घाव मोरावर पडला. तोंच मोराच्या तोंडांतून मणि बाहेर पडला. मणि पाहून राजादि लोकांना झालेल्या प्रकाराबद्दल वाईट वाटलें. त्यांनीं मुनीची क्षमा मागितली. तेव्हां मुनि शांतपणें त्यांना म्हणाले, ' सज्जनहो !

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आगामानुसारी मुनि कधींच कोणाच्याही कोणत्याच वस्तूची अभिलाषा करीत नाहींत. ते सर्वांविषयीं उदासीन असतात. हीच मुनीची वृत्ति. राजानें आपल्या लोकांसह श्रावकत्वाची दीक्षा घेतली. मुनींनीं परदोष—मग तो घोर अपराध कां असेना सांगणें योग्य नसतें. तेव्हां जिनदत्ता विचार कर! अविचारानें भलत्याच गोष्टीच्या भरीस पडूं नकोस. जिनदत्त निरुत्तर झाला. आपल्या मुलाकडे तो न्याहाळून पाहूं लागला. कुबेरदत्ताच्याहि मनावर या सर्व गोष्टींचा थोडाबहुत परिणाम झाला होता.—बापाविषयीं त्याला आदर नव्हता. पण त्याला विचार आला. मी धन चोरलें आहे पण बाप धनांध आहे. कदाचित् तो तें न मिळाल्यामुळें मुनींना उपसर्ग देईल. आणि त्यांना उपसर्ग देणें अधमपणा होय. तेव्हां आपण धन आणून पुढें ठेवावें. म्हणजे हे सत्पुरुष संकटांतून मुक्त होतील! विचारांसरशीं तो उठला व थोड्याच वेळांत ती घागर बापापुढें आणून ठेवली व म्हणाला, "तात, मींच ही चोरी केली होती. पण मुनीच्या या उपदेशामुळें माझे डोळे उघडले. मला माझ्या कृत्याचा पश्चात्ताप वाटतो. शेवटीं त्या दोघांनीं मुनींची क्षमा मागितली व त्याचेजवळ सर्व परित्याग करून संसारार्णवतारिणी दीक्षा घेतली व खडतर तपश्चरण करूं लागले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा ९६ वी.

" लोभी पिन्याकगंध "

पांचाल देशांतील कांपिल्य नगरींत राजा रत्नप्रभ आपल्या विद्यु-न्मती राणीसह राज्य करीत होता. विद्युन्मती विद्युत्प्रभेसारखी तेजस्वी होती. राजश्रेष्ठींचें नांव जिनदत्त होतें. तो श्रावकधर्मी होता. जिनदत्ता हें त्याच्या भार्येचें नांव होतें. आणखी एक श्रेष्ठी पिन्याकगंध नांवाचा नगरींत राहत असे. तो अत्यंत धनाढ्य बत्तीस कोटींचा मालक होता. त्याची प्रिया सुंदरी. विष्णुदत्त त्यांचा मुलगा. स्वभावानें गोड व सर्व कलासंपन्न होता. पिन्याकगंधाला सुमित्रा नांवाची एक बहिण होती. कांपिल्य नगरीजवळील पिंपळगांवांत राहणाऱ्या सागरदत्त श्रेष्ठीला ती दिली. तिला सुर्यमित्रा नांवाची मुलगी झाली. ती अत्यंत सुंदर, गुणी होती.

पुढें कांहीं दिवसांनीं रत्नप्रभाराजानें नगरीच्या बाहेर लोकांना पाणी पिण्यासाठीं एक मनोहर सरोवर बांधलें. तें सरोवर खोदीत असतां एका कामकऱ्याला एक पेटी मिळाली. तींत १०० कुशी होत्या. त्यानें ती आणून आपल्या घरीं ठेवली. पुढें पावसाळ्याचे दिवस आले. एक सुवर्ण कुशी त्यांतली घेऊन तो जिनदत्तांकडे गेला. जिनदत्तानें ती लोखंडाच्या भावानें घेतली व त्याची जिन-प्रतिमा बनवून मंदिरांत ठेवली. पुन्हां दुसरे दिवशीं तो वृद्ध दुसरी कुशी घेऊन जिनदासांकडे आला. पण मला आतां त्याची जरूरी नाहीं. तूं कोणासही वीक. असें त्यास सांगितलें. तेव्हां तो पिंपळगांवास आला व पिन्याकगंधास त्यानें ती लोखंडाच्या भावानें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विकली. सुवर्णाची कुशी पाहून, श्रेष्ठीच्या तोंडास पाणी सुटलें. तो त्या वृद्धाला जवळ बोलावून विचारूं लागला, " वृद्धा ! तुजजवळ आतां अशा किती कुशी शिल्लक आहेत ? वृद्ध उत्तरला, मजजवळ अजूनहि ९९ कुशी शिल्लक आहेत. पण मी आपणांस रोज १ याप्रमाणें आणून देईन. वृद्धाला ती कुशी कशाची याचा गंध नव्हता. पुढें रोज एक याप्रमाणें पिन्याकगंधाला त्यानें ९८ कुशी आणून दिल्या. त्या सर्व कुशी सुवर्णाच्याच निघाल्या. ९८ वी कुशी दिल्यादिवशीं पिंपळगांवाहून श्रेष्ठीची बहिण सुमित्रा श्रेष्ठीस बोलावण्यास आली होती. कारण, सुमित्रेचा वाङ्निश्चय ठरवावयाचा होता. तेव्हां श्रेष्ठी आपल्या मुलांस म्हणाला, मी जात आहें. उद्यां तो वृद्ध रोजकरी कुशी घेऊन सकाळीं येईल; तरी आळस न करतां ती घे. दुसरे दिवशीं तो वृद्ध श्रेष्ठीच्या घरीं आला. विष्णुदत्तास अगोदर पढवून ठेवलेंच होतें. तरी ती कुशी त्यानें विकत घेतली नाहीं. म्हातारा बाजारांत विकण्यास गेला. तो विकत असतां राजाच्या लोकांनीं त्यास पाहिलें व पकडून राजाकडे नेलें. राजानें ती कुशी त्याच्या हातून घेतली व त्यावरील लेख वाचून पाहिला. व बाकीच्या कुशींबद्दल त्यास विचारणा केली. वृद्ध घाबरून गेला. तो म्हणाला, राजन् ! मला सरोवर खोदतांना एक पेटी मिळाली होती. त्यांत शंभर कुशी होत्या. पुढें पावसाळ्यांत काम लागेना म्हणून त्यांतील एक कुशी अगदीं अल्प किंमतींत जिनदत्ताला विकली. बाकीच्या ९८ कुशी पिन्याकगंधानें विकत घेतल्या. आणि ही उरलेली शंभरावी. नंतर राजानें जिनदत्तास सुवर्णकुशी घेऊन ये. असा निरोप शिपायांकडून पाठविला. जिन-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दत्ताला काळजी पडली. पण तो सरळहृदयी होता. त्यानें ती सुवर्णाची मूर्ति घेतली व राजदरबारीं आला. राजाला अभिवादन करून म्हणाला, 'मी प्रथम याचेकडून एक कुशी विकत घेतली. परंतु मागाहून ती सुवर्णाची निघाली. त्यामुळें त्याची मी ही जिन-प्रतिमा केली. ही आपणांपुढें हजर आहे. राजाला जिनदत्ताच्या भाषणानें आनंद झाला. त्यानें त्यास निर्दोषी ठरवून प्रतिमा घेऊन जाण्यास सांगितलें. पिन्याकगंधाचें सर्व धन राजानें जप्त करून राजवाड्यांत आणलें व त्याच्या बायकामुलांना कैदेंत ठेवलें. पिन्याकगंध पिंपळगांवाहून परत येत असतां रस्त्यांत एका मनुष्याला आपल्या घरची हकिकत विचारली. त्यानें घडलेली हकिकत सांगि-तली. त्याचे मनावर अत्यंत परिणाम झाला. त्यानें दगडांवर डोकें आपटून प्राण सोडला. मरून सहाव्यां नरकांतील ललुक नांवाच्या तृतीय प्रस्तरांत जाऊन जन्मला.

कथा ९७ वी.

श्रेष्ठी स्पट हस्तक.

अंगद देशांतील चंपापुरींत राजा अभग्नवाहन राज्य करीत होता. त्याची भार्या सुंदरी. सुंदरी गुणी व अत्यंत आवडती होती. तिच्या शरीराचा बांधा मोठा रेखीव व तिचे डोळे कमळासारखे होते. राजश्रेष्ठीचें नांव आलुब्धक होतें. त्याची भार्या नागवधु. त्याला गरुडदत्त व नागदत्त हे दोन पुत्र होते. दोघेहि मोठे सुंदर कलाकौशल्यसंपन्न गुणी होते. गरुडदत्त हा जेष्ठ मुलगा होता. लुब्धक श्रेष्ठी अत्यंत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लोभी होता. त्याची संपत्ति कुबेरालाही लाजवीत होती. आपल्या धनाचें प्रदर्शन म्हणून त्यानें सुवर्णाचे दोन हत्ती, दोन मृग, दोन यक्ष, दोन देवी यांचे उत्तम पुतळे तयार केले. त्यांत अत्यंत मौल्य-वान् रत्नें जडविलीं. यांशिवाय एक बैलाचा पुतळा पुष्पराग मण्याचा केला होता. त्याला जोडी म्हणून आणखी एक बैल करण्याची त्याला चिंता लागून राहिली व त्याच विचारांत तो आपले दिवस घालवूं लागला.

वर्षावाचे दिवस होते. भयंकर वर्षाव होत होता. गंगानदी तुडुंब भरून वाहात होती. अशा वेळीं रात्रीच्या समयाला तो लुब्धक गंगेंत शिरला. हा प्रकार राजवाड्याच्या गच्चीवरून राणीनें पाहिला. गंगेंत उतरून तो लुब्धक लांकडें गोळा करीत होता. ही गोष्ट तिनें राजास सांगितली व म्हणाली, राजन् ! किती हें हृदयस्पर्शी चित्र आहे. किती बरं हा दरिद्री ! अशा वर्षावांत रात्रीच्या भयाण प्रसंगीं गंगेच्या अथांग पाण्यांत शिरून पोटासाठीं लांकडें गोळा करावीं लागतात. किती बिचारा अभागी ! मला हें दृश्य पहावत नाहीं. आपण त्याला पुष्कळसें धन देऊन या दारिद्र्यपंकांतून बाहेर काढा. नाहींतर बिचारा असाच फुकट मरेल ! पहांटें राजानें आपले दूत पाठवून, ह्या मनुष्यास बोलावून आणलें. आपणांपुढें आपला लुब्धक श्रेष्ठी उभा असलेला पाहून राजास हंसूं आलें. तो श्रेष्ठीस म्हणाला, तुला पाहिजे असेल तेवढें धन घेऊन जा ! आणि सुखानें संसार कर ! राजाचें भाषण ऐकून लुब्धक उत्तरला, राजन् ! मला संपत्तीची गरज बिलकुल नाहीं. माझ्या घरीं एक बैल आहे. त्याला जोडी पाहिजे, तरी तुझ्या घरीं असल्यास तसला बैल मला दे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राजानें आपल्या गोकुळवाड्यांतून पाहिजे तो बैल घेऊन जाण्याची आज्ञा दिली. सारा गोकुळवाडा शोधून पाहिला; पण त्याच्या बैला-सारखा एकहि बैल त्यांत नव्हता. तो परत राजाकडे येऊन म्हणाला, 'माझ्या बैलासारखा एकहि बैल तुझ्या गोठ्यांत नाहीं.' राजा चिडून म्हणाला, 'तुझा बैल आहे तरी कसा? दाखीव. नंतर राजा-सह लुब्धक घरीं आला. त्यानें हत्ती, घोडे, वगैरेंची जोडी दाखवून पुष्पराग मण्याचा तो बैल दाखविला. राजा त्याची अलोट संपत्ति पाहून आश्चर्यानें स्तंभितच झाला. तो म्हणाला, लुब्धका! तुझ्या बैलासारखा एकहि बैल माझ्या संग्रहीं नाहीं ही गोष्ट खरी. नंतर राजास त्यानें जेवण्याचा आग्रह केला. रत्नजडित पाटावर बसवून रत्नजडित ताटांत राजाला भोजन वाढलें. नंतर सुवर्णाच्या ताटांतून उत्तमोत्तम रत्नें ठेवली व तें ताट राजापुढें घेऊन उभा राहिला. पण राजास देण्याची त्याला इच्छा होईना. धनावरील त्याचा मोह सुटेना. देण्याचा आविर्भाव मात्र केला. राजानें ही गोष्ट तर्कानें ताडली व त्याचें स्पटहस्तक हें नांव ठेवलें व तो घरीं परत आला.

पुढें तो लोभी स्पटहस्तक सिंहलद्वीपास गेला. तेथें चार कोटींचें सुवर्ण कमाविलें. परत निघाला असतां वाटेंत जहाज फुटून तो मरण पावला. पैशाच्या लोभामुळें तो मरून आपल्याच घरीं सर्प जन्मला व आपल्या संपत्तीचें रक्षण करूं लागला. कोणालाहि हात लावूं देईना. त्याच्या भयामुळें तेथें जाण्यास कोणी धजेना. तेव्हां गरुडदत्तानें त्यास मारून टाकलें. मरून तो चवथ्या नरकास गेला. खडखडा नांवाच्या जलावर्तात १२० सागर आयुष्याचा नारकी जीव होऊन जन्मला. गरुडदत्तहि हिंसेमुळें मरून चवथ्या नरकास गेला. नागवसु

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व नागदत्ता यांना त्याच्या मरणामुळें अत्यंत दुःख झालें. पण ते विवेकी होते. नागवसूनें धर्माचें श्रवण करून श्रावकधर्म स्वीकारला. तो उत्तमप्रकारें पाळून मरून तो ब्रह्मलोकांतील नंदीघोष विमानांत महान् देव झाला. नागदत्तेनें सुव्रतमुनीजवळ जाऊन अर्जिकेची दीक्षा घेतली. चंपोद्यानांत अनशनव्रत ग्रहण करून तिनें देहत्याग केला व महाशुक्र स्वर्गांत देव होऊन जन्मली. स्पटहस्तकाचा जीव चवथ्या नरकांतलें आपलें आयुष्य भोगून, वृषभपर्वतांवर हत्ती होऊन जन्मला. गरुडदत्ताचा जीव तेथेंच काकजंघ नांवाचा पारधी होऊन जन्मला. त्या पारध्याला दूर्गा व गंगा नांवाच्या दोन बायका होत्या. त्या दोघीहि वर्णानें काळ्यासांवळ्या होत्या. दुर्गा मोठी होती. एके दिवशीं गंगेनें कांहीं क्षुल्लक भांडणावरून दुर्गेला मुसळानें बडविलें. धीवर गंगेवर रागावला व म्हणाला ठीक आहे. तुला मी हत्ती मारून दांत आणून देतों. ठरल्याप्रमाणें धीवराच्या बाणाला तो हत्ती बळीं पडला. मरून चित्रकूट पर्वतांवर कीचकपक्षी होऊन जन्मला. पुन्हां या पापी पारध्यानें त्या जंगलाला आग लाविली. त्या वणव्यांत तो कीचकपक्षी जळून भस्म झाला. पारधीहि त्यांत सांपडून मरण पावला.

सिंहलद्वीपाच्या द्रवील देशांतून विन्यानदी समुद्राला वाहात जाऊन मिळते. त्या ठिकाणीं तिचें पात्र मोठें विस्तृत असतें. तिच्या कांठीं तो कीचकपक्षी (स्पटहस्तकाचा जीव) खेकड होऊन जन्मला. धीवर मरून कुधीर ग्रामांत पुन्हां धीवर जन्मला. समुद्रकांठीं तो मोती आणण्यासाठीं जात असे. एकदां पुष्कळशीं मोत्यें घेऊन तो विन्यानदीतटांवर आला. तीं तेथेंच ठेवून दुसरीं आणण्यासाठीं तो पुन्हां

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गेला. तो खेकड आपल्या बिळांतून बाहेर आला व त्यांनीं तीं सारीं मोत्यें बिळांत नेलीं. पुन्हां धीवरानें तेथें मोत्यें आणून ठेविलीं. पण तो तीं घेऊन जात असतां धीवरानें पाहिलें. त्यानें त्याला जोराचा तडाखा मारला. त्यांत तो मरण पावला.

मग्नालि देशांत अंबुदावर्त पर्वताच्या पायथ्याशीं उत्पल नांवाचें एक खेडेगांव होतें. तेथें एक शेतकरी राहात असे. त्या शेतकऱ्याचा नौकर नंदिविलास नांवाचा होता. त्याची बायको क्रमिका. क्रमि-केच्या पोटीं तो खेकड मरून करभ नांवानें जन्मला. धीवरहि मरून याच गांवांत त्या शेतकऱ्याच्या शिंगीच्या पोटीं शिंगरूं होऊन जन्मला. बापांबरोबर करभहि त्या शेतकऱ्याचे घरीं येई. तो घोडी, शिंगरूं वगैरे सांभाळी. पण शिंगरास पाहातांच त्यास जातिस्मरण झालें. त्याची द्वेषभावना पुन्हां जागृत झाली. तो शिंगरास यथेच्छ झोडपूं लागला, शिंगरूंहि त्याचेवर लाथा मारीत असे. यांत कांहीं दिवस निघून गेले. अंबुद पर्वतांवर चार चारण मुनी आले. त्यांचीं नांवें अनंतवीर्य, अनंतदेव, श्रीनील व श्रीधर्म होतीं. साधूंची वार्ता ऐकून करभ मुनी दर्शनासाठीं पर्वतावर गेला. मुनीमुखांतून धर्म श्रवण करून त्यानें श्रावक धर्माचा स्वीकार केला व घरीं परत आला.

एके दिवशीं त्या शिंगराजवळ निजला असतां त्या दुष्टानें त्यास दांतांनीं चावून, पायांखालीं तुडवून मारलें. करभ मरून सौधर्म स्वर्गाच्या मध्यम सभेंतील जलकांत विमानांत देव होऊन जन्मला.

अंग देशांतील चंपापुरींत विद्युत्वाहन राजा आपल्या विद्युत्प्रभा राणीसह राज्य करीत होता. राजश्रेष्ठी भवदत्त मोठा संपन्न होता. श्रेष्ठीची भार्या भद्रमती रूपयौवनसंपन्न होती. त्या दांपत्याच्या पोटीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सौधर्म स्वर्गीचें सुख भोगून, त्या करमदेवानें जन्म घेतला. त्याचें नांव भवदेव ठेवण्यांत आलें. याच नगरींत पद्मदेव नांवाचा आणखी एक श्रेष्ठी राहात असे. त्याची भार्या पद्मावती. त्यांच्या पोटीं नंदीघोष विमानांतील देवानें स्वर्गातून च्यवून जन्म घेतला. त्याचें नांव जिनदेवकुमार ठेवण्यांत आलें. या दोन्हीं श्रेष्ठीपुत्रांत पूर्वऋणानुबंधामुळें स्नेहसंबंध दृढ झाला.

कांहीं दिवस सुखानें गेले. जिनदेवकुमारानें संसाराला त्रासून जिनदेवाचार्याजवळ जिनदीक्षा घेतली. जिनदेव मुनी आपल्या शुद्धाचरणानें व खड्तर तपश्चर्येनें मोठ्या संघाचे आचार्य बनले. भवदेवानें यांचेजवळ दीक्षा ग्रहण केली. गुरूंना विचारून ते एकल विहारी बनले. विहार करीत करीत ते कलिंग देशाला आले. ऐरावती नदीच्या कांठावर वसलेल्या नंदी गांवाजवळ ते आराधना करीत राहिले. त्यांना जवळच सुवर्णानें भरलेली एक घागर सांपडली. ती एका खड्ड्यांत पुरून ठेवली व त्यावर एक मोठी शिला ठेवून दिली. पुढें त्या शिलेवर बसून ध्यान करूं लागले. हा प्रकार धनरक्षक मंदिरादेवीनें पाहिला. तिनें अर्जिकेचें रूप धारण केलें. मोठमोठे दीव्य अलंकार परीधान करून, मुनीकडे आली व हंसून म्हणाली, मुनीराज ! आपलें तप खरोखरींच उग्र आहे. तरी मजबरोबर महिला ग्रामाला आपण चलावें व माझ्या सहवासांत आपला काळ सुखानें घालवावा. देवीचे बोल मुनींना लागले. ते तिरस्कारानें म्हणाले, " थेरडे ! तुला लाज वाटत नाहीं. माझ्या स्थितीची तुला कल्पना नाहीं आणि निलाजऱ्यासारखी बोलत्येस ! " ती शांतपणें म्हणाली, महाराज ! आपण माझीच लाज काढतां आणि आपण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मात्र देवादिकांनांहि दुर्लभ असें व्रत ग्रहण करून, धनाचा लोभ करतां हें कसें ? मुनी तिच्या उत्तरानें निरूत्तर झाले. आपल्या कृत्याची त्यांना लाज वाटली. ते पुन्हां जिनदेव आचार्यांकडे आले. आपल्या दोषाची आलोचना करून, त्यांनीं प्रायश्चित्त घेतलें व पुन्हां जिनदीक्षा ग्रहण केली. उत्तम तऱ्हेची तपश्चर्या करीत ते संघांतच राहूं लागले.

अयनापुरांत राजा सुकेतू राज्य करीत असे. तो मोठा बलाढ्य सार्वभौम होता. केतुमती पतिभक्तिपरायण होती. राजाचा श्रेष्ठी सुभद्र नांवाचा होता. श्रीदत्ता त्या श्रेष्ठीची भार्या, व भद्रबाहु त्यांचा पुत्र होता. भद्रबाहु आपल्या गुणानें सर्वांचा चाहता बनला. लोक त्याचा आदरसत्कार करीत. पुढें कांहीं दिवसांनीं संघासह भवदेव मुनी अयन नगरीस आले. भद्रबाहूची कीर्ति त्यांच्या कानां-वर आली. त्यांचा मानमरातब पाहून, आपणांलाहि असाच जन्म प्राप्त व्हावा अशी त्यांना भावना झाली व ते निदान बांधून मरण पावले. मरून सनत्कुमार स्वर्गांतील जंबुनद विमानांत देव झाले. जिनदेवाचार्यानें चतुर्विध आराधना करून समाधिमरण साधलें व ते अच्युत स्वर्गांत देव झाले.

अवंती देशांतील उज्जयनी नगरींत राजा सिंहबल आपल्या श्रीषेणा राणीसह राज्य करीत होता. यांना कीर्तिसेना नांवाची अत्यंत सुंदर, गुणी मुलगी होती. राजश्रेष्ठी सुबंधु धनकनकसंपन्न होता. त्याची प्रिया धनश्री. जंबुनद विमानांतून च्यवून भयदेवांनीं धनश्रीच्या गर्भांत वास केला. धनश्री गर्भवती होतांच तिचे सर्व भाऊबंद, पति वगैरे मरण पावले — सर्वांची वाताहत झाल्यामुळें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धनश्री अत्यंत दुःखी झाली. सिप्रा नदीच्या तीरावर ती शोक करीत बसली. पर्वतानें तिला आपली बहीण समजून आपल्या घरीं आश्रय दिला. धनश्री पुढें प्रसूत होऊन तिला एक तेजस्वी पुत्र झाला. त्याचें नांव मेदज ठेवण्यांत आलें. धनश्रीचा भाऊ श्रीषेण मोठा लोभी निष्ठुर होता. नागश्री त्याची भार्या. त्यांना तिलकश्री नांवाची एक मुलगी होती. हा पूर्व जन्मींचा नागवसू होय. मेदज हा पूर्वींचा स्पटहस्तक. मेदजाची व तिलकश्रीची प्रीति जडली. मेदजाचें जाणेंयेणें श्रेष्ठीच्या घरीं होऊं लागले. एकदां ते हिंदोळ्यांवर बसून झोके घेत होते. श्रीषेण श्रेष्ठीला हें दृश्य पाहून राग आला. त्यानें लाथ मारून मेदजाला खालीं पाडलें व म्हणाला, म्लेंच्छा ! चल, निघ, माझ्या घरांतून ! चालता हो. मेदज निमूटपणें ते बोल सहन करून घरीं आला व मातेस सर्व हकिकत निवेदन केली. तिला अत्यंत दुःख झालें. पुढें मेदजानें श्रीषेणाला तिलकश्रीची मागणी घातली. श्रीषेण धनलोभी होता. तूं हिच्या वजनाची सुवर्णाची प्रतिमा आणून देशील तर मी तिलकश्री तुला देईन, असें सांगितलें. मेदज घरीं आला. मातेला मामाचें म्हणणें सांगितलें. तें ऐकून धनश्री म्हणाली बाळा ! तुझ्या बापाचा खून करून यानें सर्व संपत्ति गिळंकृत केली. मी दुःखी निराश्रित बनून या मेदाच्या झोपडींत येऊन राहिलें. आपण निर्धन आहोंत ! तिलकश्रीच्या वजनाइतकें सोनें कसें मिळणार ? तूं तिचा नाद सोडून दे. मेदजाला आपल्या स्थितीचें रडूं आलें. तो प्राण देण्याच्या हेतूनें एका निबिड भयाण अरण्यांत शिरला. एका उंच ताडवृक्षावर चढून त्यानें उडी मारण्याचें ठरविलें व तो झाडावर चढला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हा प्रकार अच्युतकल्पांतील देवांनीं आपल्या ज्ञानानीं जाणला. हा पुरुदेव पूर्वजन्मींचा नागदत्त होय. मुनीचा वेष घेऊन तो वनांत आला व मेदजास म्हणाला, ' आपण या झाडावरून खालीं उडी टाकूं इच्छितां तें कां ? मेदज उत्तरला, मी निर्धन आहें. माझें प्रेम तिलकश्रीवर बसलें आहे. तिलकश्रीशिवाय माझें जीवन व्यर्थ होय. आणि तिच्या प्राप्तीसाठीं तिच्या वजनाइतकें सुवर्ण माझे मामा मागतात आणि तें दिलें तरच तिची प्राप्ति होते. पण तें माझ्या या परिस्थितींत शक्य नाहीं म्हणूनच मी मरणास तयार झालों आहे. यावर साधु म्हणाले, तूं जर लग्नोत्तर बारा वर्षे संसार करून दीक्षा घेशील तर मी तुला तितक्या वजनाची सोन्याची प्रतिमा देईन. देवाची अट मेदजानें कबूल केली. तेव्हां देव म्हणाले, मेदजा ! तूं आपल्या घरीं जा. घरांत थोडीशी जागा सारवून शुद्ध कर. त्यावर एक शुभ्र वस्त्र टाक. म्हणजे त्याच्या खालीं आपोआप सुवर्णाची मूर्ति प्रगटेल, एवढें सांगून मुनी निघून गेले. मेदज झाडावरून खालीं उतरला. घरीं घेऊन साधूनें सांगितल्याप्रमाणें त्यानें केलें. नंतर ती सुवर्णाची मूर्ति घेऊन, श्रीषेणाकडे आला व म्हणाला, मामा ! ही मूर्ति घ्या व तिलकश्रीशीं माझें लग्न लावा. श्रीषेणाला ती प्रतिमा पाहून लोभ सुटला. तो पुन्हां म्हणाला, मेदजा ! तूं क्षीरोधदीचें पाणी आणशील तर तुला माझी मुलगी देईन. तरी तें पाणी घेऊन ये. मेदजानें घरीं येऊन आपल्या मातेस हा वृत्तांत सांगितला. माता म्हणाली, बाळा ! उगीचच त्याच्या नादीं लागूं नकोस ! तो आपला शत्रु आहे; तो आपली मुलगी तुला देईल असें मला वाटत नाहीं. तेव्हां त्याचा नाद सोडून दे. मेदजाला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पूर्वीच्या साधूची आठवण झाली. त्यानें त्याची प्रार्थना केली. प्रार्थनेमुळें इंद्र प्रगट झाले. त्यांनीं प्रसन्न होऊन त्यास एक अंगठी दिली व सांगितलें मेदजा! तुला जें कांहीं लागेल तें सर्व ही अंगठी पुरवील. ती अंगठी घेऊन तो मामांकडे आला व मामास म्हणाला, बोला! आपणांस काय काय पाहिजे? क्षीरोधदीचें पाणीच काय? पण जें आपणांस लागेल तें मी देण्यास तयार आहें. श्रीषेणाला भाच्याची वल्गना पोकळ वाटली. तो म्हणाला, फक्त पाणीच आणून दे. म्हणजे पुष्कळ झालें. मेदज वनांत आला व मोठ्यानें ओरडून म्हणाला, हे क्षीरसमुद्रा! चल लवकर ये, आणि श्रीषेण श्रेष्ठीच्या घरांत प्रवेश कर. आज्ञा होतांच तो समुद्र मोठमोठे पर्वत ओलांडित हलकल्लोळ करीत त्या नगरींत शिरला. लोक या पाण्याच्या लाटा पाहून भयभित झाले. मेदज श्रेष्ठीला म्हणाला, मामा बघा! प्रत्यक्ष क्षीर समुद्रच येथें आला आहे. आपणांला वाटेल तितकें पाणी यांतून घ्या. थोडयाच वेळांत सारें गांव जलमय झालें. सर्व लोकांची पांचावर धारण बसली. ते मेदजाकडे येऊन त्यास विनवूं लागले. मेदजानें अंगठीच्या सहाय्यानें पुन्हां शांतता प्रस्थापित केली. त्याचें विद्याप्राबल्य पाहून लोक मोठ्या आदरानें, सन्मानानें त्याचेकडे पाहूं लागले. श्रेष्ठीनें तिलकश्रीशीं त्याचें लग्न लावून दिलें; एवढेंच नव्हें, तर तेथील राजानें आपली कन्या कीर्तिसेनाहि त्यास दिली व त्याचवेळीं त्याचें इतर बत्तीस मुलींशीं लग्न लावलें. महिपतीनें त्याला आपला श्रेष्ठी बनविलें. मेदज आपल्या सर्व स्त्रियांच्या सहवासांत आपला काळ आनंदानें घालवूं लागला.

सुखानें संसार करण्यांत कांहीं काळ निघून गेला. पुढें एके

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिवशीं देव स्वर्गांतून खालीं आले व त्यास म्हणाले, श्रेष्ठीन्! जिनधर्माचें आचरण करून अव्याबाध सुखाची तूं प्राप्ति करून घे. व्यर्थ हे संसारवर्धक भोग भोगण्यांत काय फायदा? पण श्रेष्ठीला हें रुचलें नाहीं. तो म्हणाला, साधो! आपण आणखी बारा वर्षें संसार करण्याची पूर्वीं मला आज्ञा दिली आहे ती पूर्ण होतांच मी दीक्षा घेईन. देव स्वर्गाला निघून गेले. बारा वर्षें पूर्ण झालीं. पुन्हां देव त्याचेकडे आले व म्हणाले, तुझी मुदत पूर्ण झाली. आतां दीक्षा घेण्यास तयार हो. श्रेष्ठीला संसाराचा मोह सोडवेना. तो देवाला म्हणाला, आणखी आपण मला बारा वर्षें संसार करण्यास मुदत द्यावी. ती पुरी झाली म्हणजे मी आपल्या म्हणण्याप्रमाणें दीक्षा घेईन. देव या गोष्टीस कबूल झाले व त्यास धर्मानुसार वागून संसार करण्याचा उपदेश देऊन स्वर्गास निघून गेले. तींहि वर्षें पूर्ण झालीं. देव मेदजास दीक्षा घेण्याबद्दल आग्रह करूं लागले. मेदजाला देवाचा राग आला. तो रागानें म्हणाला तूं कोण? कुठला राहणार? मजकडे पुन्हां येऊन तेंच सांगतोस! हें स्वर्गासारखें सुख सोडून नागवें फिरण्यांत काय मौज? कोणता मूर्ख दारोदार भीक मागण्याचें पत्करील! देव आश्चर्यानें स्तंभित झाले. दुसऱ्या कोणत्यातरी उपायांनीं याला संसारापासून परावृत्त केलेंच पाहिजे. असा विचार करून ते निघून गेले.

दुसरे दिवशीं मेदज राजाकडे कांहीं कामानिमित्त गेला होता. देवानें आपले स्वतःचे पहारेकरी त्याचे घराचेभोंवतीं ठेवून, आपण मेदजाचें रूप घेऊन अंतःपुरांत शिरला. मेदज राजदरबारांतून घरीं आला. घरांत शिरतो तोंच रखवालदारानें त्यास मज्जाव केला व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सांगितलें, महाराज ! आपण आंत जाऊं नका ! आमचे धनी मेदज तिलकश्रीबरोबर भोगोपभोग करीत आहेत. तरी आपलें जाणें बरें नाहीं व तशी आम्हांस आज्ञाहि नाहीं. आपलेच लोक आपल्याच घरांत जाण्यास मज्जाव करतात याचें त्याला आश्चर्य वाटलें. त्यानें राजाकडे येऊन सारी हकिकत निवेदन केली. राजानें श्रेष्ठीला बोलावणें पाठविलें. तोहि येऊन योग्यासनांवर बसला. दोघांच्या स्वरूपांतलें साम्य पाहून राजा बुचकळ्यांत पडला. खरा कोण व धूर्त कोण ? याचा त्यास उलगडा होईना. तो विचारांत पडला. देवानें हा प्रकार जाणला व सर्व सभेच्या लोकांना उद्देशून म्हणाला, जो आपल्या व राजाच्या कुळाचा इतिहास सांगेल तोच खरा मेदज होय. ज्याला सांगतां येणार नाहीं तो धूर्त ! राजाला पसंत पडलें. तो मेदज श्रेष्ठीकडे वळून म्हणाला, तूं खरा असशील तर आपल्या व माझ्या कुळाचा इतिहास सांग. पण श्रेष्ठीला कोणाच्याच कुळाचा इतिहास सांगतां येईना. तो स्वस्थ राहिला. तेव्हां राजा देवश्रेष्ठीस म्हणाला, आपण माझ्या व आपल्या वंशाचा इतिहास सांगा. आम्हीं मोठ्या आनंदानें ऐकूं. देव म्हणाले, ऐक ! प्रथम मी तुझ्या वंशाचा इतिहास सांगतो.

"तुझ्या वंशांत प्रथम जर्जयंत राजे झाले. त्यांचा मुलगा अरिंजय. अरिंजयाचा मुलगा धीरन, त्याचा जयंत, जयंताचा चक्र, चक्राचा मुलगा उज्जया, उज्जयाचा मुलगा मेघंजय, मेघंजयाचा मुलगा मेघवाहान चक्रवर्ती झाला, मेहवाहानाचा पुत्र सिंहवाहान. तुझ्या सर्व वंशजांनीं जैन धर्माची कास धरून श्रवणपदाची प्राप्ति करून घेतलेली आहे, कित्येक स्वर्गाला तर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कित्येक मोक्षाला गेले आहेत, हा तुझा वंशेतिहास होय, आतां मी माझा सांगतो तो ऐक ! माझ्या वंशाचा प्रथम श्रेष्ठी मानव, मानवाचा मुलगा महेंद्रदत्त, महेंद्रदत्ताचा अक्षोभ, अक्षोभाचा धनपति, धनपतीचा मुलगा सुवर्णदत्त, सुवर्णदत्ताचा इंद्रदत्त, त्याचा मुलगा सागरदत्त, सागरदत्ताचा मुलगा वरुणदत्त, वरुणदत्ताचा मेघदत्त, आणि मेघदत्ताचा मी मेदत्त. आपल्या कृपाप्रसादानें मला हे राजन् ! हें श्रेष्ठीपद मिळालें. तुझ्या वंशजाप्रमाणें माझ्याहि वंशजांनीं जिनधर्माचा स्वीकार करून, श्रावकत्व प्राप्त करून घेतलेलें आहे. स्वतःच्या व श्रेष्ठीच्या वंशाचा इतिहास ऐकून राजाची खात्री झाली. त्यानें मेदजाला धूर्त ठरवून, त्याच्या मुसक्या बांधण्याची आज्ञा दिली. शिपायांनीं त्याच्या मुसक्या बांधल्या. तेव्हां राजा म्हणाला, जा ! याला नरसिंहस्मशानांत घेऊन जा व तेथें फांसावर चढवा. राजाज्ञेप्रमाणें त्याला वधस्तंभाकडे नेण्यांत आलें. देव मुनीचें रूप घेऊन स्मशानांत आले व हंसून म्हणाले, ‘ आणखी बारा वर्षे संसार भोगावयाचा होता ना ? मेदजाचे डोळे उघडले. तो मुनीला नम्रपणें म्हणाला, मुनीवर्या ! आपण माझें रक्षण करा ! मला संसारभोगाशीं कांहीं कर्तव्य नाहीं. आपण माझी रक्षा करा. मी जिनदीक्षा घेऊन तप करीन. नंतर साधु चांडाळांना म्हणाले, थांबा ! याला मारूं नका. हा अपराधी नाहीं. राजास बोलावून आणा. कांहीं वेळानीं राजा आपल्या लवाजम्यांसह तेथें आला. राजास पाहून साधु म्हणाले, राजा ! हा खरा अपराधी नाहीं. तेव्हां त्याला ठार करूं नका ? पण राजा उत्तरला – ‘ राजसभेंत दोषी कोण ? या गोष्टीचा निर्णय झाला आहे. मग त्याला शिक्षा ती कां

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करूं नये ? पण राजा ! तुला कुलोत्पत्ति सांगणारा तो मी श्रेष्ठी नव्हे. मी स्वर्गींचा देव आहें. असें म्हणून देवांनीं आपलें खरें स्वरूप प्रगट केलें. हा अतिशय पाहून राजाला विस्मय वाटला. पुढें देवानें आपलें व मेदजश्रेष्ठींचें पूर्वभवांतर निवेदन केलें. श्रेष्ठी उदास झाला. तो विरक्त बनला. आपल्या श्रीदत्त मुलास संसार सोंपवून राजा वगैरे सर्वांची क्षमा मागितली व श्रीधर्म मुनींजवळ जैनदीक्षा ग्रहण केली. तिलकश्री व कीर्तिसेना वगैरे त्याच्या बत्तीस स्त्रियांनीं सुव्रत मुनी-जवळ अर्जिकेची दीक्षा घेतली. सिंहवाहान भूपानें आपल्या विषय-वाहान मुलास राज्यावर बसवून आपणहि श्रीधर्म मुनीजवळ जाऊन दीक्षा घेतली. नंतर देव स्वर्गास निघून गेले. मेदज मुनी पुष्कळसें तप करून एकलविहारी बनले. कौशंबी नगरींत राजा गंधर्वनीक राज्य करीत होता. त्याच्या राज्यांत अंगारदेव नांवाचा एक मोठा चतुर, कुशल, सोनार राहात असे. मेदज मुनी विहार करीत करीत त्या नगरीस आले. सोनार एक मुगुट तयार करीत होता: त्याजवर जडावाचें काम चाललें होतें. त्याचा आवडता मोर जवळच नाचतबागडत होता. सोनार आपल्या कामांत पूर्ण गुंतला होता. काकता-लिय योग असा त्यावेळीं मुनी आहारासाठीं आले. मुनीना आपल्या दारावर आलेलें पाहतांच सोनार लगबगीनें त्यांना सामोरा गेला व यथाविधि त्यांना पडघावून घेतलें. सोनार या गडबडींत होता. तो मोरानें तेथें पडलेल्या मण्यांपैकीं एक मणि झटकन् गिळला. मुनींचें लक्ष्य तिकडे होतेंच ! पुढें सोनार मणि शोधूं लागला. पण ठेवल्या-जागीं मणि नव्हता. तो मुनीस म्हणाला, 'महाराज इथला मणि आपण पाहिला काय ? मुनी स्वस्थ राहिले. सोनार घाबरून गेला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यानें पुन्हां मुनींना विचारलें महाराज ! मणि राजाचा आहे; मोठा मौल्यवान् आहे. तो न सांपडल्यास माझें जीवित राहणार नाहीं. तरी कृपा करून कोठें आहे तें सांगा ! मुनी कांहींच बोलले नाहींत. सोनाराला त्यांचा राग आला. रागाच्या भरांत त्यानें मुनींना बुक्क्या मारल्या. धक्के दिले. काठीनें मारण्यास सुरुवात केली. पण दैवयोग असा ती कांठी मारतां मारतां मोरावर पडली. त्याच्या तोंडांतून गिळलेलें रत्न बाहेर पडलें. झालेल्या उपसर्गामुळें मुनी आहार न घेतांच बाहेर पडले व देवपाद पर्वतावर आजन्म आहार-त्यागाचा नियम घेऊन, कायोत्सर्गानें ध्यान करूं लागले. ध्यानामुळें त्यांना केवळज्ञान प्राप्त झालें. तेव्हां त्यांना वंदन करण्यासाठीं इतर साधु आले. गंधर्वनीक राजाहि आपल्या प्रजाजनांसह पर्वतावर आला. तिलकश्री वगैरे अर्जिकाहि आल्या. नागदत्ताचा जीव अच्युतेंद्र स्वर्गांतून खालीं आला. सर्वांनीं मुनींना नमस्कार करून, धर्मोपदेश श्रवण केला. नंतर राजानें आपणांस अंगारदेवानें उपसर्ग कां दिला म्हणून विचारिलें. मुनी सांगूं लागले. हा माझा पूर्वजन्मींचा गरुडदत्त नांवाचा पुत्र होय. मी त्याचा बाप स्पटहस्तक होय. नंतर मुनींनीं श्रेष्ठीच्या जन्मापासून आजपर्यंत हकिकत निवेदन केली. ही द्वेषाची कारणपरंपरा ऐकून गंधर्वनीक राजाला आनंद झाला. अंगारगंधानें त्याचवेळीं सर्व परीग्रहाचा त्याग करून संसारार्णव तारिणी दीक्षा घेतली व खडतर तपश्चरण करून समाधिपूर्वक मरून तो अहमिंद्र स्वर्गांत देव झाला. त्याचवेळीं गंधर्वनीक राजानें मेदज केवळिजवळ तपग्रहण केलें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा ९८ वी.

सम्यक्त्वी प्रियंगूतिलका.

शूरसेन देशांतील मथुरा नगरींत राजा उग्रसेन रेवती राणीसह राज्य करीत असे. त्याला दोन मुलें होतीं. पहिल्याचें नांव कंस व दुसऱ्याचें अतिमुक्तक. दोघेहि अत्यंत शूर, प्रतापी, विनयी होते. जिनदत्त राजाचा श्रेष्ठी सम्यक्त्वी श्रावक होता. जिनमती त्याची भार्या प्रेमळ होती. श्रेष्ठीला प्रियंगुतिलका नांवाची एक मुलगी होती. ही स्वभावानें गोड, आचरणानें धर्मवान, जिनभाक्तिपरायण, सम्यक्त्वी होती. सर्व कलांत तिनें प्राविण्य संपादन केलें होतें. हा काल नमि तीर्थंकराचा होय. एकदां वशिष्ठ तापसी साधु मथुरेला आले. यमुनेच्या कांठीं वृक्षाच्या सुंदर छायेखालीं एक मोठी धुनी पेटवून सूर्याकडे तोंड करून, उभे राहिले व पंचाग्नितपाचें ध्यान करूं लागले. अक्षसूत्राचा जप करीत ते फक्त वायु प्राशन करून राहूं लागले. पुढें पेटलेल्या भट्टीच्या तापानें व सूर्याच्या प्रखर उष्णतेनें त्यांच्या अंगाचा भडका उडाला. ते यमुनेच्या डोहांत शिरले. त्या डोहांत पुष्कळसे मासे राहत होते. वशिष्ठ पाण्यांत शिरले तेव्हां पुष्कळसे मासे त्यांच्या जटेंत अडकले. बाहेर आल्यामुळें ते तडफडून मरण पावले. अशा रीतीने ते हिंसात्मक तपश्चरण करीत. त्यांच्या दर्शनासाठीं पुष्कळशा युवती सांजसकाळ येत. पण प्रियंगुतिलका चुकूनहि त्यांच्या दर्शनास गेली नाहीं. यामुळें नगरच्या नारी तिच्याकडे पाहात व आपसांत कुजबुजत. एकदां तर त्यांनीं तिला स्पष्ट विचारलें, वशिष्ठासारखे थोर तपस्वी आले असून तूं एकहि दिवस त्यांच्या दर्शनास आली नाहींस आणि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तूं तर स्वतःला मोठी धर्मवान म्हणवत्येस ! हीच कां तुझी धर्मभक्ति ! प्रियंगुतिलका सर्व जाणून होती. पण ती मुनीविषयीं कांहीं न बोलतां त्यांना म्हणाली, आपण बाई सगळ्या पुण्यवान आहांत. मी परतंत्र आहें. परस्वाधीनतेमुळें कोठेंहि मला जातां येत नाहीं. पाणी आणण्यास बाहेर जातें, पण त्वरेनें घरीं यावें लागतें. सासुरवाशिनीसारखी माझी स्थिति आहे. म्हणूनच मला त्या थोर पुरुषाचें दर्शन घेतां येत नाहीं. आपण धर्माधर्म जाणणाऱ्या विवेकी शाहाण्या आहांत. मी मूर्ख ! म्हणून दर्शनाचें भाग्य माझ्या नाशिबीं नाहीं.

याहि गोष्टीला कांहीं दिवस होऊन गेले. एकदां ती त्या स्त्रियांसह पाण्यासाठीं नदीकांठीं आली. साऱ्याजणींनीं वशिष्ठांना नमस्कार केला. पण प्रियंगुतिलका मुनींच्या तोंडाकडे पाहातच उभी होती. ती नमस्कार करीत नाहीं असें पाहून साऱ्याजणीं तिला हाताशीं धरून मुनीकडे ओढत घेऊन आल्या व म्हणाल्या दुष्टे ! तूं या थोर मुनीचें दर्शन घे ! त्याशिवाय आतां तुझी सुटका नाहीं. आतां प्रियंगुतिलकेला खरें स्वरूप प्रगट केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. ती म्हणाली, या धीवराचे पाय मी कधींहि धरणार नाहीं. तिच्या भाषणानें वशिष्ठाला राग आला. उग्रसेन राजाकडे त्यांनीं आपली तक्रार दाखल केली. राजाहि चिडून गेला. त्यानें द्वारपाळाला तात्काळ जिनदत्तांस पकडून राजसभेंत हजर करण्याचा हुकूम केला. हुकुमाप्रमाणें जिनदत्तास राजापुढें हजर केलें. जिनदत्ताला आपणापुढें पाहून, राजा रागारागानें म्हणाला, तूं साधूंना धीवर म्हटलेंस ! जिनदत्त उत्तरला, राजा ! मी यांना धीवर म्हटलें असेल तर प्रत्यक्ष आपण या मुनींनाच विचारा ! म्हणजे तेच पुरावा देतील ! वशिष्ठाला विचारण्यांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आलें तेव्हां त्यानें त्याच्या मुलीनें—प्रियंगुतिलकेनें—मला धींवर म्हटलें. जिनदत्तानें नाहीं असें सांगितलें. जिनदत्तास जाण्याची परवानगी राजानें दिली. नंतर प्रियंगूस बोलावून आणलें. राजास नमस्कार करून ती जवळच एका आसनावर बसली. तेव्हां राजानें विचारलें, दुष्टे! तूं या मुनींना धीवर म्हटलेंस काय? धीवर म्हटलें असशील तर तुला कडक शिक्षा करावी लागेल. यावर प्रियंगुतिलका उत्तरली, राजन्! मी परस्वाधीन स्त्री आहे. दुःखी दरिद्री आहे. माझी उपजीविका नोकरीवर चालते! मला माझ्या स्वामीच्या घरीं पाणी भरण्यासाठीं रोज नदीवर जावें लागतें. मुनी तेथें तप करीत बसलेले असतात. इतर बऱ्याच स्त्रिया नदीवर जमतात. त्या मुनींना आदरानें वंदन करतात. त्या पुण्यवान् आहेत. मला स्वामीच्या भयामुळें वेळ न गमावतां पाणी घेऊन त्वरेनें परतावें लागतें. मला इतर स्त्रिया वेळोंवेळीं आग्रह करतात. पण मी त्यांना आपण पुण्यवान आहांत, स्वतंत्र आहांत त्यामुळें आपणांस हें दर्शन घडतें. मी अभागी, दरिद्री आहे. पापाच्या उदयामुळें मी पराधीन आहे. असेंच आजपर्यंत उत्तर देत आलें. पण कालचीच गोष्ट! त्या मुळींच ऐकेनात. त्यांनीं मला धरून बळजबरीनें मुनीकडे नेलें. मला त्यांचा राग आला. मी मुनींना वंदन केलें नाहीं. एवढेंच नव्हे तर त्यांना धीवर म्हटलें. आणि धीवराचें वंदन जगांत कुणी केलें आहे? मला यांत मी दोष केला असें मुळींच वाटत नाहीं.

प्रियंगुच्या भाषणानें वशिष्ठ चिडून गेले. ते म्हणाले, दुष्टे! माझा बाप ब्राह्मण जगत्कर्ता होता. त्याचा मी गुणी जेष्ठपुत्र आहें. मी वेदशास्त्रवेत्ता असून अखंड ब्रह्मचारी आहे. केवळ वायु भक्षण करू-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नच मी माझी उपजीविका करतो आणि तूं मला धीवर म्हणतेस! प्रियंगु म्हणाली, 'आपण धीवराची व्याख्या सांगूं शकाल काय? वशिष्ठ उत्तरले, मासे मारतो तो धीवर. हें खरें ना? मग माझें बोलणें खोटें कसें? तुम्हीं नेहमीं मासे मारताच! साधु एकदम खेंकसून म्हणाले, दुष्टे! मला मासे मारणारा म्हणत्येस? मग खोटें आहे? आपण पाण्यांत अध्ययन करून बुडी मारतां त्यावेळीं या अगडबंब जटा-भारानें पुष्कळशा माशांना स्वर्गाची वाट दाखवितां आणि याचें प्रत्यंतर आपणांस पाहावयाचेंच असेल तर आपला हा जटाभार मोकळा करा. जटाभार मोकळा सोडतांच कित्येक मासे त्यांतून खालीं गळून पडले. ते सारे मृत होते. हें दृश्य पाहून राजाला प्रियं-गुतिलकेचा आदर वाटला. आदरानें तिचा सत्कार केला. सर्व लोक आश्चर्यचकित झाले. उग्रसेनानें जिनधर्म स्वीकारला. राजाबरोबर इतर पुष्कळशा लोकांनीं धर्माचा अंगिकार केला. वशिष्ठाला नगरा-बाहेर घालवून दिलें. वशिष्ठ गंगा व गंगावती नदीच्या संगमावर येऊन पंचाग्नितप करूं लागले.

कांहीं दिवसांनंतर वीरभद्र गणधर आपल्या ५०० मुनिशिष्यां-सह त्या संगमावर आले. तापस्याला पाहून, त्यांतून एक तरुण यति गणधरांस म्हणाले, या तपस्याची तपश्चर्या मोठी उग्र दिसते. वीरभद्र उत्तरले, कसलें उग्र तप? याच्या हातून अजून जीववध होतोच! वशिष्ठाच्या कानीं हें वाक्य पडलें. ते म्हणाले, महाराज! विनाका-रण आमची निंदा कां करतां? मी कोणता जीववध केला? माझें तप दोषयुक्त कसें? मुनी उत्तरले, तुझे ज्ञानी गुरु कोणत्या गतीस गेले आहेत? हें तुला सांगतां येईल काय? वशिष्ठ या प्रश्नानें थोडा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चिडला व म्हणाला, माझे गुरु महान् तपस्वी होते. भयंकर तप करून ते ब्रह्मलोकास गेले असून तेथेंच आतां देवाचें आयुष्य ते भोगत आहेत. यावर वीरभद्राचार्य म्हणाले, वशिष्ठा! तुझे गुरु स्वर्गाला गेले नाहींतच पण तिर्यक् योनींत जन्मून सध्यां तुझ्या या जवळच्या धुनीच्याखालीं अर्धदग्ध स्थितींत सर्प होऊन पडले आहेत. वशिष्ठानें लांकडें बाजूस सारलीं तों खरोखरीच एक भुजंग अर्ध-दग्ध स्थितींत पडलेला त्याला दिसला. वशिष्ठ विस्मय पावला. जैन-धर्माचें श्रेष्ठत्व त्यास पटलें. त्यानें तो धर्म अंगिकारण्याचें मनांत ठर-विलें. वीरभद्रानें वशिष्ठाच्या इच्छेवरून त्यास धर्माचें ज्ञान करून दिलें. गुरुपदेशाप्रमाणें तापस धर्माचा त्याग करून, वशिष्ठानें श्रवण-धर्म स्वीकारला. तेव्हां वीरभद्रानें पुढील अध्ययनासाठीं शिवगुप्त मुनीकडे पाठविलें. सहा महिने अध्ययन करून वशिष्ठ शिवगुप्त मुनीच्या आज्ञेवरून गणभद्रमुनीकडे आला. गणभद्रांनीं सहा महि-न्यानंतर त्याला सुमति गुरूकडे पाठविलें. तेथें उत्तम प्रकारचें अध्य-यन करून वशिष्ठ एकलविहारी बनले. फिरत फिरत ते मथुरेजव-ळील गोवर्धन पर्वतावर आले. गोवर्धन पर्वतावर तपश्चर्या करूं लागले. तपानें देवता प्रसन्न झाली व म्हणाली, आपल्या तपानें मी आपणांवर प्रसन्न झाली आहे; आपली कांहीं आज्ञा असल्यास मला सांगावी. "मला तूर्त कशाची गरज नाहीं. पण प्रसंगीं काम पडल्यास तुझी आठवण करीन त्यावेळीं तूं मजजवळ हजर राहावें." असें वशिष्ठानें उत्तर दिलें. तेव्हां त्याचें गुण गात देवता अदृश्य झाली. वशिष्ठानें तापस-धर्माचा त्याग करून, जिनधर्म स्वीकारल्याचें उग्रसेनाला कळलें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुनी मासोपवासानंतर त्याच्या नगरींत आहारासाठीं आले. त्यांना पाहून नगरांत राजानें द्वाही फिरविली, राजाज्ञेशिवाय जो कोणी मुनींना आहार देण्याचा प्रयत्न करील त्याला पंचदंडाची शिक्षा देण्यांत येईल. त्यामुळें मुनी घरावरून गेले, तरी कोणीहि आहारास बोलावलें नाहीं. सर्व नगर फिरून ते राजमंदिराजवळ आले. पण तेथेंहि कोणी लक्ष्य दिलें नाहीं. तेथून ते निघून गोवर्धन गिरीवर आले व महिन्याचा उपवास ग्रहण करून तप करूं लागले. उपवास-समाप्तिनंतर पारण्याच्या दिवशीं त्यांनीं नगरींत प्रवेश केला. पण याहि वेळीं त्यांना भिक्षा मिळाली नाहीं. पुन्हां ते मासोपवासाचें व्रत ग्रहण करून पर्वतावर येऊन राहिले. एक महिना पूर्ण झाला. या-वेळीं ते नगरींत आले असतां एका वृद्धेची व त्यांची गांठ पडली. ती म्हणाली, मुनीवर्या! लोकांना आहार देण्याची पुष्कळशी इच्छा आहे; पण राजाज्ञा नसल्यामुळें कोणीहि आपणांस भिक्षा देण्यास धजत नाहीं. यामुळें वशिष्ठ राजावर रागावला; तो तसाच रागारागानें गोवर्धन पर्वतावर आला. चिंतवन करतांच पूर्वीची देवता प्रगट झाली व तिला म्हणाला, जा! उग्रसेन राजाचा जाऊन खून करून ये.' हें ऐकून देवता आश्चर्यानें स्तंभित होऊन साधूस म्हणाली, आपण नग्न मुनी आहांत! आपल्या अवस्थेला हिंसा करणें उचित नाहीं व तसा उपदेश करणें आपल्याला शोभत नाहीं. नंतर वशिष्ठ म्हणाले, माझ्या पुढील जन्मांत ही आज्ञा तूं पाळ! इकडे रेवतीला गर्भ राहिला. त्यामुळें दिवसेंदिवस रेवती क्षीण होऊं लागली. तिला अशुभ डोहाळे होऊं लागले. तेव्हां राजानें विचारलें, तूं अशी दिवसेंनुदिवस कृश कां बनत चालली आहेस? राणीनें सांगितलें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

महाराज, माझ्या पोटीं गर्भ राहिला असून मला आपल्या हृदयांतील रक्त काढून प्यावें असे डोहाळे होऊं लागले आहेत. राजानें तिच्या प्रेमामुळें ते डोहाळे पुरविले. नऊ मास पूर्ण होतांच तिनें एका सुंदर दीव्य मुलास जन्म दिला. तें मूल जन्मतांच एका रत्नजडित कांबळ्यांत गुंडाळून त्यावर आपलें नांव लिहून तें कंसमंजुकिपेंत बंद केलें व ती पेटी उग्रसेनानें यमुनेच्या प्रवाहांत सोडून दिली. पेटी वाहात वाहात कौशंबी नगरीच्या किनाऱ्याला लागली. पहाटच्या वेळीं कल्पमालि नदीवर आली होती. तिनें ती पेटी पाहिली. नदींतून ती पेटी बाहेर काढली व उघडून पाहिली. तों त्यांत मूल दिसलें. मुलाला पाहातांच तिला अत्यंत आनंद झाला व त्यास घेऊन घरीं आली. कंसपेटींत सांपडल्यामुळें तिनें त्याचें नांव कंस ठेवलें. ती उत्तमप्रकारें त्याचें पालनपोषण करूं लागली. कंस आठ वर्षांचा झाला. तो स्वभावानें अत्यंत भांडखोर खट्याळ निघाला. त्यामुळें रोज कोणाला तरी मारी व भांडण उपस्थित करी. यानें कंटाळून त्यास घराबाहेर हांकलून दिलें. कंस तिथून सूरिका नगरीस आला. वसुदेवाच्या उपदेशावरून त्यानें शस्त्रविद्येचें अध्ययन केलें व त्यांत त्यानें प्राविण्य संपादन केलें.

मगध प्रांतांतील राजगृही नगरींत राजा जरासंध राज्य करीत असे. जरासंध अर्धचक्रवर्ती होता. त्याची राणी कलिंगयशा. त्यांना जीवंयशा नांवाची कन्या होती. एकदां एका विख्यात ज्योतिषानें तिचा हात पाहून असें भाकित केलें कीं, हे राजा ! जो कोणी पोदनपुरच्या सिंहरथ राजाला बांधून आणील त्यास तूं आपली ही कन्या दे ! जरासंधानें तसें जाहिर केलें. समुद्रविजयानें आपलें सैन्य

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

देऊन वसुदेवाला त्यास पकडण्यास पाठविलें. कंस वसुदेवाचा सारथि होता. वसुदेव आपल्या सैन्यानिशीं पोदनपुरीस आला. दोघांत भयंकर युद्ध जुंपलें. वसुदेवानें कंसाला सिंहसेनास पकडून आणण्याची आज्ञा दिली. कंसानें त्यास मोठ्या प्रयत्नानें धरून आणून, वसुदेवापुढें हजर केलें. वसुदेव कंसासह सिंहसेनाला घेऊन जरासंधाकडे आला. वसुदेवाच्या तोंडून सर्व हकिकत ऐकून जरासंधानें कंसास त्याच्या आईबापांची माहिती विचारली. कंस म्हणाला, कौशंबी नगरींत सौलो गंगट राहातो त्याची भार्या रजोदरी. त्यांचा मी पुत्र. माझें नांव कंस. मी सर्व शस्त्रशास्त्रांत निपुण आहे. नंतर जरासंधानें मनुष्य पाठवून, रजोदरीस आणवून घेतलें. रजोदरीनें निघतांना आपल्या बरोबर ती पेटी, रत्नकांबळी व मुद्रीका घेतली होती. जरासंधानें रजोदरीस विचारलें, हा तुझा मुलगा कंस काय ? ती उत्तरली राजा ! हा मुलगा माझा नाहीं. मला या पेटींत हा सांपडला. जरासंधानें ती पेटी उघडून पाहिली. त्यांतली रत्नजडीत कांबळी घेऊन निरखून पाहिली, तों त्यावर एका बाजूला उग्रसेन हीं अक्षरें होतीं. नंतर तो कंसाला म्हणाला, कंसा ! तूं या स्त्रीचा मुलगा नसून माझा भाचा आहेस ! जरासंधानें मोठ्या आनंदानें जीवंयशेशीं त्याचें लग्न लावून दिलें व मथुरेचें राज्य दिलें.

मथुरेंत आल्यानंतर कंसानें उग्रसेनाबरोबर युद्ध करून त्यास गोपूरद्वारांत कोंडून ठेवलें व त्यास एका उथळ भांड्यांत कोद्र धान्याची कांजी करून खाण्यास देऊं लागला. हा अपमान सहन न झाल्यामुळें त्याचा मुलगा अतिमुक्तकानें जिनदीक्षा ग्रहण केली. तेव्हां कंसानें उग्रसेनास मुक्त करून राजवाड्यांत आणून ठेवलें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मित्रवती नगरींत त्यावेळीं देवकी राजा राज्य करीत होता. कंसाविषयीं त्याला मोठा आदर वाटे. त्याची राणी धनदेवी व मुलगी देवकी होती. देवकी रूपलावण्यसुंदर होती. कंसाच्या सांगण्यावरून वसुदेवाशीं देवकीचें त्यानें लग्न लावून दिलें. देवकी पुढें रजःस्वला झाली. त्या प्रसंगीं मोठा उत्सव करण्यांत आला. सुंदर वस्त्रें परिधान करून जीवंयशा नृत्य करूं लागली. साऱ्या नगरींत उत्सव मानण्यांत आला. त्यावेळीं आहारासाठीं अतिमुक्तक मुनि राजरस्त्यानें जात होते. त्यांना पाहून जीवंयशा हंसून म्हणाली, भावोजी! देवकीचा ऋतुस्नानाचा हा उत्सव चालला आहे. आपण यांत सामील व्हा व मजबरोबर नृत्य करूं लागा. अतिमुक्तक उत्तरले, मुनींना नाच शोभत नाहीं. तूंच आनंदानें नाच! पण जीवंयशा त्यांना नाचण्याविषयीं आग्रह करूं लागली त्यामुळें मुनींनीं रागावून तिला शाप दिला कीं, जीवंयशा! तूं जिच्यासाठीं हा उत्सव करून नाचत आहेस! तिच्या पोटीं जन्मणारा पुत्र तुझ्या पतीचा वध करील! शाप ऐकतांच तिनें मुनींच्यापुढें आपलीं वस्त्रें जोरानें आपटलीं. तेव्हां त्यांनीं आणखी एक शाप दिला. तुझ्या नवऱ्यास ठार करील एवढेंच नव्हे तर तुझे पिताश्री जरासंधानाहि तो ठार करील! हा शाप ऐकतांच तिनें रागानें पुन्हां तीं वस्त्रें पायांखालीं तुडवून मुनीवर फेंकलीं. तेव्हां मुनींनीं तुझ्या कुलाचा हा देवकीनंदन सर्वस्वीं नाश करून, राजा बनेल. असा तिसरा शाप दिला व परत वनांत निघून गेले.

जीवंयशेनें घडलेला प्रकार कंसास निवेदन केला. तो भीतीनें घाबरून गेला. पण बाहेर कांहीं न दाखवितां शांत राहिला. नंतर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यानें एक युक्ति योजिली. 'तो वसुदेवाकडे आला व म्हणाला, देवकीची प्रसूति माझे येथें करावी. अशी माझी इच्छा आहे. वसुदेवानें कबूल केलें व तसें वचन दिल. पुढें वसुदेवास मुनींच्या शापाची हकिकत कळली. तो देवकीसह अतिमुक्तक मुनीकडे आला वं मुनींना म्हणाला, महाराज, माझा मुलगा कंसाचा व जरासंधाचा वध करील ? मग ह्या पृथ्वीमंडळाचें रक्षण कोण करील ? देवकी एका आंब्याच्या डाहाळीला धरून उभी होती. डाहाळी एकाएकीं हातांतून निसटली त्यामुळें झाडावरून आंब्याच्या तीन जोडया व सुटे आंबे दोन असे आठ आंबे खाली पडले. हें पाहून मुनी वसुदेवास म्हणाले, देवकीच्या पोटीं अष्टपुत्र होतील. प्रथम तीन वेळीं आवळीजावळीं मुलें होतील. ती दीक्षा घेऊन मोक्षास जातील ! सातवा मोठा गुणी निघेल ! व आठवा वासुदेव म्हणून जगांत ओळखला जाईल. आणि हाच जरासंधाचा व कंसाचा वध करून जगत्पति बनेल ! नंतर मुनींना वंदन करून देवकीसह वसुदेव घरीं परतले. अतिमुक्तक मुनी विहार करीत करीत दूर देशीं निघून गेले. कंसानें वसुदेवदेवकीना आपल्या घरीं सन्मानानें आणवून घेतलें. पुढें देवकी प्रसूत होऊन तिनें दोन मुलांस जन्म दिला. भाद्रिका नगरींत सुप्रतिष्ठित श्रेष्ठी राहात असे. त्याची भार्या आयाळा अत्यंत सुंदर गुणी होती. ती याचवेळीं प्रसूत झाली व तिला दोन मुलें झालीं, पण तीं जन्मतांच मेलीं. पण देवांनीं तीं मुलें देवकीच्या प्रसूतिगृहांत आणून ठेवलीं व देवकीचीं मुलें आयाळाच्या घरांत आणून ठेवलीं. सकाळीं तीं मुलें मेल्याची खबर कंसाला कळली. त्यास आनंद झाला. पुढें अशी देवकीला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चार मुलें झालीं. तीं सारीं मुलें आयाळानें सांभाळलीं. त्यांचीं—देवदत्त, देवपालित, मुनीदत्त, मुनीपालित, शत्रुन्घ व जितशत्रु हीं नांवें होत. देवकीनें आठव्या मुलास रात्रीला जन्म दिला. देवतेच्या मदतीनें वसुदेव मुलास घेऊन गोकुळांत आला. गोकुळांत नंद नांवाचा अधिपति राहात असे. त्याची भार्या यशोदा. ती प्रसूतिसाठीं माहेरीं गेली होती. कर्मधर्मसंयोगानें तिला मुलगी झाली. सर्वांची इच्छा तिला मुलगा व्हावा अशी होती. त्यामुळें ते देवीवर अत्यंत रागावले व देवीपुढें नेऊन ती मुलगी आदळली. वसुदेवहि तेथेंच होते. त्यांनीं चटकन् अदलावदल केली व परत आले. सकाळीं कंसास मुलगी झाल्याची बातमी पाठविली. कंसाची भीति दूर झाली. त्यानें तिला ठार करण्याचा नाद सोडून दिला. पुढें मुलगी तारूण्यांत आली. तिनें जिनधर्माचा अंगिकार करून, सुव्रत मुनीजवळ दीक्षा घेतली. एकदां ती संघासह फिरत फिरत विंध्य पर्वताच्या पायथ्याशीं आली. तेथील भिल्लांचें विद्रुप व धिप्पाड रूप पाहून, तिला भीति वाटली व कायोत्सर्गानें ती ध्यान करूं लागली. भिल्ल तिला देवी समजून तिची पूजा करूं लागले. पुष्कळसें धन लुटून चोरून आणून, तिच्या चरणीं वाहूं लागले. एकदां व्यापाऱ्यांचा तांडा त्या अरण्यांतून चालला होता. त्यांना लुटून त्यांची सर्व संपत्ति घेऊन भिल्ल देवीकडे आले. पण देवी सिंहाच्या भक्षस्थानीं पडलेली होती. तेव्हां भिल्लांनीं तिचीं तीन बोटें कापून एका उंच ठिकाणीं नेऊन स्थापलीं. व तिच्यापुढें मोठमोठ्यानें ओरडून वेडींवांकडीं गाणीं गाऊन नाचूं लागले. नंतर तीं अंगुलें तेथून विंध्य पर्वतावर आणून स्थापलीं व दुर्गादेवी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म्हणून तिला वंदूं लागले. याच देवीला पुढें लोक विंध्यवासिनी व दुर्गादेवी या नांवानें ओळखूं लागले. व भजूं लागले. तिच्यापुढें नानाप्रकारची हिंसा होऊं लागली.

इकडे कृष्ण यशोदेच्या घरीं वाढूं लागला. कंसाच्या घरीं एक मोठा उत्पात झाला. तो पाहून कंसाला मोठी भीति वाटली. त्यानें नैमित्यिक शकुनिला विचारलें, हा उत्पात कशामुळें झाला ? तेव्हां शकुनि म्हणाले, कंसा ! तुझा शत्रु नंदाच्या घरीं वाढूं लागला आहे. कंसाला मोठी काळजी उत्पन्न झाली. त्यानें पूर्वजन्मीं प्रसन्न झालेल्या देवीचें चिंतवन केलें. तात्काळ ती त्याच्यापुढें प्रगट झाली व म्हणाली, ‘ काय आज्ञा आहे ? कंस म्हणाला जा ! ’ “ नंदाच्या गोठ्यांत माझा शत्रू आहे त्यास ठार करून ये. ” पण देवीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ती कृष्णाच्या हातून मरण पावली. पुढें कंसाचें व कृष्णाचें युद्ध झालें. त्यांत कंस मारला गेला. तेव्हां वसुदेवानें उग्रसेनाला पुन्हां आपल्या राज्यावर बसविलें.

कथा ९९ वी.

अवंति देशांतील उज्जयनी नगरींत श्रेष्ठी सागरदत्त आपल्या सागरदत्ता प्रियेसह राहात असे. अत्यंत दारिद्र्यानें पीडिल्यामुळें तो धन मिळविण्यासाठीं सिंहलद्वीपास गेला. तेथें व्यापार करून त्यानें एक अनर्घ्य मणी प्राप्त करून घेतला व आपल्या नगरीस परत येण्यास निघाला. रस्त्यांत एका सरोवराच्या कांठीं पाणी पिण्यापूर्वीं तो मणी कांठांवर ठेवला. निघतांना मण्याची आठवण त्यास राहिली

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाहीं. तो तसाच घरीं परत आला. जवळच एक गरीब शेतकरी नांगरीत होता. त्यानें तो दिव्य मणी पाहिला. त्यानें तो घेतला. पण मण्याची किंमत न कळाल्यामुळें दगडानें त्याचा चुरा केला व आपल्या पदरांत बांधला. पुढें श्रेष्ठीला मण्याची आठवण झाली. तो परत त्या ठिकाणीं आला. मणी शोधतां त्यास सांपडेना. त्यानें शेतकऱ्यास विचारलें. शेतकऱ्यानें मणी घेऊन चुरा केल्याचें सांगितलें. तो चुरा पाहून तो शेतकऱ्यास म्हणाला चुरा केलास ती जागा मला दाखीव. शेतकऱ्यानें ती जागा दाखविली. नंतर तो शेतकऱ्यास म्हणाला; तुला कधीं पैशाची गरज पडली तर हा मण्याचा चुरा राजवाड्यांत नेऊन वीक. म्हणजे तुला पुष्कळसें द्रव्य मिळेल. धनाशिवाय मी कोणासहि विकणार नाहीं अशी तूं शपथ वाहा. तशी शेतकऱ्याकडून शपथ घेऊन उरलेला चुरा घेऊन घरीं परत आला. त्यानें तो चुरा सर्व बाजारांत दाखविला. पण कोणीहि त्यास विकत घेईना. शेवटीं तो राजाकडे आला. राजानें तो चुरा घेऊन त्यास पुष्कळसें धन दिलें.

कथा १०० वी.

" राणी – रुक्मिणी "

मगध देशांतील लक्ष्मी ग्रामांत वेदविद्यावेदज्ञ सोमदत्त ब्राह्मण राहात असे. त्याची भार्या लक्ष्मीवति अत्यंत लावण्यसंपन्न होती. आपल्या रूपाचा तिला मोठा गर्व असे. सदासर्वदा ती आपला काळ श्रृंगार करण्यांत घालवी. कांहीं दिवस सुखांत गेले. एके दिवशीं आपल्या उपवासाचें पारणें सोडण्यासाठीं एक मुनी त्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गांवांत आले. त्यांच नांव समाधिगुप्त होते. फिरत फिरत ते लक्ष्मीमतीच्या घरासमोर आले. मुनींना पाहून सोमदत्त म्हणाला, 'ऊठ, मुनी दाराशीं आले आहेत, त्यांना भक्तिभावानें आहारदान दे. एवढें म्हणून तो बाहेर आला. लक्ष्मीमति आरशांत बघून आपला शरीरशृंगार करूं लागली. मुनीचें प्रतिबिंब आरशांत पडलेलें पाहून, तिनें त्यांची निंदा केली व घराचें दार बंद करून घेतलें. तिच्या या पापकर्मामुळें पुढें सातच दिवसांनीं तिला उंबरकुष्ट झाला. सोमदत्तानें घराबाहेर घालवून दिलें. रोगाच्या भयंकर वेदनेमुळें जीवाला कंटाळून तिनें ज्वालोद्योतींत पुष्करांत पडून जीव दिला. मरून त्याच गांवांतील गंगभट रजकाच्या (लोणाऱ्याच्या) गर्दभीच्या पोटीं जन्मली. मातेचें दूध न मिळाल्यामुळें ती जन्मतांच मरण पावली. त्याच वनांत पुढें गंधडुकरी झाली. तीहि मरून कुत्री झाली. कुत्री रानावनांत भटकत असतां दावानलांत सांपडून मरण पावली.

लाट देशांत मोडणाऱ्या भृगुकच्छ नगराजवळील नर्मदाकांठीं वसलेल्या बलगांवांत निविशिंद धीवर राहात असे. त्याची बायको मंडुकी मोठी कजाग दुष्ट होती. तिच्या पोटीं त्या कुत्रीनें जन्म घेतला. ती रूपानें हिडिस, शरीरानें दुर्बळ जन्मली. तिच्या अंगाचा एक प्रकारचा दुर्गंध येत असे. त्यामुळें आईबापांना तिचा तिरस्कार वाटूं लागला. नर्मदा तीरांवर एका झोपडींत आणून सोडलें. तेव्हां लोकांना या तीरांवरून पलिकडच्या तीरावर पोंचविण्याचें ती काम करी व मिळणाऱ्या मोबदल्यानें आपली उपजीविका चालवी. कांहीं दिवस असे निघून गेले. एकदां विहार करीत समाधिगुप्त मुनी नर्मदातीरीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आले. दिवस हिंवाळ्याचे होते. त्यांच्या शरीरावर कांहींहि वस्त्र नाहीं हें पाहून तिला दया आली. त्याच्यापुढें तिनें जाळ केला. मुनी धर्मध्यानांत होते. समाधि उतरल्यानंतर मुनीनें तिला धर्माचा उपदेश केला. तो ऐकून तिनें आपलें पूर्वभवांतर विचारलें. त्यामुळें तिला जातिस्मरण झालें. तिनें क्षुल्लिकेची दीक्षा घेतली. मुनीनीं धर्मश्री आर्जिकेजवळ राहण्यास सांगितलें. त्या दोन्ही आर्जिका विहार करीत करीत मगध देशांतील सोपारय गांवाला आल्या. तेथें नापिल्य श्राविकेजवळ त्या क्षुल्लकीला आर्जिकेनें ठेवलें. श्राविकेच्या आज्ञेनुसार जिनमंदिरांत ती राहूं लागली. बारा वर्षेपर्यंत उत्तम प्रकारें तप करून ती समाधिमरणानें अच्युत स्वर्गांत अच्युतेंद्राची इंद्राणी झाली.

या भरतक्षेत्रांतील विदर्भ प्रांतांत मोडणाऱ्या कुंडिनपुरांत राजा भीष्म राज्य करीत होता त्याच्या यशोमती राणीच्या पोटीं अच्युत स्वर्गांतून च्यवून लक्ष्मीमतीच्या जीवानें जन्म घेतला. तिचें नांव रुक्मिणी ठेवण्यांत आलें.

एकदां नारद सत्यभामेच्या घरीं आले. सत्यभामा रत्नजडित सिंहासनावर बसून आपलें तोंड आरशांत न्याहाळून पाहात होती. नारदाकडे एकदांच तिनें दृष्टि वर करून पाहिलें. व पुन्हां आपल्याच कामांत गुंग झाली. नारदाला याचा राग आला. ते आल्यापावलीं परत फिरले. त्यांना अपमानाचें शल्य सारखें बोचित होतें. त्यांनीं तिची खोड मोडण्याचा विचार केला. आणि ही खोड सवतीनेंच मोडण्यासारखी आहे; कारण सवतीच्या दुःखासारखें दुसरें कोणतेंच दुःख जाणवत नाहीं. तेव्हां रुक्मिणीचा कृष्णाशीं विवाह

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करावा म्हणजे आपल्या अपमानाचा सूड परभारेंच उगवला जाईल. नंतर ते रुक्मिणीच्या घरीं आले. रुक्मिणीनें मोठ्या आदरानें त्यांना सिंहासनावर बसविलें. इकडच्या तिकडच्या गोष्टी करीत नारदानीं विष्णूचें चित्र तिला दाखविलें. तो मदनपुत्र पाहून तिला मूर्च्छा आली. शुद्धीवर आल्यानंतर तिनें नारदास विचारलें महाराज ? हा चिटपट कोणाचा ? या दीव्यदेहधारी जीवाचें नांव काय ? नारदानें अनुकूल वातावरण पाहून, विष्णूची माहिती दिली. व त्याच्या गुणाचें, रूपाचें, यथेच्छ वर्णन केलें. रुक्मिणीला अति आनंद झाला. ती नारदास पुन्हां म्हणाली, माघ महिन्याच्या शुद्ध पंचमीस मी माधवी वनांत वंदन करण्यास जाणार आहे. आपण तेथें विष्णूंना घेऊन यावें म्हणजे माझी त्यांची भेट होईल.

नारद तेथून निघाले ते विष्णूकडे आले. नारदांना पाहतांच विष्णु त्यांना सामोरे गेले. व भक्तिपुरःस्सर वंदन करून त्यांना उच्चासनावर बसविलें. कुशल प्रश्नोत्तरानंतर नारदानें रुक्मिणीचा चित्रपट विष्णूस दाखविला. विष्णु चित्रपट पाहून मूर्च्छित झाला. शुद्धीवर आल्यानंतर चित्रपटाची माहिती नारदास विचारली. नारद म्हणाले ही भीष्माची कन्या होय. हिचें नांव रुक्मिणी. आपण कुंडनपुरास येत असाल तर आपला कार्यभाग होईल. तेव्हां विष्णु, बलदेव व नारद तिघेहि कामुक विमानांत बसून, माधवी वनांत आले. ठरल्याप्रमाणें रुक्मिणी पूजेसाठीं आपल्या दासदासीसह आली होती. नारदानें विष्णूची व रुक्मिणीची भेट घालून दिली. एकमेकांना पाहतांच एकमेकांविषयीं आदर उत्पन्न झाला. आदराचें रूपांतर प्रेमांत झालें. नंतर रुक्मिणीसह वसुदेव द्वारकेकडे जाण्यास निघाले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निघतांना रुक्मिणीस हरण करून, जात आहेत; अशा प्रकारची घोषणा केली. हा पांचजन्य ऐकून भीष्म, रुक्मी व शिशुपाल यांना राग आला. ते आपल्या चतुरंग सैन्यासह द्वारकेवर चाल करून आले. आपले पिताश्री लढाईच्या तयारीनें आलेले पाहून, रुक्मिणी विष्णूस म्हणाली ' माझ्यासाठीं पुष्कळशा जीवांची हिंसा होणार ! वडिलांच्या बाहुबलांपुढें, त्यांच्या अफाट सैन्यापुढें आपला टिकाव कसा लागणार ? विष्णू उत्तरले, प्रिये ! घाबरूं नकोस. माझ्या शक्तिची तुला कल्पना नाहीं. हें पाहा ! असें म्हणून त्यांनीं आपल्या हातांतील वज्रमुद्रिका दाबून तिचा चक्काचूर केला. हें अलोट सामर्थ्य पाहून रुक्मिणी विष्णूस म्हणाली, आपण माझ्या वडलांस व भावांस सोडून शिशुपालादि सैन्यांचा पाहिजे तर नाश करावा. याप्रमाणें त्यांचें बोलणें चाललें आहे; तोंच शत्रूचें सैन्य जवळ येऊन भिडलें. तेव्हां जनार्दन नारदांसह रुक्मीस विमानांत बसवून, तो बलदेवांसह रथांतून खालीं उतरला. त्यास पाहतांच शिशुपाल रागानें म्हणाला, 'भ्याडा ! पळून जाऊं नकोस ! युद्धाला तयार हो ! विष्णुनींहि प्रत्युत्तर दिलें. तेव्हां शिशुपालानीं मुंच्यास्त्र सोडलें. त्यामुळें हरीचें सर्व सैन्य रणांगणांत पडलें. तेव्हां केशव बल-देवांनीं त्याच्यावर उद्योतास्त्र सोडून जिकडे तिकडे अंधःकार केला. तो अंधार नाहिसा करून त्यांच्यावर शिशुपालानें दहनास्त्र सोडलें. त्याला रोधक म्हणून विष्णुनें वाराणास्त्र सोडलें. नंतर शिशुपालानें बापाच्या सहाय्यानें भयंकर विषारी सर्प त्यांच्यावर सोडले. उलट विष्णूनें अस्त्रांच्या सहाय्यानें गरूड उत्पन्न केले. गरूडांनीं सर्व सर्प मारून टाकले. शेवटीं विष्णूनें चक्र सोडलें. चक्रानें शिशुपालाचें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शीर उडविलें. इकडे बलदेवानें भीष्म व रुक्मिला नागपाशानें बांधून आणलें. शिशुपाल पडलेला व भीष्म रुक्मी पकडले गेलेले पाहून सर्व सैन्य सैरांवैरा पळूं लागले. विष्णूचा जय झाला. त्याच्या नांवाचा जयजयकार करण्यांत आला. नंतर विष्णु, नारद, रुक्मिणी व बलदेव द्वारकेस आले. शुभ मुहूर्तावर रुक्मिणीचें विष्णूशीं लग्न झालें. रुक्मिणी आवडती विष्णूची होती. त्यानें तिला पट्टराणी बनविलें. रुक्मिणीच्या सहवासांत कृष्ण आपला काळ घालवूं लागले. सत्यभामेकडे ते कधींहि ढुंकून पाहिनात. भीष्म रुक्मि तेथें थोडा काळ राहून, कुंडनपुरास परत आले. विष्णू बलभद्राचा निरोप घेऊन नारद सत्यभामेच्या महालांत आले. नारदांना पाहून तिनें उठून आदरानें त्यांना उच्चासनांवर बसविलें. तेव्हां नारद म्हणाले, ' पहा ! अभिमानी स्त्रिये ! रुक्मीणी माझ्या प्रसादानें आनंदांत आहे. तूं अशीच पापांत दुःखात राहा ! पुढें रुक्मिणीनें संमयश्री मुनीजवळ दीक्षा घेतली. उत्तम प्रकारें तप आचरून तीर्थंकर गोत्र बांधून, स्त्रीत्वाचा छेद करून, ती स्वर्गांत देव झाली. देवलोकांतून पुन्हां मानवजन्म धारण करून विविध प्रकारचें तपश्चरण करून शेवटीं अव्याबाध सुखाची निर्वाणाची प्राप्ती करून घेतली.

कथा १०१ वी.

" संभूति-मुनि. "

वाराणसी नगरींत सुषेण नांवांचा एक दरिद्री शेतकरी राहात असे. त्याची भार्या गंधारी अति सुंदर होती. त्यांना चित्त व संभूत नांवांचीं दोन मुलें होतीं. दोन्हींहि मुलें मोठी सुशील होती. आपला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मूळ धंदा सोडून ते गायन नर्तन करूं लागले. त्यांचा आवाज अत्यंत मधूर होता. एकदां राजगृहीस आले. नर्तकीच्या वेषांत ते नाचत असतां संभूताचें सौंदर्य पाहून सुशर्मा पुरोहित त्याचेवर आषक झाला. पण ही स्त्री नसून पुरुष आहे; असें कळून येतांच त्यास अत्यंत दुःख झालें. त्याचें कलाप्रेम नष्ट झालें. त्यानें आपली बहीण लक्ष्मीमति त्यास दिली. कांहीं दिवसांनीं संभूतीचें कुलगोत्र त्यास कळलें. नंतर ते बंधू पाटलिपुत्रांस आले. रात्रीच्या वेळीं स्त्री वेषांत त्यांनीं कौमुदीमहोत्सवांत नाच केला. पण पहाटे त्याच्या मिशा-वरून ते पुरुष आहेत, असें लोकांना कळून आले. तेव्हां त्यांनीं धिःकारून हांकलून दिले. तेथून ते काशीस आले. गुरुदत्त मुनीजवळ जिनधर्माचें श्रवण करून, त्यांनीं दिगंबरी दीक्षा घेतली. आगमाचें अध्ययन करून त्यांत प्राविण्य संपादन केलें. पुढें ते विहार करीत राजगृही नगरीस आले. मासोपवासानंतर पारण्यासाठीं संभूति मुनी नगरींत प्रवेश करते झाले. आहारासाठीं फिरत असतां सुशर्मा ब्राह्म-णांस पाहिलें, त्याला पाहतांच मुनी घाबरून गेले. व भीतीनें पळत सुटले. पळत असतां त्यांचें मुखांतून अग्निज्वाळा चहूंकडे पसरूं लागल्या. हा वृत्तांत चित्रमुनींना कळला. त्यानें येऊन तें संकट निवारण केलें. हे माहात्म्य पाहून सुशर्मा पळून गेला. तेव्हां देवतेनें चक्रीचें रूप घेऊन, मुनीची सेवा केली. तें चक्रीचें रूप पाहून मुनीनीं माझ्या तपाचें जर कांहीं माहात्म्य शिल्लक असेल तर मला पुढील जन्मीं चक्रवर्तीपद मिळेल असें निदान बांधलें. ते मरून सौधर्म स्वर्गांत महर्द्धिक देव झाले.

भरतक्षेत्रांत पंचाळ नांवाचा एक मोठा देश आहे. त्या देशां-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तील कांपिल्य नगरींत राजा ब्रह्म राज्य करीत होता. राजराणी वनदेवीच्या पोटीं स्वर्गांतून च्यवून मुनीच्या जीवानें जन्म घेतला. त्याचें नांव ब्रह्मदत्त ठेवण्यांत आलें. सुवर्ण शर्मा ब्राह्मण संसार सागरांत भटकत भटकत ब्रम्हदत्ताचा स्वयंपाकी होऊन जन्मला. ब्रह्मदत्त चक्रवर्ती झाले. एके दिवशींची गोष्ट. ब्रह्मदत्तांना अत्यंत भूक लागली होती. स्वयंपाक्यानें गडबडींत त्यांच्या ताटांत गरमागरम खीर वाढली. गरम असल्यामुळें राजाचा हात भाजला. राजानें रागाच्या भरांत तें ताट उचलून, त्याच्या डोक्यांवर मारलें. त्यांत तो स्वयंपाकी मरून, लवण समुद्रांत वराक देव झाला. आपलें पूर्व जन्मींचें वैर आठवून त्यानें तपस्व्याचा वेष घेतला. बरोबर उत्तमोत्तम फळें घेऊन, तो ब्रह्मदत्तांकडे आला. ब्रह्मदत्त फळाच्या आशेनें त्याचे बरोबर आला. तेव्हां त्या वराकानें उचलून त्यास समुद्रांत फेंकून दिलें. ब्रह्मदत्त मरून सातव्या नरकास गेला.

कथा १०२ वी.

मानी पुष्पदंता.

भरत क्षेत्रांतील जिनधाम नगरींत राजा पुष्पचूल आपल्या पुष्पदंता राणीसह राज्य करीत होता. पंडिता, तिची दासी अत्यंत सुंदर, कलाकौशल्यसंपन्न गुणी, रूपवान होती. एकदां विहार करीत करीत आपल्या संघासह अमरप्रभ योगेंद्र या नगरीच्या उद्यानांत येऊन उतरले. मुनी आल्याची वार्ता कळतांच राजा पुष्पचूल आपल्या परिवारांसह मुनीवंदनेस गेला. मुनी मुखांतून धर्मश्रवण करून राजानें दीक्षा घेतली. पुष्पदंतेनें आपल्या पंडिता दासीसह वंभीलगणिनी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अर्जिकेजवळ दीक्षा घेतली. पुष्पदंता मोठी गर्विष्ठ, कुलाऐश्वर्य मदोन्मत्त होती. त्यामुळें तिला लोकांनीं आपणांस वंदन करावें, आर्जिकांनीं पूजावें अशी इच्छा होई. पण कोणी चुकूनहि तिची पूजा करीत नसे; आपणांला लोकांनीं वंदन करावें या हेतूंनीं ती आपल्या शरिराला सुगंधी द्रव्यें लावून, सुगंधित बनवूं लागली. ही गोष्ट वरिष्ठ आर्जिकेला समजली. तिनें आपणांस या वृत्तींत सुगंधित द्रव्यें लावणें वगैरे गोष्टी उचित नाहींत असें सांगितलें. तेव्हां पुष्पदंता अर्जिका म्हणाली, माझें शरीर मूळतःच सुगंधी सुंदर आहे. मी कधींहि सुगंधी पदार्थ लावीत नाहीं. कारण अशा पुष्कळ स्त्रियांचीं शरिरें सुगंधित असतात. मला एक गोष्ट माहित आहे. ती आपणांस सांगते असें म्हणून तिनें एक सौधर्म स्वर्गांतून च्यवून, जन्माला येणाऱ्या एका दासीचीं स्वकपोलकल्पित गोष्ट सांगण्यास सुरवात केली.

" या भरत क्षेत्रांत चंपानगरींत श्रेष्ठी सागरदत्त आपल्या धनश्री स्त्रीसह राहात असे. एदका ती सौधर्म स्वर्गांतून च्यवून, धनश्रीच्या पोटीं जन्मली. तिचें नांव धनमित्रा होतें. त्या धनमित्रेची मी दासी. माझें नांव पूतिगंधा होतें. एकदां सागरदत्तानें एका नैमित्तिकाला विचारलें. धनमित्रेला कोणता वर मिळेल ? नैमित्तिकानें सांगितलें. श्रेष्ठिवर्या ! तुझ्या बागेंत एक मनुष्य येईल; त्याची तुझी भेट होतांच तुला एक लक्ष दिनारांची प्राप्ती होईल. व ही पूतिगंधा सुगंधयुक्त शरीराची बनेल. त्याचा राजाकडून सन्मान होईल. आणि तोच तुझ्या मुलीला वरील. तेव्हांपासून सागरदत्तानें रोज बागेंत जाऊन तसा मनुष्य शोध करण्याचा परिपाठ ठेवला. कांहीं दिवस निघून गेले. राजा वसुदेव सहज सागरदत्ताच्या बागेंत आला. सागर-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दत्ताची व त्याची भेट होतांच सागरदत्ताला एक लक्ष दिनारांचा लाभ झाला. व माझें शरीर सुगंधित बनलें. सागरदत्तानें धनमित्रेचें वसु-देवांशीं लग्न लावलें.

कथा १०३ वी.

" ऋषभपुत्र मरीची "

पुष्पलावती देशांत मधुवन नांवाचें एक अत्यंत सुंदर वन होतें. त्या वनांत पुरवा नांवाचा एक म्लेंच्छ राहात असे. तो स्वभावानें प्रेमळ आनंदी होता. एकदां समाधिगुप्त साधु रस्ता चुकल्यामुळें भटकत भटकत त्या वनांत आले. ते श्रमानें अंगदीं थकून गेले होते. पुरुरवाची व त्यांची भेट झाली. पुरुरवानें मुनीना योग्य रस्ता दाखविला. मुनींना आनंद वाटला. ते दयेनें प्रेरित होऊन म्हणाले, भद्रा ! या अरण्यांतून शहरांत जाण्याचा मला तूं मार्ग दाखविलास, पण आतां मी तुला या भवाटवीतून तरून जाण्याचा मुख्य मार्ग सांगतो तो ऐक ! नंतर साधुनीं श्रावकधर्माचा, मुनीधर्माचा त्यास उपदेश केला. पुरुरव्यानें सम्यक्त्वपूर्वक गृहस्थधर्माचा मुनीजवळ स्वीकार केला. श्रावकधर्माचें पालन करीत तो मरून, सौधर्म स्वर्गांत देव झाला. तेथील एक सागराचे आयुष्य भोगून, भरतचक्रवर्तीच्या धारणी स्त्रीच्या पोटीं मरीची नांवानें जन्मला. मरीचीनें दीक्षा घेऊन, सांख्यधर्माचें दिग्दर्शन केलें. त्या मिथ्यात्वामुळें तो नाना योनींतून भटकत भटकत शेवटीं महावीर तीर्थंकर होऊन जन्मास आला.

कथा १०४ वी.

" कुलाभिमानी—भुजंग. "

फार प्राचीन काळीं उज्जयनी नगरींत राजा सूरसेन आपल्या सूर-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सेना राणीसह राज्य करीत होता. त्याला सूरवीर नांवाचा एक सर्व-कलासंपन्न, गुणवान पुत्र होता. सूरवीराला विषाची बाधा जडली. ती दूर करण्यासाठीं राजानें पुष्कळशा नामांकित वैद्यांना संग्रहीं ठेवलें. आपल्या मुलाच्या कल्याणासाठीं त्यांचा यथायोग्य आदर सत्कार करीत असे. त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था उत्तम ठेवीत असे. एकदां सूरवीर राजवाड्याच्या गच्चीवर बसला असतां एक भयंकर भुजंग त्यास डसला. त्याच्या विषानें राजपुत्र बेशुद्ध होऊन पडला. राजानें सर्व वैद्यांना बोलावणें पाठविलें. सर्वांनीं मुलाची स्थिति पाहिली. तेव्हां त्यापैकीं सोमशर्मा वैद्य राजास उद्देशून म्हणाला, "राजपुत्राला सर्प दिननक्षत्र संपण्यापूर्वीं एक मुहूर्त अगोदर डंसला आहे. त्याअर्थीं राजपुत्राच्या उठण्याची आशा नाहीं. आम्हीं प्रयत्न करूं पण त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं." हें ऐकून राजा म्हणाला, 'मी आपणांला संग्रहीं ठेवलें तें मुलाच्या हितासाठीं.' यावर सोमशर्मा उत्तरला, "कर्मानुसार जें होणार असतें तें टळत नाहीं. आणि त्याला आम्हीं तरी काय करूं शकणार? पण राजा! या गोष्टींची तुला प्रचीतीच पाहावयाची असेल तर पाहा! मी प्रत्यक्षच चमत्कार करून दाखवितो." नंतर त्यानें सर्व नागांस मंत्राच्या सहाय्यानें बोलाविलें. सर्व नाग, सर्प, भुजंग, राजवाड्यांत जमले. नंतर सोमशर्मानें एक मंडळ तयार केलें. व त्या सर्व सर्पांना उद्देशून म्हणाला, आपणांपैकीं जो कोणी अपराधी असेल त्यानेंच फक्त या मंडळांत राहावें. बाकीच्यानीं आपापल्या ठिकाणाला निघून जावें.' एका सर्पाखेरीज करून सर्व भुजंग सर्प निघून गेले. मंडळांतल्या सर्पाकडे पाहून राजास उद्देशून सोमशर्मा म्हणाला, 'सर्पाच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जाती दोन आहेत. एक गंधन व दुसरी अगंधन. गंधनकुळांतले सर्प आपलें विष परत घेतात. त्यांना कुळाचा अभिमान नसतो. पण अगंधन मोठे गर्विष्ठ जात्याभिमानी असतात. आपला अभिमान ते प्राण गेला तरी सोडीत नाहींत. आणि हा सर्प त्याच कुळांतला आहे. आणि म्हणूनच प्रथम हे राजा ! आपणांला हें विष उतरणार नाहीं असें सांगितलें होतें. ही जात एकदां डसल्यानंतर मृत्यु आला तरी आपलें विष परत घेत नाहींत. तेव्हां राजा दुःखानें उसासे टाकीत म्हणाला, याला तरी यमसदनाला पाठवा ! नंतर तो सोमशर्मा नागास म्हणाला ' माझ्या स्वामीच्या मुलाचें विष परत घे. नाहींपेक्षां या प्रज्वलित अग्निकुंडांत उडी टाकण्यास तयार हो ! नागास विचार पडला. तो मनांत विचार करूं लागला. आपल्या कुळांत आजपर्यंत कोणीहि असें विष परत घेतलें नाहीं. आपण परत घेऊन कुळास बट्टा लावणें आपणांस शोभत नाहीं. मरण हें आज नाहीं उद्यां येणारच ! तें कधींच टळत नाहीं. मग त्यासाठीं कुलधर्म सोडून जिवंत राहण्यापेक्षां मरणेंच इष्ट ! असा विचार करून त्यानें प्रज्वलित अग्निकुंडांत प्रवेश केला. खरेंच आहे:—

वरं प्रविष्टं ज्वालिते हुताशने ।
न चापि भग्नं चिरसंचितं व्रतं ॥
वरंहि मृत्युः शुचि शुद्ध कर्मणां ।
न शील वृत्ते स्खालितं हि जीवितं ॥

तीर्यग् जातींत जन्मलेल्या अज्ञानी जीवानें देखील विष परत न घेतां मरण स्वीकारलें. तेव्हां उत्कृष्ट कुलजोत्पन्न साधुंनीं जिनगुरु साक्षींनें घेतलेला जैनधर्म पाळतांना एकदां टाकलेल्या कषायरूपी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विषाचा मरण आलें तरी पुन्हां कधींहि स्वीकार करूं नये. आणि हेंच त्यांचें परम कर्तव्य होय.

कथा १०५ वी.

सुकौशल देशांतील अयोध्या नगरीचा राजा यशसेन मोठा प्रजाहितदक्ष होता. जयमति राणी त्याची अत्यंत आवडती होती. त्याला जयसेन व गंधमित्र नांवाचे दोन पुत्र होते. हे सर्व शास्त्रांत, कलेंत पारङ्गत होते. पुढें राजानें थोरल्या मुलास जयसेनास राज्याभिषेक करून गंधमित्रास युवराजपद दिलें. आणि आपण मुनीसागर मुनीजवळून दीक्षा ग्रहण केली. जयसेन राज्यावर आल्यानंतर गंधमित्रानें त्याचेपासून राज्य हिसकावून घेतलें. व राज्याबाहेर हांकलून दिलें. जयसेन गंधमित्राच्या उण्यावर टपून राहिला. व आपले सैन्य घेऊन तो गांवाबाहेर राहूं लागला. गंधमित्राच्या हालचालींवर त्याची नेहमीं नजर असे. गंधमित्र आपल्या ५०० युवतींसह नानाप्रकारचे सुखोपभोग भोगीत राज्य हाकूं लागला. त्याचें घाणेंद्रिय अत्यंत तिखट होतें. तो त्याच्या आधीन राही. कांहीं दिवसांनीं गंधमित्र आपल्या युवतींसह शरयुतटांवर तळ देऊन राहिला. ही गोष्ट वीरसेनास समजली. त्यानें विविध प्रकारचीं सुंदर पुष्पें गोळा करून, त्यावर विषाची पूड टाकली. व तीं सारीं फुलें सरय नदींत सोडलीं. गंधमित्राच्या स्त्रियांनीं तीं गोळा करून आपल्या प्रियकरास आणून दिलीं. अगोदरच तो वासाचा भोक्ता ! त्यांतच नानातऱ्हेचीं फुलें पाहून त्यास आनंद झाला. त्यानें त्याचा वास घेण्यास सुरवात केली. वासामुळें त्यांतल्या विषानें मरून तो नर-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कास गेला. जयसेनानें पूर्ववत् आपलें राज्य हस्तगत करून घेतलें. व आनंदानें राज्यकारभार हांकूं लागला.

कथा १०६ वी.

" गंधर्वदत्त व पांचाळ "

पाटलिपुत्र नगरीचा राजा गंधर्वदत्त मोठा शूर प्रजाप्रिय होता. राणी गंधर्वसेना लावण्यसंपन्न गुणी होती. यांची मुलगी गंधर्वदत्ता अत्यंत विद्वान् सर्व कलेंत निपूण गायनपटु होती. तिनें मला जो कोणी गायन कलेंत जिंकील त्याची मी भार्या होईन; कोणी जिंकणार नाहीं तर सार्वकालिक ब्रह्मचर्याचा नियम घेऊन प्रज्वलित अग्निकुंडांत शिरून आत्मत्याग करीन अशी तिनें जाहीर प्रतिज्ञा केली. तिची प्रतिज्ञा ऐकून पुष्कळसे नरश्रेष्ठ गोळा झाले. तिनें त्यापैकीं प्रत्येकाशीं सात सात दिवसपर्यंत गायनवादन शास्त्राचा खल केला. व प्रत्येकाला तिनें वादांत जिंकलें.

विजयार्द्ध पर्वताजवळील मोदन नगरींत पांचाळ नांवाचा उपाध्याय राहात असे. तो गायनविद्येंत निपुण होता. त्याच्या आवाजाची माधुरी गंधर्वतुल्य मधुर व गोड होती. त्याला एकानें गंधर्वदत्तेची हकीकत निवेदन केली. तिच्या गायनाची यथेच्छ स्तुति केली. पांचाळ आपल्या ५०० शिष्यांसह तिच्याशीं वादविवाद करण्यासाठीं आला. गांवाबाहेर त्यानें आपलें ठाणें वसविलें. व अशोकवृक्षाखालीं कोणी आल्यास मला उठीव असें शिष्यांस सांगून तो निद्रिस्थ झाला. बाकीचे सगळे शिष्य पाटलिपुत्रास गेले. पांचाळ आल्याची खबर हस्तें परहस्तें गंधर्वदत्तेस कळली. ती आपल्या परिवारांसह वस्त्र, गंध, कर्पूर, श्रीखंड, तांबूल, वगैरे पूजेचें साहित्य घेऊन, पांचाळाकडे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आली. पांचाळाचें भीष्म स्वरूप, पसरलेलें तोंड, पोटाचा नगारा, पाहून तिनें हेंच कां पांचाळ ? अशी विचारणा केली. पांचाळ ते हेच असें समजतांच तिच्या साऱ्या कल्पना नष्ट झाल्या. तिनें अशोक वृक्षाला वस्त्रें गुंडाळलीं; त्याला कुंकूं लावून, पुष्पमाळा घातल्या व त्याची पूजा केली, व त्रिवार नमस्कार करून, निघतांना म्हणाली

" यावदस्य मुखे भीमे पांचालस्य सरस्वति ॥
पिंडी पादप तावत्ते कुतो नेयं व्यवास्थिता ॥

अस म्हणून राजवाड्याकडे निघून गेली.

कांहीं वेळानें पांचाळ जागे झाले. अशोकाची पूजा केलेली पाहून, शिष्यांस ही पूजा कोणी केली ? अशी विचारणा केली. तेव्हां एका शिष्यानें सांगितलें, एक स्त्री आपल्या परिवारांसह येथें आली होती. आपणांस झोपलेले पाहून या अशोक वृक्षाची तिनें पूजा केली. व निघतांना,

" उद्दंतुर मुखे यावदस्य देवी व्यवास्थिता ।
तावत्तवस्तरो कस्मान्न स्थिते यं सरस्वतिः ॥ "

असें म्हणून गेली. पांचाळाला तिचा अत्यंत राग आला. त्यानें गंधर्व-दत्तेस बोलावून आणलें. प्रथम तिच्या गायनाची परीक्षा घेतली. त्या गायनानें तो प्रसन्न झाला. नंतर त्यानें गायनास सुरवात केली. गायनानें गंधर्वदत्ता मुग्ध झाली. पण आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें या दंता-ड्याशीं आपणांस लग्न करावें लागेल ही कल्पना मनांत येतांच तिला अत्यंत वाईट वाटलें. गायनोत्तर प्रासाद शिखरावरून खालीं उडी टाकून प्राण दिला व संसाराच्या त्रासांतून मुक्त झाली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा १०७ वी.

" जिव्हालोलूप नरपति भीम. "

या भरत क्षेत्रांतील नगरींत राजा भीम राज्य करीत होता. तो मोठा जिव्हालोलूप होता. त्याचा आहार अति मोठा होता. त्याची प्रिया सोमश्री नांवाची होती. राजपुत्र भीमदास अत्यंत शूर, पराक्रमी होता. नंदीश्वर पर्व सुरू झालें. त्या आठ दिवसांत कोणीहि जीववध करूं नये अशी राजानें नगरींत ग्वाही फिरविली. पण राजा स्वतः खादाडवृत्तीचा असल्यामुळें त्यानें आपल्या स्वयंपाक्यास मांसाचें पक्वान्न तयार करण्यास आज्ञा दिली. नगरींत तर हिंसा बंद होती. तेव्हां आचाऱ्यानें स्मशानांतून एक मेलेलें मूल आणलें. व त्याचें उत्तम पक्वान्न तयार करून राजास वाढलें. राजानें तें मोठ्या आवडीनें खाल्लें. अगोदरच खादाड खाऊ ! त्यांतून उत्तम पक्वान्न ! तो आचाऱ्यावर प्रसन्न झाला व म्हणाला, आजचें तर अन्न फार उत्तम होतें. पण तें कशाचें होतें ? स्वयंपाकी भीत भीत म्हणाला, ' हें मांस एका मेलेल्या मुलाचें होतें; राजानें यापुढें त्यास हेंच अन्न करण्याची आज्ञा दिली. राजाज्ञेप्रमाणें रोज एका मुलाचा बळी घेतला जाऊं लागला. थोड्याच दिवसांत तें नगर पुत्रहीन बनलें. गांवांत हाःहाःकार उडाला. तेव्हां सामंत्र मंत्र्यांनीं भीमदासास राज्यावर बसवून, राजास व आचाऱ्यास हद्दपार केले. ते दोघे भटकत भटकत विंध्यपर्वतावर आले. मेखलाढ्य नगरीच्या लोकांना ही खबर कळली. त्यांनीं त्या नरभक्षकांस ठार केलें. मरून जिव्हालोलूप भीमराजा नरकास गेला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा १०८ वी.

" श्रेष्ठि भर्तृमित्र "

भद्दिल नगरींत श्रेष्ठी धनपति राहात असे. त्याची भार्या धनश्री सुंदर तेजस्वी होती. त्यांचा मुलगा भर्तृमित्र. त्याची प्रिया देवदत्ता. देवदत्ता मोठी सुंदर होती. एकदां भर्तृमित्र आपल्या बत्तीस श्रेष्ठी मित्रासह सहकुटुंब सहपरिवार नगरोद्यानात विहारासाठीं गेला. त्यांत वसंतसेना नांवाचा एक श्रेष्ठी होता. त्याची स्त्री वसंतमाला वसंतश्री सारखी तेजस्वी सुंदर होती. वसंतमाला आपल्या पतीजवळ त्याच्या अंगावर डोकें ठेवून हातपाय ताणून निजली होती. देवदत्ताहि आपल्या पतीजवळ निजली होती. सर्व जोडपीं बगीच्यांत सुखानें आराम घेत असतां आंब्याचा मोहोर पाहून वसंतमाला आपल्या प्राणवल्लभास म्हणाली, नाथा ! नववसंताचा आम्र मोहोर मनाला किती आल्हाददायक वाटतो. सर्व कामीजनांचीं मनें आपोआपच याचेकडे वेधलीं जातात. मग माझें मन यानें वेधलें यांत नवल तें काय ? मला आपण तो तोडून द्यावा. म्हणजे मी तो कानांवर ठेवीन. वसंतसेनाच्या मांडीवर ती निजली होती. तो म्हणाला, मी बसल्या बसल्या कसा तोडूं शकेन ? " नाहीं. आपण आहा त्या स्थितींतच मला तोडून द्या ! आपण उठतां कामा नये." तेव्हां धनुष्याला बाण लावून तो त्यानें सोडला. पण तो व्यर्थ गेला. पुन्हां बाण सोडला. पण तोहि व्यर्थ गेला. तिसऱ्या वेळीं थोडासा आंब्याचा मोहोर खालीं पडला. तो त्यानें वसंतमालेस दिला. हा प्रकार दुरून देवदत्तेनें पाहिला. तिनेंहि तशीच मागणी केली. पण भर्तृमित्राला धनुर्विद्या अवगत नव्हती. त्यानें लाजेनें मान खालीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घातली. त्याला अत्यंत वाईट वाटलें. त्यानें धनुर्वेदविद्या प्राप्त करून घेण्यासाठीं देशत्याग केला व मेघपुरास आला.

मेघपुरीचा राजा मेघसेन मोठा प्रजाहितदक्ष शूर वीर होता. त्याची प्रिया अत्यंत सुंदर वेगवती नांवाची होती. त्यांची मुलगी मेघमाला अत्यंत विद्वान् सर्व कलासंपन्न होती. ती तारुण्यांत आल्यानंतर मेघसेनानें तिच्या स्वयंवराची मांडणी केली. व जो कोणी चंद्रकवेध करील त्याला ही वरील ! अशी घोषणा जाहीर केली.

नरप्रमाण उंचीचा एक स्तंभ रोंवून, त्यावर एक सहस्र आऱ्यांचें दिव्य चक्र ठेवावयाचें ! हें सारखें फिरत असतें. चंद्रकवेध करणारा कुशल धनुर्धारी धनुष्य हातांत घेऊन, त्या चक्रावर बसतो. चक्राबरोबर तोहि फिरत राहातो. पण त्याचें सारें लक्ष लक्षवेध वेधण्याकडे असतें. त्या स्तंभापुढें सात पाऊलांवर दोन खांब सारखे एका ओळींत असतात. त्या खांबाच्या समोर प्रत्येकीं तीन तीन पाऊलांवर दोन दोन खांब जोडीनें असतात. सातव्यानंतर आठव्या खांबाची जोडी तीन पावलांवरच असते. त्यावर एक लहानसें पण भ्रमतें चक्र असतें. त्या चक्राच्या एका आऱ्यास एक कवडी बांधलेली लोंबत असतें. त्या कवडीचा वेध वेधकाला करावा लागतो. व त्यालाच चंद्रकवेध म्हणतात. आणि हा चंद्रकवेध करील त्या वेधकालाच ती राजकन्या मिळावयाची होती. हा कठिण वेध पाहून पुष्कळसे राजे तर तसेंच परत गेले. कित्येकांनीं प्रयत्न केला पण भयानें घाबरून गेले. कोणालाहि तो वेध वेधतां येईना.

पुढें द्रोणाचार्य आपल्या शिष्यांसह तेथें आले. भर्तृमित्राला ही गोष्ट कळली. गुरुदक्षिणा म्हणून त्यांना मूल्यवान रत्नें देऊन, धनुर्विद्येचें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शिक्षण घेण्यासाठीं त्यांचा शिष्य बनला. गुरुंशीं विनयानें वागून ते शिकवितील तें मोठ्या काळजीनें लक्ष लावून शिकूं लागला. गुरूची आपल्यावर कृपादृष्टि राहावी म्हणून तो त्यांच्या पूजेसाठीं जवळील पर्वतांवरून नित्य फुलें घेऊन येत असे. तेव्हांपासून त्या पर्वताचें पुष्पपर्वत हें नांव पडलें. उपाध्याय नृपभीतीमुळें राजपुत्रांना देखील विद्या शिकवीत असत. माझ्यासाठीं या पर्वतावरून आंवळे गोळा करून, खालील तीराला ये असें भर्तृमित्र शिष्यांला सांगून, द्रोणाचार्य स्नानासाठीं नदीवर आले. तेथें त्यांनीं राजपुत्रांना झाडाच्या सालीचा वेध कसा करावा वगैरे विद्या सांगितल्या. भर्तृमित्र गुर्वाज्ञे-प्रमाणें कच्चे आवळे गोळा करून गुरूकडे आला. येतांना तो पूर्वीच्या पावलांवर पाऊलच ठेवून आला. त्याला आपल्याच पावलांवर पाऊल ठेवून येत असलेला पाहून राजपुत्र रागा वून म्हणाले, 'भर्तृमित्रा ! हे आंवळे खालीं ठेवून तूं आम्हांला ही झाडाची साल कशी छेदन करावी हें दाखीव ! त्यानें झाडाची साल छेदन करून दाखविली. त्याची निशाण मारण्याची हातोटी पाहून, सर्वांना आश्चर्य वाटलें. प्रत्यक्ष हजर नसतांना केवळ तर्कानें आपल्या पावलांवर पाऊल ठेवून, यानें जाणून घेतलें व तालसूचि छेदन केली. याचें त्यांना आश्चर्य वाटलें. नंतर ते द्रोणाचार्यांसह परत घरीं आले.

भर्तृमित्रानें धनुर्वेदविद्येंत प्राविण्य संपादन करून घेतलें. चंद्रक-वेध करून मेघमालेशीं लग्न लावलें. बारा वर्षें मेघमालेच्या सहवासांत त्यानें सासुरवाडींत घालविलीं. त्या अवधींत त्याच्या मातापित्याकडून, मित्रांकडून पुष्कळशीं पत्रें आलीं. पण तीं मेघमालेनें त्याला चोरून ठेवून दिलीं. एकदां सहज तो बाहेर फिरत होता. कोणी एका वृद्धानें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

येऊन त्याच्या हातांत पत्र दिलें. पत्र वाचतांच भर्तृमित्रानें निघण्याची तयारी केली. रस्त्यांत महाभीम वन लागलें. वनांत मेघमालेचें सौंदर्य पाहून, म्लेंच्छ राजा सुवेगानें त्यांच्यावर हल्ला केला. सौंदर्यानें वेडा झालेला मनुष्य जगांत काय करीत नाहीं ? प्रतिस्पर्ध्याच्या बळाचें देखील त्यांना ध्यान राहात नाहीं. सारासार विचारशक्तिच नष्ट होते. तीच अवस्था सुवेगाची झाली. भर्तृमित्राशीं त्याचें युद्ध सुरू झालें. युद्धांत भर्तृमित्राचें सर्व बाण वायां गेले. फक्त एकच बाण भात्यांत उरला. तेव्हां मेघमालेला त्यांनीं रथाखालीं सोडलें. तिच्या पायांतील नुपुरांचा आवाज ऐकून सुवेग वेडा बनला. त्याचें लक्ष युद्धांतून उडालें. तो तिच्याकडे सारखा पहात राहिला. ही संधि साधून भर्तृमित्रानें उरलेला बाण त्याच्यावर सोडला. बाणानें आपलें काम केलें. सुवेग गतप्राण होऊन भूमीवर पडला. मरून तो नरकास गेला.

कथा १०९ वी.

" व्यभिचारी नागदत्ता. "

नाशिक शहरांत पूर्वीं सागरदत्त नांवाचा एक श्रेष्ठी राहात असे. तो अत्यंत धनाढ्य होता. त्याची बायको नागदत्ता सुंदर, पण दुराचारी होती. श्रेष्ठीला एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्यें होतीं. मुलाचें नांव श्रीकुमार व मुलीचें श्रीषेणा होतें.

गुरें राखण्यासाठीं एक गुराखी त्यांचेकडे नौकरीस होता. त्याचें नांव नंद होतें. नंद मोठा देखणा होता. नागदत्तेचें त्याच्यावर प्रेम बसलें. दोघांचा चोरटा संबंध जुळला. एकदां सायंकाळच्या वेळीं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सागरदत्त गाईबरोबर रानांत गेला. गाईंना चारण्यास सोडून तो स्वस्थ झाडाखालीं निजला. नंदानें त्यास मारून टाकलें. नागदत्तेच्या मार्गांतला काटा दूर झाला. ती उघडपणें नंदाशीं आनंदानें संसार करूं लागली. श्रीकुमाराला आपल्या आईचें कृत्य रुचत नव्हतें. तो नेहमीं तिची टीका करी. आईला त्याचा राग येई. तेव्हां नंदानें व तिनें मिळून त्याला ठार मारण्याचा विचार केला. ही गोष्ट श्रीषेणेस समजली. एकदां गाईंना घेऊन, श्रीकुमार रानांत जाण्यास निघाला. तेव्हां त्याच्या बहिणीनें श्रीषेणेनें ही गोष्ट त्यास सांगितली व सावध राहण्याबद्दल त्यास बजावलें. गाईंना चरण्यास सोडून तो जाऊन निजला. त्याचा माग काढीत नंद गोपहि तेथें आला. कुमार सावध होता. कुमार हळूंच उठून त्याचे पाठोपाठ गेला व त्याच्या पाठींत भाल्यानें भोसकलें. नंद त्यामुळें गतप्राण झाला. श्रीकुमार गुरांना घेऊन घरीं आला. नागदत्तेनें त्याला एकटाच पाहून नंदाची चौकशी केली. त्यानें उत्तर दिलें, तुझ्या नंदाला मी ओळखीतहि नाहीं आणि तो कोठें गेला हें मला माहितही नाहीं. पण कुमाराच्या हातांतील भाला रक्तानें माखलेला होता. नागदत्तेची नजर त्याचेवर पडली. त्यानें त्याला ठार मारलें अशी तिची खात्री झाली. रागाच्या भरांत श्रीकुमाराच्या डोक्यांत मुसळ घातलें. श्रीकुमार डोकें फुटून मरण पावला. आपल्या भावास मारलेलें पाहून, श्रीषेणेनें उलट आपल्या मातेस मुसळानें वडवलें. त्यामुळें तीहि मरण पावली. व्यसनापायीं आपल्या पोटच्या पोराचाहि बळी घेतला. व्यभिचारी जगांत काय करीत नाहींत ?

———

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा ११० वी.

सुरम्य सुराष्ट्र देशांत त्यावेळीं द्वारावती नगरी मोडत असे. हें एक द्वीप होतें. याच्या भोंवतालीं चोहोंबाजूंनें समुद्र होता. हें बेट मोठें सुंदर गजबजलेलें होतें. याचा विस्तार नऊ योजने होता. याला सोळा गोपुरें होतीं. प्रत्येक गोपूर बारा योजन रुंदीचें होतें. चोवीस प्रवेशद्वारें होतीं. बेटांतील घरें मणिकांचननिर्मित गगनस्पर्शी होतीं. असंख्य कोटयाधीश श्रेष्ठी तेथें राहात. युधिष्ठिरादि वीरांची ती भूमि होती. त्या श्रेष्ठी जनांत एक अत्यंत श्रेष्ठ सदाचरणी समुद्र-विजय नांवाचा एक श्रेष्ठी होता. त्याच्या भार्येचें नांव शिवा, मुलाचें नांव नेमिनाथ होतें. नेमिनाथ सद्गुणाचे सागर होते. त्यांनीं जिन-दीक्षा घेऊन केवलज्ञान प्राप्त करून घेतलें.

द्वारवतीचा दहावा राजा वसुदेव — वसुदेवाची राणी रोहिणी. त्याचा पुत्र बलदेव. वसुदेवाला देवकी नांवाची आणखी एक राणी होती. तिच्या पोटीं नववें वासुदेव कृष्ण जन्मले. वसुदेवाला दहा सहस्र स्त्रिया होत्या. व सहाशें पंचाहात्तर सहस्र बलदेवादि कुमार होते. कृष्णाचे स्नेही यादवांची संख्या अर्धकोटीची होती. कृष्णाला सोळा हजार बायका होत्या. पण त्यांत मुख्य आठ होत्या. रुक्मिणी, सत्यभामा, जयवंती, सुशिमा, लक्ष्मणा, गौरी, गांधारी व पद्मावती हीं त्यांचीं नांवें होत. चक्र, गदा, शक्ति, खड्ग, रविमणि, शंख व शारंगहर ही सात प्रकारची संपत्ती त्याची सेवा करी. श्रीकृष्ण या अशा वैभवांत आपला काळ सुखानें घालवीत होता. एकदां विहार करीत करीत केवलि नेमिनाथ ऊर्जयंत शिखरावर येऊन राहिले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बलदेव कृष्ण आपल्या परिवारांसह त्यांचें दर्शनास गेले. त्रिवार प्रदक्षिणा घालून नमस्कार करून ते जवळ बसले. नंतर बलदेवांनीं नेमिनाथांस विचारलें. हें कृष्णाचें वैभव अजून किती वर्षे टिकणार आहे ! नेमिनाथांनीं सांगितलें राजा ! आजपासून बारा वर्षांनीं या धनसंपन्न द्वारावती नगरीचा नाश होईल. त्यांत विष्णूचें वैभव लयाला जाईल. यावर बलभद्रानीं त्याचें कारण काय म्हणून विचारलें. नेमिनाथ उत्तरलें, याचें कारण कादंबरी. 'मग द्वारावतीचाच कां नाश होणार?' नेमिनाथ उत्तरले. 'हिरण्यनाभिचा पुत्र रोहिणीचा सहोदर मुनी द्वीपायन सांभाच्या आज्ञेवरून वाऱ्यानें दिलेल्या त्रासानें मरण पावला. मरून तो धूमकेतु नांवानें जन्मणार ! तो द्वारावतीला जाळील. आणि जरत्कुमाराचें हातून कृष्णाचें मरण ओढवेल ! नंतर बलदेव वगैरे परत नगरीस आले. त्यानीं नगरींतलें सारें मद्य गोळा करून रवैतक उद्यानांत आणून ठेवलें. जरत्कुमारालाहि त्यानें द्वारावतींतून विंध्यपर्वतांवर आणून सोडलें. नगरींतील सारीं हत्यारें सुऱ्या वगैरे त्यानीं समुद्रांत नेऊन बुडविलीं. तीं माशानीं गिळलीं. ते मासे धीवराच्या जाळ्यांत सांपडले. त्यापैकीं कांहीं मासे जरत्कुमाराला त्या धीवरानें आणून दिले. त्यांतून हत्यारें निघालीं तीं त्यानें आपल्या संग्रहीं ठेवलीं.

द्वीपायन मुनी सुराष्ट्र देश सोडून, पूर्वेकडे गेले होते. बारा वर्षाला एक महिना कमी असतां ते निरनिराळ्या ठिकाणीं विहार करून परत द्वारावतीस आले. रेवतक उद्यानाजवळील उर्ध्वग्रीवनगावर ते प्रतिमा घेऊन उभे राहिले. शंभुकुमार इतर कुमारांसह त्या उद्यानांत खेळत खेळत आले. तेथील कादंबरी त्यांनीं प्राशन केली. मुनीना थोडासा त्रास दिला. वाऱ्याचा त्रास सहन न झाल्यामुळें मुनी रागावले. हा वृत्तांत बल-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

देव केशवास समजला. ते धावरून द्वीपायन मुनीकडे आले. त्यानीं त्यांची क्षमा मागितली. मुनीनीं दोन बोटेंवर उचलतांच पूर्वींचा असूर जन्मास आला व द्वीपायन मुनी मरण पावले. विभंगज्ञानानें आपलें पूर्वभव आठवून त्यांनीं द्वारावतीस आग लावली. द्वारावती जळत असलेली पाहून बलदेवकृष्ण नर्मदा उतरून गहन अरण्यांत शिरले. कौशंभ वनांत निजले असतां जरत्कुमारानें पूर्वीं मिळालेलीं हत्यारें विष्णूच्या हातां–पायांवर मारलीं. व विष्णूस ठार केलें. कृष्णाचें प्रेत घेऊन बलदेव सहा महिने फिरले. पुढें देवांनीं त्यांना उपदेश केला. उपदेशामुळें त्यानीं जैनदिक्षा घेतली व पुष्कळसें तप करून ते ब्रह्मलोकास गेले.

कथा १११ वी.

" राजा – सगर "

विनीता देशांत अजित तीर्थंकराच्या समयाला राजा सगर राज्य करीत होता. त्याला ६९ हजार स्त्रिया होत्या. नऊ प्रकारचा निधि, चतुर्दश रत्नें, दिव्य चमु, उत्तम भोजन व दीव्य आभरणें, मनोहर शय्या, वाहन, नाटक, नगर, या दहा प्रकारच्या भोगांनीं युक्त असे नानाप्रकारचे भोग तो भोगीत होता. एके ठिकाणीं म्हटलें आहे.

" भाजनं भोजनं शय्या चतुर्वाहनमासनं ।
निधि रत्नं पुरं नाटयं भोगस्तस्य दशांगकाः ॥ "

त्याला सहा हजार तेजस्वी पुत्र होते. ते मोठे गुणी, तेजस्वी, सदाचरणी होते. एकदां सगर त्या सर्वांना म्हणाला, ' कैलास पर्वतावर चोविस तीर्थंकराची उत्तम कृत्रिमाकृत्रिम जिनमंदिरें आहेत. त्यांचें वंदन सुरासूर अहर्निश करतात. पण या पंचम कालांत त्याचा नाश

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होईल ! तेव्हां तुम्हीं सर्व त्या पर्वतावर जा ! तीं उत्तम मंदिरें पाडून टाकून, ती जागा भयाण करा. वडिलांच्या आज्ञेप्रमाणें ते सर्व राजपुत्र कैलास पर्वतावर आले. रत्नदंडानीं तो पर्वत खोदण्यास सुरूवात केली. खोदित असतांना एक देव त्यांनां म्हणाला, राजपुत्र हो ! आपण येथें खोदूं नका ! माझें घर येथें आहे. त्याचा नाश करूं नका. पण राजपुत्रांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. व ते आपल्या कामास लागले. तेव्हां भीम व भगीरथ या दोन राजपुत्रांना सोडून, बाकीच्या सर्वांना देवानें जाळून टाकलें. ते दोघे हताश हृदयानें सगराकडे परत आले. त्यानीं कैलास पर्वतावर घडलेला वृत्तांत सगरांस निवेदन केला. सगराच्या मनाला जबरदस्त धक्का बसला. जीवित विद्युल्लते प्रमाणें क्षणभंगूर, यौवनरूप संपदा कदलीगर्भाप्रमाणें निःसार, संध्याराग सारखी प्रीति, हे व जगांतले सर्व भोग नरकाचेच मार्ग होत. असा विचार करून भगीरथाला राज्यावर बसविलें. व आपण सर्व प्रजाजनांची क्षमा मागून, प्रमोदोद्यानांत गेला. तेथें सर्वभूति मुनींना नमस्कार करून आपल्या भीम पुत्रांसह दीक्षा घेतली. आगमाचें यथायोग्य अध्ययन करून, त्यांत प्राविण्य संपादन केलें. भयंकर तपश्चरण करून त्यांनीं अशेष कर्मांचा नाश केला. व शेवटीं ते मोक्षास गेले.

कथा ११२ वी.

" सिंहबल कुंभार "

अवंती देशांतील महाधन गांवांत सिंहबल नांवाचा एक कुंभार राहात असे. भरण गांवास तो नेहमीं बैलांवर लादून, गाडगी व मडकीं विकण्यास घेऊन जात असे. एकदां असाच गांवाबाहेर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दुकान लावून बसला होता. ही बातमी गांवातील स्त्रीयांना कळतांच त्या त्याच्याभोंवतीं गोळा झाल्या. त्यांनी पुढील खेपेस याची किंमत देऊं असें गोड बोलून हातीं आलीं तेवढीं गाडगीं पळविलीं. तेव्हां उरलेली भांडीं घेऊन बैलावर लादून तो चालला. तो स्वभावानें भोळसर सरलहृदयी होता. त्याचा कोणीही फायदा घेत. मुलें त्याची फजिती करीत. तो सहन करी. त्यामुळें व्यवहारांत नफ्यापेक्षां नुकसानच अधिक होई. स्त्रिया निघून गेलेल्या पाहतांच गांवांतील कांहीं खटयाळ पोरें त्याच्याभोंवतीं गोळा झालीं. त्याची थट्टा कुचेष्टा करूं लागलीं. कोणी भांडीं, कोणी मडकीं, कोणी घागरी, पळविण्यास सुरुवात केली. शेवटीं त्याचा बैलहि पळवून नेला. कुंभार वेडा बनला. त्यानें बैल गेलेला पाहून, सारें गांव धुंडाळलें. प्रत्येकाच्या घरीं जाई व मडक्याची किंमत व बैलाची मागणी करी. पण कोणीहि त्याची दाद घेईना. त्यामुळें तो पूर्ण वेडा झाला. सातवर्षें तो गांवांत भटकला. पण कोणीहि त्याचा बैल किंवा मडकीं त्यास परत दिलीं नाहींत. शेवटीं कंटाळून त्यानें त्या गांवांस आग लावली. आपल्या स्वार्थासाठीं कुलालानें सर्वांचा नाश केला.

कथा ११३ वी.

"श्रेष्ठि पुत्र महीष"

विनिता देशांतील साकेता नगरींत राजा सीमंधर राज्य करीत होता. राणी जिनसेना नांवाची होती. राजकुमार मकरध्वज अत्यंत सुंदर गुणी होता, राजमंत्री सिद्धार्थ होता. राजश्रेष्ठी वृषभसेन लोकप्रिय, धनकनकसंपन्न होता. त्याची भार्या रूपश्री रूपानें, गुणानें सर्वांची आवडती होती. श्रेष्ठीच्या गोकुळवाडयांत पुष्कळशा म्हशी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होत्या. त्या म्हशींत दोन अत्यंत उत्तम म्हशी होत्या. पहिलीचें नांव सुभद्रा व दुसरीचें भद्रा होतें. या दोन म्हशींच्या कळपांना सांभाळण्या-साठीं दोन गुराखी होते. एकाचें नांव गोविंदा व दुसऱ्याचें वामन होतें. ते दोघेहि गुराखी एकाच ठिकाणीं राहात. आपापला म्हशीचा कळप आनंदानें सांभाळून दिवस घालवीत असत. एके दिवशींची गोष्ट! गोविंदानें वामनास आपल्या म्हशी सांभाळण्यास सांगून, कांहीं घरगुती कामासाठीं घरीं राहिला. वामन त्या सर्व म्हशी एकत्र करून, रानांत घेऊन गेला. सुभद्रा व भद्रा दोन्हीं म्हशी जवळ जवळच निजल्या होत्या. गोविंदा हळूंच वामनाची नजर चुकवून तेथें आला व त्यानें सुभद्रेचें रेडकू मारून खाल्लें. ते रेडकू मरून पुन्हां सुभद्रेच्या पोटीं जन्मलें. तेहि गोविंदानें मारून खाल्लें. याप्रमाणें सात वेळां सुभद्रेची रेडकें गोविंदानें मारलीं व खाल्लीं. आठव्या वेळीं ते पुन्हां सुभद्रेच्या पोटीं आलें. सुभद्रा यावेळीं दूर जाऊन प्रसवली. ही गोष्ट गोविंदास समजली. तोहि तिच्या पाठोपाठ आला. गोविंदाला दुरून येतांना पाहून, तें रेडकू भयानें कांपूं लागलें. त्याच्या सामोरें जाऊन तें त्याच्या पायांवर पडलें. आपणांला शरण आलेलें पाहून त्यास अभयदान दिलें. त्यामुळें पाड-साला जातिस्मरण झालें. तो गोविंदासह म्हशीच्या कळपांत येऊन राहिला. गोविंदानें वृषभसेनाच्या पायीं लागण्यास सांगितलें. तेव्हां त्या रेड्याला घेऊन श्रेष्ठी उत्सवासाठीं साकेता नगरीस गेले. सभा-मंडपांत बसलेल्या सीमंधर राजाला श्रेष्ठीच्या आज्ञेवरून महीषानें प्रणाम केला. तेव्हां राजानें त्यास बाजारभर चरण्यासाठीं सोडून दिलें. राजमार्गांतून भटकत कोठेंहि जें मिळेल

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तें खात तो आपली सुखानें कालक्रमणा करूं लागला. एकदां द्वारपालानें त्यास पकडलें. व हा श्रेष्ठीपुत्र कोणालाहि न कळत जाऊन खातो व त्याची नासधूस करतो तेव्हां हा जर खरा असून दोषी नसेल तर यानें तप्त झालेला लोखंडाचा गोळा दातांत धरावा, असें द्वारपाळानें जाहीर केलें. महिषानें सर्व लोकांसमक्ष तो गोळा दातांनें उचलून धरला व तडक राजांकडे गेला. सर्व लोकांना त्याच्या निर्दोषत्वाची खात्री पटली. तेव्हांपासून त्याला कोणीहि त्याच्या कार्यक्रमांत विघ्न आणीतनासे झाले.

एके दिवशींची गोष्ट! अशोक वनांतील पुष्करणीच्या पाण्यांत महीष क्रीडेसाठीं गेला. क्रीडा करीत असतां राजपुत्र मकरध्वज मंत्री पुत्रांसह क्रीडेसाठीं आला. महीषाला क्रीडा करतांना पाहून राजपुत्रानें त्याचें मांस खाण्याच्या इच्छेनें त्याचा डावा पाय तोडण्यास आपल्या मनुष्यास आज्ञा दिली. मनुष्यानें त्याचा पाय तोडून टाकला. महीष लंगडत लंगडत राजाकडे आला. त्यांची भयंकर अवस्था पाहून राजाला अत्यंत वाईट वाटलें. त्यानें त्यास नमस्कारमंत्र सांगितला. समाधिपूर्वक मरून तो महीष सौधर्म स्वर्गात महर्द्धीक देव झाला. नंतर राजानें राजकुमार वगैरेला मारण्याची आज्ञा दिली. ही गोष्ट सिद्धार्थ मंत्र्याला समजली. तो त्या कुमारांना दत्त मुनीकडे घेऊन गेला. व त्यांना दीक्षा देवविली. व मंत्री परत राजाकडे आला. राजानें त्याना फांशीं चढविलें किंवा नाहीं असें विचारलें. 'आपल्या आज्ञेप्रमाणें सर्व कांहीं गोष्टीं केल्या आहेत. मंत्र्याचा राजाला राग आला. त्यानें आपण कुमाराला कां मारलें असें पुन्हां राजानें विचारलें. तेव्हां मंत्र्यानें त्यांच्या दीक्षेची हकिकत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सांगितली. मृगध्वज मुनींना केवळज्ञान झाल्यानंतर, सीमंधर राजा त्यांच्याकडे गेला. मुनीला वंदन करून, त्यांनीं महीषाचा व आपला पूर्वभव मुनीना विचारला. मुनीनीं सगळें भवांतर त्यास सांगितलें. तें ऐकून राजानें श्रावकधर्माची दीक्षा घेतली.

कथा ११४ वी.

यमदग्नि व कामधेनु

वासुपूज्य तीर्थंकराच्या काळांतली गोष्ट! कौशला नगरींत कार्तवीर्य राजा राज्य करीत होता. राजराणी पद्मावती रूपलावण्य संपन्न होती. अयोध्याजवळील एका निबिड अरण्यांत एक तपस्व्याची पर्णकुटी होती. तेथें यमदग्नि तापसी राहात असे. त्याच्या प्रियेचें नांव रेणुका होतें. त्यांचा मुलगा श्वेतराम तापसी होता. एकदां वरदत्त मुनी पृथ्वीपर्यटन करीत करीत त्या तापसश्रमाजवळील एका झाडाखालीं येऊन उतरले. रेणुकेनें मुनीजवळ जैन धर्माचें श्रावण करून सम्यक्त्वपूर्वक श्राविकेची दीक्षा घेतली. तेव्हां योगींद्रानीं रेणुकेला गौरक्षा शिकवून, कामधेनू गाय दिली. पुढें कांहीं दिवसांनीं राजा कार्तवीर्य हत्ती धरण्यासाठीं त्या जंगलांत आला. फिरत फिरत जमदग्निच्या आश्रमांत आला. आश्रमांत रेणूका एकटीच होती. रेणुकेस राजानें जेवणास मागितलें. रेणुकेनें राजास भोजन दिलें. भोजनोत्तर राजाच्या दृष्टीस ती कामधेनू पडली. तो कामधेनुला घेऊन आपल्या नगरीस आला. रेणुकेला कामधेनू गेल्यामुळें अति दुःख झालें. ती रडूं लागली. इतक्यांत श्वेतराम अरण्यांतून जळण घेऊन आला. माता शोक करीत असलेली पाहून त्यानें कां रडतेस म्हणून विचारलें. तेव्हां रेणूका उत्तरली, कार्तवीर्य महाराज

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

येथें भोजनास आले होते. त्यांनीं जातांना कामधेनुलाहि नेलें. श्वेतरामाला राजाचा राग आला. तो कामधेनू परत आणण्यासाठीं निघाला. मुलास निघालेलें पाहून जमदग्नी म्हणाले, ' कार्तवीर्य मोठा तेजस्वी शूर आहे. तुला तो ऐकणार नाहीं. त्याला जिंकावयाचेंच असेल तर योगिंद्रानें तुझ्या मातेस शिकविलेली विद्या प्राप्त करून घे व परशु बरोबर घेऊन जा. वडिलांच्या आज्ञेप्रमाणें श्वेतरामानें मातेकडून ती विद्या जाणून घेतली व परशू घेऊन कार्तवीर्याच्या राजधानींत आला. कार्तवीर्याशीं त्याचें युद्ध झालें. त्यांत परशुनें राजाचा व त्याच्या सैन्याचा पाडाव केला. राजा मरून नरकास गेला. नंतर परशुरामानें सात वेळ पृथ्वी निःक्षत्रिय केली व तो राजा बनला. एकदां क्षत्रियांनीं एका ज्योतिष्यास याचें मरण कशांत आहे असें विचारलें. तेव्हां ज्योतिष्यांनीं सांगितलें, भाताचे जेवणाचें वेळीं पायस होईल तेव्हां हा मरेल ! तेव्हांपासून त्याच्या भोजनाची सर्व काळजी घेऊं लागले. एकदां सुभूम राजाच्या येथें सर्व नराधिपांसुद्धां त्यास भोजनास बोलाविलें. भोजनाच्या वेळीं भाताचें रूपांतर पायसांत झालें. तेव्हां सुभोमानें त्यास रणांत जिंकून ठार केलें. शेवटीं सुभोम चक्रवर्ती झाला. यानें २१ वेळां पृथ्वी निष्ब्राम्हण केली.

कथा ११५ वी.

" लढवय्या सिंहकेसरी. "

दक्षिण प्रांतांत किंशुक पटल नांवांची एक नगरी होती. तेथील राजा विजयादित्य प्रजाहितदक्ष प्रेमळ होता. राणीचें नांव विजयादित्या होतें. सिंहकेसरी नांवाचा एक बलाढ्य पराक्रमी चाकर या राजाच्या पदरीं होता. सिंहकेसरीची कीर्ति ऐकून, दुसरा एक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

महाभट दूर देशांहून, त्याच्याशीं सामना करण्यासाठीं आला. दोघांत युद्ध सुरूं झालें. युद्ध हृदयस्पर्शी होतें. लढतां लढतां सिंह-केसरीच्या पोटांत महाभटानें तरवार खुपसली. सिंहकेसरी घायाळ झाला. पोटांतली आंतडी बाहेर आली. तरीहि तो तरवार घेऊन लढूं लागला. त्याचा त्वेष अनिवार झाला. लढतां लढतां त्यानें त्या महाभटाच्या पोटांत तरवार खूपसून, त्यास ठार केलें. सिंह-केसरीला अगोदरच जखम झाली होती; त्या वेदनेनें तोहि मरण पावला. त्याच्या शौर्याची प्रशंसा जग करूं लागले. मरणोत्तर राजानें त्याची उत्तरक्रीया केली.

कथा ११६ वी.

" पौरुषवान् नीलसिंहराजा "

दक्षिण देशांत कलापूर नांवांची नगरी होती. तिचा राजा नीलसिंह सम्यक्त्वी श्रावक होता. तो नेहमीं शुद्ध पंचमीचा उपवास करीत असे. उपवासाच्या दिवशीं सर्व परीग्रहाचा त्याग करून, तो ध्यान करी. या गोष्टीचा फायदा घेऊन एका परदेशीय राजानें आपल्या सैन्यानिशीं येऊन त्याच्यावर हल्ला केला. तो दिवस उपवासाचा होता. परचक्र आलेलें जाणून आपल्या सैन्यासह स्वस्थ तो त्याच्यापुढें जाऊन ऊभा राहिला. त्याच्या सैन्यांत कोणत्याहि प्रकारची हालचाल दिसेना. तेव्हां प्रतिपक्षाच्या राजानें त्याच्यावर बाण सोडला. बाण नीलसिंहाच्या डोक्यांत शिरला. त्यानें तो मूर्छित होऊन पडला. शुद्धीवर येतांच त्याला प्रतिपक्षाचा भयंकर राग आला. त्यानें एकदम त्यांचेवर हल्ला चढविला. युद्धांत प्रति-पक्षाचा समूळ नाश झाला. व नीलसिंह विजयी बनला. राज-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वाड्यांत आल्यानंतर तो बाण मोठ्या प्रयत्नानें त्याच्या डोक्यांतून उपसून काढला. बाण निघतांच त्याच्या वेदनेनें त्यास मूर्च्छा आली. उपचारानंतर तो शुद्धीवर आला. तेव्हां त्यास सांगण्यांत आलें 'आपण आतां कांहींतरी औषध घ्यावें तेणेंकरून आपल्या शरीरास आराम पडले!' राजा उत्तरला, 'मी सर्व प्रकारच्या आहाराचा त्याग केलेला आहे; मला कांहींही घेण्याची इच्छा नाहीं व मी घेणार नाहीं.' नंतर त्यानें आनंदानें जिनेश्वराचें चिंतवन करण्यास सुरुवात केली. षष्ठीच्या सकाळीं सूर्योदयानंतर पंचपूजा केली व तो दिवस सुखासमाधानानें धर्मध्यानांत घालवून त्यानें प्राण सोडला.

कथा ११७ वी.

पौलरपुरांत एक शिवभूति नांवाचा ब्राह्मण राहात असे. तो अत्यंत सदाचारी, धर्मप्रेमी होता, अगदीं बाळपणातच त्यानें ब्रह्मचर्याचें व्रत धारण केलें होतें. त्यानें तें १०० वर्षें पाळलें. पुढें तो भ्रष्ट झाला. त्यामुळें त्याला कुष्टरोग जडला. तो त्यास सहन होईना. त्याला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला व त्यांतच तो मरण पावला.

कथा ११८ वी.

"सुकुमार मुनी."

वत्सकावती देशांतील कौशांबी नगरींत राजा अतिबल आपल्या श्रीकांता राणीसह राज्य करीत होता. सोमशर्मा ब्राह्मण राजाचा उपाध्याय होता. तो स्वभावानें मोठा प्रेमळ व सर्वांचा आवडता होता. त्याची भार्या काश्यपी रुपयौवन संपन्न होती. सुखानें संसार करीत असतां त्यांना दोन मुलें झालीं. त्यांचीं नांवें अग्निभूति व वायुभूति अशीं होतीं. तीं व्यसनीं कलहप्रिय निघालीं. बापाची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आज्ञा कधींहि पाळीत नसत. पुढें सोमशर्मा मरण पावला. तेव्हां ते उभयतां बंधू राजाकडे धन मागण्यास गेले. त्यांचा मूर्खपणा पाहून राजानें होतें नव्हतें तें त्यांच्या जवळून हिरावून घेतलें. व तें त्यांच्या गोत्रजांना त्यांनीं वाटून दिलें. अग्निभूति व वायुभूतीला अत्यंत वाईट वाटलें. तें गांव सोडून राजगृहीस आले. तेथें त्यांचा चुलता सूर्यमित्र राहात असे. आपल्या वडलाच्या मृत्यूची बातमी त्याला सांगितली. त्याला अत्यंत वाईट वाटलें. त्या बंधुद्वयाला त्यांनीं आपल्या घरीं आश्रय दिला. दोघांनींहि विद्याध्ययनास सुरुवात केली. सात आठ वर्षांच्या काळांत त्यांनीं सर्व शास्त्रांत प्राविण्य संपादन केलें. पूर्णपणें वेदाध्ययन झाल्यानंतर ते आपल्या जन्मभूमीस परत आले. राजाची भेट घेतली. त्यांची विद्वत्ता पाहून, पुन्हां राजानीं उपाध्याय पदावर त्यांची नेमणूक केली.

कांहीं दिवसांनीं राजगृहीस सौधर्ममुनी आले. सूर्यमित्रानें सर्व संग परित्याग करून त्यांचें जवळ दीगंबरी दीक्षा ग्रहण केली. विहार करीत करीत सूर्यमित्र मुनी कौशांबीस आले. आहारासाठीं फिरत असतां अग्निभूतीच्या घराकडे आले. अग्नीभूतीनें मुलाच्या मुंजी बंधनासाठीं पुष्कळशा ब्राम्हणांना पाचारलें होतें. मुनीना दारीं पाहतांच तो मोठ्या भक्तिभावानें त्यांना सामोरा गेला. विधिपूर्वक त्यांना आहार दिला. त्यामुळें त्याच्या घरीं वसुधारादिक पांच आश्चर्यें उत्पन्न झालीं. हा मुनीचा प्रभाव पाहून सर्व ब्राह्मण त्यांच्या चरणीं लागले. वायूभूति तेथेंच शिष्यांना पाठ देत बसला होता. त्यानें नमस्कार केला नाहीं. तो मुनीच्या तोंडाकडे पाहात स्वस्थ उभा राहिला. तेव्हां अग्निभूति त्यास म्हणाला, ‘ मुनीच्या कृपेकरून हे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आश्चर्यैंपंचक उत्पन्न झाले असून आपणांला परमलक्ष्मीची प्राप्ती झाली आहे तरी तूं यांना नमस्कार कर!' वायुभूति उत्तरला, 'स्नान न करणाऱ्या मुनींना मी कधींहि वंदना करणार नाहीं.' हें वायुभूतीचें उत्तर ऐकून अग्नीभूति म्हणाला, 'खरोखरीं उत्तम कुलांत जन्म घेऊन तूं दुष्ट बनलास! हें तुझें करणें तुला शोभत नाहीं. पापमार्गाचा स्वीकार करूं नकोस. दुराचारी बनूं नकोस. आलेली सुवर्णसंधी दवडूं नकोस'. वायुभूतीच्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं. सूर्यमित्र मुनी दयावाद पर्वतावर निघून गेले. अग्निभूति मुनीच्या पाठोपाठ पर्वतावर गेला. व त्यानें परीग्रहाचा त्याग करून मुनीजवळ दीक्षा घेतली.

अग्नीभूतीच्या दीक्षेमुळें सोमदत्तेला अत्यंत दुःख झालें. ती वायुभूतीस रडत रडत म्हणाली, 'दुष्टा! तुला उपकाराची जाणीव नाहीं. ज्यानें तुला ही स्थिती दाखविली त्या थोर मुनीच्या दर्शनाचा लाभ झाला तरी तूं तिकडे ढुंकून पाहिलें नाहीं. सोमदत्तेच्या भाषणानें वायुभूतीला अत्यंत वाईट वाटलें. त्यानें सोमदत्तेस लाथेखालीं तुडविलें. एवढेंच नव्हे तर वेडेवांकडे बोलून तिला घराबाहेर घालवून दिलें. सोमदत्तेला हें सहन झालें नाहीं. ती निघतांना रागानें म्हणाली, "दुष्टा! तूं आज या पायानें लाथाडलेंस; पण लक्षांत ठेव! या नाहीं पुढच्या जन्मीं तुला मी अशीच पायाखालीं तुडवीन." कांहीं दिवसांनीं सोमदत्ता मरण पावली. अभिमानी वायुभूतीला पुढें उदुंबरकोष्ट रोग जडला. त्यांतच त्याचा अंत झाला.

अंगक देशांत मोडणाऱ्या चंपापूर नगरींतील उद्यानांत वासुपूज्य जिनेश्वराच्या प्रतिमेची वंदना करण्यासाठीं सूर्यमित्र आपल्या अग्निभूति वगैरे शिष्यासह आले. प्रतिमेचें वंदन करतांच सूर्यमित्र मुनींना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चतुर्ज्ञानाची प्राप्ति झाली. मुनींची निंदा केल्यामुळें कुष्ट रोगानें मरून लंक विद्याधराच्या घरीं वायूभूति गर्दभी होऊन जन्मला. गर्दभी मरून कुत्री, कुत्री मरून चंपापुरींत मातंगाच्या घरीं डुकर होऊन जन्मला. ती डुकरी मरून त्याच मातंग श्रेष्ठीच्या घरीं मुलगी झाली. ती जन्मतांच आंधळी झाली. झाडाखालीं पडलेली ती जंबुफुलें खात होती. अग्निभूति मुनीची दृष्टी तिच्याकडे गेली. तिला पाहून तो गुरुवर्यांना म्हणाला, 'महाराज! अशा या स्थितींत तिला वैराग्य कसें उत्पन्न होत नाहीं?' मुनी उत्तरले. 'हा तुझा बंधू वायु-भूति असून पापामुळें त्यानें गर्दभी वगैरेचा जन्म घेतला व तो आतां मरून मुलगी झाला आहे.' तेव्हां अग्निभूति त्या मुलीस म्हणाले, "बाळे! पूर्वजन्मीं केलेल्या पापांमुळें तुला ही दुःस्थिती प्राप्त झाली आहे. तेव्हां तूं अणुव्रतें ग्रहण कर." अग्नीभूतीच्या उपदेशानुसार तिनें अणुव्रताचा स्वीकार केला व ती पाळन करीत मरण पावली.

चंपापुरीचा राजा चंद्रवाहन, त्याची भार्या चंद्रमति मोठी सुंदर होती. राजपुरोहित नागशर्मा त्याची भार्या त्रिवेदी—हिच्या पोटीं तीं अंध मुलगी मरून जन्मास आली. तिचें नांव नागश्री ठेवण्यांत आलें. नागश्री दिसण्यांत अति सुंदर, मधुरभाषणी होती. कांहीं दिवसांनीं विहार करीत सूर्यमित्र मुनी आपल्या संघासह चंपापुरीस आले. व नगराबाहेरील चंपोद्यानांतील नागमंदिरांत येऊन उतरले. त्या मंदिरांत पद्मनाग, संबलनाग व पत्रनाग हें तीन नाग राहात असत. त्या नागाचें पूजन करण्यासाठीं नागश्री उद्यानांत आली. नागांची पुष्पादिकांनीं पूजा करून, तिनें सूर्यमित्र मुनींना नमस्कार केला. नागश्रीला पाहतांच अग्नीभूतीच्या मनांत प्रेमभाव उत्पन्न झाला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यांनीं मुनीला विचारलें, 'महाराज! मला इच्याविषयीं आदर व प्रेम कां वाटावें!' 'हा तुझा पूर्व जन्मींचा बंधू वायुभूति मातंग कन्यका मरून आतां नागश्री झाली आहे' असें मुनींनीं सांगितलें. नागश्रीनें आपलें भवांतर ऐकून, मुनीजवळ अणुव्रतें ग्रहण केलीं, व्रतें देतांना सूर्यमित्र मुनींनीं कोणत्याहि स्थितींत, संकटांत व्रतभंग घडूं देऊं नकोस; असा तिला कळकळीचा उपदेश केला. त्यांना वंदना करून नागश्री घरीं आली.

नागशर्मा उपासकधर्मी होता. जिनधर्मांची व्रतें नागश्रीनें घेतलीं हें कळतांच तो नागश्रीस अद्वातद्वा बोलूं लागला. व व्रतें सोडून देण्याबद्दल आग्रह करूं लागला. नागश्री म्हणाली, "व्रते सोडावीं अशी आपली इच्छाच असेल तर ज्यांच्या जवळून मी घेतलीं त्यांच्या जवळच मी सोडीन." नंतर मुलीला बरोबर घेऊन नागशर्मा मुनीकडे जाण्यास निघाला. रस्त्यांत एका चोराला दोरखंडांनीं बांधून राजसेवक घेऊन जात होते. तें पाहण्यासाठीं लोकांचा समूह त्यांचेंभोवतीं जमला होता. चोर मोठा धिप्पाड व सुंदर होता. नागश्रीनें हा प्रकार काय असावा असें नागशर्म्यास विचारलें. चौकशी अंतीं असें कळलें कीं, या पुरुषानें एका श्रेष्ठीच्या मुलाला धन मागितलें. त्यानें न दिल्यामुळें चोरानें त्यास ठार केलें. म्हणून चोरास राजाकडे घेऊन जात आहे. तेव्हां नागश्री म्हणाली, 'बाबा! जीववध करूं नये. असेंच मी व्रत घेतलें आहे. कारण वध केल्यानें हिंसेचें पातक तर लागतेंच पण सूळावरहि चढावें लागतें. तेव्हां कधींहि मी जीवहिंसा करणार नाहीं. असें मी घेतलेलें व्रत आपण मला सोडण्यास सांगतां काय! जीववधानें मिळणारें फळ आपण समक्ष पाहतच आहे.'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यावर सोमशर्मा म्हणाला, ‘ बाळे! हें व्रत तर फार चांगलें आहे. मुमुक्षूंनीं याचें अवश्य पालन केलें पाहिजे. मग तें जिनप्रणित कां असेना? तूं हें व्रत सोडूं नकोस! बाकी सगळीं व्रतें तूं सोडून दे. ’ आणखी थोडा रस्ता चालून गेल्यानंतर एका मनुष्याचे हातपाय बांधलेले त्यांनीं पाहिलें तेव्हां नागदत्तानें त्यास विचारलें, “बाबारे! तूं काय दोष केलास म्हणून तुझे हे हातपाय बांधले?” त्या मनुष्यानें सांगितलें.

“देवदत्त व यज्ञदत्त नांवांचे दोन श्रेष्ठी धान्याचा व्यापार करीत असतात. ते आपले सर्व धान्य घेऊन श्रीपुरीहून, विकण्यासाठीं चंपापुरीस आले. जयकर राजेश्वरांस त्यांनीं तें धान्य विकलें. याच नगरींत तारक नांवाचा वाणी करपल्लवी विद्येच्या साहाय्यानें मायावी रूपें घेऊन, चोऱ्या करीत असे. यानें राजाची सर्व संपत्ती, धनधान्य आपल्या विद्येच्या सहाय्यानें मोजून तो भिंतीवर मांडून ठेवीत असे. एकदां तो राजाकडे गेला व म्हणाला, ‘ मला तुझें सर्व धान्य विकत घ्यावयाचें आहे; पण मी एक गोष्ट सांगतों ती ऐक! कोण्या एका गांवीं अत्यंत धनाढ्य धनपाल श्रेष्ठी राहात असे. त्याच्या धनदत्त पुत्राला सर्पानें दंश केला. तें विष उतरविण्यासाठीं श्रेष्ठीनें पुष्कळशा प्रसिद्ध मांत्रिकांना बोलावून आणलें. त्यापैकीं एक मांत्रिक धनपालास म्हणाला आपल्या मुलास अशा स्थितींत एवढी रात्र राहूं द्या. म्हणजे सर्पाचें वीष त्याच्या सर्वांगांत भिनेल! मग मी सकाळीं मंत्राच्या सहाय्यानें तें वीष उतरून टाकेन. श्रेष्ठीनें मुलाच्या रक्षणार्थ चार नोकर ठेवले. त्यापैकीं एकजण अरण्यांत गेला व एक मेंढा घेऊन आला. दुसरा लांकडें व तिसरा विस्तव घेऊन आला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चौघानें मिळून तो मेंढा शिजवून खाल्ला. मांत्रिक सकाळीं आला. त्यानें मंत्राच्या सहाय्यानें विष उतरलें. श्रेष्ठीनें प्रसन्न होऊन मांत्रिकांस पुष्कळसें धन देऊन संतुष्ट केलें.' अशी कथा सांगून या नरपुरुषानें राजावर व त्याच्या नोकरांवर मोहिनीमंत्र टाकला व सर्वांना बेशुद्ध केलें. नंतर करपल्लवी विद्येच्या सहाय्यानें सर्व धान्य मोजलें. पण राजास तें आहे त्यापेक्षां कमी आहे असें भासवून सर्व विकत घेतलें. पण ही गोष्ट पुढें बाहेर पडली. चोरीचा माल पचतो कसा ? राजानें पकडून हातपाय तोडण्याचा हुकूम दिला आहे. म्हणून आम्हीं याचे हातपाय बांधून नेत आहोंत ? ही कथा ऐकल्यानंतर नागदत्त मुलीस म्हणाला " तूं हें चोरी न करण्याचें व्रत घेतलें आहेस. तेव्हां हें व्रत सोडूं नकोस ! बाकीच्या व्रताचा तूं त्याग कर.'

आणखी थोडा मार्ग चालून गेल्यानंतर एका मनुष्याला सुळाकडे नेत असलेले या दोघांना दिसलें. नागदत्तानें पकडून नेणाऱ्या माणसांपैकीं एकाजवळ चौकशी केली; तो सांगूं लागला " चंपापुरीजवळील शैलपुरांत मत्स्य नांवाचा राष्ट्रकूट् कुटुंबी राहात असे. जैका नांवाची त्याची भार्या होती. त्यांना दोन मुलें होतीं. नंद व ओदक. नंदाच्या मामानें नंदास आपली मुलगी दिली. पण तिच्याशीं संसार न करतांच तो पैसे मिळविण्यासाठीं देशांतराला निघून गेला. बारा वर्षें निघून गेलीं. तो परत येत नाहीं असें पाहून मामानें पुन्हां ओदकाशीं तिचें लग्न लावलें. ती संसार करूं लागली. पुढें नंद परत आला. तेव्हां बापानें नंदाच्या स्वाधीन त्या मुलीला केलें. पण झालेल्या प्रकारामुळें नंदानें तिला टाकून दिलें. ओदकानेंहि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ती टाकली. शेवटीं बापाच्या घरीं येऊन राहूं लागली. ती गुणानें अति सुंदर पण या प्रकारामुळें तिचा संसार मोडला. याच गांवांत नागशर्मा आपल्या कटुका भार्येसह राहात असत. त्यांचा मुलगा नागशूर. याला अत्यंत सुंदर चार स्त्रिया होत्या. पण त्यांना सोडून तो सौदालिकेबरोबर आपला संसार करूं लागला. तिला घेऊन चंपापुरीस आला. इतरांच्या स्त्रिया पळवून आणण्याच्या आरोपावरून त्यास राजसेवकांनीं पकडून राजासमोर आणून उभें केलें. राजानें एक सुंदर लोखंडाचा स्त्रीचा पुतळा तप्त करून त्या पुतळ्यास यास आलिंगन करण्यास लावा ! अशी शिक्षा फर्माविली. म्हणूनच हे लोक त्याला तिकडे घेऊन जात आहेत. ”

नंतर ते थोडे आणखी पुढें आलें. तों आणखी एका मनुष्यास बांधून नेत असल्याचें त्यांनीं पाहिलें. नागश्रीच्या सांगण्यावरून नागदत्तानें चौकशी केली. तेव्हां त्यांना कळून आलें कीं, या धीर-पुण्य गवळ्याला राजानें आपल्या एका गोकुळवाड्यांतील सर्व धेनू घेऊन जाण्याविषयीं सांगितलें होतें. पण त्यानें सर्व गोकूळवाड्यां-तून उत्तमोत्तम धेनू निवडून घेतल्या. ही गोष्ट महाराणीनें राजास सांगितली. कारण राजाच्या गोकुळवाड्याजवळ महाराणीचेंहि गोकुळवाडे होते. सर्वांच्याच तक्रारी राजाकडे आल्या. तेव्हां राजानें याला पकडून दूर देशीं नेऊन ठार करण्याची आज्ञा दिली. अति लोभाचें हें फळ ! ! हे सर्व प्रसंग पाहून नागश्री नगदत्तास म्हणाली, ‘ बाबा ! मी अहिंसा, सत्य, अस्तेय, स्वदार रति, व धना-दिक प्रमाण हीं पांच व्रतें घेतलीं आहेत. त्यामुळें मला याचे दोष लागणार नाहींत. मग आपण सोडा म्हणतां तर काय सोडूं काय ?’

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नागदत्ताला सोदाहरणानें हें सर्व पटलें होतें. तो उत्तरला, " तूं आपलीं व्रतें सोडूं नकोस. जरी तूं जिनधर्मी साधुकडून घेतलेली आहेत तरी तीं आपल्याहि शास्त्रांत सांगितलेली असून, श्रेष्ठ मानलेलीं आहेत. मग आतां त्या नागड्या साधूकडे जाण्यांत काय अर्थ आहे ? आपण आतां घरीं परतावें हें बरें ! कारण अज्ञान मुलींना फसवून अयोग्य मार्गाला लावणें हें या मुनीचें मुख्य काम. अशांचें दर्शन घेण्यापासून काय फायदा ? " असें बोलत ते मुनी-जवळ आले. मुनींना पाहून तो मोठ्यानें म्हणाला, ' माझ्या मुलीची प्रतारणा करतांना हे नागड्या ! तुला लाज कशी वाटली नाहीं ? मुनी शांतचित्तानें उत्तरले, ' नागश्री ही माझी मुलगी आहे. तुझी नाहीं. नंतर त्यानें नागश्रीस हाक मारून जवळ बसण्यास सांगितलें. नागश्री सूर्यमित्र मुनीजवळ जाऊन बसली. मुनींचा नागदत्ताला अतिशय राग आला. तो म्हणाला, ' नागड्या ! माझ्या मुलीस सोड. ही मुलगी माझी आहे. " यावर मुनी म्हणाले, " ब्राह्मणा ! तूं आल्या वाटेनें आपल्या घरीं जा ! प्रत्यक्षच राजाच आम्हांला सांगेल त्यावेळीं पाहतां येईल. ही माझी मुलगी आहे. हें खास ! " नागदत्त ' अब्रम्हण्यं महापापं ' असें ओरडत चंद्रवाहन राजाकडे गेला. त्यानें राजास सारी हकिकत सांगितली. आपल्या परिवारांसह राजा मुनीकडे आला. नागदत्त म्हणाला, ' राजा ! हीं माझी मुलगी. देवां ब्राह्मणांनीं दिलेली ! आणि हा साधु आपली म्हणतो. " यावर सूर्यमित्र मुनी राजाकडे वळून म्हणाले. राजा ! ही मुलगी माझी आहे. एवढेंच नव्हें तर मी हिला वेदविद्या स्मृति वगैरे शिकविलें आहे. तुला याचें प्रत्यंतरच पाहावयाचें असेल तर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पाहा!" नंतर ते नागश्रीस म्हणाले, ' हे वायुभूतिचरा ! मी तुला शिकविलेली सर्व विद्या तूं म्हणून दाखीव." मुनीनीं असें म्हणतांच नागश्रीला जातिस्मरण झालें. प्रथम तिनें ॐकार म्हणून, स्वर्णभेद सांगितले. सूत्रें, ऋग्वेद, सप्तसंहिता वगैरे वाचल्या. यजुर्वेद, सामवेद अथर्वणवेद, अठरा प्रकारचीं पुराणें, संहिता, मीमांसा, न्यायग्रंथ म्हणून दाखविले. राजाला हें ऐकून आश्चर्य वाटलें. त्यानें मुनींना विचारलें, ' आपलें म्हणणें खरें आहे. पण हिचा व आपला कोणत्या प्रकारचा संबंध होता हें आम्हांस सांगा. साधु सांगूं लागले.

वत्सकावती देशांत कौशांबी नगरी आहे. तेथील राजा अतिबल त्याची प्रिया श्रीकांता. राजपुरोहित अग्निमित्र. अग्निमित्राची भार्या ह्यांना दोन मुलें होती. थोरला सूर्यमित्र तो मी. आणि धाकटा सोमशर्मा नांवांचा होता. सोमशर्माची भार्या काश्यपी. तिच्या पोटीं अग्निभूति वायुभूति असे पुत्र झाले. आमचे वडील निवर्तल्यानंतर राजानें उपाध्यायपद मला देऊन सर्व संपत्ती माझे स्वाधीन केली. पण बंधुप्रेमामुळें मी सोमदत्तास देऊन टाकली. व मी मगध देशांतील राजगृहींत येऊन राहिलों. माझी विद्वत्ता पाहून, मला वसुपाल राजानें आपला उपाध्याय केलें. यानंतर मुनीनीं अग्निवायुभूतीच्या शिक्षणाची व आजपर्यंतची सर्व हकिकत निवेदन करून म्हटलें, 'त्या वायुभूतीचा हा जीव नागश्री होय. म्हणूनच तिला जातिस्मरण झालें. व तिनें या सर्व वेदविद्या म्हणून दाखविल्या.' यामुळें चंद्रवाहन राजाला वैराग्य उत्पन्न झालें. त्यानें राजपुत्र महाचलास राज्यावर बसवून, आपण पुष्कळशा लोकांसह दीगंबर दीक्षा घेतली. नागशर्माहि विरक्त बनला. व त्यानेंहि दीक्षा घेतली. नागश्रीनें व त्रिवेदीनें

१५

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ब्राह्मणी अर्जिकेजवळून दीक्षा ग्रहण केली. उग्रपर्वतावरून सूर्यमित्र मुनी मोक्षास गेले.

नागशर्मा तपश्चर्येच्या प्रभावानें मरून अच्युत कल्पांत देव झाला. त्रिवेदीनें नागश्री माझी मुलगी होवो; असें निदान केलें व त्या दोघी मरून अच्युत स्वर्गांतील पद्मपूर विमानांत देव झाल्या.

उज्जयनी नगरींत श्रेष्ठी इंद्रदत्त राहात असे. तो अत्यंत श्रीमंत होता. त्याची भार्या गुणमती गुणानें, रुपानें सुंदर होती. नागदत्त-चर देव स्वर्गांतून च्यवून यांच्या पोटीं सुरेंद्रदत्त नांवानें जन्मला. याच नगरींत आणखी एक श्रेष्ठी राहात असे. त्याचें नांव सुभद्र. त्याची भार्या सर्वयशा. त्रिवेदीच्या जीवानें स्वर्गांतून च्यवून यांच्या पोटीं जन्म घेतला. तिचें नांव यशोभद्रा ठेवण्यांत आलें. सुरेंद्रदत्ताचें व यशोभद्रेचें लग्न झालें. यांच्या पोटीं स्वर्गीय सुख भोगून, नाग-श्रीचा जीव सुकुमाल नांवानें जन्मला. सुकुमालास सुरेंद्रदत्तानें श्रेष्ठीपद दिलें. व आपण जिनसेन मुनीजवळ दीक्षा घेतली. सुकु-मालाला ३२ स्त्रिया होत्या. त्या स्त्रियांसह तो आपल्या बत्तीस मजली राजवाड्यांत सुखानें संसार करूं लागला. सुकुमालाला पाहून एका ज्योतिष्यानें असें भाकीत त्याच्या मातेजवळ केलें कीं, मुनीचें दर्शन होतांच हा सर्वसंग परित्याग करून दीक्षा ग्रहण करील; तेव्हांपासून त्याच्या मातेनें आपल्या घरीं मुनीं कधींच येणार नाहींत अशी व्यवस्था ठेवली.

एकदां प्रद्योताच्या राजवाड्यांत दक्षिण दिशेवरून एक व्यापारी रत्नजडित शाली विकण्यासाठीं आला होता. त्याचे जवळच रत्न-जडित आठ शाली होत्या. ज्योतिर्माला राणी जवळच बसली होती.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राजानें आपला श्रेष्ठी सुकुमालासाठीं या शाली खरेदी केल्या.

कथा ११९ वी

"मुनी सुकौशल"

विनिता देशांतील कौशल नगरींत राजा प्रजापाल आपल्या सुप्रभा प्रियेसह राज्य करीत होता. राजश्रेष्ठींचें नांव सिद्धार्थ होतें. सिद्धार्थ बत्तीस कोटः धनाचा मालक होता. त्याला बत्तीस स्त्रिया होत्या. लोक त्याला धनपति नांवानेंच ओळखीत. त्या बत्तीस स्त्रियांपैकीं त्याची आवडती जयमती नांवाची स्त्री होती. जयमतीला मुलबाळ नव्हतें. ती मुलांसाठीं नेहमीं जप, तप, व्रत, नियम करीत असे. एकदां ते आनंदी जोडपें गच्चीवर बसलें होतें. दोघांत इकडच्या तिकडच्या गोष्टी चालल्या होत्या. सहज जयमतीचें लक्ष सिद्धार्थाच्या मस्तकाकडे गेलें. एक पांढरा केस तिनें पाहिला. ती सहज विनोदानें म्हणाली 'नाथा! आपणांस बोलावण्यास दूत आला आहे, हें ऐकून सिद्धार्थ मागेंपुढें पाहूं लागला. पण कोणीच त्यास दिसलें नाहीं. त्यानें विचारलें,' देवि! दूत कोणांकडून आला, आणि कोठें आहे? मी सगळीकडे पाहिलें मला दिसत नाहीं.' तेव्हां नाथा! हा पहा दूत! हा दूत नरदूत नसून धर्मदूत आहे, असें म्हणून जयदेवीनें त्यास पांढरा केस दाखविला. तो पाहतांच श्रेष्ठीस जतिस्मरण झालें. व त्यास दीक्षा घेण्याची इच्छा झाली. ही गोष्ट राजमंत्रि सचिवांना कळली. सिद्धार्थास ते येऊन म्हणाले, 'आपण तप करूं इच्छितां हें योग्य आहे. पण आपल्या ह्या एवढ्या मोठ्या पसाऱ्याला कोणी वारस नाहीं. आपल्या मागें हें सर्व लयास जाईल तेव्हां वारस उत्पन्न होईपर्यंत तरी आपण दीक्षा घेण्याचा विचार

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रहित करावा.' सिद्धार्थानें सर्वांच्या आग्रहाला मान दिला व म्हणाला 'आपली गोष्ट मला कबूल आहे. पण पुत्रदर्शन होतांच मी तात्काळ तपश्चर्येसाठीं निघून जाइन.'

पुढें पुत्रप्राप्तीसाठीं जयमति यक्षपूजन करूं लागली. एकदां यक्षपूजन करीत असतां तिला एका दीव्यज्ञानी मुनींनीं पाहून म्हटलें, 'श्राविके! लौकिक देवांना पुजल्यानें कधींतरी पुत्रधनाची प्राप्ती झाली आहे काय? जिनधर्मानें सर्व कांहीं मिळतें. त्यांची पूजा करण्याचें सोडून दे. सम्यक्त्वपूर्वक धर्माला पाळ. लौकिक देवाला भजणें मिथ्यात्व होय. मिथ्यात्वानें उलट कर्मबंधच होतो. पण धर्म सम्यक्त्वपूर्वक आचरल्यानें सुखाची प्राप्ती होते. धर्मानें वागशील तर आजपासून तुझ्या पोटीं सात दिवसांनीं गर्भ राहील. व तूं एका दिव्य मुलास जन्म देशील! मुनीच्या आज्ञेप्रमाणें मिथ्यात्वाचा त्याग करून, ती जिनधर्मानुसार आचरण करूं लागली. मुनींनीं भाकित केल्याप्रमाणें तिला गर्भ राहिला. नऊ मास पूर्ण होतांच तिनें एका दिव्य मुलास जन्म दिला. सिद्धार्थ पुत्रदर्शनानें दीक्षा घेणार म्हणून ही गोष्ट तिनें गांवांत किंवा घरांत पसरूं दिली नाहीं. कांहीं दिवस निघून गेले. होणारी गोष्ट टळत नाहीं. एक दासी अंतपुरांतून बाहेर आली. ती सहज एका दासी पुढें म्हणाली गडे जयमतीचें मूल किती सुंदर आहे म्हणून सांगू! पण ही गोष्ट तूं कोणाला सांगू नको बरें! हें भाषण एका दरिद्री क्षुधेनें पीडलेल्या सोमशर्मा ब्राम्हणानें ऐकलें. त्याला अत्यंत आनंद झाला. आतां ही आनंदाची वार्ता ऐकून श्रेष्ठी आपणांस पुष्कळसें धन देईल म्हणून तो महाळुंगाचें फळ घेऊन श्रेष्ठी मंदिरांत गेला. सिद्धार्थाची भेट होतांच तो

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म्हणाला, श्रेष्ठीवर्या ! तुझ्या जयमतीच्या पोटीं सुपुत्र जन्मला आहे. सिद्धार्थाला ही वार्ता अत्यंत आनंदित करती झाली. त्याच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. त्यानें सोमशर्माला पुष्कळसें धन व शंभर गांवें इनाम दिलीं. व त्याचा आदरसत्कार केला. नंतर तो जयमतीच्या मंदीरांत गेला. पुत्र दर्शन घेतलें. त्या आनंदोत्सवाप्रित्यर्थ जिनमंदिरांत पूजा करण्यांत आली. त्याचें धनदेव नांव ठेवण्यांत आलें. नगरांत श्रेष्ठीला मुलगा झाल्याची वार्ता कळली. सर्व नागारिकांनीं आनंदोत्सव केला. सिद्धार्थानें मुलांस श्रेष्ठीपद देऊन, विनयंधर मुनी जवळ जाऊन दीक्षा घेतली. जयमतीशिवाय इतर स्त्रियांनीं विनयंधराना नमस्कार करून, सुव्रत मुनीजवळ दीक्षा घेतली.

पतीच्या दीक्षेमुळें जयमतीला विषाद वाटला. सिद्धार्थाच्या नांवानें ती खडे फोडूं लागली. त्यांची निंदा करूं लागली. मी तारुण्यांत आलेली, अशा मला एकटीला वैधव्यावस्थेंत सोडून जाण्याइतकी त्यांना लाज नव्हती काय ? पुरुषजात ही निष्ठूरच. अशांचें कल्याण तपानें तरी कसें होणार ? अशा मुनीना घरांत येण्याची बंदी करणेंच योग्य ! तिनें आपल्या नोकरांना सांगून त्याचा प्रबंध केला. व आपला काळ सुकौशल कुमाराच्या लालन पालनांत घालवूं लागली. रात्री सुनंदा सुकुमाराला स्तनपान पाजी ! नंदा खेळवी. सुमति भोजन घाली. सुप्रभा स्नान घाली व मेखला श्रृंगार व कपडे नेसवी. अशा प्रेमांत दाईच्या देखरेखीखालीं बाळ वाढूं लागला. यौवनावस्थेंत प्रवेश करतांच त्याचे बत्तीस मुलीबरोबर लग्न लावण्यांत आलें. एके दिवशींची गोष्ट ! एका ज्योतिष्यानें जयमतीला सांगितलें. तुझा हा बाळ मुनींचें रूप दृष्टीस पडतांच विरागी बनेल !

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अगोदरच मुनींचा तिटकारा ! त्यांत नैमित्तिकाच्या भविष्यानें भर टाकली. तिनें भिक्षेसाठीं येणाऱ्या सर्व साधूंना घरीं येण्याला बंदी केली. मुलाच्या संरक्षणासाठीं घराभोंवतालच्या पटांगणांत हत्ती घोडयांच्या पागांच्या जागीं गगनचुंबी अष्टमजली सात सात महाल बांधले व मध्यभागीं मुलांस ठेवलें. सुकुमार आनंदांत आपला काळ तेथें घालवूं लागला.

एके दिवशीची गोष्ट ! माध्यान्हाची वेळ होती. सुकौशल वाडयाच्या गच्चीवर उभा होता. दुरून एक मुनी भिक्षेसाठीं गांवांत येत होते. ते त्यानीं पाहिलें. त्यांचा अस्थिपंजर देह पाहून, त्याचें मनांत दया उत्पन्न झाली. त्यानें पूर्वीं कधीं असें दृश्य पाहिलें नव्हतें. मुनींहि त्याच्याच घराकडे येत होते. तेव्हां त्यानें आपल्या मातेस विचारलें, आपल्या घरीं येणारे हे कोण ? यांचा हा देह असा इतका दुबळा दुःखी कां ? जयमति म्हणाली बाळा ! कोणीतरी, अभागी, पापी, चोरटा, स्वजनांनीं टाकलेला, नागडा भिकारी असावा ! असें भिकारी गांवांतून रोज फिरत असतात. भीक्षा मागणें हेंच त्यांचें काम. कोणी कांहीं न दिल्यामुळें तो आपल्या दारीं आला आहे एवढेंच ! आणि हा गृहभंजक तुझा बाप होय.' सुव्रता दासी जवळच होती. मुनीची निंदा ऐकून जयमतीस म्हणाली. जयमति ! तूं थोर सम्यक्त्व कुलांत जन्म घेतलास. धर्मामुळें तुला ही संतति लाभली. त्याची, त्याला अनुसरणाऱ्या मुनीची तूं निंदा करत्येस ! हें पातक तूं कोठल्या जन्मीं फेडशील ! तुझ्या कुलांतून आजपर्यंत पुष्कळसे श्रेष्ठीपुत्र सर्व जगाची संपत्ती तृणवत समजून सकल परीग्रहाचा त्याग करून, विरागी बनले. अरण्यांत जाऊन त्यानीं घनघोर तपश्च-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रण केलें. तपश्चरणाला मदत व्हावी म्हणूनच ते भीक्षा घेतात. एरव्हीं त्यांना भीक्षेची देखील गरज नसते. अशा सत्पुरुषांची निंदा करणें हा आपला धर्म नव्हे. निंदा संसारवर्धक कर्माचा बंध बांधतें. तेव्हां तूं असा उलटा कर्मबंध जोडून घेऊं नकोस. सुव्रतेचें हें स्पष्टीकरण अधिक लांबलें असतें; पण तिला मध्येंच गप्प बसवून सुप्रभा धात्री म्हणाली कुमारा ! आपण हिच्या म्हणण्याकडे लक्ष्य देऊं नका. जगांत असे ढोंगी पुष्कळ असतात. योग्याचें रूप म्हणजे केवळ ढोंग होय. यामुळें तर त्यांना जगांत सुख मिळतच नाहीं. पण टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठीं वणवण करीत दारोदार भटकावें लागते. हे मोठे लुच्चे लफंगे असतात. यांची कर्मसंतति अभागीं असते. त्यांना कोणींहि भीक्षा घालीत नाहीं. कित्येक तर रानांतुन डोईवर लांकडांच्या मोळ्या आणून बाजारांत विकतात. व आपली उपजीविका करतात. तर कित्येक ढोंगी साधूचें रूप धेऊन, जगाला फसवीत फिरतात. अशाचपैकीं हा एक साधू आहे. त्याचें नांव भौम आहे. तो अनाथ असून त्याला त्याच्या भाऊबंदांनीं घरांतून हांकलून दिलें आहे. तो दारोदार भीक मागून आपलें पोट भरतो. आणखी एक दुसरा पारधी चिलात नामें येथेंच राहात असतो. तो भाजीपाला विकुन धनसंग्रह करतो. धनानें सोनें खरिदतो; व उलट भीक्षा मागून, आपलें पोट भरतो. त्याजजवळ एकदां बरेचसें सोनें पाहून, राजसेवकांनीं त्यास पकडलें. तेव्हां अश्या भीकार भणंग्याकडे आपल्या सारख्यांनीं लक्ष्य देणें योग्य नाहीं. हे असे दरिद्रि आपल्या दुष्कर्मानेंच दुःख भोगीत असतात. आपण तिकडे लक्ष्य देऊं नका ! सुकोशलाला पुष्कळसें सांगितलें तरी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तें पटेना ! आईच्या म्हणण्यावरून ही माझी कांहींतरी समजूत करून देत आहे अशी त्याची खात्री झाली. तो मनांत विचार करूं लागला. पण त्यानें असें कधीं दृश्यच अनुभवलें नसल्यामुळें त्याची मति चालेना. तो खिन्न होऊन बसला. इतक्यांत स्वयंपाक्यानें जेवण्यास वर्दी दिली. आईनें जेवण्यास चलण्याबद्दल त्यास सांगितलें. पण त्यानें तिकडे लक्ष्य दिलें नाहीं. तेव्हां त्याच्या बत्तीस भार्या आल्या त्यांचीं नांवें:— स्वयंप्रभा, श्रीदत्ता, मित्रवती, सुप्रभा, अनंगसेना, सोमश्री, श्रीमती, बंधुमति, सेना, भानुमित्रा, रविप्रभा, प्रियंगू, प्रियमति, श्यामा, श्यामलता, विद्युलता, विमलमति दिशा, शूरसेना, धनमत्ति, विदया, वैजयंति, स्वर्णमाला, अपराजिता, दमयंती, केतुमाला, धनश्री, धनया, बंधुश्री. या सर्व स्त्रीयांनीं त्यास भोजनांस येण्याविषयीं विनंति केली. तेव्हां तो सर्वांना उद्देशून म्हणाला, जोपर्यंत मला खरें काय तें कळणार नाहीं. तोपर्यंत मी भोजन करणार नाहीं. नंतर सुव्रता दासीकडे वळून म्हणाला तुला खरी माहिती असेल ती सांग. सुव्रता सांगू लागली, ‘ कुमार ! आपण अगदीं लहान होता, आपले पिताश्री सिद्धार्थ आपणांला श्रेष्ठीपदाचा अधिकार देऊन, मुनी बनले. ते आज आपल्या मंदिरी भीक्षेसाठीं आले होते. तपामुळें त्यांचें शरीर कृष झालें आहे. आपल्या मातेनें त्यांना द्वारपालांकडून घराजगळ येण्याची बंदी केली. त्यांना अंतराय घडला, त्यामुळें ते परत गेले. हें ऐकतांच सुकोशलानें सर्वांना निक्षून सांगितलें कीं मी देखील आतां मुनीरूपानेंच भोजन घेईन. नंतर तो चटकन घरांबाहेर पडला.

प्रासुकोद्यानांत मुनी शिळेवर उभे राहून ध्यान करीत होते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुनीनां पाहतांच कुमाराला जातिस्मरण झालें. त्याला आपले पूर्वींचे पांच भव आठवले तें भवांतर खालील प्रमाणें होय.

मलय पर्वतांवर एक उत्तुंग शुभ्र हत्ती राहात असे. त्याचें नांव सिद्धार्थ होतें. त्याच्या पद्मावती व मलया नांवांच्या दोन स्त्रीया होत्या. त्याच्यासह आनंदानें तो आपली कालक्रमणा करीत असतां मलयेनें सवती मत्सराला बळीं पडून सिद्धार्थास पर्वताच्या कड्यावरून खालीं लोटून दिलें. त्यामुळें तो मरण पावला.

अंगदेशांतील चंपापुरींत राजा गंधमादन त्यावेळीं राज्य करीत असे. तो सप्तस्थान गुणधारी होता. दर्शन, अणुव्रत, शील, गुरुसेवा, गुणार्जन, जिनागमप्रविणत्व हे सप्तस्थान होत. राजानें कैलास पर्वतावरील जिनायतनांसारखीं सहस्रकूट मंदिरें पृथ्वीवर बांधलीं. सागरदत्ताची मुलगी सुरुपा चंपापुरींतील नागदत्त श्रेष्ठीला दिली होती. या नागदत्ताच्या पोटीं पूर्वींच्या पद्मावती हत्तीणीचा जीव मरण पावून जन्मास आला. तिचें नांव सुकेशिणी ठेवण्यांत आलें. श्रेष्ठी वरांग हा सुरूपेचा भाऊ होता. तो मोठा धनसंपन्न होता. उन्हाळ्याचे दिवस. वसंत ऋतुचा उत्सव चालला होता. सुकेशिणी जिनमंदिरांत दर्शनाला आली होती. राजाहि मंदिरांत होताच. तिचें रूप पाहून राजानें विचारलें. ही मुलगी कोणाची ? त्यानें उत्तर दिलें कीं,'तुझ्या नागदत्त श्रेष्ठीची मुलगी होय. राजाला आनंद झाला. तो मंदिरांतून श्रेष्ठीच्या घरीं गेला. सुरूपेला मागणी घातली. पण ती म्हणाली 'मी माझ्या भाच्यास जितरंगास देऊं केली आहे.' राजा घरीं परतला. त्याला सुकेशिनीचा लोभ सुटेना. त्यानें आपला पुरोहित नागदत्त श्रेष्ठीकडे पाठविला व मागणी केली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्रेष्ठीनें मान्य केलें. राजा परिवारांसह लग्नासाठीं श्रेष्ठीघरीं आला. श्रेष्ठीनें सुकेशिनीचें लग्न मोठ्या आनंदानें लावून दिलें. राजा तिच्या सहवासांत नानाप्रकारचे भोग भोगीत आपला काळ घालवूं लागला. यांत चार वर्षांचा काळ निघून गेला. गंधमादन राजा आपल्या स्त्रीपरिवारांसह वनांत हत्ती पकडण्यासाठीं गेला. रानांत ठिकाठिकाणीं मोठमोठे खळगे खणून ठेवलेले होते. त्यांत वनहत्तीचा कळप सांपडला. सुकेशिणीनें त्यांना पाहण्याची इच्छा आपल्या दासीकरवीं राजास कळविली. राजानें एका चित्रकारांस त्यांचीं चित्रें काढून सुकेशिणीस दाखविण्याचा हुकूम केला. चित्रकारानें आपल्या कुंचल्यानें हत्तीचीं चित्रें रेखाटण्यास सुरवात केली. तीं चित्रें इतकीं वठलीं कीं, तीं प्रत्यक्ष सजीव हत्तीच भासूं लागलीं. त्याकडे पाहण्यांत सुकेशीनीनें आपला बराच वेळ घालविला.

इकडे राजा त्या वनहत्तींना वश करून परत सुकेशिणीकडे आला. त्यानें राणीसरकारांना हा हत्ती पसंत आहे किंवा नाहीं असें विचारण्यासाठीं एका दुतांस सुकेशिणीकडे पाठवून दिलें. दूत परत निरोप घेऊन आला. हा हत्ती आम्हांस पसंत नसून मलयपर्वतावर अत्यंत सुंदर धिप्पाड हत्ती आहेत. त्यापैकीं एक हत्ती पकडून, पाठवून द्या. असें राणीसरकारांचें म्हणणें आहे. तेव्हां राजा आपल्या सैन्यासह मलयपर्वताकडे जाण्यास निघाला. पर्वतावर आल्यानंतर त्यानें आपल्या सैन्यास त्या हत्तीस पकडण्याची आज्ञा केली. पण तो धिप्पाड हत्ती पाहतांच तें सैन्य घाबरून गेलें. राजानें त्यास मारण्याची आज्ञा दिली. सैनिकानें बाण सोडून त्यास जर्जर केलें. बाणानें तो मरण पावला. त्या मदोन्मत हत्तीचें नंतर दांत व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मौक्तिकें काढून राजापुढें ठेवलीं. राजानें सुकेशिणीला दिली. सुकेशिणीनें ती मोठ्या प्रेमानें छातीस लावलीं. पण चमत्कार हा ती गतप्राण होऊन पडलीं. सुकेशिणी एकाएकीं मेलेली पाहून, राजा आश्चर्यचकित झाला. हा प्रकार नागदत्ता व प्रियंगुतिलका, सुरुपा व वरांग यांना कळला. त्यांनाहि आश्चर्यच वाटलें. त्यांनीं यशोधर मुनीजवळ जिनधर्माचें श्रवण करून दीक्षा घेतली. गंधमादन भूपतीनें मुनींना नमस्कार करून सुकेशिणीचें पूर्वभवांतर विचारलें. मुनींनीं सांगण्यास सुरवात केली.

" दक्षिणप्रांतांत मथुरा नांवाची एक प्रख्यात नगरी आहे. पूर्वी राजा गंधर्व आपल्या गंधर्वे राणीसह मथुरेंत राज्य करीत होता. राजश्रेष्ठी सुदर्शन. त्याची भार्या वीरश्री अत्यंत रूपयौवनसंपन्न होती. श्रेष्ठीपुत्र प्रियंगुदर्शन अत्यंत प्रेमळ देखणा होता. मथुरेंत आणखी एक श्रेष्ठी राहत असे. त्याचें नांव प्रियवंद होतें. त्याची प्रिया विजया तेजस्वी गुणी होती. विजयेची मुलगी कीर्ति मृदुभाषणी, गुणवान होती. तिच्या गुणाची कीर्ति सर्व गात. कीर्तीचें प्रियंगुदर्शनाशीं मोठ्या थाटानें लग्न झालें. पुढें गंधर्व राजानें कांहीं वनहत्ती वनांतून पकडून आणले. त्यांत एक अत्यंत सुंदर मदोमन्त हत्ती होता. हत्तीची लोक प्रशंसा करूं लागले. प्रियंगुदर्शन व कीर्ति यांनाही तो हत्ती पाहून आनंद झाला. एवढेंच नव्हे तर आपणास असेंच सुंदर रूप प्राप्त व्हावें असें निदान बांधलें. सर्पदंशानें दोघेहि मरण पावले. मलयपर्वतावरील गगनचुंबी वृक्षराजींत प्रियंगुदर्शन मरून मलयसुंदर हत्ती झाला. पूर्वीची त्याची भार्या कीर्ति मलया नांवाची हत्तीणी झाली. पूर्वप्रेमामुळें त्यांचें एकमेकांवर अत्यंत प्रेम

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जडले. मलयसुंदराची दुसरी एक भार्या पद्मावती नांवाची होती. मलयेवर मलयसुंदराचें अत्यंत प्रेम होतें. कोणतीहि वस्तु तो प्रथम तिला देई. नंतर पद्मावतीला देत असे. पुढें एकदां सरोवरांत स्नान करून हत्तीनीं दोन कमळें आपल्या सोंडेंत धरून आणलीं. व सहज मलयेचें आपल्यावर कितपत प्रेम आहे; याची परीक्षा घेण्यासाठीं तो मलयेला आपल्या डाव्या बाजूस व पद्मावतीला उजतीला उजवीकडे ठेऊन तो मध्य भागीं उभा राहिला. व त्यानें प्रथम कमल पद्मावतीला दिलें. मलयेला अत्यंत वाईट वाटलें. ती पर्वतावरून पडून मरण पावली. काकतालीय न्यायानें ती पुढें सुकेशिनी जन्मली. कलिंग हत्तीला पाहतांच तिला जातिस्मरण झालें. पद्मावतीचा मलयसुंदराचा सूड उगविण्याची भावना तिच्या मनांत जागृत झाली. म्हणूनच तुला हे राजा ! मलयसुंदरास पकडून आणण्याचा निरोप दिला. तूं हत्ती पकडणें अशक्य झाल्यामुळें तूं मारण्याची आज्ञा दिलीस. पद्मावती आपला गजेश्वर मृत पाहून, दुःखातिरेकानें मरण पावली. सुकेशिणी मौक्तिक व दांत पाहून, आपल्या कृतीची निंदा करीत मरण पावली.

हें भवांतर ऐकून राजानें मुनीना विचारलें. महाराज ! आतां हे पुढें कोठें जन्म घेणार ? हें सांगावें. मुनी उत्तरलें. राजा ऐक !

" सुराष्ट्र देशांतील गिरी नगरींत राजा तीरथ आपल्या गोमती राणीसह राज्य करीत आहे. त्याच्या पोटीं ह्या सुकेशिणीनें जन्म घेतला आहे. तिचें नांव मनोहारि आहे. राजपुरोहिताचें नांव विजय आहे. त्याची प्रिया कुबेरश्री अत्यंत सुंदर आहे. हा मलय-सुंदर हत्ती मरून, कुबेरकांत नांवाचा त्यांचा मुलगा होऊन जन्मला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे. याच नगरींत धनदेव श्रेष्ठी राहातो. तो राजाचा श्रेष्ठी आहे. त्याची भार्या धनश्री. वरांग मरून, श्रीधर नांवानें यांच्या पोटीं जन्मला. श्रीधर व कुबेरकांत हे पुढें जीवश्चकंठश्च मित्र बनले. पुढें कांहीं दिवसांनीं श्रीधराची बायको गच्चीवरून पडून मरण पावली. मित्राला दुःखी पाहून कुबेरकांतानें विचारलें. कां कुशल आहेना ? तेव्हां श्रीधर दुःखित अंतःकरणानें उद्गारला. मित्रा ! तुझी प्रिया रत्नकांवळी ओढून आपल्या घराकडे लगबगीनें जात होती. तिला माझ्या प्रियेनें पाहिलें. पाहतांच ईर्षा उत्पन्न झाली व तिनें प्रासाद शिखरावरून खालीं पडून प्राण दिला. तेव्हां कुबेरदत्त म्हणाला माझी ही प्रिया लवकरच मलयाचलावरून पडून मरणार आहे. असें म्हणतांच त्यास जातीस्मरण झालें. त्यानें आपलें पूर्व चरित्र एका पटावर लिहून काढले. व तो गोसाव्याचा वेष धारण करून ऊर्जयंत पर्वताकडे जाण्यास निघाला. वाटेंत विद्याधर वस्ती लागली. विद्याधरांजवळ राहून त्यानें पुष्कळशा विद्या साध्य करून घेतल्या. मलया नांव घेऊन तो नाचकाम करूं लागला. एकदां तो नृत्य करीत होता. मनोहरीनें त्यास पाहिलें. पाहतांक्षणींच जातिस्मरण झालें. मनोहरीनें आपली दासी कुबेरकांताकडे पाठविली. कुबेर-कांतानें तिच्या दासीस तो पट दिला. त्यावरील पूर्वजन्मींची हकिकत वांचून मनोहरेला मूर्च्छा आली. कुबेरकांतानें नृत्य सोडून तिच्या घरांत प्रवेश केला. तो घरांत शिरतो असें पाहतांच विजय राजानें त्यास हटकलें व विचारलें, तूं एवढा उन्मत्त कसा बनलास ? कुबेरकांत निःश्वास टाकून त्यास म्हणाला ‘ मी मनो-हरीसाठीं मुग्ध बनलो आहे. तिची ही अवस्था माझ्या सारखींच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

झाली आहे. नंतर त्यानें आपलें विद्यासामर्थ्य राजास दाखविलें. राजास आनंद झाला. त्यानें मनोहारींचें स्वयंवर जाहीर केलें. यामुळें राजसंघ चिडून गेला. शेवटीं कुबेरदत्तानें त्या सर्वांना युद्धांत जिंकून, मनोहारीचें विधिपूर्वक पाणीग्रहण केलें. पुढें मनोहारीसह तो सोपारक नगरीस येण्यास निघाला. वाटेंत वीज पडून मरण पावला.

विजयार्द्ध पर्वताच्या दाक्षिण श्रेणीवर, अलकापुरी नांवाची नगरी आहे. तेथें राजा चंडवेग राज्य करीत असे. हा पूर्वींचा श्रीधर होय. यांच्या पोटीं कुबेरकांत मरून विद्युन्माली नांवानें जन्मला. मेघमाली नांवांचा आणखी एक विद्याधर या नगरींत राहात असे. त्याची भार्या विद्युल्लता. या विद्युल्लतेच्या पोटीं मनोहारीनें मुलीचा जन्म घेतला. तिचें नांव विरलवेगा ठेवलें. एकदां चंडवेगाबरोबर विद्युन्माली ऊर्जयंत गिरीवर नेमिनाथाच्या दर्शनास गेला असतां त्या पर्वताचें शिखर वगैरे पाहून त्याला जातिस्मरण झालें व तो मूर्च्छित पडला. शुद्धीवर येतांच त्यानें प्रज्ञप्तिविद्या साध्य करून घेतली. विद्या साध्य होतांच देवी प्रगट झाली. तेव्हां विद्युन्मालीनें देवीला मनोहारीच्या जीवाकडे जाण्यास सांगितलें. देवीला पाहतांच विरलवेगेला जातिस्मरण झालें. हा प्रकार पाहून चंडवेगानें त्याचें उभयताचें लग्न लावून दिलें. हिमवान् पर्वतावरून ते विहार करीत असतां प्रतिसुर्यानें त्यांना ठार केलें. नंतर गंगेच्या नैऋत्येला साकेता नगरी आहे. तेथें सागरसेन नांवाचा श्रेष्ठी राहातो. त्याची भार्या धनश्री. विद्युन्माली मरून त्यांच्या पोटीं सिद्धार्थ नांवानें जन्मला. राजगृही नगरींत श्रेष्ठी समुद्रदत्त आपल्या सुमति भार्येसह राहात असे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विरलवेगा मरण पावून यांच्या पोटीं जयमती नांवानें जन्मली. सिद्धार्थांचें व जयमतीचें लग्न झालें. जयमतीच्या पोटीं चंडवेग मरून सुकोशल झाला."

वरील आपलें व सिद्धार्थाचें भवांतर जाणून सुकोशलानें सिद्धार्थाजवळ दीक्षा ग्रहण केली. जयमति आर्तध्यानानें मरून मगधदेशांतील पर्वतांवर व्याघ्री जन्मली. एकदां चातुर्मासांत त्या पर्वतांवर ते पित्तापुत्र मुनी येऊन राहिले. पारणेसाठीं गांवांत जात असतां वाघिणीनें त्यांना पाहिलें. पूर्वद्वेषानें प्रेरित होऊन तिनें त्या दोघांवर झडप घातली. मुनी संकट आलेलें पाहून कायोत्सर्गानें ध्यान करूं लागले. वाघिणीनें प्रथम सिद्धार्थाचा नंतर सुकोशल मुनीचा प्राण घेतला. मरून ते दोघेहि सिद्धार्थ स्वर्गांत देव झाले. व्याघ्रीनें सुकोशल मुनीच्या हातांवरील तीळ पाहिला. पाहतांच तिला जातिस्मरण झालें. आपल्या कृत्याबद्दल तिला पश्चात्ताप झाला. सिद्धार्थाची मुख्य भार्या श्रीकांतानें दीक्षा घेऊन उग्र तप केलें. व ती स्वर्गास गेली. पद्मावतीचें, वरांगाचे, सुकोशलाचें, हें चरित्र विद्याधर मुनी मुखां तून ऐकून, गंधमादन राजा विरक्त बनला. आपल्या दंतिवाहन मुलास राज्य देऊन त्यानें जिनधर्माची दीक्षा घेतली. गंधमादनाच्या दोन्हीं राण्यांनीं पद्मावती अर्जिकेजवळ दीक्षा घेतली. गंधमादनांनीं भयंकर उग्र तपश्चरण करून मोक्ष प्राप्त करून घेतला.

कथा १२० वी.

" मुनी गजकुमार "

सौराष्ट्र देशांत मोडणाऱ्या द्वारावती नगरींत वसुदेव राजा राज्य करीत असे. वसुदेवाची राणी गंधर्वदत्ता. अत्यंत रमणीय सुंदर होता. त्यांचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुलगा गजकुमार अत्यंत शूर गुणी होता. पोदननगरीचा राजा अपराजित. त्याची राणी अभयपराजिता होती. अपराजिताचा वसुदेवांवर मोठा दांत होता. वसुदेवाविरुद्ध कारस्थान करण्यांत तो आनंद मानी. वसुदेवानें कंठाळून जाऊन गांवांत अशी ग्वाही फिरविली की जो कोणी अपराजितास पकडून आणील त्यास तो मागेल तें देण्यांत येईल. तेव्हां राजकुमारानें तें काम हातीं घेतलें. अपराजितास पकडून आणून त्यानें वसुदेवापुढें उभे केलें. वसुदेवाला अपरिमित आनंद झाला. आनंदाच्या भरांत कुमारास इच्छित वर मागण्यास सांगितलें. कुमारानें नगरांत स्वच्छंदानें फिरण्यास परवानगी असावी असा वर मागितला. राजानें तो दिला. तेव्हांपासून कुमार गांवांत उघडपणें टवाळकी करूं लागला. लोकांच्या स्त्रिया तो उघडपणें भररस्त्यांत भ्रष्ट करी. शेवटीं पंगु श्रेष्ठीची भार्या सुरति हिलाहि त्यानें भ्रष्ट केलें. तो तिच्याशीं उघडपणें व्यवहार करूं लागला. श्रेष्ठी डोळ्यांनीं हा प्रकार पाही पण तो सहन करी. समर्थाबरोबर कोण झगडणार ! त्यांतून कुमार आणि राजाज्ञा ! न्यायाची आशा नाहीं. श्रेष्ठीच्या मनांत पुष्कळसे विचार येत. पण रागावण्याशिवाय त्याला कांहीं करतां येत नसे. कांहीं दिवस गेले. नेमिनाथ तीर्थंकराजवळ धर्माचें श्रवण करून कुमारानें जिनदीक्षा घेतली. विविध प्रकारचें तपश्चरण केलें. एकदां ते फिरत फिरत ऐवतकोद्यानांत आले. ही खबर पंगुश्रेष्ठीस समजली. सूडाची भावना जागृत झाली. लोखंडी खिळे बरोबर घेऊन तो उद्यानांत आला. मुनी ध्यानस्थ होते. त्यानें त्याच्या सर्वांगांत खिळे ठोकले. कुमार मुनीनीं शांतपणें त्या वेदना सहन करीत समाधीपूर्वक प्राण सोडला व मरून स्वर्गांत देव झाले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा १२१ वी

" मुनी सनत्कुमार "

कुरुजांगल देशांतील हस्तिनागपुरांत कुरुवंशीय राजा विश्वसेन राणी सहदेवीसह राज्य करीत असे. त्यांचा पुत्र सनत्कुमार हे चवदावे चक्रवर्ती होत. चक्रवर्तीचें वैभव भोगीत ते आपली सुखानें कालक्रमणा करीत होते. एकदां सौधर्म स्वर्गांत सौधर्मेंद्र सिंहासनावर बसून नृत्य पाहात होते. सभोंवतालीं सभेंत पुष्कळसे इंद्रदेवही बसले होते. ईशान्य स्वर्गांतून संगम नांवाचें देव सौधर्मेंद्राकडे आले, त्यांचें सूर्यासहि लाजविणारे तेज पाहून सर्व देवांना आश्चर्य वाटलें. त्यांनीं इंद्रालप विचारलें. यांना हें दिव्य शरीर कोणत्या तपामुळें, पुण्याईमुळें प्राप्त झालें बरें ! इंद्र उत्तरले. देवानें यापूर्वी आचाम्लवर्धमान तप आचरलें. त्यामुळें याची ही कांति इतकी तेजस्वी बनली आहे. तेव्हां देवानीं पुन्हां विचारलें इंद्रा ! आणखी कोणी याच्या इतका तेजस्वी जगांत आहे कां ? " हस्तिनापुरांत चक्रवर्ती सनत्कुमार यांचें तेज याच्याहूनहि अधिक आहे. असें इंद्रानें उत्तर दिलें. विजय व वैजयंत या दोघां देवांना ईर्षा उत्पन्न झाली. सनत्कुमाराचें रूप पाहण्यासाठीं ते दोघे ब्राम्हणाचा वेष घेऊन, स्वर्गांतून हस्तिनागपुरास आले. राजवाड्यात त्यांनीं प्रवेश केला. द्वारपाळानें ब्राम्हण आल्याची वर्दी राजास दिली. राजाच्या आज्ञेवरून त्यांना आंत नेण्यांत आलें. राजाला त्यावेळीं राजसेवक तेलानें मर्दन करीत होते. राजाचें सौंदर्य पाहून त्यांना अचंबा वाटला. इंद्राच्या म्हणण्याची त्यानां प्रचीति आली. ते सनत्कुमाराला म्हणाले राजन् ! आपलें रूपयौवन इंद्रानें देखील वर्णिलें असून, अगदीं तद्वतच आहे. तेव्हां राजानें आपण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कोण ! कोठून आणि कशासाठीं आलांत ? असें त्यानां विचारलें. देव म्हणाले सौधर्मस्वर्गांत सौंदर्याच्या गोष्टी निघाल्या होत्या. त्यावेळीं इंद्रानें आपल्या सौंदर्याची मनसोक्त स्तुति केली. पण इंद्राच्या म्हणण्यावर आमचा विश्वास बसेना. आम्हीं प्रत्यक्ष खात्री करून घेण्याचें ठरविलें व ब्राह्मणाचा वेष घेऊन येथें आलों आहोंत. इंद्रानें वर्णिल्यापेक्षांहि आपलें रूप अत्यंत तेजस्वी आहे. आपण खरोखरीं पुण्यवान् जीव आहांत. आतां आमचें काम संपलें. आतां आम्हीं आपली रजा घेतो. असें म्हणून ते परत जाण्यास निघाले. तेव्हां चक्रवर्ती हसून म्हणाले. माझ्या रुपाची इंद्रानें प्रशंसा केली. आपणांला माझें खरें. तेज. पाहावयाचें असेल तर आणखी दोन घटका थांबा ! मी स्नान करून कपडे, दिव्यालंकार परिधान करून येतो. मग माझें रूप पाहा ! देव राज्याच्या म्हणण्याप्रमाणें थोडा वेळ थांबलें. स्नानोत्तर राजानें दिव्यालंकर वस्त्रें परिधान केलीं व तो राजसभेंत सिंहासनांवर येऊन बसला. देवहि सभेंत आले. त्याला पाहून म्हणाले राजन् ! रुप, बल, तेज, यौवन, धनादिक, सगळ्या वस्तू इंद्रधनुष्यांप्रमाणें क्षणांत नष्ट होणाऱ्या आहेत. देवाच्या भाषणानें चक्रीला विस्मय वाटला. नंतर देव पुन्हां म्हणाले राजन् ! देवाचें सौंदर्य जन्मल्यापासून मरेपर्यंत सारखेंच राहतें. त्याच्या रूपांत कधींच फरक पडत नाहीं. परंतु मानवाचें तसें नसतें. त्याचें रूप यौवन कमी अधिक होतें. कारण मनुष्य जन्माला येतांच त्याचें जें रूप असतें तें तारुण्यांत नसतें. तारुण्यांत असतें तें वृद्धावस्थेंत नसतें. त्यांच्या रुपागुणांत फरक पडत जातो. आणि ही सर्व सामान्य गोष्ट आहे. वृद्धावस्थेंत तर सौंदर्यशक्ति वगैरे गोष्टी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नष्ट होतात. आणि हें सारे जीवन जीवित असेंपर्यंतच असतें मरणानंतर कांहींच राहात नाहीं. मग त्या देहावर कितीहि मौल्यवान अलंकार पोषाख चढविले तरी तें सौंदर्य प्राप्त होत नाहीं; ही गोष्ट दूरची ! पण थोड्या वेळा पूर्वींच्या व आतांच्या तुझ्या सौंदर्यांत फरक पडलेला आहे. तें थोडें निस्तेज दिसूं लागलें आहे. यामुळें राजा आपल्या शरीराकडे निरखून पाहूं लागला. त्यास आपला देह रुपहीन निस्तेज दिसूं लागला. चंद्रसूर्यासारखे तेजस्वी रत्नहार जरी वक्ष-स्थळांवर रुळत होतें तरी सौंदर्य खुलत नव्हतें. या स्थितीनें चक्रीच्या मनांत वैराग्यभाव उत्पन्न केलें. थोड्याच वेळा पूर्वींचे माझें सौंदर्य आतां निस्तेज दिसतें. तर वृद्धावस्थेंत माझी काय स्थिति होईल ? असा त्याला विचार आला. त्यानें राजपुत्रास राज्यावर बसवून सर्व बाह्याभ्यंतर परीग्रहाचा त्याग करून विशुद्ध हृदयानें विनयंधर मुनी-जवळ दीक्षा घेतली. देव स्वर्गीं निघून गेले.

सहा महिन्यांच्या तपश्चर्येनंतर मुनी आहारासाठीं नगरींत आले. देवदत्तानें त्यांना ताकभाताचा आहार दिला. मुनींनें मोठ्या आनंदानें तो आहार ग्रहण केला. सहा महिन्यांचें उपवासाचें व्रत ग्रहण केलें. मुनींना ज्वर, श्वास, ओली खरूज वगैरे रोग झाले. त्यामुळें त्यांना अत्यंत त्रास होऊं लागला. पण तिकडे लक्ष न देतां ते उग्र तपश्चरण करूं लागले. तपश्चर्याच्या प्राबल्यानें आम, खेल, विष्ठा, जल वगैरे सर्व प्रकारच्या औषधी प्राप्त झाल्या. पूर्वकर्मानुसार भोगाव्या लागत असलेल्या दुःखांना न जुमानतां त्यांनीं शुद्धांःत-करणपूर्वक तपश्चरणाचा मार्ग चोखाळला. औषधी प्राप्त झाल्या तरी आपल्या देहाचा रोग दूर करण्याकडे त्याचा उपयोग केला नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्याचें सर्व सामर्थ्य आत्मोन्नति करण्यांत खर्च होऊं लागलें. सौधर्म स्वर्गांत त्यांची इंद्रानीं स्तुति केली. ही स्तुति न आवडून, त्यांची परीक्षा घेण्यासाठीं पूर्वींचे देव वैद्याचें रूप घेऊन मुनीकडे आले व म्हणाले, महामुने ! आम्ही वैद्य आहोंत. आपल्या शरीराला जडलेल्या व्याधी आम्ही सहज दूर करूं शकतो. मुनी उत्तरले, आपण उत्तम वैद्य असाल ही गोष्ट खरी; या व्याधी दुर कोणीही करू शकेल ! पण माझ्या संसार व्याधी तुम्हीं नष्ट करा ! इतर व्याधी कोणीहि करील ! मुख्य व्याधी सरल्या कीं याहि सरल्या असें समजा ! मुनीच्या भाषणानें देव थक्क झाले. मुनींना त्यांनीं नम्रपणें नमस्कार करून म्हटलें मुनीश्वरा ! आपण महान् विख्यात वैद्य आहांत ! आम्हां पामरांच्या हातून काय होणार? आपण आपल्या तपाच्या प्रभावानें सर्वच व्याधी नाहींशा करण्यास समर्थ आहांत ! नंतर देव स्वर्गास निघून गेले. सनत्कुमार मुनींनीं कर्मांचा नायनाट करून शेवटीं तपश्चर्येच्या जोरावर अनंत सुखाचें मोक्ष-स्थान प्राप्त करून घेतलें.

कथा १२२ वी.

पूर्वीं वैदिश नगरींत राजा प्रजापाल राज्य करीत असे. सुनंदा त्याची सुंदरी मानसहरिणी होती. या राजाचा श्रेष्ठी आनंद अत्यंत धनसंपन्न गुणी होता. आपल्या प्रेमळ स्वभावामुळें तो सर्वांचा चाहता बनला होता. त्याची भार्या सुंदर गुणी होती. त्यांना पद्मावती वगैरे मिळून सात मुली होत्या. सर्वांत लहान मुलगी एणिका. अत्यंत सुंदर होती. तिला श्रेष्ठींनें सागरदत्तास दिली. एणिकेचा मुलगा धर्मवान निघाला. वर्धमान जिनेश्वरांना आपलें पूर्वभवांतर विचारून घेतलें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आपलें आयुष्य थोडें राहिलें असं पाहून, त्यानें परीग्रहाचा त्याग करून सन्मत्ति जिनाजवळ दीक्षा ग्रहण केली. तपश्चरण करीत ते विहार करीत असतां गंगा पार करण्यासाठीं ते नावेवर चढले. दैवयोगानें ती नाव उपडी झाली. गंगेनें आपल्या पोटांत त्यांना स्थान दिलें. समाधिपूर्वक मरून ते मोक्षास गेले.

कथा १२३ वी.

" भद्रबाहू मुनी. "

पौंड्रवर्धन देशांत सांप्रत ज्याला देवकूट म्हणतात पूर्व कोटि नांवाची नगरी होती. नगरीचा राजा सम्राटाधिपति होता. राणी पद्मश्री अत्यंत, प्रेमळ, आवडती होती. राजाचा पुरोहित सोमशर्मा, त्याची भार्या सोमश्री प्रेमळ रूपयौवनसंपन्न होती. त्यांचा मुलगा भद्रबाहू. भद्रबाहू भद्रपरिणामी गुणी होते. ते आपल्या गुणामुळें सर्वांचे आवडते बनले. पुष्कळशा ब्रह्मचारी मुलांसह ते गांवांत खेळत असत. एकदां खेळ खेळतांना तीं सर्व मुलें एकमेकांच्या आंगावर निजलीं. एकंदर चवदा मुलें होतीं. चवदा मुलें एकावर एक निजल्यामुळें तें दृश्य लांबून मोठें विचित्र दिसे. त्याचवेळीं वर्धमान तीर्थंकर मोक्षास गेल्यानंतर त्याच्या १४ गणधरांपैकीं चवथे तीर्थंकर गोवर्धन नेमिनाथाच्या प्रतिमेचें दर्शन घेण्यासाठीं ऊर्जयंत गिरीवर आले. तेथून फिरत फिरत कोटि नगरास आले. नगराबाहेर ही मुलांची लंगोर पाहून, ते म्हणाले कीं, हीं चवदा मुलें आहेत. यांपैकीं पांचवा मुलगा श्रुतकेवलि बनेल ! हें भविष्य ऐकून भद्रबाहूंना गोवर्धनाचे शिष्य बनविण्यांत आलें. गणधरांनीं त्यास विविध शास्त्रांत पारंगत बनविलें. पुढें भद्रबाहूंनीं त्यांचेजवळ

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दीक्षा घेतली. थोड्याच काळांत ते श्रुतकेवलि बनले. कायोत्सर्गानें ध्यान करीत असतां सुरासुरानें येऊन त्यांची भक्तिभावानें पूजा केली. धर्मानुसार आचरण केल्यानें ते थोड्याच काळांत संघाचे पालक श्रुतसागर पालक बनले. गोवर्धन गुरूंनीं नानाप्रकारचें तप आचरून स्वर्ग गांठला.

अवंती देशांत श्रीमान् उज्जयनी नगरी होती. ती अत्यंत मनोहर सरोवरें, विहिरी, वाडे, राजवाडे यांनीं गजबजलेली होती. नगरी-जवळील सिप्रानदीच्या तटावर एक अत्यंत सुंदर उपवन होतें. तें उपवन विविध प्रकारच्या वृक्षांनीं, फुलांफळांच्या झाडांनीं अगदीं गजबजलेलें होतें. त्या उपवनांत चतुर्विधसंघासह भद्रबाहुमुनी येऊन उतरले. त्यावेळीं राजा चंद्रगुप्त उज्जयनींत राज्य करीत होता. तो मोठा सम्यक्त्वी श्रावकधर्मी होता. त्याची देवी सुप्रभा रूपानें तेजस्वी होती. मुनी आहारासाठीं नगरींत शिरले. या घरावरून त्या घरावर फिरत असतां एका घरांत शिरले. घरांत कोणीहि नव्हतें. पण फक्त एक लहान मूल पाळण्यांत निजलेलें त्यांच्या दृष्टीस पडलें. मुलानें मुनींना बाहेर जाण्यास सांगून ते म्हणाले, येथें बारा वर्षेपर्यंत दुष्काळ पडणार आहे. हे मुलाचे बोल ऐकून दीव्यज्ञानी मुनी विचार करीत आहाराशिवाय परत नगराबाहेर आले. अपराण्हीच्या आवश्यक क्रिया करून संघाला उद्देशून म्हणाले, या देशांत अना-वृष्टि होऊन बारा वर्षांचा दुष्काळ पडणार आहे. हा धनधान्य संपन्न देश चोरांकडून लुटला जाईल ! सर्व लोक त्राहि त्राहि होतील ! आपण सर्वांनीं हा देश सोडून, लवणसमुद्राकडे जावें. माझा काळ जवळ आला आहे. मी येथें राहीन. भद्रबाहूच्यां भाष-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

णानें विरागी होऊन चंद्रगुप्त राजानें त्याच्याजवळ दीक्षा घेतली. हेच चंद्रगुप्त पुढें विशाखाचार्य नांवानें प्रसिद्धीस आले. ते मोठ्या संघाचे अधिपति बनले. गुर्वाज्ञेप्रमाणें संघ दक्षिणदिशेकडील पुन्नाट देशाकडे निघून गेले. भद्रबाहु मुनींनीं क्षुत्पिपासा वगैरे परीषहांना जिंकीत त्या प्रांतांत विहार केला. विहार करीत भाद्रपददेशांत आले. तेथें समाधिमरण साधून ते स्वर्गास गेले. दुर्भिक्ष नाहींसें झाल्यानंतर विशाखाचार्य आपल्या संघासह दक्षिणेंतून मध्यप्रांतांत परत आले.

रामिल्ल, स्थवीर व भद्राचार्य दक्षिणेंत न जातां सिंधू देशांत गेले. तिकडून आपल्या शिष्यांसह दुष्काळाच्या वेळीं परत मध्यप्रांतांत आले. भयंकर दुष्काळामुळें अन्न कोणाच्याहि दृष्टीस पडेनासें झालें. भुकेनें व्याकूळ होऊन सर्व लोक हताश हृदयानें आपलें जीवन कंठीत होते. हा प्रकार पाहून यांनीं संघास सांगितलें, आपण रात्रीच्या वेळीं हातांत पात्रें घेऊन भिक्षेसाठीं जात जा. म्हणजे लोकांपासून होणारा त्रास आपल्याला सहन करावा लागणार नाहीं. दुष्काळ सरल्यानंतर पुन्हां आपण प्रायश्चित्त घेऊं. सर्व साधू तसे वागूं लागले. पुढें एके दिवशीं एक नग्न साधू रात्रीच्या वेळीं हातांत पात्र घेऊन श्रावकाच्या घरीं भिक्षेसाठीं गेले. घरांत कोणी नव्हतें. फक्त एक स्त्री होती. ती गर्भवती होती. अंधारांत मुनीची पडछाया पाहून ती भयानें घाबरून गेली. त्यामुळें तिचा गर्भपात झाला. नंतर श्रावक लोक गोळा झाले. त्यांनीं साधूस सांगितलें, काळ कठिण आला आहे. काळाप्रमाणें वागणें इष्ट आहे. पुढें सुस्थिति प्राप्त झाल्यानंतर तुम्हीं आपला वेष परत धारण करा!

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पण सध्यां हें नग्नत्व टाकून द्या ! व आपणांभोंवतीं एक अर्धे वस्त्र गुंडाळा ! भिक्षापात्र हातांत घेऊन रात्रौ भिक्षेसाठीं येत चला. भिक्षा घेऊन गेल्यानंतर दिवसां भोजन करीत चला. श्रावकाच्या म्हणण्या-प्रमाणें मुनी वागूं लागले. पुढें दुर्भिक्ष सरलें. सुस्थिति प्राप्त झाली. रामिल्ल, स्थवीर व भद्राचार्यांनीं आपल्या संघाला बोलावून अर्ध-फालकाचा त्याग करण्याचा उपदेश केला. व आपलें मूळ निर्ग्रंथत्व पत्करण्यास सांगितलें. खऱ्या धर्माची ज्यांना जाणीव होती त्यांनीं त्यांचा उपदेश मान्य केला. तेव्हां हे तिघे आचार्य आपल्या संघा-सह महावैराग्यसंपन्न विशाखाचार्यांकडे आले. अर्धफालकत्वाचा त्याग करून पुन्हां निर्ग्रंथ दीक्षा घेतली.

कांहीं मुनी अर्धफालक व पूर्वीचेच आचार यांना चिकटून बसले. तेव्हांपासून जिनधर्मांत दुही झाली. परमार्थमार्गापासून वंचित तपश्चर्येचें व्रत पाळण्याच्या त्रासांतून मुक्त होऊं इच्छिणाऱ्या लोकांनीं या संघाचें अनुयायित्व पत्करलें. सौराष्ट्र देशांतील वलभी-पुरीचा राजा वप्रवाद मिथ्यात्वी होता. त्याची राणी स्वामिनी अर्धफालक संघाची अनुयायी होती. एकदां राज्यासह ती राज-वाड्याच्या गच्चीवरून नगरीची शोभा अवलोकन करीत असतां राजरस्त्यावरून अर्धफालक साधूंचा संघ भिक्षेसाठीं गांवांत फिरत असलेला त्यांनीं पाहिला. तेव्हां महिपाल राणीस म्हणाले, प्रिये ! तुझा हा साधूसंघ कांहीं शोभनीय दिसत नाहीं. हे नागवेहि नव्हेत, धड वस्त्रधारीहि नव्हेत. ही अर्धवट स्थिति भुतासारखी दिसते. दुसरे दिवशीं संघ नगरींत आला. त्याला उद्देशून राजा म्हणाला, आपण ही अर्धवट स्थिति सोडून देऊन पूर्ण नग्नत्व धारण करणें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बरें ! आणि आपणांस नग्नत्व पसंत नसेल तर शरीर आच्छादित होईल एवढा कपडा तरी वापरूं लागा. साधूंनीं तेव्हांपासून पूर्ण वस्त्र वापरण्यास सुरवात केली. व ते आपणांस केवलिकतीर्थे म्हणूं लागले. पुढें हा संघ जापनसंघ नांवानें प्रसिद्धीस आला.

कथा १२४ वी

कौशांबी नगरींत श्रेष्ठी कुलोत्पन्न इंद्रदत्तादिक बत्तीस श्रेष्ठी राहात असत. ते सर्व श्रावकधर्मी होते. त्यांना समुद्रदत्त वगैरे बत्तीस मुलें होतीं. तींहि अत्यंत धार्मिक होतीं. पुढें सगळे विरक्त बनले. केवलिकडे जाऊन त्यांनीं आपलें पूर्वभवांतर विचारलें. आपलें आयुष्य थोडें राहिलें हें जाणून सर्वांनीं त्याच्याजवळ दीक्षा ग्रहण केली. यमुनेंतून ते पार होत असतां पाण्याच्या प्रवाहांत सांपडले. त्यांतच त्यांना समाधि मिळाली. शुभध्यानांतच समाधि मिळाल्यामुळें ते मरून स्वर्गीं देव झाले.

कथा १२५ वी

मुनी धर्मघोष

चंपापुरी नगरीच्या आसमंतांतील प्रदेशांत मुनी धर्मघोष तपश्चरण करीत होते. मासोपवासानंतर ते पारण्यासाठीं एका गांवाकडे जाण्यास निघाले. वाटेंत रस्ता चुकून ते भटकत भटकत गंगेच्या तीरावर आले. प्रवासाच्या त्रासामुळें ते तहानेनें व्याकूळ होऊन गेले होते. तेव्हां गंगेनें त्यांना एक कळस भरून पाणी पिण्यास दिलें. पण मुनी म्हणाले, तपस्विनि ! अशा प्रकारचें पाणी पिणें आमच्या धर्माच्या विरुद्ध आहे. तेव्हां गंगा पूर्व विदेहांतील जिन-वरांकडे गेली. व म्हणाली, जिनेश्वरा ! माझ्या कांठावर एक मुनी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आले आहेत ते तहानेनें व्याकुळ झालेले आहेत. मी त्यांना पिण्यास प्राशुक जल दिलें. पण त्यांनीं तें घेतलें नाहीं व उलट म्हणाले, 'असें पाणी आम्हीं घेत नाहीं.' तेव्हां जिनवरा ! याचें कारण काय असावें ? जिनवर उत्तरले; तिर्यंच् देव, देवी यांनीं दिलेलें पाणी किंवा अन्न कांहीं असो मुनी घेत नाहींत. व मुनींना घेणें योग्य नाहीं. अशा मुनींना जिनपूजा, सम्यक्त्व प्रातिहार्य करणें योग्य ! अन्नपाणी देणें योग्य नाहीं. जिनेश्वराच्या आज्ञेप्रमाणें देवींनें मुनीवर सारखा थंड पाण्याचा मारा केला. देवांनीं केलेला प्रातिहार्य पाहून मुनी शुक्लध्यानांत लीन झाले. ध्यानामुळें त्यांच्या सर्व घातिकर्मांचा नाश झाला. कर्मे नष्ट होतांच त्यांना केवलज्ञान प्राप्त झालें. केवलींचे मुखांतून देवीनें धर्मश्रवण केलें. त्यांची मोठ्या भक्तिभावानें पूजा करून ती अदृश्य झाली. धर्मघोषमुनींनीं अशेष कर्म चतुष्टयांचा नाश करून निराबाध सुखाचें स्थान मोक्ष प्राप्त करून घेतला.

कथा १२६ वी.

" श्रीदत्तमुनी. "

चंपापुरीचा राजा सिंहरथ सम्यकूदर्शनसंपन्न श्रावक होता. राजराणी सिंहिका नांवाची होती. साकेत नगरीचा राजा अंशुमान सुदृष्टि श्रावक होता. त्याची राणी अंशुमालिनी. इलापुरीचा राजा जितशत्रु त्याची प्रिया इला अत्यंत रूपयौवनसंपन्न होती. हे तिघेहि राजे एकमेकांचे अत्यंत निकटवर्ति व जिवलग स्नेही होते. आपापल्या राज्यांत ते सुखानें कालक्रमणा करीत. नंदीश्वर पर्व आला. इलावर्धन नगरींत जितशत्रु राजानें पूजा सुरूं केली. राजाची दासी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विमलमति हिडिस स्वरूपाची होती. तिचे दांत पुढें आलेले, पोट मोठें, पाय वांकडे असें भूतासारखें रूप होतें. त्यामुळें लोक तिला भीत असत. इलेबरोबर ती पूजेस जाण्यास निघाली. तुझें हें भयंकर स्वरूप पाहून, जिनमंदीरांत येणारे सर्व श्रावक घाबरून जातील! तेव्हां तूं घरीं राहा! समय मंगल आहे. मंगलसमयीं मंगल लोकांनींच जमावें लागतें. असें म्हणून राजानें तिला जाण्यास मज्जाव केला. दासीला अत्यंत दुःख झालें. डोळ्यांत पाणी आलें. ती आर्जवानें म्हणाली, राजा! मी अभागिनीनें अद्याप जिनगुणउत्सव कधींच पाहिलेला नाहीं, जिनाचें मुखकमल पुण्याशिवाय कधींच पाहायला मिळत नाहीं. त्यांतून हा पर्व महान् पर्व गणला जातो. आणि अशा पर्वतीर्थीवर तूं मला जाऊं नको म्हणतोस! असो, तुझी मर्जी. दासी पूजेला गेली नाहीं. ती घरीं उपवास धारण करून राहिली. अष्टान्हिकाचे आठहि दिवस तिनें उपवासांत धर्मध्यानचिंतवनांत घरीं घालविले. उपवासानें तिचें शरीर दुबळें झालें. राजाला ही खबर नव्हती. ती कृश झालेली पाहून तिला विचारलें. दासीनें अष्टान्हिकाच्या उपवासामुळें मी अशी दुबळी झाली आहें असें सांगितलें. राजाला अत्यानंद झाला. तो प्रसन्न होऊन म्हणाला, तुला जें मागावयाचें असेल तें मागून घे. ती म्हणाली, तूं खरोखरीं मजवर प्रसन्न असशील तर आणखी आठ दिवस पूजा चालूं ठेव. राजानें तिच्यासाठीं महान् पूजा सुरूं केली. तिनें पुन्हां आठ उपवास केले व ध्यानांत दिवस घालवूं लागली. ही गोष्ट हिमपर्वतावरील पद्महृदांत राहणाऱ्या श्रीदेवीस कळली. तिनें आपल्या परीवारांसह येऊन सुवर्णकलशांनीं तिला अभिषेक घातला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व तिची मोठी पूजा केली. श्रीदेवीचें रूपवैभव पाहून दासी मूढ बनली व असली विभूति आपणांस प्राप्त होवो असें निदान करून ती मरण पावली. मरून जंबुद्वीपांतील भरतक्षेत्रांत हिमवत पर्वता-वरील पद्महृद् सरोवरांत देवी झाली. ही देवी इलावर्धन गांवांतील लोकांच्या स्वप्नांत येऊन दर्शन देऊं लागली. व आपण श्रीमंदिरांत येऊन भक्तिपुर:स्सर महान् पूजा करा. म्हणजे मी आपणांस इच्छित वर देईन असें सांगूं लागली. भक्तिपुर:स्सर पूजेनें देवता संतुष्ट होऊन प्रसन्न होतात; म्हणून लोकांनीं श्रीमंदिरांत पूजाउत्सव सुरू केला. हा प्रकार इलादेवीला समजला. तिला संतति होत नव्हती. संततीसाठीं तिनें बारा वर्षें व्रतवैकल्यें पूजा केली. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. तिनें श्रीदेवीची पूजा पुत्रप्राप्तिसाठीं करण्यास सुरुवात केली. आपली पूजा इलादेवी करीत आहे असें पाहून, ती स्वयंप्रभजिनांकडे गेली. व म्हणाली, इलादेवीला पुत्र नाहीं. तिच्या पोटीं कोण जन्म घेणार ? जिनेश्वरानें सांगितलें, इला-देवीच्या पोटीं स्वर्गांतून च्यवून एक वर्धमान देव जन्म घेणार आहेत. नंतर ती इलादेवीच्या स्वप्नांत आली व तुला लवकरच पुत्र होणार आहे असें सांगितलें. थोडयाच दिवसांनीं तिला गर्भ राहिला. नऊ मासांनंतर तिनें एका मुलास जन्म दिला. त्याचें नांव श्रीदत्त ठेवण्यांत आलें. साकेताधिपतीनें आपली मुलगी अंशुमति श्रीदत्तांस दिली. अंशुमतीला पोपटाचा फार नाद होता. नेहमीं त्याच्याशीं ती खेळत असे. एकदां तें दांपत्य द्यूत खेळत बसलें होतें. द्यूतांत अंशुमतीनें श्रीदत्तास जिंकलें. तेव्हां पोपटानें दोन रेघा ओढल्या. पण श्रीदत्तानें अंशुमतीस जिंकलें तेव्हां पोपटानें एक रेघ ओढली. त्याचा खोड-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

साळपणा पाहून राजानें रागानें त्याच्या मानेवर फांसे मारले. पोपट मरून व्यंतरदेव झाला.

कांहीं दिवस सुखासमाधानांत गेले. एकदां राजा प्रासादशिखरांवर बसला असतां ढगांचें क्षणोक्षणीं होत असलेलें रूपांतर पाहून त्याच्या मनांत संसाराविषयीं विरक्त भावना उत्पन्न झाली. त्यानें मुलास राज्य देऊन वरधर्ममुनीजवळ दीक्षा घेतली. सर्व शास्त्राचें ज्ञान करून घेतलें. तपश्चरण करीत विहार करूं लागले. विहार करीत पुन्हां या नगरीस आले. ही गोष्ट पोपटाच्या जीवानें व्यंतरदेवानें आपल्या अवधिज्ञानानें जाणली. ते दिवस हिंवाळ्याचे होते. थंडगार वारा त्यानें उत्पन्न केला व त्यांच्या अंगावर त्यानें वर्षाव करण्यास सुरुवात केली. मुनींनीं तो उपसर्ग मोठ्या आनंदानें सहन केला व शेवटीं निर्वाणपद गांठलें.

कथा १२७ वी.

वृषभसेनमुनी.

उज्जयनी नगरींत श्रीमान् राजा प्रद्योत आपल्या ज्योतिर्माला राणीसह राज्य करीत होता. महीपाल एकदां मनोन्मत्त हत्ती धरण्यासाठीं भयंकर पहाडी अरण्यांत गेला. तेथें एका हत्तीस वश केलें. त्यावर आरूढ होऊन तो निघाला. पण हत्ती पुरा माणसाळलेला नव्हता. तो राजास घेऊन पुन्हां अरण्यांत पळत सुटला. हत्ती आपल्या आटोक्याच्या बाहेर गेलेला पाहून राजानें हुषारी करून रस्त्यांत झाडाची फांदी हातीं धरून आपली सुटका करून घेतली. हत्ती बेफाम होता. तो पुढें निघून गेला. राजा झाडावरून खालीं उतरला. रस्त्याची माहिती नव्हती. सांपडेल त्या मार्गानें तो भटकत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भटकत खेटकग्रामाला आला. भुकेनें, प्रवासाच्या श्रमानें तो अगदीं थकून गेला होता. गांवाजवळील विहीरीवर पाणी पिण्यास गेला. जिनपालित नांवाच्या त्या गांवांत राहणाऱ्या गृहस्थाची मुलगी जिनदत्ता त्या विहीरीवर पाण्यासाठीं आली होती. राजानें तिला पाणी मागितलें. तिनें पाणी पिण्यास दिलें व ती घागर भरून घरीं आली व आपल्या पित्यास म्हणाली, बाहेर विहीरीवर एक गृहस्थ आले आहेत. ते दिसण्यांत भव्य सुंदर आहेत. त्यांना आपल्या घरीं बोलवावें. ग्रामकुटानें राजास बोलावून आणलें. कांहीं दिवस राजा तेथेंच राहिला. त्याचे सैनिक त्याचा शोध करीत खेटकग्रामास आले. जिनपालितास प्रद्योत राजा आहे असें कळून चुकलें. त्यानें जिनदत्तेशीं त्याचें लग्न लावून दिलें. राजानें जिनदत्तेला आपली पट्टराणी बनविलें. श्वशुरांस पुष्कळशी धनसंपत्ति देऊन, तो आपल्या नगरीस परत आला व जिनदत्तेबरोबर सुखानें आपला काळ घालवूं लागला.

एके दिवशींची गोष्ट ! राजाचा मुख्य हत्ती पाण्यांत अडकला. ही वार्ता ऐकतांच राजा जिनदत्तेला सोडून नगराबाहेर आला. जिनदत्ता त्या वेळीं श्रृंगार चढवीत होती. राजा गेलेला पाहून तिला राग आला. ही संधि साधून इतर राजराण्या तिला म्हणाल्या, ' पूर्वी असाच राजा एकदां हत्ती धरण्यासाठीं आम्हांला सोडून गेला तो पुन्हां आला नाहीं. तो आमच्यावर प्राणाहून अधिक प्रेम करी. पण आमची स्थिति ही अशी झाली. आतां तुलाहि तो सोडून गेला आहे. तुझीहि गत आमच्यासारखीच व्हावयाची ! यामुळें जिनदत्तेचा राग अनावर झाला. ती आपलें मंदीर सोडून दुसऱ्याच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घरीं जाऊन राहिली. थोड्या वेळानें राजा परत आला. मंदिरांत जिनदत्ता दिसली नाहीं. त्यानें सेवकांस विचारलें कोठें गेली ? आपण गेल्यानंतर जिनदत्तेनें त्या घराचा त्याग केला. एवढेंच नव्हे तर पतिसमागमाचा त्याग करून, ती तपस्वीनी बनून दुसऱ्याच्या घरीं राहावयास गेली आहे. या उत्तरानें राजा रागावला. पण आपण कांहीं गडबड केल्यास लोक आपलीच निंदा करतील. असा पोक्त विचार करून त्या गर्भवती जिनदत्तेस त्यानें स्मशानांत नेऊन सोडलें. जिनदत्ता स्मशानांत आपला काळ कंठूं लागली. नऊ महिने पूर्ण होतांच तिनें एका उत्तम मुलास जन्म दिला. त्याच रात्रीं राजास पहांटें एक स्वप्न पडलें. स्वप्नांत एक उत्तम बैल पाहिला. प्रातर्विधि वगैरे उरकल्यानंतर राजानें मंत्रिजनांना आपलें स्वप्न सांगितलें. तेव्हां मंत्रि म्हणाले, राजन् ! आपण बैल पाहिला त्याअर्थीं आपल्याला पुत्रलाभ झालेला आहे. तेव्हां राजानें अंतःपुरांत सचिवाला चौकशी करण्यासाठीं पाठविलें. सचिवानें चौकशी केली. तेव्हां राण्यांनीं उत्तर दिलें. पतिसंगाशिवाय मुलगा होत नाहीं. आणि आम्ही तर पतीस अंतरलेले आहोंत. मग आमच्या पोटीं मुलगा कसा संभवेल ? या उत्तरानंतर सचिव स्मशानांत जिनदत्तेकडे आला. जिनदत्ता मुलास मांडीवर घेऊन बसली होती. सचिवानें परत येऊन राजास ही हकिकत निवेदन केली. राजास आनंद झाला. मोठ्या थाटानें राजानें जिनदत्तेस परत आणलें. स्वप्नांत वृषभ पाहिल्यामुळें, राजानें पुत्राचें नांव वृषभसेन ठेवलें. कुमार हळूहळू आठ वर्षांचा झाला. कुमाराचा ओढा प्रथमपासूनच धर्माकडे होता. एकदां राजा त्यास म्हणाला, आम्हीं आपणांला राजपट बांधून दीक्षा घेऊं इच्छितों.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यावर वृषभसेन उत्तरले. मानवी राज्यपट मला नको आहे. देव मोक्षादिक संयुक्त राज्यपट मला बांधून नंतर आपण दीक्षा घ्यावी. राजानें त्याची प्रवृत्ति पाहून, सांसारिक उपदेश केला. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यानें दीक्षा घेण्याचेंच ठरविलें. नंतर वृषभसेन अभिनंदनमुनीजवळ आले. अभिनंदनांनीं त्यांना दीक्षा दिली. आगमांत प्राविण्य संपादल्यानंतर ते एकलविहारी बनले.

वत्सकावती देशांतील कौशंबी नगरीजवळील देवघाट पर्वतावर मुनी तपश्चरण करूं लागले. आजूबाजूच्या लोकांना ही वार्ता समजली. तेव्हांपासून कौशंबी नगरीचे लोक त्यांच्या दर्शनास येऊं लागले. त्या नगरींत बुद्धदास नांवाचा एक उपासक राहात असे. तो जिनधर्माचा द्वेष्टा होता. मुनी आहारासाठीं गांवांत आले. तेव्हां बुद्धदास त्या पर्वतावर गेला. मुनी ध्यानस्थ बसतांच ती शिला अग्नीनें तप्त केली व परत घरीं आला. आहारोत्तर मुनी पर्वतावर आले. आपली ध्यानाची जागा तप्त पाहून त्यांनीं आजन्म प्रत्याख्यानाचा नियम घेतला व त्यावर आनंदानें उभे राहून ध्यान करूं लागले. परीषह सहन केल्यामुळें त्यांना केवळज्ञानाची प्राप्ति झाली. ते केवळी बनले.

कथा १२८ वी

" कार्तिकमुनी "

कार्तिक नगरीचा राजा अग्नि. त्याची भार्या वीरवती कलासंपन्न गुणी होती. त्यांना सहा मुली होत्या. त्या सगळ्या विनयी, गुणी, विद्वान्, कलासंपन्न होत्या. बंधुमति, श्रीषेणा, श्रीमती, स्वयंप्रभा, कीर्ति, लक्ष्मीमति, त्यांचीं हीं अनुक्रमें नांवें होत. एकदां नंदीश्वर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पर्वांत या सहाही बहिणींनीं उपवास केला. जिनपूजेचें साहित्य घेऊन त्या जिनमंदिराकडे चालल्या. राजाची दृष्टि त्यांतील सर्वांत लहान मुलगी कीर्ति हिजवर गेली. तिला पाहतांच त्याच्या मनांत कामविकार उत्पन्न झाले. आपल्या भार्येला सोडून त्यानें तिच्याशीं रतिक्रिडा केली. कीर्तीला गर्भ राहिला. नववा महिना लागला. तिला सरोवरांत नाना प्रकारची क्रीडा करावी असे डोहाळे होऊं लागले. ती सरोवरांत विहीरींत क्रीडा करूं लागली. क्रीडेनंतर प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. त्याचें नांव स्वामी कार्तिकेय असें ठेवण्यांत आलें. कीर्तीला पुढें आणखी एक मुलगी झाली. तिचें नांव वीरश्री ठेवण्यांत आलें. वीरश्रीचें लग्न रोहेटक नगरीचा राजा क्रौंच याच्याशीं झालें. कार्तिकेय इतर कुमारांबरोबर खेळ खेळण्यांत आपलें बालपण घालवूं लागले. एकदां असेंच खेळत असतां माता कीर्ति तेथें आली. तिला दुःखीकष्टी पाहून, कुमारानें विचारलें. अंब ! तूं अशी दुःखी कां दिसत्येस ? बाळा, तुझा तात तोच माझा बाप ! याचें मला वाईट वाटतें असें तिनें उत्तर दिलें. कार्तिकाच्या मनावर विपरीत परिणाम झाला. त्यानें विरागी बनून यशोधरमुनीजवळ जिनदीक्षा ग्रहण केली. विविध प्रकारें खडतर तपश्चरण करून ते विहार करीत करीत किष्किंधा पर्वतांवर येऊन राहिले. रात्रीच्या समयाला पाऊस पडत होता. पावसामुळें त्यांच्या अंगावरील मळ धुवून गेला. तो मळ सर्वोषधीप्रमाणें काम देऊं लागला. त्यांत स्नान केल्यानें मनुष्याच्या सर्व व्याधि हरण होऊं लागल्या. पुढें ती जागा पवित्र तीर्थ म्हणून गणली जाऊं लागली. एकदां मुनी आहारासाठीं रोहेटक नगरींत आले. क्रौंच्याची भार्या वीरश्री; ही मुनीची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बहीण. वीरश्री सौधावर बसली होती. मुनींना पाहतांच राजा खालीं आला. त्यानें मुनींना हांकलून दिलें व मयूर विद्येनें त्यांना उंच ठिकाणीं नेऊन बसविलें. ही वेदना मुनींनी सहन केली व मरून ते स्वर्गास गेले.

कथा १२९ वी.

" मुनी अभयघोष "

काकंधी नगरींत राजा अभयघोष आपली प्रिया अभयघोषा राणी-सह राज्य करीत असे. एकदां राजाची स्वारी आपल्या चतुरंग सैन्यासह नगराबाहेर निघाली. रस्त्यांत एक कांसव त्यांना मिळाला. त्याचे चारी पाय बांधून एका काठीवर त्यांस लोंबकळत ठेवलें व तो राजा शहरांत परत फिरला. हें दृश्य पाहण्यास नगरीचे सारे बाळगोपाळ गोळा झाले. सर्वांना मौज वाटूं लागली. तेव्हां राजानें चक्र सोडून त्याचे पाय तोडून टाकले. तो कांसव एका धींवरानें आपल्या घरीं नेला. कांसवाला भयंकर वेदना होत होत्या. त्या वेदनेंतच त्याचा अंत झाला. मरून तो अभयघोष राजाचा चंडवेग नांवाचा मुलगा होऊन जन्मला. आपल्या देवींबरोबर राजा गच्चीवर बसला असतां त्याची दृष्टि आकाशाकडे गेली. त्यावेळीं चंद्रास राहूनें गिळलें होतें. हें दृश्य पाहून त्याला वैराग्य उत्पन्न झालें. नंदनमुनीजवळून त्यानें दीक्षा ग्रहण केली. तपश्चरण करीत नगराबाहेर राहूं लागले.

मुनींना पाहून चंडवेगाला पूर्व वैर आठवलें त्यानें त्यांचे हातपाय कापून टाकले. अभयघोषानें हा उपसर्ग अत्यंत शांततेनं, समतेनें सहन केला. ते केवली बनून मोक्षास गेले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा १३० वी.

' राजा विद्युच्चर '

भरत क्षेत्रांत मिथिला नांवाची नगरी होती. राजा पद्मरथानंतर वामरथ मिथिलेच्या गादीवर बसला. राणी महादेवी बंधुमति रूप-यौवनसंपन्न गुणी होती. राजरक्षपालाचें नांव यमदंड होतें. या नगरींत एक चोर राहात असे. त्याचें नांव विद्युच्चर चोर होतें. त्याला ६४ कला अवगत होत्या. हा रात्रौ नगरींत चोऱ्या करीत असे व दिवसां महारोग्यासारखें रूप घेऊन शहरांत वावरत असे. चोऱ्या करून त्यानें गांवांतलीं उत्तमोत्तम रत्नें आपल्या संग्रहीं आणून ठेवलीं व आपला काळ चोऱ्या करण्यांत व वेश्यागमनांत घालवूं लागला. एकदां तर प्रत्यक्ष राजमहालांत शिरून वामरथाच्या गळ्यांतील हार चोरून नेला. पहाटें यमदंडाला बोलावून आणलें. तो म्हणाला, ' आज रात्रौ महालांत कोणी तरी चोर शिरला होता. त्यानें आम्हांला बेशुद्ध करून सूरदत्त मुक्ताहार पळविला आहे. त्या चोरास त्या हारासुद्धां तूं आठ दिवसांच्या आंत हजर कर ! नाहीं-पेक्षां तुला कडक शासन भोगावें लागेल ! यमदंड चोराच्या तपासास लागला. विहीरी, बागबगीचे, मंदिरें धर्मशाळा सगळीं ठिकाणें शोधून पालथीं घातलीं. चोर सांपडला नाहीं. सहा दिवस असे निघून गेले. सातव्या दिवशीं एका अनाथ वाटसरूला धर्मशाळेंतून पकडून राजा-कडे घेऊन चालला. " यमदंडानें अंजन गुटकेच्या सहाय्यानें इंद्र-जालाचें दर्शन दाखविलें. व मला विनाकारण चोर म्हणून पकडलें. मी गरीब बिचारा प्रवासी आहे. विनाकारण हा माझ्यावर आळ घेत आहे. यांतून मला सोडवा. असें तो रस्त्यांतून जातांना ओरडूं लागला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लोकांना त्याचें म्हणणें कांहीं अंशीं पटलें. व ते यमदंडाची निंदा करूं लागले. जिकडे तिकडे लोकांत याच गोष्टी होऊं लागल्या. कोणी आरक्षकाला विचारी तेव्हां तो म्हणे हा अट्टल चोर आहे. याच्याशिवाय राजाचा हार गेला नाहीं. अशी माझी खात्री आहे. यावर लगेच चोर उत्तर देई. मला यानें सायंकाळच्या वेळीं आपल्या घरीं नेऊन चोरास भोगावी लागणारी शिक्षा भोगविलीं वगैरे गोष्टी गांवांत पसरल्या. यमदंडानें त्यास राजापुढें नेऊन उभे केलें. व म्हणाला, राजा आपणांपुढें हा चोर उभा आहे. हवी ती शिक्षा आपण करावी. तो वाटसरूं राजास नम्रपणें म्हणाला, मी चोर नाहीं. आरक्षक चोर म्हणतो. म्हणो बिचारा! पण प्रथम माझें म्हणणें आपण ऐका! नंतर जें करावयाचें असेल तें करा! राजानें त्यास अभयवचन देऊन म्हटलें, तूं निर्भय आहेस. तुला जें कांहीं सांगावयाचें असेल तें निर्भयपणें सांग. विद्युच्चर निवेदन करूं लागला.

" विद्युच्चर चोर म्हणून जो प्रख्यात आहे, तो हा मी तेव्हां राजा म्हणाला तूं रात्रीं बत्तीस प्रकारच्या वेदना सहन केल्या म्हणतोस त्या कशा! नाना शास्त्र कोविद तो चोर उत्तरला! स्मशानांत राहणाऱ्या साधूंच्या मुखांतून नरकांत भोगाव्या लागणाऱ्या दुःखाचें वर्णन मी बऱ्याच वेळां ऐकलें आहे. त्यापुढें कालचा त्रास कांहींच वाटला नाहीं. म्हणून तो मी आनंदानें सहन केला. राजा चोराच्या भाषणानें विस्मयचकित झाला. त्याला यात कांहींतरी गूढ असावें असें वाटूं लागलें. त्याची परिक्षा घेण्यासाठीं चोरांस पुन्हा अभिवचन देऊन म्हणाला, तुला जें कांहीं मागावयाचें असेल तें माग! मी तुला देण्यास तयार आहें. या अभिवचनाचा फायदा घेऊन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चोरानें माझ्या मित्रास यमदंडास हें आपण अभय द्यावें असे उद्गार काढले. हा यमदंड तुझा मित्र कसा ?

असा राजानें प्रश्न करतांच चोर उत्तरला.

" राजन्! दक्षिण प्रांतांत अभिर नांवाचा एक अत्यंत धनधान्य-संपन्न देश आहे. त्या देशांत विन्या नदीच्या कांठीं विन्या-तटपूर नांवाची नगरी आहे. तेथील राजा जितशत्रू. त्याची भार्या जयमती. त्यांचा मी पुत्र विद्युच्चर. याच नगरीत राजा! यम नांवाचा तळार राहात असे. त्याची भार्या यमुनादेवी. हा यमदंड त्यांचा पुत्र माझा मित्र आहे. बालपण लोटल्यानंतर मी चौर्यशास्त्रांचा अभ्यास केला. हें सर्व शास्त्रांत गुरुतर शास्त्र आहे. यमदंडानें तळाराच्या शास्त्राचें अध्ययन केलें. आम्ही दोघें बाळपणींचे मित्र. एकदां मी त्यास म्हणालों, तूं जेथें आरक्षक बनशील तेथेंच मी चोऱ्या करीन. त्यानेंहि प्रतिज्ञा केली ठीक आहे. तूं चोरीं करशील तेथेंच मीं रक्षक बनेन. नंतर आम्ही आमचा काळ सुखानें घालवू लागलों. मला राज्यावर बसवून अभिनंदन मुनीजवळ वडलांनीं दीक्षा घेतली. यमदंडास त्याच्या वडलांनें अधिकार सोंपवुन दीक्षा ग्रहण केली. राजा आणि तो आरक्षक असें आमचें राज्य चाललें. मी दिवसां राज्य करी व रात्रीं वेष बदलून चोऱ्या करी. पण आरक्षकानें याहि संकटातुन शहराचें उत्तम रीतीनें रक्षण केलें. आपला प्रभू चोर आणि आपण आरक्षक. तेव्हां आपणांस कांहीं करतां येणार नाहीं. या भीतीनें त्यानें त्या पदाचा राजीनामा दिला व आपल्या पदरीं येऊन राहिला. कांहीं दिवस निघून गेले. यमदंडाची परीक्षा घेण्या-साठीं मी नगरीस आलो. हा त्याचा आणि माझा पूर्वापार संबंध होय.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नंतर विद्युच्चरानें आजपर्यंत चोरलेली सर्व संपत्ति, तो हार वगैरे राजसभेंत आणून ठेवलें. ज्याचे त्यानीं आपले धन ओळखून पाहिलें सर्वांनांच आश्चर्य वाटलें. राजानें त्याचा मोठा सन्मान केला व आपणांजवळ ठेवून घेतलें.

विद्युच्चर मिथिला नगरींत असल्याचें विन्यातट नगरींच्या मंत्र्यास समजलें. त्यानीं दुतास पाठवून राजास परत नगरींस चालण्याविषयीं विनंती केली. राजदूत पाहून नगरवासी जनांची तो राजा असल्या-बद्दल पूर्ण खात्री झाली. विद्युच्चर हा राजाचा भाचा होता. राजा त्यास आपली मुलगी देण्यास तयार झाला. पण विद्युच्चराला वाईट वाटलें. तो यमदंडासह आपल्या नगरींस परत आला. त्यानें आपल्या मुलास गादीवर बसवून सर्व परीग्रहाचा त्याग करून आपण सामंत मंत्र्यासह गुणसेन मुनींजवळ दीक्षा घेतली. तो महान् तपस्वी बनला. आपल्या ५०० शिष्यांसह विहार करीत करींत ताम्रलिप्त नगरीस आला. नगरींच्या बाहेर दुर्गादेवींचें मंदीर होतें. ती देवी मुनींना नमस्कार करून म्हणाली :—

पांच दिवस माझा उत्सव आहें लोक माझी पुजा करू लागले आहेत. तो संपेपर्यंत आपण नगरींत जाऊं नये. मुनींनी तिकडे लक्ष दिलें नाहीं. ते सरळ नगरींत गेले. रात्रौ ते ध्यानस्थ बसले असतां देवींने येऊन त्यांना उपसर्ग दिला. मुनीवरानें तो उपसर्ग अगदीं शांतपणें सहन केला. शेवटीं समाधिपूर्वक समाधानानें देह सोडून ते निर्वाणास गेले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा १४१ वी.

" गजकुमार मुनी. "

श्रावस्ती नगरींत ईक्ष्वाकुवंशीय राजा परचिर राज्य करीत असे. त्याची मुख्य राणी पद्मावती नांवाची होती. अनंतवीर्याशिवाय राजाला आणखी ५०० मुलें होतीं. तीं सगळींच मुलें रूपयौवनसंपन्न गुणी वज्रदेही होती. एकदां परीचर राजा आपल्या अंतःपूर परिवारांसह प्रमदा वनांत गेला. तेथील सुदर्शन विहिरींत तो आपल्या पद्मावती, मितप्रभा, व प्रभावती राणीसह क्रीडा करूं लागला. हें दृश्य विद्युद्दंष्ट्राच्या प्रियेनें मदनवेगेनें पाहिलें. त्याच्या सौंदर्याची आपल्या पतीजवळ मनसोक्त स्तुति केली. विद्युद्दंष्ट्राला ही स्तुति आवडली नाहीं. त्याला तिचा मनस्वी राग आला. तिला घरीं सोडून तो पुन्हां वनांत आला. त्यानें मोठमोठ्या भयंकर शिळांनीं ती विहीर झांकून टाकली. त्यामुळें परिचर राजा आंत गुदमरून मरण पावला. आर्तध्यानात मेल्यामुळें तो मरून त्याच रानात रक्तनेत्राचा कृष्णसर्प झाला. पद्मावती वगैरे चार स्त्रिया धर्मध्यान चिंतवनांत मरण पावल्या. त्या मरून पहिल्या स्वर्गांतील स्वस्तिकावर्त विमानांत देवता झाल्या.

तिसऱ्या दिवशीं अनंतवीर्य सहज खेळत खेळत बागेंत आला. तेथें एक अवधिज्ञानीं सागरसेन मुनी एका शिळेवर बसले होते. मुनींना भक्तिपुरःस्सर वंदन करून विचारलें, " माझे पिताश्री कोणत्या गतीस गेले ? " " विद्युद्दंष्ट्राच्या कृत्यामुळें ते मरण पावले. आर्तध्यानानें मेल्यामुळें ते या वनांत भुजंग होऊन जन्मले आहेत. " असें मुनींनी सांगितलें. ' त्यांना धर्मलाभ घडेल काय ? ' असें विचारतांच मुनी उत्तरलें, तो सर्प या बिळांत राहतो आहे. तेथें जाऊन म्हण कीं हे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परिचरा! मुनीकडे चल! तुझे बोल ऐकतांच त्याला जातिस्मरण होईल व तो धर्मग्रहण करील.' मुनी आज्ञेप्रमाणें अनंतवीर्य सर्पाच्या बिलाजवळ आला. त्यानें 'हे परीचरा! आपण धर्मग्रहण करण्यासाठीं मुनीकडे चलावें असें उद्गार काढले. ते ऐकतांच सर्प बिळांतून बाहेर येऊन मुनीजवळ बसला. मुनींनी त्यास धर्माचा उपदेश केला. त्यानें सार्वकालिक उपवास ग्रहण करून देहत्याग केला. मरून नागमंदिरांत नागकुमार नांवाचा देव होऊन जन्मला.

अनंतवीर्यांनीं आपल्या मुलास—सुवासुनंदनास राज्यावर बसवून आपण सर्व बाह्याभ्यंतर परिग्रहाचा त्याग केला. व सागरसेन मुनीजवळ दीक्षा ग्रहण केली व अशेष कर्मांचा नाश करून शेवटीं तो शुद्धात्मा मुक्तीस गेला.

एकदां नागकुमार नंदीश्वर पर्वांत जिनमंदीरांचें दर्शन करण्यासाठीं मंदरपर्वतांवर गेला. पर्वतावर विद्युद्दंष्ट्र विद्याधर कांहीं विद्येचें साधन करीत होता. त्याला पाहतांच नागकुमाराला पूर्वीचा द्वेष आठवला. त्यानें विद्युद्दंष्ट्रास समुद्रांत नेऊन बुडविलें. विद्युद्दंष्ट्र मरून खटखटा नांवाच्या प्रथम नरकास गेला. तेथें तीन पल्यें दुःख भोगून तो तोणिमतपर्वतावर सिंह झाला.

हस्तीनागपुरांत कुरूवंशीय राजा विजयदत्त आपल्या विजया राणीसह राज्य करीत होता. नागकुमारानें नागकुलांतलें आयुष्य संपवून, त्याच्या पोटीं जन्म घेतला. त्याचें नांव गुरुदत्त ठेवण्यांत आलें. बापानें मुलांस राज्यावर बसवून जिनसेन मुनीजवळ दीक्षा घेतली. गुरुदत्त सुखानें राज्यकारभार करूं लागला.

तोणिमत पर्वताच्या आग्नेय दिशेस लाट देश आहे. तो अत्यंत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सुंदर प्रदेश सुपीक आहे. त्या देशांत चंपापुरी नांवाची एक अति-रम्य धनकनकसंपन्न नगरी होती. त्या नगरीचा राजा चंद्रकीर्ति अत्यंत पराक्रमी तेजस्वी होता. चंद्रलेश्या राणी आपल्या रूपानें गुणानें चंद्रासही लाजवीत असे. यांना जिनमति वगैरे आठ मुली होत्या. सगळ्यांत धाकटी अभयमति. हिला गुरुदत्तानें मागणी घातली. राजानें ती अमान्य केली. तेव्हां चिडून गुरुदत्त आपल्या सैन्यानिशीं त्याचेवर चाल करून आला व नगरीस वेढा दिला. दोघांत घनघोर युद्ध झालें. हजारों सैन्य कामास आलें. त्यावेळीं शत्रुपक्षाकडील एका सैनिकानें महेंद्रदत्ताचा हात तोडला. तो हात सौलंकी घेऊन आकाशांत उडाली. या घरावरून त्या घरावर ती घिरट्या घालीत फिरत असतांना तिनें तो हात अभयमतीच्या माहालावर टाकला. तो हात पाहून अभयमतीनें दासीला विचारलें. "हा हात कोणाचा?" दासी उत्तरली. तुझ्यासाठीं जुंपलेल्या रणांत कोणीतरी कोणाचा हात तोडून टाकल्यासारखें दिसतें. इत-क्यांत चंद्रकीर्ति नरेश्वर राजवाड्यांत शिरलें. गुरुदत्तानें त्यांचा परा-भव केला होता. त्यांनीं अभयमतीशीं मुकाटपणें गुरुदत्ताचें लग्न लावून दिलें. गुरुदत्त कांहीं काळ सुखानें घालवीत तेथें राहिला.

एकदां तूणिमत पर्वतांवर राहणारे लोक गुरुदत्ताकडे आले व म्हणाले, राजन्! पर्वतावर एक भयंकर सिंह राहतो. त्यानें आम्हां सर्वांना जर्जर करून सोडलें आहे. तरी आपण आपल्या सैन्यानिशीं जाऊन त्याचा बंदोबस्त करावा. राजा पर्वतावर आपल्या सैनिकां-सह आला. सैन्याचा गलबला, घोड्यांचें खिंकाळणें ऐकून व्याघ्र गूहेंत जाऊन बसला. त्याला मारणें अशक्य झाल्यामुळें राजानें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गूहेच्या तोंडाशीं विस्तव केला. धुरामुळें व जाळामुळें तो गुदमरून भाजून मरण पावला.

चंद्रपुरी नगरींत भववर्मा नांवाचा ब्राह्मण राहात असे. त्याची भार्या विश्वदेवी. व्याघ्र मरून त्यांच्या पोटीं जन्मला. त्याचें नांव कपिल ठेवण्यांत आलें. त्याची भार्या कपिला नांवांची होती. गुरुदत्त अभयमतीबरोबर पुष्कळ वर्षें संसार करून आपल्या परिवारांसह हस्तिनापुरास परत आला. अभयमतीनें भद्र नांवाच्या मुलास जन्म दिला. पुढें धरणीभूषण पर्वतावर अमृताश्रव नांवाचे आचार्य आले. त्यांचा शिष्यपरिवार सातशे मुनींचा होता. मुनी आल्याची वार्ता समजतांच गुरुदत्त त्यांच्या वंदनेसाठीं पर्वतावर गेला. मुनींना वंदन करून राजानें आपलें पूर्वभवांतर मुनीमुखांतून ऐकलें नंतर अभयमतीचें पूर्वभवांतर सांगण्यास सुरुवात केली.

गंधर्वनगरींत गरुडवेग राहात असे. त्याची भार्या गोमती. एकदां विहार करीत समाधिगुप्त मुनी त्या नगरीस आले. गोमतीनें त्यांच्याजवळ मधुमांस मदिरा त्यागाचें व्रत घेतलें. गरुडवेगानें पुष्कळसे पक्षी आपल्या राजवाड्यांत पिंजऱ्यांत कोंडून ठेवले होते. गोमतीनें व्रत घेतल्यामुळें त्यांना पिंजऱ्यांतून बंधमुक्त केलें. राजानें रागारागानें तिला घरांतून हांकलून दिलें. पुढें तूं म्हणजे पूर्वजन्मींची गोमती. चंद्रलेखेच्या पोटीं आलीस. गर्भांत येतांच तुझ्या मातेला जीवदान देण्याचे डोहाळे होऊं लागले. ते डोहाळे राजानें पुरविले. हजारों जीवांचें रक्षण झालें. त्यामुळें तुझें नांव अभयमति ठेवण्यांत आलें.” आपलें भवांतर ऐकून अभयमतीला उपरति झाली. तिनें अभया आर्जिकेजवळ आर्जिकेची दीक्षा घेतली. गुरुदत्तानें आपल्या श्रीदत्त

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुलास राज्य देऊन मुनीजवळ दीक्षा घेतली.

एकदां कपिला दहिभात घेऊन शेतांत आपल्या नवऱ्यास देण्यास गेली. कपिल शेत नांगरीत होता. मध्यान्हाची वेळ झाली. जेवण आलें नाहीं म्हणून तो रागारागानें घरीं आला. कपिला शेतांतून परत घरीं आली. कपिल तिला पुष्कळ बोलला. ती म्हणाली "मी तर शेतांत गेलें होतें. आपण तेथें नव्हता; म्हणून मी परत घरीं आले." "कां तेथें मुनी होते त्यांनीं तुला मी दुसऱ्या शेतांत गेल्याचें सांगितलें नाहीं कां ? मी त्यांना सांगूनच गेलो होतो." कपिला म्हणाली 'मुनींना मी आपल्याबद्दल विचारिलें; पण त्यांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. ते ध्यानस्त होते. कपिलाला मुनीचा भयंकर राग आला. एका हातांत वातांचें भेंडोळें व दुसऱ्या हातांत विस्तव घेऊन तो पुन्हां शेतांत मुनीजवळ आला. मुनीच्या भोंवतीं तें वाताचें भेंडाळें गुंडाळून त्यावर अग्नि ठेवला. मुनींना उपसर्ग होऊं लागला. तो त्यानीं शांतपणें सहन केला. म्हणून त्यांना केवळ-ज्ञान प्राप्त झालें. तेव्हां देव त्याची पूजा करण्यासाठीं स्वर्गांतून आले. देवांनीं मुनीची भक्तिभावानें पूजा केली. हा अतिशय पाहून कपिलाला अत्यंत वाईट वाटलें. कृतकर्माबद्दल त्याला पश्चात्ताप झाला. त्यानें मुनीस नमस्कार करून आपलें पूर्वभवांतर विचारलें. मुनींनीं विद्युद्दंष्ट्रांच्या जन्मापासून आतांपर्यंतची हकिकत त्यास सांद्रपणें निवेदन केली. कपिलाच्या मनावर भयंकर परिणाम झाला. त्याचें फल त्यानें मुनीजवळ दीक्षा घेतली. एकलविहारी बनून ते कोंकण प्रांतांत आले. भयंकर गिरीकंदरांत शुष्क काष्ठांवर रात्रीच्या वेळीं ते ध्यानस्थ बसले. अजाणता एकानें विस्तव फेंकला. मुनी तेथें आल्याची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यास कल्पना नव्हती. विस्तवानें आपलें काम केलें. जिकडे तिकडे ज्वाला पसरल्या. त्यामुळें त्यांना हाय लागूं लागली. पण त्यांनीं तें शांतपणें सहन करून समाधिमरण साधलें. मरून अच्युत स्वर्गांत महर्द्धिक देव झाले.

दुसरे दिवशीं पहाटे तो कोंकणी गिरीकुहरांत परत आला. तेथें मुनीचें प्रेत पाहून, त्यास अत्यंत वाईट वाटलें. आपल्या कृत्याचा त्यास पश्चात्ताप होऊं लागला. पश्चात्तापाच्या भरांत स्वतः अग्नींत पडून मरण पावला. मरून क्षुल्लक देव झाला. तो देव विंध्य पर्वतावर श्वेत हत्ती होऊन जन्मला. तो हत्ती लोकांचा सारखा बळी घेऊं लागला. अच्युतेंद्रानें येऊन त्यास उपदेश केला. त्यांनीं दिलेल्या व्रताप्रमाणें तो हत्ती सम्यक्त्वांनीं वागूं लागला. एकदां वनांत दावानलानें पेट घेतला. सर्व हत्ती न्यग्रोध वृक्षाखालीं गोळा झाले. अग्नीची झळ सर्वांसच लागत होती. पण या हत्तीनें शांतपणें धर्मध्यान करीत ती सहन केली. शेवटीं तो जळून मरण पावला. मरून सहस्रार स्वर्गांतील पद्मगुल्म विमानांत देव झाला. त्याचें आयुष्य अठरा सागराचें होतें. तेथून च्यवून तो राजगृहीचा राजा श्रेणिक त्याच्या धनश्री देवीच्या पोटीं जन्मास आला. धनश्रीला गर्भ राहतांच तिला डोहाळे होऊं लागले. ती नाथांस म्हणाली ‘ आपण मला सर्व सैन्यांसह गहन अरण्यांत विजा चमकत असतां हत्तीवर बसून घेऊन जावें. असें मला वाटतें. व तसेच डोहाळे होतात. व तशाच प्रकारचीं स्वप्नेंहि पडतात. श्रेणिकाला काळजी पडली. त्यानें अभयकुमारास हकिकत कळविली. व याचा कांहीं तरी उपाय करण्याचें त्यास सांगितलें. तो म्हणाला, विजयार्द्धाच्या दक्षिणेला आकाशतिलक नांवाची नगरी आहे. श्रीमान् खचरेंद्र आपल्या कनकमाला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रियेसह राज्य करीत आहे. त्याची कनकचित्रा विद्येचें साधन करीत असतां चित्रगति विद्याधरानें तिच्यावर करपल्लवी विद्येचा प्रयोग केला. ही गोष्ट मनोवती खेचरांस समजली. त्यानें बारा वर्षेपर्यंत पृथ्वीवर राहावें असा त्यास श्राप दिला. तेव्हां तो राजग्रहीस येऊन कामलतेच्या घरीं राहूं लागला. बारा -वर्षें पूर्ण झाल्यानंतर तो जाण्यास निघाला. तेव्हां त्यास मी विद्येबद्दल विचारलें. त्यानें आपल्या सर्व विद्या मला शिकविल्या. आतां मी त्यास त्या विद्येनें बोलावून आणतो. म्हणजे तो धनश्रीचे सर्व डोहाळे पुरवील ! खेचरांचें स्मरण करतांच तो हजर झाला. त्यानें धनश्रीचे डोहाळे पुरविले. नऊ मास पूर्ण झाल्यानंतर धनश्रीनें गजकुमारास जन्म दिला. कांहीं दिवसांनीं सुमतिमुनी राजग्रहीस आले. गजकुमारानें मुनीमुखांतून आपलें पूर्वभवांतर ऐकून घेऊन मुनीजवळ जिनदीक्षा ग्रहण केली. आगमाचें अध्ययन केलें. पुढें ते एकलविहारी बनले.

कलिंग देशांतील दंतिपुरास ते विहार करीत करीत आले. नगरीच्या पश्चिमेकडील गजपर्वतावर ते तपश्चरण करूं लागले.

पुरंदर नगरींत राजा नरसिंह आपल्या सुमति राणीसह राज्य करीत होता. राजाचा मुलगा गुणपाल होता. राजाचा मंत्रि बुद्धदास मोठा गूढमंत्रप्रयोग जाणणारा होता. गजपर्वतावर मुनी ध्यानस्थ बसलेले पाहून बुद्धदासास गुणपालानें विचारलें; इतक्या उंच पर्वतावर जाऊन हे ध्यान करीत आहेत; याचें कारण काय असावें ? बुद्धदास उत्तरला, यांना वात झाला आहे. याच्यावर काय उपाय करावा असें विचारतांच बुद्धदास उत्तरला, वातनाशक औषधांचा उपयोग करावा. बुद्धदास विधर्मी होता. त्याला जैनधर्माच्या मुनीचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

द्वेष होता. मुनी आहारास गांवांत आले म्हणजे त्यांची ही तपश्चर्येची जागा तापवावी म्हणजे त्यांना आराम वाटेल. मुनी भिक्षेसाठीं गांवांत गेले तेव्हां यांनीं ती शिला तापविली. भिक्षेहून मुनी परत आले. शीलेवर उभे राहिले. ती तप्त आहे असें कळतांच त्यांनीं सार्वकालिक उपवास ग्रहण केला. पुढें ते केवलि बनले. व निर्वाणास गेले. हा अतिशय पाहून बुद्धदासांस पश्चात्ताप झाला. त्यानें जिनधर्म स्वीकारला. गुणपालानें नरपालांस राज्यावर बसवून सुमति मुनींजवळ दीक्षा ग्रहण केली.

कथा १३२ वी.

"चिलात-पुत्र."

मगध देशाचा व्यापारी गोपालक पुष्कळशा व्यापाऱ्यांबरोबर प्रवासास निघाला होता. मार्गांत एका गांवीं मुनींना आहारासाठीं फिरतांना पाहिलें. दयेनें प्रेरित होऊन त्यानें मुनीस आहारदान दिलें. पुढें मरून तो जंबुद्वीपांत देव झाला. देवाचें सुख भोगून प्रश्रेणिकाचा चिलात नांवाचा मुलगा होऊन जन्मला.

एकदां प्रश्रेणिकाला 'मुद्रायण कुमाराला' प्रतोद राजानें पकडल्याची वार्ता दूतानें येऊन सांगितली. कुंडकुमारास पुष्कळसें सैन्य बरोबर देऊन प्रद्योत्तांवर पाठविलें. कुंडकुमारानें मुद्रायणांस सोडवून आणलें. प्रद्योताला त्वेष चढला. तो आपल्या सैन्यानिशीं प्रश्रेणिकावर चाल करून गेला. तो आपणांवर चाल करून येत आहे असें कळतांच राजानें जो कोणी त्यास पकडून आणील त्यास इच्छित वर दिला जाईल अशी नगरांत ग्वाही फिरविली. चिलातपुत्रानें पकडण्याचा विडा उचलला. प्रद्योतास जलक्रीडा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करीत असतां त्यानें जाऊन पकडलें. व राजापुढे आणून उभें केलें. राजाला आनंद झाला. त्यानें चिलाताच्या म्हणण्याप्रमाणें बारा वर्षें राज्य भोगण्यास दिलें व आपण जिनदीक्षा ग्रहण केली.

पुढें श्रेणिकानें चिलातांस राज्यावरून हांकलून दिलें. तो आजोळीं येऊन राहिला. मुंडक देश त्यानें जिंकून घेतला व त्याचेवर राज्य करीत सुखाने आपली कालक्रमणा करूं लागला. भर्तृमित्र चिलाताचा जीवश्चकंठश्च मित्र होता. भर्तृमित्राचा मामा भद्रदत्त भर्तृमित्रांस आपली मुलगी सुभद्रा देईना. तेव्हां ५०० राज-सैनिक घेऊन तो मामाकडे गेला. विवाहसमयापूर्वीं सुभद्रा स्नानास बसली होती. तिला उचलून घेऊन निघाला. हा प्रकार श्रेणिकांस कळला. श्रेणिकानें आपलें सैन्य त्याचेवर– पाठविलें. भर्तृमित्रानें भिऊन त्या सुंदरीस ठार केलें. व आपण पळून वैभार पर्वतावर आला. तेथें श्रीदत्तमुनी आपल्या ५०० शिष्यांसह आलेले होते. त्यांना वंदन करून त्यांचेजवळ दीक्षा घेतली. चिलातमित्रांनींहि श्रेणिकाच्या भीतीनें त्याचवेळीं दीक्षा घेतली. कायोंत्सर्गानें ते ध्यान करूं लागले. श्रेणिक त्यांना वंदन करून निघून गेला. सुभद्रा मरून व्यंतरी झाली. विभंगज्ञानानें त्यांना मुनी झाल्याचें पाहून तिनें सौलंकी पक्षाचें रुप धारण केलें. व त्यांचें मस्तकांवर येऊन बसली. आपल्या चोंचीनें त्यांचे डोळे फोडले. मस्तकांवर चोंचीनें व्रण पाडले. त्यामुळें त्यांत किडे झाले. भयंकर वेदना होऊं लागल्या. पण मुनींनें तो उपसर्ग आनंदानें सहन केला. ते आपल्या तपापासून बिलकूल ढळले नाहींत. उपसर्ग सहन करीत ते सर्वार्थसिद्धीस गेले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा १३३ वी

पूर्व विदेहांतील वीतशोक नगरींत राजा अशोक आपल्या अशोका राणीसह राज्य करीत होता. आपल्या शेतांत बैलाचीं तोंडें बांधून, तो बैलांकडून काम घेई व धान्याचा संग्रह करी. स्वयंपाकघरांत काम करणाऱ्यां स्त्रियांचींसुद्धां तो स्तनें बांधून ठेवी व त्यांच्यापासून यथेच्छ काम घेई. या दुष्कृत्यांमुळें त्यास डोकेंदुखीचा भयंकर आजार जडला. वेदनेनें तो अगदीं व्याकूळ होई. पुष्कळ उपाय केले पण आराम पडेना. एकदां एक मुनी भिक्षेसाठीं राजमंदिरांत आले. राजानें उठून त्यांना आहार दिला. आहारदानाच्या पुण्यामुळें त्याचा आजार थोडा कमी झाला. पण तो तात्पुरताच फरक होता. शेवटीं त्या वेदनेंतच तो मरण पावला.

भरतक्षेत्रांत आमलकंठा नांवाचें नगर आहे. त्या नगरीचा राजा अरिष्टसेन. राणी नंदिमति. नंदीमतीच्या पोटीं भरून अशोकानें जन्म घेतला. त्याचें नांव धन्यकुमार. त्याच्या शौर्यास, गुणांस अनुसरून जनतेनें त्याचीं बरींच नांवें ठेवलीं. मदोन्मत्त हत्तींना दमन करण्याची त्यांत शक्ति होती म्हणून त्यास दमदत्त. शीलोद्धरणाचें सामर्थ्य म्हणून अनंतवीर्य. प्रबळ शत्रूंना जिंकण्याचें सामर्थ्य म्हणून अपराजित. सैनिक तर त्यास दुर्योधन म्हणत. मंत्री सुवद्ध त्याचा मामा होता. तो धान्य नांवानेंच त्यास बोलावी. दमदत्तादि नांवांपैकीं एकाहि शब्दाचा तो चुकून उच्चार करीत नसे. म्हणून राजा मंत्र्यावर रागावे. एकदां तर खोडसाळपणानें भरसभेंत मंत्र्यानें धान्यकुमार म्हणून हांक मारिली. राजानें रागावून विचारलें, " तुला दुसरीं नांवें बोलावण्यास नाहींत काय?" मंत्री उत्तरला. मी त्यांच्या खऱ्या नांवानेंच त्यास बोला-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वतो. कारण त्यास दिलेलीं नांवें त्याच्या योग्यतेची नाहींत. मुनीनाच तीं शोभतात. कारण इंद्रियाचें दमन करणारा तो दमदत्त होय. परीषह सहन करणारांना अपराजित. रागद्वेषादि शत्रूंना जिंकणारा जितशत्रु. अशी त्याची व्याख्यां आहे आणि ही मुनींनाच शोभतात. कुमारास मंत्र्याचें उत्तर पटलें. त्यानें त्या नांवांना शोभेल असेंच आचरण करण्याचा निश्चय केला. सुबुद्धानें त्याचा धर्माकडे कल पाहून त्यास योग्य उपदेश केला. पुढें नेमिनाथ केवलि तेथें आले. मुनी आल्याची वार्ता ऐकून कुमार त्यांना वंदन करण्यासाठीं गेला. मुनीच्या तोंडून त्यानें आपलें पूर्वभवांतर ऐकलें. मुनींनीं उपदेश दिला, 'कुमारा ! तुझें आयुष्य आतां थोडें राहिलें आहे. तूं धर्माचा अंगिकार करून कर्मक्षय करशील ! तर निर्वाणास जाशील !'

धन्यकुमारानें दीक्षा घेतली. पूर्वकर्मानुसार आहार घेई; पण तो उलटून पडे. पोटांत अन्नाचा लेशहि जात नसे. तेव्हां एका वैद्यानें त्यांना औषध दिलें. त्यापासून उलटी थांबली. नंतर मुनी प्रायश्चित्त घेत, प्रतिक्रमण करीत पुढें ते सुरगांवास आले. गांवाच्या उत्तरेला यमुनानदीच्या तीरांवर पूर्वेकडे तोंड करून ध्यान करूं लागले. नगरीचा राजा यमुनापंक अत्यंत क्रूर दुष्ट होता. तो आपल्या सैन्यासह मृगयेसाठीं निघाला. रस्त्यांत मुनींना पाहून त्यास अपशकून वाटला. त्यानें मुनीवर बाण सोडले. तो उपसर्ग धन्यकुमारमुनींनीं सहन केला. व ते निर्वाणास गेले. तेव्हांपासून तें क्षेत्र पवित्र मानण्यांत आलें. यमुनापंक राजाला कुष्टरोग झाला. तो आर्तध्यानांत मरून नरकास गेला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कथा १३४ वी

भरत क्षेत्रांत दक्षिणेला कुंभकार नगरी आहे. तेथील राजा दंडवेग. त्याची प्रिया सुव्रता. अत्यंत रुपयौवन गर्विष्ठ होती. राजाचा मंत्रि बालक जिनधर्म द्वेष्टा होता. त्या गांवास अभिनंदनादि ५०० साधु आले. त्यांना बालकानें वादांत जिंकलें. महादेवीनें कोटियंत्र रचून मुनीविषयीं राजाच्या मनांत द्वेष उत्पन्न केला. राजानें त्यांना यंत्रांत पिळलें. ५०० साधूंनीं तो उपवास करून तो त्रास सहन केला. निश्चयानें जगांत काय होत नाहीं ?

कथा १३५ वी

चाणाक्य-मुनी.

पाटलिपुत्रांत राजा नंद राज्य करीत असे. त्याची राणी सुव्रता. राजाचें कवि, सुबंधु व शकट हे लोकविख्यात तीन मंत्रि होते. त्याच नगरांत कपिल नांवाचा ब्राह्मण राहात असे. त्याची भार्या देविला. त्यांचा पुत्र चाणाक्य. चाणाक्य मोठा विद्वान् वेदशास्त्र पारंगत शास्त्रकोविद होता. त्याच्या असामान्य बुद्धिमत्तेमुळें लोक त्यास पूज्य मानीत. यशोमति त्याची भार्या चंद्रमुखी गुणी होती. कपिलाची बहिण बंधुमति कविमंत्रीस दिली. आसमंतांतील राजे लोकांपासून नंद राजाला त्रास होऊं लागला. हें संकट निवारण्यासाठीं शत्रुंना खंडणी देऊन स्वस्त बसविण्यासाठीं कवीस पाठविलें. कवीनें प्रत्यंतवासी राजांना प्रत्येकीं एकेक लक्ष रुपये दिलें.

कांहीं दिवस गेले. राजानें खजिनदारांना विचारलें, भांडारांत किती रुपये शिल्लक आहेत ? "कविमंत्रींनीं सर्व शत्रु राजांना धन देऊन टाकल्यामुळें आतां एकहि कवडी खजिन्यांत शिल्लक नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असें धनपाल उत्तरला. तेव्हां राजानें कवीस त्याच्या पुत्रदारांसह अंधकुपांत ठेवलें. त्याच्या गुणामुळें त्यांना प्रत्येकीं एक भातानें भरलेलें ताट खाण्यास देई. भयाण सुयारांत राहिल्यानें कवि कंटाळून गेला. तो आपल्या कुटुंबास म्हणाला, या ताटांतला भात खाऊन राजाचा बदला घेण्यास कोण तयार होणार ? आणि हें असलें अन्न तरी कोण खाणार ? आपणच खाणें योग्य असें कुटुंबियांचें उत्तर ऐकतांच त्या भयाणकुपांत एका बिळांत तो भात टाकून दिला. अशा दुःसह स्थितींत तीन वर्षें लोटलीं. तें कुटुंब अगदीं मृतवत् दिसूं लागले. ही गोष्ट पसरत पसरत प्रत्यंतवासी राजांच्या कानांवर गेली. त्यांनीं पुन्हां येऊन वेढा दिला. वेढा पडलेला पाहतांच नंदाला कवीचें स्मरण झालें. त्यानें कवीस कूपांतून मुक्त केलें. व त्याची क्षमा मागितली. व त्यास इच्छित वर मागण्यास राजानें विनंति केली. कवि म्हणाला, 'मी माझ्या हातानेंच द्रव्य देईन; तूं देऊं नकोस. राजानें ही गोष्ट मान्य केली.

पुढें कवि द्रव्यासाठीं फिरूं लागला. त्याची चाणाक्याची रस्त्यांत गांठ पडली. चाणाक्य दर्भाचें रान खणीत होता. कवीनें आपण हा दर्भ कां खणून काढतां असें विचारलें. " हे पायाला तीक्ष्ण असल्या-मुळें बोंचतात; त्यामुळें माझे पाय रक्तबंबाळ झाले म्हणूनच मी यांना मूळांसकट उपटून टाकीत आहे असें उत्तर दिलें. " आतां आपण बरेंच खोदलें आहे बस्स करा ! असे कवि म्हणाला. कवीचें आग्रहाचें भाषण ऐकून चाणाक्य विस्मयानें म्हणाला, ' ज्यानें मूळांसकट उपटून टाकलें नाहीं त्यानें जगांत खणलें तरी कसें म्हणावें ? आणि तसें म्हणणें मूर्खपणाचेंच द्योतक होय. म्हणून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दर्भाचें मूळ सांपडणार नाहीं तोंपर्यंत मी खणितच राहणार आहें." चाणाक्याचें उत्तर ऐकून कवीला अत्यंत आश्चर्य वाटलें. नंदाचें कूळ उच्चाटण करील तर हाच करील अशी त्याची खात्री झाली. पुढें त्यानें विचार करून सभेंत एक श्लोक लिहिला,

नरेनैक शरीरेन नयशास्त्र युतेन च ।
व्यवसायेन युक्तेन जेतुं शक्त्या वसुंधरा ॥

"जो मनुष्य तन मन अर्पून नयशास्त्राला अनुसरून एकादें काम पूर्णत्वास नेतो तोच पृथ्वी जिंकण्यास समर्थ होतो." हा श्लोक कांही दिवसांनीं चाणाक्यानें वाचला. त्यानें तो उतरून घेतला. कवीला अति आनंद झाला व पूर्वींची त्याची भावना दृढ झाली. तो चाणाक्याला अनुकूल असा मार्ग आंखण्याच्या उद्योगास लागला.

एकदां कवीस चाणाक्यानें सहकुटुंब जेवण्यास बोलाविलें. निघतांना कवीनें पुष्कळसे दिनार त्याच्या अंगणांत टाकून ठेवले. यशोमतीनें ती उचलून घेतलीं. नंतर ती चाणाक्यास म्हणाली, नाथ! नंद ब्राह्मणांना उत्तम गाई देतात. तरी आपण जाऊन याचना करावी. चाणक्यानें राजाकडे जाऊन मागण्याचें ठरविलें. हें कविमंत्र्यास समजलें. त्यानें राजास गाई देण्याबद्दल उपदेश केला. नंतर कवीनें चाणाक्याला बोलावून आणलें. चाणाक्य राजाजवळ दर्भासन मांडून बसला. तेव्हां कवि म्हणाला, नंद म्हणतात एक ब्राह्मण येत आहे, तरी एक आसन खालीं सरकून बसला. याप्रमाणें त्यास एकेक आसन सरकावीत कवीनें शेवटच्या आसनावर बसण्यास लावलें. शेवटच्या आसनांवर बसतांच त्यास कवी म्हणाले,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राजे शेवटच्या आसनांवर स्वतः बसतो म्हणतात. तरी ते आपण खालीं करावें आणि आपण राजगृहांतून बाहेर जाऊन, दाराशीं उभे राहावें. यामुळें चाणाक्य रागानें लाल झाला तो म्हणाला, आपल्या सारख्या न्यायी माणसाला हें शोभत नाहीं. आमंत्रण द्यावयाचें आणि बाहेर जा म्हणून सांगावयाचें ! शेवटीं त्यास धक्के देऊन बाहेर घालविलें. त्यामुळें तर त्याचा राग कळसास पोंचला. नंदवंश उलथून पाडण्याचा निश्चय करून तो रागारागानें बाहेर पडला व ओरडून म्हणाला. कोणाला निष्कंटक राज्य पाहिजे असेल तर त्यानें मजकडे यावे. मी त्याला देतो. एक मनुष्य त्याला मिळाला. त्यास बरोबर घेऊन त्यानें गांव सोडलें. अत्यंत चपल घोड्यावर बसवून तो बाहेर समुद्रकांठीं आला. समुद्रांत एक किला होता. त्या किल्ल्याचा त्यानें कबजा केला व आपलें राज्य तेथें पकारलें. हीं गोष्ट आसमंतांतील राजांना कळली. त्यांनीं चाणाक्यास मदत केली. सर्वांनीं मिळून नंदास दंड मागितला. नंदानी ती मागणी नाकारली. तेव्हां आपल्या सैन्यांसह ते सर्व नंदावर चालून गेले. युद्धांत चाणाक्याच्या हातून नंद मारला गेला. चाणाक्यानें राज्य बळकावलें. थोडा काळ सुखानें राज्य भोगून तो कारभार पूर्वींच्या मनुष्यास सोंपविला व आपण मतिप्रधान मुनिजवळ सर्व परीग्रहांचा त्याग करून जैनदीक्षा ग्रहण केली.

पुढें ते आपल्या ६०० शिष्यांसह विहार करीत करीत महाक्रौंच्य नगराच्या पश्चिम गोकूळवाड्यांत येऊन उतरले. त्यावेळीं राजा सुमित्र आपल्या विनयमति राणीसह राज्य करीत होता. सुबंधु नंदाचा मंत्रि नंदाच्या मरणानंतर क्रौंच पुरेशांकडे येऊन राहिला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुनीवार्ता समजतांच क्रौंच पुराधिश परिवारासह दर्शनास गेले. सुबंधु बरोबर होता. त्यांना पाहतांच त्यास पूर्वीचें वैर आठवलें. सायंकाळच्या वेळीं मुनीच्या भोंवतीं त्यानें अग्नि पेटविला. या पापानें मरून तो नरकास गेला. अग्नींत सांपडल्यामुळें त्या सर्व मुनींनीं शुक्लध्यान वरलें व तो उपसर्ग सहन केला. समाधिपूर्वक मरण साधून चाण्यक्य मोक्षास गेले. त्यावेळेपासून क्रौंच्य नगरीच्या पश्चिमेला या मुनीच्या पादुका स्थापण्यांत आल्या. अद्यापिही त्याची वंदना साधु लोक करीत असतात.

कथा १३६ वी.

मुनी वृषभसेन

आंध्रप्रांतांत कुडाल नांवाची नगरी होती. तेथें वैश्रवण राजा पद्मावतीसह राज्य करीत असे. त्याचा मंत्रि रिष्टक जैनधर्माचा अत्यंत द्वेष्टा होता. वृषभसेनमुनी आपल्या संघासह त्या नगरीस आले. संघाचें दर्शन घेण्यास राजा आपल्या परिवारासह निघाला. मुनीवंदनास राजा जात आहे हें कळतांच रिष्टकांस राग आला. त्यानें मुनीबरोबर वादविवाद केला व तो वादांत हरला. शेवटीं चिडून त्यानें मुनीच्या वसतिस्थानांस आग लावली. तो उपसर्ग सहन केल्यामुळें मुनी स्वर्गास गेले.

कथा १३७ वी.

"बाल सम्यक्त्वी -- श्रीपाल"

दक्षिणेकडील पुन्नट देशांत तलाटवीपूर नांवांची एक नगरी होती. तेथील राजा गंग शिवभक्त होता. राणी शिवमति अंत्यत सुंदर होती. राजमंत्री पल्लपति मोठा सम्यक्त्वी श्रावक होता. त्याची भार्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

महादेवी. जिनधर्म परायण होती. श्रीपाल नांवाचा त्यांना एक मुलगा होता. वसुपालाचार्य आपल्या संघासह त्या नगरीबाहेर राहात असत. महादेवी गृहकृत्य आटोपल्यानंतर आषाढ शुद्ध चतुर्दशीच्या दिवशीं पंचमीचा उपवास घेण्यासाठीं पूजेचें साहित्य घेऊन मंदिरांत गेली. जिनाची पूजा करून वसुपाल मुनीकडे आली. त्यांचें वंदन करून मुनीजवळ तिनें उपवास ग्रहण केला व तेथें बसली. श्रीपाल-बरोबर होताच. तो मातेस म्हणाला ' तूं उपवासग्रहण केलास मी देखील तुझ्याबरोबर उपवास ग्रहण करीन. कारण उपवासानें पापाचा क्षय होतो तेव्हां मी उपवास करूं कां ? ' माता बरें म्हणाली. मुनींना वंदन करून ते घरीं परत आले.

पंचमीचा दिवस उजाडला. माता-पुत्र दोघेही व्रतस्थ राहिले. मुलाची परीक्षा घेण्याच्या हेतूनें आई बाळांस म्हणाली, ' तुला भूक लागली असल्यास थोडेसें खा ! तुझ्याबरोबरच मी उपवास वरला आहे. " मला मृत्यु आला तरी मी कांहीं खाणार नाहीं. " असें श्रीपालानें प्रत्युत्तर दिलें. मी केवळ थट्टेनें तुला बरें म्हटलें. हें खरें होतें काय ? पण माते ! जिनसाक्षीनें मी हा उपवास ग्रहण केला आहे. मी ज्यांच्याजवळ हें व्रत घेतलें. प्रत्यक्ष त्यांनीं जरी मोडण्यास सांगितलें तरी हें व्रत मी सोडणार नाहीं. मुलाचा निश्चय पाहून माता आनंदली. सायंकाळची वेळ. सूर्य अस्तास चालला होता. कुमाराचें मुख उपवासानें वाळून गेलें. तो अगदीं थकल्यासारखा झाला. सगळ्या त्याच्या अंगांचा दाह होऊं लागला. पुष्कळसे शीतल पदार्थ वरून चोळले तरी कांहीं उपयोग होईना. भोजनाशिवाय हा दाह कमी होणार नाहीं असें सर्वांचें मत पडलें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उजाडल्याशिवाय हा अन्न घेणार नाहीं असें सर्वांना वाटलें. त्यांनीं एक युक्ति केली. घरांत बाहेर दिवे लावण्यांत आले. नंतर माता त्यास म्हणाली 'पहा ऊठ ! उजाडलें आहे. भोजन कर !' तो शांतपणें उत्तरला ' अंबिके ! घाबरूं नकोस ! क्षत्रियकुलोत्पन्न रणांगणास पाठ दाखवीत नाहींत. ते मरतात किंवा मारतात. त्यांना जीविताची आशा नसते. तसेंच या तपाबद्दल एकदां घेतलेला नियम व्रत शेवटपर्यंत पाळणें हें आपलें कर्तव्य. मग कितीहि संकटें सहन करावीं लागोत ! तीं सहन करणें वीराचें काम होय ! तेव्हां दिवस उजाडेपावेतों मी जगलो तर उपवास सोडीन. जीविताची आशा उरणार नाहीं. तर मग मरेपर्यंत मी उपवास करीन. आणि हीच माझी खरी प्रतिज्ञा ! जिनवरांची आराधना करण्यांत काळ घालविणें हेंच आतां माझें ध्येय ' असें म्हणून तो पाण्यांत बसला. दाहाकडे लक्ष न देतां शांतपणें ध्यान करूं लागला. मातेला राहवेना. तिनें आणखी जास्त दिवे लावले व मुलास भोजन कर म्हणूं लागली. पण श्रीपाल उत्तरला 'जोपर्यंत गुरूंचें दर्शन होणार नाहीं तोपर्यंत मी अन्न ग्रहण करणार नाहीं. मातेनें गुरूंना बोलावून आणलें. मुनी म्हणाले 'ऊठ मी भोजनास आलो आहे. तूं भोजन कर.' गुरूचें भाषण ऐकून तो हंसून म्हणाला ' आपल्या कृपाप्रसादेंकरून या संसारसागरांतून मी तरून जाईन. माझ्या व्रताचा भंग केल्यास मी पुन्हा संसारसागरांत बुडेन. आपण संसारसागरतारक आहांत. आपण मला तारावें.' कुमाराचा निश्चय जाणून गुरूंनीं त्यास संसारसागरांतून तरून जाण्याचा उत्तम मार्ग सांगितला. प्रतिक्रमणाचें महत्त्व सांगितलें. श्रीपालानें मोठ्या आनंदानें क्षुत्पिपासा परीषह सहन करून समाधि-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पूर्वक मरण साधलें व शेवटीं मरून तो स्वर्गी देव झाला.

कथा १३८ वी

दक्षिण प्रांतांत ऋषिपत्तन नांवाची एक नगरी होती. तेथील राजा विजयादित्य. मोठा शूर धीर होता. राजश्रेष्ठी नामवादि मोठा सम्यक्त्वी श्रावक होता. त्याची भार्या वसुंधरा. विनयाचार संपन्न शुद्धाचरणी होती. कांहीं दिवसांनीं त्या नगरींत भयंकर दुष्काळ पडला. सर्व लोक भुकेनें व्याकूळ होऊन रानोमाळ भटकूं लागले. माध्यान्हींची वेळ होती. नामवादि मंदिरांतून पूजन करून घरीं आला. जेवणास बसणार इतक्यांत एक तरुण क्षुधेनें तृषेनें व्याकूळ होत्साता त्याच्या घरांत शिरला. श्रेष्ठीपुढचें ताट ओढून त्यानें अधाशीपणानें खाण्यास सुरवात केली. तेव्हां श्रेष्ठी म्हणाला 'मित्रा! हातपाय प्रक्षालन करून शांतपणें भोजन कर. हातपाय धुवून तो पुन्हा जेवावयास बसला. भोजनोत्तर तांबूल घेऊन घराबाहेर पडला. आपल्या कृत्याचा त्यास पश्चात्ताप होऊं लागला. त्यानें आपलें पोट फाडून सर्व अन्न बाहेर काढलें.

त्यामुळें तो तडफडूं लागला. नामवादी त्याला म्हणाला 'पथिका! तूं हें वाईट कर्म केलेस. पण तो परत म्हणाला श्रेष्ठीवर्या! मी केलेलें कर्म अनुचित खरें उष्टें खातांना मला मागचा पुढचा विचार आला नाहीं. ऋषभादि क्रिया केल्यानें उत्तम फळ मिळतें; आहाराला बळी पडून मी जुगुप्सेला पात्र झालो. नंतर तो श्रेष्ठीपासून निघाला.सकल सर्वसंगपरीत्याग करून समाधिमरण साधलें व मरून स्वर्गीं देव झाला.

कथा १३९ वी

'शालिसिक्त' मत्स्य

स्वयंभूरमण समुद्रांत ५०० योजन विस्ताराचा हजार योजन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लांबीच्या कानाचा एक मासा राहात असे. त्याच्या कानांत एक साळीच्या आकाराचा शालिशिक्त नांवाचा मासा राहत असे. तो आपली गुजराण मोठ्या माशाच्या कानांतील मळखाऊन करीत असे. विचारानें तो क्रूर चंचल होता. एकदां या प्रचंड माशानें भोजनासाठीं आपलें बृहन्मुख उघडलें. त्यावेळीं त्या विलासी माशाच्या तोंडांत पुष्कळसे लहान मासे कांसवें आंत शिरलीं. पोट भरल्यानंतर त्या माशानें आपलें तोंड बंद केलें. पुढें सहा महिनेपर्यंत तो मासा स्वस्थ राहिला. त्या अवधींत पुष्कळसे मासे वगैरे जीव त्याचे जवळून जात येत असत. पण त्यांना हा मोठा मासा कधींच त्रास देत नसे. हा प्रकार पाहून तो क्षुद्र मासा आपल्याच मनाशीं विचार करी. खरोखरीं हा मूर्ख आहे. एवढें भक्ष्य उत्तम मासे समोरून जात असून तो त्यांच्याकडे ढुंकूनहि पाहात नाहीं. माझें एवढें मोठें शरीर असतें तर मी एकाहि माशाला माझ्या पुढून जाऊं दिलें नसतें. सर्वांना मी आपल्या उदरांत उदार आश्रय दिला असता. याप्रमाणें विचार करण्यांत त्याचा काळ जाऊं लागला. त्या थोर माशाचाहि काळ पुष्कळशा जिवांची हिंसा करण्यांत जाऊं लागला. कांहीं दिवस लोटल्यानंतर ते दोघेहि मरण पावले. दोघेहि मरून सातव्या नरकास गेले. शालिशिक्त हा लहान; याच्या हातून प्रत्यक्ष हिंसा घडली नव्हती तरी हिंसेच्या परिणामाचें फळ मोठें होतें. म्हणून दोघांनाहि एकाच नरकास जावें लागलें.

कथा १४० वी

" सुभोम चक्रवर्ती "

ईशावती नगरीचा राजा कार्तवीर्य आपल्या रेवती राणीसह

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राज्य करीत होता. सुभोम त्यांचा पुत्र आठवा चक्रवर्तीं होय. विजयसेन हा चक्रवर्तीचा स्वयंपाकी होता. पक्वान्न करण्यांत तो मोठा पटाईत कुशाग्र बुद्धीचा होता. एकदां राजास त्यानें खीर वाढली. ती अतिशय कढत होती. खातांना चक्रवर्तीचा हात भाजला. रागारागानें तें ताट आचाऱ्यांवर भिरकावून दिलें. त्यामुळें भाजून तो मरण पावला. क्षीरसमुद्रापलिकडील रत्नद्वीपांत मरून तो व्यंतर देव झाला. व्यंतर देवानें चक्रवर्तीचा सूड उगविण्यासाठीं तापसाचा वेष घेतला. व चक्रवर्तीकडे आला. बरोबर उत्तम फळें आणलीं होतीं ती त्यानें सुभूतीस दिलीं. फळें पाहून सुभूतीला मोह सुटला. ही फळें कोठून आणलीस म्हणून विचारलें. माझ्या मठांत अशा-प्रकारचीं फळें पुष्कळ आहेत, असें तापस्यानें उत्तर दिलें. राजा फळासाठीं त्याचे बरोबर निघाला. वाटेंत व्यंतर देवानें त्यास समुद्रांत बुडवून मारलें. राजा मरून सातव्या नरकास गेला.

कथा १४१ वी

दोन दरिद्री.

उज्जयनींत दोन दरिद्री राहात असत. रानांतून लांकडे गोळा करून तीं विकून त्यावर पोट भरणें हा त्यांचा धंदा. एकदां जेष्ठ महिन्यांत ते दोघे घनदाट अरण्यांत लाकडे गोळा करण्यासाठीं गेले. लांकडाचे भारे घेऊन ते एका कमल सरोवरापाशीं आले. भारे जमि-नीवर ठेवून त्यांतलें थंड पाणी प्यांले. जवळच झाडाखालीं जाऊन लवंडले. तोंच त्यांना गाढ निद्रा लागली. एकाला स्वप्नांत आपण त्रैलोक्याधिपती बनून सिंहासनावर अधिष्ठित झाल्याचें दिसलें. दुसऱ्या मनुष्यानें त्यास उठविलें. पण झोंपेच्या भरांत तो पुन्हां लवं-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ढला. त्यास गोड गोड स्वप्नें पडूं लागलीं. एका स्वप्नांत आपणांस राज्य मिळालें असून पुष्कळशी संपत्ती आपल्या पायांजवळ लोळत आहे असें त्यांनीं पाहिलें. शेवटीं तो जागा झाला. पाहातों तों तेथें कांहींच नव्हतें. खरोखरीं जन्म स्वप्नासारखा आहे. स्वप्नांतलें राज्य जसें प्रत्यक्ष अनुभवण्यास मिळत नाहीं. तें दुर्लभ असतें तद्वतच हा मनुष्य जन्म व धर्म अत्यंत दुर्लभ आहे.

कथा १४२ वी.

" धनदेव वसंततिलका "

अवंति देशांत धनधान्यसंपन्न उज्जयनी नांवाची एक नगरी होती. तेथें सुहस्त नांवाचा श्रेष्ठी राहात असे. तो बत्तीस कोटींचा धनी होता. त्याची भार्या वसंततिलका एका गणिकेची मुलगी होती. वसंततिलकेच्या पोटीं कामाक्रिडा केल्यानें गर्भ राहिला. पुढें तिला मुलगा व मुलगी अशीं आवळींजावळीं मुलें झालीं. मुलें जन्मतांच तिच्या शरीराला कोड फुटला. त्यामुळें तिचें अत्यंत हाल होऊं लागलें. श्रेष्ठीनें तिला घालवून दिलें. तिला अत्यंत दुःख झालें. मुलें जन्मतांच श्रेष्ठीनें आपणांस टाकलें. माझे सुखाचे दिवस संपले. मला रोग झाला. पूर्वजन्मीं आपण कोणतें पाप केलें होतें त्याचें हें फळ आपणांस मिळालें असें चिंतवून ती विलाप करूं लागली. शेवटीं तिनें गांवाच्या दक्षिणेला एका कांवळ्यांत गुंडाळून मुलीस सोडून दिलें व मुलांस उत्तरेला सोडलें.

प्रयाग नगरीहून येणाऱ्या सुकेतु व्यापाऱ्याला ती मुलगी सांपडली. त्यानें आपल्या प्रियेजवळ दिली. तिनें मोठ्या प्रेमानें तिचें लालनपालन करून तिचें नांव कमला ठेवलें. साकेतनगरीहून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

येणाऱ्या सुभद्र व्यापाऱ्यानें मुलाचा सांभाळ केला. त्याचें नांव धनदेव ठेवलें. वयांत आल्यानंतर कमलेशीं धनदेवाचें लग्न झालें. लग्नोत्तर तें दांपत्य साकेतनगरींत मोठ्या आनंदानें संसार करूं लागले.

पुढें कांहीं दिवसांनीं धनदेव व्यापारासाठीं उज्जयनीस आला. वसंतसेनेवर त्याची नजर गेली. तिच्या प्रेमानें वेडा होऊन तो तिच्याच घरीं राहूं लागला. इकडे कमला पतीवियोगानें दुःखी झाली. मुनीसागरसेन साकेतनगरीच्या उद्यानांत येऊन उतरले होते. कमला त्यांच्या दर्शनास गेली. मुनींना भक्तीभावानें वंदन करून आपल्या पतीराजाची हकीकत विचारली. दिव्यज्ञानी मुनी उत्तरले. तुझा धनी उज्जयनींत वसंततिलका गणिकेच्या घरीं आपले दिवस घालवीत आहे. आणि ती त्याची माता आहे. मुनीच्या उत्तरानें कमला चकित झाली. 'महाराज! वसंततिलका त्यांची या जन्मीची कीं गतजन्मीची माता ? आणि ती कशी ?' असें पुन्हां विचारलें.

त्यावर मुनी तिचा पूर्वापार संबंध सांगूं लागले.

उज्जयनींत सोमप्रभ नांवाचा एक अत्यंत विद्वान् ब्राह्मण राहात असे. त्याला अग्निभूति व सोमभूति नांवाचें दोन पुत्र होते. ते वेदशास्त्र विशारद होते. एकदां ते नगराच्या बाहेरून परत घराकडे येत असतां जिनमंदिरांत दोन साधु व दोघां अर्जिकांना त्यांनीं पाहिलें. वृद्ध मुनीपुढें बसून तरुण अर्जिकाश्रुत ज्ञानाचें अध्ययन करीत होती. हें पाहून सोमप्रभ मुलांना म्हणाला, "बघा! कशी गम्मत आहे.? वृद्ध आर्जिका तरुणाची व तरुण आर्जिका वृद्धाची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भार्या झाली आहे. वृद्धवृद्धाची तरुण तरुणाची जोडी शोभते; पण हें उलट !" वगैरे मुनींचा उपहास करीत ते घरीं आले. पुढें सोमशर्मा मरण पावून वसंतसेनेच्या पोटीं वसंततिलका नांवानें जन्मली अग्निभूति व सोमभूति मरून वसंततिलकेच्या पोटीं जुळी भावंडे जन्मलीं. मुलें जन्मतांच मातेला दारूण रोगानें ग्रस्त केलें. तिनें दोन्ही मुलांना नगराबाहेर नेऊन सोडलें. पुढें त्या दोघांना दोघां व्यापाऱ्यांनीं सांभाळलें. पूर्वीचा अग्निभूति तो तुझा धनदेव पति व सोमभूति तो तुझा जीव कमला. पूर्वजन्मींचा तुमचा पिता तो तुमची माता वसंततिलका. पूर्वकर्मानुसार धनदेव तिच्याशीं संसार करीत असून त्यांना एक मुलगा पण झाला आहे. ही हकीकत ऐकून कमलेला औदासिन्य उत्पन्न झालें. तिनें धर्मश्रवण करून मुनीजवळ क्षुल्लिकेची दीक्षा ग्रहण केली.

नंतर ती उज्जयनीस आली. वसंततिलकेच्या घरांत शिरली. पाळण्यांत मूल रडत होतें. त्यांना पाहून मोठ्यानें म्हणाली "बाळा ! तूं रडूं नकोस ! तूं माझाच मुलगा, भाऊ व दीर आहेस ! तुझा बाप तोच माझा प्राणवल्लभ—तुझी माता तीच माझी माता."

'पुत्रोसि मे शिशो नूनं । भ्रातव्योसि सहोदर ॥
तं देवरोसि मे वत्स । मत्चिदानंद नायक ॥
यस्ते पिता स मे कांतो । बाल प्राणाति वल्लभाः ॥
माक्रंद पुत्र माक्रंद । कमलेती जगौ शिशुम् ॥

कमलेचे उद्गार ऐकून वसंततिलका तिला म्हणाली, "तुला हें बोलणें शोभत नाहीं. तुझ्या म्हणण्याचा अर्थ तरी काय ? कमलेनें मुनीमुखांतून ऐकलेली सारी हकिकत सांगून म्हणाली. मुनी निंदा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

केल्याचें फळ ! आपणांला पुल्लिंग छेदून स्त्रीत्व प्राप्त झालें. हिंसा, असत्य, चौर्य, मैथुन, परीग्रह हीं पापोर्जनाचीं साधनें असून कुकर्म-संतति वाढविणारीं साधनें होत. अपार संसारांत क्रोधादि कषायांना बळीं पडल्यामुळें आपण भटकत आहोंत आतां तरी सावध व्हा ! संसाराचा त्याग करून धर्मसाधन करा." या कमळेच्या उपदेशानें दोघांनीं सम्यवक्त्वाचें सेवन करून श्रावकत्व पत्करलें. ही कथा ऐकून कित्येकांनीं श्रावकत्वाची तर कित्येकांनीं मुनीधर्माची दीक्षा घेतली.

कथा १४३ वी.

मिथिला नगरीचा राजा सुभोग. त्याची भार्या मनोरमा. अत्यंत सुंदर होती. राजपुत्र देवरति अत्यंत गर्विष्टमानी होता. अष्टमद त्यांत पूर्णपणें भरलेलें होते. एकदां देवगणी मुनी आपल्या संघासह राजोद्यानांत येऊन उतरले. मुनींना वंदन करून राजानें आपलें भवांतर विचारलें व पुढें काय होणार ? हेही विचारलें. मुनी पूर्वभवांतर सांगून म्हणाले 'राजा ! तूं आजपासून आठ दिवसांनीं वीज पडून मरण पावशील. मरून तूं आपल्या शौचकुपांतच किडा होऊन जन्मशील'. नंतर हें ऐकून राजानें मुलांस बोलावून आणून ही हकिकत सांगितली. व तो सर्व व्याप सोडून पाणीमहालांत जाऊन राहिला. सातव्या दिवशीं तो वीज पडून मरण पावला. मरून शौचकुपांत पांढरा किडा होऊन जन्मला. किडा पाहून मुलांना व इतरांना आश्चर्य वाटलें. त्यांनीं जैनधर्म पाळण्यास सुरूवात केली.

कथा १४४ वी

" सुदृष्टि मुनी "

उज्जयनी नगरींत राजा प्रजापाळ आपल्या सुप्रभा प्रियेसह राज्य

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करीत होता. राजाच्या पदरीं सुदृष्टि नांवांचा एक विख्यात रत्न-विज्ञान कोविद सोनार होता. त्याच्या स्त्रीचें नांव विमला होतें. सुदृष्टिचा शिष्य वंक. त्याचा व विमलेचा चोरटा संबंध होता. सुदृष्टि विमलेसह शयनमंदीरांत निजला असतां वंकानें त्यास ठार केलें. सुदृष्टि मरून विमलेच्याच पोटीं आला. त्याचें नांव लसत्कुमार ठेवण्यांत आलें. हा आळशी ऐदी निघाला. एकदां राजा उद्यानांत क्रीडा करण्यासाठीं गेला. क्रीडा करीत असतां त्याच्या गळ्यांतील मौल्यवान हार तुटून पडला. हा हार सुदृष्टिनें केलेला होता. असला हार कोणासहि करतां येत नव्हता. राजाला सुदृष्टीची आठवण झाली. ही गोष्ट लसत्कुमारांस समजली. लसत्कुमारानें राज-वाडयांत जाऊन तो हार नीट करून दिला. राजास आश्चर्य वाटलें. त्यानें विचारलें बाळा ! ही सुदृष्टीची विद्या तुला कोणी शिकविली ? सुदृष्टी म्हणाला 'राजा ! मी सुदृष्टीच होय. सुदृष्टी मरून विमलेच्या पोटीं मी पुन्हां जन्म घेतला. पूर्वीं माझी भार्या विमला. आतां माझी माता झाली आहे'. हा जगांतला विचित्र संबंध पाहून राजांस उपरति झाली. त्यानीं अभिनंदन मुनीजवळ जाऊन दीक्षा घेतली. त्याचवेळीं पुष्कळशा लोकांनींहि दीक्षा घेतली. लसत्कुमारानेंहि दीक्षा घेतली. विविध प्रकारचें तपश्चरण करीत ते मुनी सौरी पुरीच्या उत्तरेला गेले. यमुनेच्या पश्चिम तीरांवर ते समाधिपूर्वक मरण साधून निर्वाणास गेले.

कथा १४५ वी.

" – धर्मसिंह – "

कौशलदेशातील कौशलनगरींत राजा धर्मसिंह चंडश्री राणीसह

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राज्य करीत होता. राजपुत्र प्रियेसन अत्यंत विनयाचार संपन्न होता. तो आपल्या गुणांमुळें सर्वांचा आवडता बनला. दक्षिण प्रांतांत कोलागिरी नांवांची एक नगरी होती. तेथील राजा धीरसेन. त्याची प्रिया वीरवती होती. त्यांना चंडवेत नांवाचा मुलगा व खरराई नांवाचीं मुलगी होती. धर्मसिंहानें कांहीं काळ संसार करून दमवर मुनीजवळ दीक्षा घेतली. चंडशी पतिवियोगांत आपला काळ घालवूं लागली. आपली बहिण दु:खी आहे. हें चंद्रभूतांस कळलें. त्यानें मुनीचा शोध करून व्रतापासून त्यांना बरेंच परावृत्त केलें. मुनींनीं पुन्हां विरागी बनून जिनदीक्षा ग्रहण केली. ते कौलगिरीस आले. भिक्षेसाठीं गांवांत फिरूं लागले. हें चंद्रभूतानें पाहिलें. चंद्रभुताला मुनींनेंही पाहिलें. हा मला नेहमीं व्रतापासून परावृत्त करतो तेव्हां आपण आतां कायमचा निश्चय करून ध्यानस्थ व्हावें असें त्यांनीं मनांत ठरविलें. व सर्वसंगत्याग करून त्यांनीं तपश्चर्या करण्यास सुरुवात केली. चंद्रभुतानें मुनीचा पुष्कळसा शोध केला. पण त्यास भेटले नाहींत. धर्मसिंहमुनी समाधिपूर्वक मरण साधून स्वर्गांत देव झाले.

कथा १४६ वी

वृषभसेन

पाटलिपुत्र नगरींत श्रेष्ठी वृषभदत्त राहात असे. त्याची भार्या वृषभश्री व पुत्र वृषभसेन होता. त्या नगरींत धनपति श्रेष्ठी राहत असे. तो अत्यंत धनाढ्य होता. श्रीकांता त्याची भार्या. धनपतीनें आपली मुलगी धनश्री वृषभसेनास दिली. वृषभसेनानें सुखानें संसार करून दमवरमुनीजवळ दीक्षा ग्रहण केली. धनश्री अत्यंत दु:खी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वनली. तिच्या पित्यानें मुनीचा शोध करून त्यांना बांधून आणून तिच्या महालांत सोडलें. मुनी कांहीं दिवस धनश्रीजवळ राहिले. पण पुन्हां त्यांनीं दीक्षा घेतली. पुन्हां श्रेष्ठीनें त्यास धरून आणून धनश्रीजवळ सोडलें. पुन्हां त्यांनीं दीक्षा घेतली. असें चार पांच वेळां घडलें. तेव्हां मुनींनीं आपलें व्रताचरण तडीस नेण्याचा विचार केला. ते दृढनिश्चयी बनून तपश्चरण करूं लागले. समाधिपूर्वक मरण साधून ते स्वर्गांत देव झाले.

कथा १४७ वी

" राजा जयसेन "

जयसेन श्रावस्तीनगरीचा महीपाळ होता. राणी वीरसेना उपासकधर्मी होती. राजपुत्र वीरसेन कलाविज्ञान कुशल गुणी होता. राजा आपल्या राणीच्या सहवासांत सुखानें कालक्रमणा करीत होता. त्याच नगरींत शिवभूति भिक्षुक आपल्या संघासह राहात असे. तो बुद्धधर्माचा प्रसार करी. व राजासहि उपदेश देई. पुढें कांहीं दिवसांनीं वृषभसेनमुनी श्रावस्तीनगरीस आले. जयसेनानें जिनधर्माचें श्रवण करून तो धर्म स्वीकारला. बुद्धधर्माचा त्याग केला व श्रावक बनला. राजानें आपल्या सर्व प्रजाजनांना व सामंत पुरोहितांना जैनी बनविले. पूर्वीच्या बुद्ध मंदिराचें जिनमंदिरांत रूपांतर झालें. शिवगुप्त बुद्ध चिडून गेला. व त्यानें राजाचें उच्चाटण करण्याचें ठरविलें.

पृथ्वीपुरीचा राजा सूमति बुद्धधर्मी बनला. शिवगुप्तास त्यानें आपलें गुरू केले. गुरूनें जयसेनाबद्दल राजाचे कान भरवले. व जयसेनास बुद्धधर्माचा स्वीकार करण्याबद्दल सुमतिराजानें कळविलें.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जयसेनानें तो धर्म स्वीकारला नाहीं. सुमति चिडून सैन्यासह श्रावस्ती नगरीवर चाल करून आला. नगरीबाहेर त्यानें आपल्या सैन्यानिशीं तळ दिला. जयसेनास जो कोणी ठार करून येईल त्यास इच्छित वर दिला जाईल अशी घोषणा आपल्या सैन्यांत करविली. अभिसारक नांवाच्या उपासकानें जयसेनास ठार मारण्याचा विडा उचलला. त्यानें वृषभसेनांजवळ जाऊन जैनधर्माची दीक्षा घेतली. जयसेन मुनींना वंदन करण्यासाठीं आपल्या परिवारांसह आला. मुनीवंदन करून तो मंदिरांत गेला. अभिसारक मुनीहि राजाच्या पाठोपाठ मंदिरांत शिरला. धर्माच्या गोष्टी झाल्यानंतर राजा जाण्यास निघाला. मुनींना वंदन करण्यासाठीं तो खालीं वांकला. अभिसारकानें त्याचें डोकें तरवारीनें उडविलें. राजा मरून पडला. अभिसारकांस कोडें पडलें. हातून गोष्ट घडली, पण हें संकट निवारण करणें कठीण. बाहेर गेल्यास आपली जगांत फजिती होईल. तेव्हां त्यानें पूर्ण विचार करून राजाच्या रक्तानें मंदिराच्या भिंतीवर एक श्लोक लिहिला:—

" मयेदं कर्मणो लोका विहितं नियतं भुवि।
कृतमेददिदं क्षिप्रमाभिसारेण सांप्रतम् ॥

नंतर जिनचरणांजवळ आत्मनिंदा करून आलोचना केली. पंचनमस्कार मंत्राचा जप करीत त्या तरवारीनें स्वतःचें उदर फाडून देहत्याग केला. व मरून स्वर्गांत देव झाला. वीरसेनाला सर्व मुनी संघाचा राग आला. त्यानें उपसर्ग देण्यास सुरुवात केली. सहज तो मंदिरांत शिरला. त्यानें भिंतीवरील एक श्लोक पाहून तो वाचला. वाचतांच त्याचे डोळे उघडले. त्यास कृतकर्माबद्दल पश्चात्ताप

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वाटला. त्यानें मुनीची क्षमा मागून मुनीजवळ श्रावकत्वाची दीक्षा घेतली.

कथा १४८ वी.

शकटाल--मुनी.

पाटलिपुत्रांत नंद राजा राज्य करीत असे. त्याची राणी सुनंदा. अत्यंत गोड स्वभावाची व सर्वांची आवडती होती. राजमंत्री शकटाल मोठा प्रेमळ राजकार्यधुरंधर होता.

वत्सकावती देशांतील कौशांबी नगरींत सुभूति नांवाचा ब्राह्मण आपल्या कपिलाभार्येसह राहात असे. त्यांना दोन पुत्र होते. पहिला पर वेदस्मृति अनभिज्ञ होता. त्याची भार्या सोमिल्ला होती. दुसरा मुलगा अपर वेदशास्त्रसंपन्न लोकविख्यात होता. त्याची भार्या सुप्रभा नांवाची होती. सोमिल्ला, नेहमीं दुःखी दिसे. तिनें दुःखव्रत नांवांचें व्रत ग्रहण केलें. उपवास केला. उपवासाचें पारणें सोडण्यापूर्वीं ब्राह्मणांस विधिपूर्वक दान भोजन देऊन नंतर आपण जेवावें असें होतें. पण तिला त्याचा अर्थ समजला नाहीं. तिनें आपल्या नवऱ्यास मिष्टान्नाचें जेवण घातलें. व त्यासच एक उत्तम काळें वस्त्र व दोन बैल दान दिलें. भोजनोत्तर पर घराबाहेर पडला. भटकत भटकत एका महानिबिड अरण्यांत शिरला. अरण्य हिंस्र पशुंचें मोठें वसतिस्थान होतें. पर भयानें घाबरून गेला. व तेथील देवतेच्या चरणांवर पडला. देवतेनें तूं थोड्याच अवधींत चतुर्वेदज्ञ आणि काव्यनाटकतज्ञ बनशील, असा प्रसन्न होऊन वर दिला. नंतर पर घरीं आला.

कांहीं काळ निघून गेला. कौशांबी नगरीच्या बाहेर वटगांवांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सूर्यशर्मा ब्राह्मण राहात असे. त्याची भार्या वसुमित्रा त्यांना चार मुलें होतीं. हीं अपर ब्राम्हणांजवळ अध्ययनासाठीं राहिलीं. पहिला मुलगा वररुचि एकपाठी होता. दुसरा नमुचि द्विपाठी, तिसरा बृहस्पति त्रिपाठी व चवथा इंद्रदत्त चतुष्पाठी होता. अपर चवघांना एकाचवेळीं ओरडून पाठ सांगे एकपाठी वररुचि तें ग्रहण द्वीपाठीस सांगे. द्विपाठी, त्रिपाटीस, त्रिपाठी, चतुष्पाठीस सांगे. याप्रमाणें त्यांचें अध्ययन चाललें होतें. कांहीं वर्षांनीं ते वेदशास्त्रांत पारंगत बनलें. त्यांचें अध्ययन पूर्ण झालें. गुरुदक्षिणा म्हणून सहस्रगाई देण्याचें ठरवून ते पाटली पुत्रांस नंदाकडे आले. त्याचवेळीं नंद मरण पावला होता. तेव्हां नमुचीनें परकाया प्रवेश विद्येच्या जोरांवर आपला देह सोडून नंदाच्या शरीरांत प्रवेश केला. नंद पुन्हां जीवंत झाला. पूर्वीप्रमाणें राज्यकारभार हाकूं लागला. त्यानें एका-वर्णाच्या हजार गाई वररुची वगैरे ब्राह्मणांस दान दिल्या. वरा-रुचीनीं त्या गाई एका मनुष्याबरोबर गुरुकडे पाठवून दिल्या. अपर गुरुनें रागावून प्रत्येकांस भिन्न भिन्न शाप दिला. नमुचिला मद्यविट्टाल, वररुचीस समारणात्मक, इंद्र दत्तांस महागृहसनुत्थान नावांचा शाप दिला. शापामुळें ते योगीनंदाच्या सेवेंत आपला काळ घालवूं लागले. योगानंदाच्या परीक्षेसाठीं शकटालानें दोषावह मद्य पाजलें. नंदानें रागावून शकटालाला त्याच्या शत पुत्रांसह कारा-गृहांत टाकलें. व त्याना नियमित ठराविक अन्न भाताची परळ खाण्यास देऊं लागला.

त्या नगरींत श्रेष्ठी सागरदत्त राहात असे. त्याच्या भार्येचे नांव, सुनदां. श्रेष्ठीबरोबर जेवणाच्या वेळीं एक पिशाच्च श्रेष्ठींचें रूप घेऊन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जेवण्यास येई. त्यामुळें श्रेष्ठीस भूतबाधा झाली. नंदाला ही गोष्ट कळली. त्याला शकटालाची आठवण झाली. त्यानें त्यास अंधारकोठडींतून मुक्त केलें. शकटालानें श्रेष्ठींचें पिशाश्च मंत्रविद्येनें हाकलून लावलें. शकटाल राजाविषयीं मनांत द्वेषानें धुमसत होता. शकटालाची जागा वररुचीस देण्यांत आली. तेव्हांपासून वररुची राजाजवळ राहूं लागला. एकदां सभेंत वररुचीस म्हणाला आपण चतुर शीघ्रकवि आहांत. आपणांस आम्हीं श्लोकाचा चतुर्थ चरण सांगूं आपण पहिले तीन चरण रचून सांगाल काय? वररुचीनें ही गोष्ट कबूल केली. दुसरे दिवशीं राजानें "रणं टणं टंटण टंटणेति" हा चरण म्हणून दाखविला. आणि म्हणाला आबालवृद्धांना आवडणारे बुधकर्ण रसायन अशा या श्लोकाचे पहिले तीन चरण आम्हास म्हणून दाखवा तेव्हां वररुचीनें :—

"नंदस्य राज्ञो मदविव्हलाया। हस्ताश्च्युतः स्वर्णघटो युवत्याः ॥
सोपानमार्गं श्रित्य करोति शब्दं। रणंटणं टंटण टंटणेति ॥
कपाटमाश्रित्य वरांगणायाः। संदर्शितो यौवन गर्वितायाः ॥
न रोचते तस्य जितेंद्रियस्य। सनुपुरः प्रावर्जितस्य पादः ॥
नाप्यागमोस्ति शलभस्य न मारुतस्य।
स्नेहक्षयो न भवति प्रथम प्रदोषे ॥
अव्यक्त नुपूर रवध्वनि बोधितेन। पारापतेन पतता कृतमंधकारम् ॥
चतुष्कुलकम्

नंतर राजानें आणखी ऐका श्लोकाचें पश्चिम चरण सांगितलें. तें "कर्कशनालं कर्कशनालं" ॥ वररूचीनें त्या श्लोकाचीं पूर्ति करून ते श्लोक उच्चारले :—

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

' क्वापिन मेस्तिहि कारण बुद्धी । स्तस्य पदस्य परस्य न वेत्ता ॥
मामिद मद्य भणिष्यति राजा । कर्कशनालमकर्कशनालम् ॥
उत्पल नालंकृता भरनासा । त्वं नगतः स्थित एव निराद्य
अद्य कृतं कमलं कमलाक्षि । कर्कशनालमकर्कश नालं ॥
अंगुलि तर्जन जर्जरितांगं । शीर्ण विशीर्ण पवित्र पलाशं ॥
अद्यकृतं कमलं कमलाक्षि । कर्कशनालमकर्कशनालं ॥

हे श्लोक ऐकून शकटाल राजास म्हणाला 'राजा ! या श्लोकाच्या अर्थांनीं अंतःपुरांतील स्त्रियांचीं मनें कलुषित होतील व त्यामुळें त्या कुमार्गाला लागतील. तेव्हां राजाला वररूचीचा अत्यंत राग आला. त्यानें ' या दुष्टघरभेद्याचा शिरच्छेद करा ' असा आपल्या नोकरांस हुकूम केला. नोकरांनीं वररूचीस नगराबाहेर नेऊन सोडले. व दुसऱ्याच एका मनुष्याला ठार करून परत आले. वररूची पाटलीपुत्रा-जवळील पलाशग्रामांत जाऊन राहिला.

पुढें कांहीं दिवसांनीं राजपुत्र सुनंदा एका उमद्या घोड्यावर बसून सहल करण्यास निघाला. घोडा जात्याच खट्याळ द्वाड होता. त्यानें राजपुत्रास नेऊन भयंकर निबिड अरण्यांत सोडलें.

रात्र झाली होती. जिकडे तिकडे अंधाराचें साम्राज्य पसरलें होतें. पक्ष्यांचा किर्र आवाज येत होता. राजसुत सुनंदा घोड्यावरून उतरून वटवृक्षावर जाऊन बसला. कांहीं वेळानें एक अश्वल वाघाच्या भीतीनें त्या झाडांखालीं आलें. व झाडावर चढून बसलें. राजा अश्वलाच्या भीतीनें घाबरून गेला. तेव्हां अश्वल त्यास 'म्हणाले तूं घाबरूं नकोस !' इतक्यांत व्याघ्रही वृक्षाखालीं आला. तो अश्वलास म्हणाला 'मित्रा ! तुझ्या या निद्रित मित्रांस खालीं सोड ! माझ्यावर उपकार होतील. अस्वल उत्तरला. 'महारण्यांत सांपडल्यामुळें मला शरण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आलेल्या या निद्रिस्त नंदनंदनांस मी कसा सोडूं ?' यावर व्याघ्र म्हणाला 'अस्वला ! अजून तुला मानवजातीचा अनुभव नाहीं. त्याच्यासारखी कृतघ्नी जात जगांत कोणतीच नाहीं. तरी तूं त्यास खालीं सोड. अस्वलानें कांहीं उत्तर दिलें नाहीं. तो कुमाराजवळ जाऊन निजला. अस्वल निजल्यानंतर तो व्याघ्र कुमारास म्हणाला "राजपुत्रा ! अस्वलास खालीं सोड ! मला अत्यंत भूक लागली आहे. मी खाऊन शांत होईन. सुनंद उत्तरला. व्याघ्रा ! या भयंकर अरण्यांत अस्वलानें माझें प्रथम रक्षण केलें. माझ्या रक्षकाला भक्ष्य म्हणून तुला देण्यास माझें मन तयार होत नाहीं. उपकाराचा मोबदला अपकारानें कसा घ्यावा ?" नंतर कुमारानें अस्वलांस उठविण्याचा प्रयत्न केला. पण तें अगदींच झोंपेनें घेरल्यामुळें रागावून त्यास म्हणाले "कुमारा ! उ–ते–वं–ते–हं–किं–ची–दु–सी–मी. हीं दहा अक्षरें सुटी आहेत या अक्षरांनीं तुझे पुढील कार्य तडीस जाईल. जो कोणी या अक्षरांतून निष्पन्न होणारा अर्थ सांगेल. त्याचें कार्य तडीस जाईल. एवढें सांगून अस्वल व व्याघ्र दोघेहि अदृश्य झाले.

पहाटें सुनंद झाडावरून खालीं उतरून आपल्या घरीं परत आला. राजवाड्यांत तो आपला वेळ लोकांची निंदा करण्यात घालवूं लागला. एकदां नंदानें पलाशकूट गांवच्या लोकांना आज्ञा केली कीं, तुम्हीं आकाशांतून पडलेलें पण जमिनीवर न सांडलेलें पाणी आणून द्या. तसें पाणी न आणाल तर तुम्हांस शिक्षा केली जाईल. सर्वांना कोडें पडलें. असें पाणी कोठें मिळावें याचा ते विचार करूं लागले. सर्व चिंतातूर बनले. कोणांस कांहीं सुचेना. शिक्षेच्या भयानें सर्वांची गाळण उडाली. ती गोष्ट वररूचीस समजली. त्यानें

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सर्वांना आश्वासन देऊन सांगितलें. आपण निर्धास्त असा! मी तुम्हांला त्या प्रकारचें पाणीं उद्यां पहाटे आणून देतो. नंतर दुसरे दिवशीं त्यांनीं दहिंवराच्या पाण्यानी घागरी भरून दिल्या. व राजाकडे घेऊन जाण्यास सांगितल्या. लोकांनीं घागरी राजापुढें आणून ठेवल्या. पाण्याच्या घागरी पाहून राजास आश्चर्य वाटलें. "आपणांस हें पाणी कोठें मिळालें? असें त्यांना विचारलें. "हें उषाजल आहे." असें प्रचाजनांनीं उत्तर दिलें. राजाला राग आला. तो रागावून म्हणाला 'हा असला उपदेश तुम्हांला कोणी दिला? ही असली सल्ला तुम्हांस कोणी सांगितली?' प्रजाजन उत्तरले. 'आमच्या गांवांत एक यक्षदेवता राहाते. ती मनकवडी आहे. तिनेंच आम्हांला हा सल्ला दिला.' या उत्तरानें राजा स्वस्थ राहिला.

पुन्हां दुसरे दिवशीं प्रजेला बोलावून त्यांनीं आज्ञा केली कीं एका मदोन्मत्त हत्तीस धरून आणा. गांवांच्या बाहेरील पश्चिम दिशेची विहीर घेऊन या. व त्या देवतेस दिवसा किंवा रात्रीं न आणतां बरोबर घेऊन या. नंतर प्रजाजन वररूचीकडे गेले. त्यांनीं ही हकिकत त्यास निवेदन केली. राजाच्या आज्ञेप्रमाणें सर्व गोष्टी करून वररूची त्या प्रजाजनांसह राजदरबारीं आला. कुमार पूर्वीची सुटी अक्षरें गुणगुणत होता. तीं ऐकून तो कुमारास म्हणाला, 'या श्लोकाचा तुम्हांस अर्थ सांगतों, तो आपण ऐकावा.

उ— उत्तिष्ठाशु दुराचार सुमित्रत्वं त्वमर्हसि।
स्मर ऋक्षं तथा व्याघ्रं वटे यन्विहितं त्वया॥

ऊठ हे दुराचारी ऊठ! सुमित्रत्वाला—वध—आणि अस्वलाचें वाघाचें स्मरण कर.

*

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ते —ते नराः पुण्यवंतः कौमित्रस्यापकृतं बहु ।
ये मन्यंते महासत्त्वाः कीर्तिव्याप्त दिगंतराः ॥

मित्राच्या उपकाराला जाणतात ते पुण्यवान महाज्ञानी लोकमान्य होत.

वं—वंदितो पचितोत्यर्थं पालितो वालिपुत्रवत् ।
यःपापः पापहीनस्य कां गतिं स प्रयास्यति ॥

दुष्कृत्याच्या समयाला वंद्य झाला वालिपुत्राप्रमाणें ज्याला सांभाळलें तो पापिष्ट कोणत्या गतीस जाईल ?

ते—तेन ते पापरूपेण नर पापदुरात्मनां ।
दह्यते हृदयं किं न शुष्कैधामिव वन्हिना

त्या पापामुळें तो पापिष्ट दुरात्मा जळलेल्या लांकडाप्रमाणें हृदयाला जाळीत नाहीं काय ?

हं— हंति पक्षद्वयं सोऽपि यो नरः साध्यसूयकः
व्याजेन सेवनं कुर्यात् मित्रस्य धनदायिनः

जो कार्यसाधु एका दगडानें दोन पक्षी मारूं पाहातो. तो आपल्या धनवान मित्राचें कपटानें हरण करतो.

किं-- किं ते न समंवैरं कृतमन्यत्र जन्मनि ॥
येन ऋक्षमिमं पापंनिद्रालुंहतु मिच्छसि ॥

या किंवा अन्य जन्मींचा वैर द्वेषभाव नसतांना त्या निद्रिस्त अस्वलाला मारूं पाहतोस ?

चि-- चिरोपार्जित वैराशाः नराः पापं सुदारूणं
न कुर्वते महापाप यथात्वं दुष्टमानसः

हे दुष्ट हृदय ! पिढ्यानुपिढ्या ही द्वेषभावना रुजत आली असली तरी असें दारूण पाप करण्यास मानव धजत नाहीं.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दु— दुष्ट चित्त न किंवोर्त्सि सर्वराद्धातजं पुलं
अत्रामुत्र सुखं नास्ती मित्रवंचनकारिणः ॥

हे दुष्ट हृदया ! मित्राची प्रतारणा करणाऱ्यांना इहपर लोकीं सुख नाहीं हें शास्त्रवाक्य तूं जाणीत नाहींस काय ?

से— सेतुं प्राप्य नदीनं वा सरितः संगमं खल
ब्रह्म हा शुद्धिमायाति कृतघ्नो नैव जातुचित्

सेतु नदी सरोवर संगमावर जरी गेला किंवा त्यांत बुडाला, तरी कृतघ्न शुद्ध होत नाहीं.

मि— मित्रबांधव संत्यक्तः साधुभृत्यपरिच्युतः
अप्रान्पुवन्वने स्थानं कृतघ्नो नरकं व्रजेत्

मित्रांनीं बांधवांनीं ज्याला टाकलें साधुनोकर यांचेपासून जो दूर लोटला गेला त्या कृतघ्नाला रानांवनांत कुठेंहि स्थान मिळत नाहीं. तो नरकास जातो.

हे पापिष्टा ! तूं नगरीचा राहणारा, तुला रानावनांत राहणाऱ्या सिंह अस्वलाचें हृदय कसें ओळखतां येणार ? माझ्या हृदयांत सरस्वती नसते म्हणूनच मी हें तुझें मनांतलें इंगित ओळखूं शकलों. हें वररूचींचें स्पष्टीकरण ऐकून राजाला आनंद झाला. त्यानें त्यास पुन्हां आपल्या पदांवर आरूढ केलें. तेव्हां सभेंतः—

षडंगान्यस्य जिव्हाग्रे । स्वक्रमो येन रक्षितः
सोऽयं गुणी चतुर्वेदी । दैवमाक्रम्य खंडितः ॥

असें इंद्रदत्तानें म्हटलें.

कांहीं दिवस सुखांत निघून गेले. एकदां महापद्मसूरि आपल्या संघासह त्या नगरीस आले. शकटाल मुनीदर्शनास उद्यानांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गेला. भक्तीपुरःस्सर त्यांचें वंदन करून, मुनीजवळ दीक्षा घेतली. पुढें शकटाल महान् तपस्वी व ज्ञानी बनले. व शेवटीं आचार्य झाले. शकटालाच्या मागें वररूचीचें साम्राज्य माजलें. राजा त्याच्या अंकित राहूं लागला. कांहीं दिवसांनीं शकटाल मुनी भोजनासाठीं नगरींत आले. वररूचीच्या मनांत पूर्वींचा द्वेष जळत होता. मुनी राजवाड्याच्या अंतःपुरांत आहारास गेले होते. आहार घेऊन बाहेर पडले. याचा फायदा घेऊन वररूचीनें राजाच्या कानांत विष ओतलें. तुझ्या अंतःपुरांत हा पापी भिक्षेच्या मिषानें शिरला होता. त्याची भावना अत्यंत दुष्ट होती. अंतःपुरांत त्याचा झालेला सन्मान, राजा! तुला पाहवणार नाहीं. ऐकवणार नाहीं. वररूचीचें काम झालें. राजा रागानें बेहोष झाला. त्यानें आपल्या लोकांना शकटाल मुनीकडे पाठवून दिले. शकटालांनीं सर्व वृत्तांत जाणून आलोचनापूर्वक सर्व शरीराचा त्याग करून पंचनमस्कार मंत्राचा जप करीत आपल्या पोटांत सुरी खूपसून प्राण सोडला. मरून ते स्वर्गास गेले.

पुढें शकटाल निर्दोषी असल्याचें राजास कळून आलें. त्याला आपल्या कृत्याचा भयंकर पश्चात्ताप झाला. त्यानें महापद्म मुनीजवळ जिनधर्माचें श्रवण करून श्रावकत्वाची दीक्षा घेतली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi